म. ग्रं. सं. ठाणें

विषय: चरित्र

संग्रहालय क्रमांक

लेखक

सन: १८८२

पुस्तकाचें नांव: परशुरामपंत भाऊ पटवर्धन

२८०

इ. ५. १८८२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

...जकमंडळीनें पसंत केलें आहे.

# परशुराम ..त भाऊ पटवर्धन
# यांचे चरित्र.

... ... ... कागदपत्र व माहिती ...

... ...थ,

दाम अ...

भि... ...

फा... अ... ...

... ...

(सन १८६७ च्या ... ... ...)

... ...

"श्री शिवा... ... ... ...

आगस्ट, १८८२.

किंमत १ रुपया.

या ग्रंथासंबंधें सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत.

Govind Mahadeo Dikshit Bhiwandi

हें पुस्तक गोविंद महादेव दीक्षित यांचे खासगत पुस्तकसंग्रहांतील नंबर आहे. सदर पुस्तक गोपाळ [illegible] पाटणकर [illegible] पोस्टमास्तर ठाणे यांजकडून पुस्तकाची किंमत देऊन आणविलें आहे

मिती भाद्रपद शुध्द १ बुधवार तारीख १८०५

मीती भा. शु

पारेग

२०

गोविंद महादेव दि.
बुकनंबर
भिवंडी.
खासगी पुस्तकालय.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

ग्रंथ संग्रहालय
नं. 20
ठाणे

बुकनंबर
भिवंडी.
खासगीपुस्तकालय.

[redacted]

[ हा ग्रंथ मराठी ग्रंथोत्तेजकमंडळीनें पसंत केला आहे. ]

# परशुरामपंत भाऊ पटवर्धन यांचें चरित्र.

हा ग्रंथ

अनेक जुन्या बखरी, जुने लेख, कागदपत्र व दाखले,

आणि कितीएक इंग्रजी ग्रंथ,

यांच्या आधारानें,

भिकाजी धोंडदेव निगुडकर,

फर्स्ट आसिस्टंट मास्तर, इंग्लिशस्कूल, जमखंडी,

यांनीं तयार केला.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें हा ग्रंथ रजिस्टर केला आहे.)

पुणें येथें

"श्री शिवाजी" छापखान्यांत छापिला.

आगस्ट, १८८२.

किंमत १ रुपया.

या ग्रंथासंबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

अनुकरण करण्याविषयीं सामान्यत: मनुष्यमात्राची फार प्रवृत्ति असते. एखाद्यानें अमुक एक चांगलें कृत्य केलें आणि त्यामुळें त्याचें हित झालें, असें पाहिलें म्हणजे आपणही त्या प्रमाणेंच करावें असें मनुष्यास साहजिक वाटतें. तसेंच एखाद्याच्या दुर्वर्तनामुळें त्याची अमुक प्रकारें हानि झाली असें, समजलें असतां, त्या वर्तनापासून दूर राहण्याविषयीं "पुढच्यास ठेंच मागचा शहाणा" या न्यायानें मनुष्य सावध राहतें. यास्तव, ज्यांत व्यक्तिविशेषाच्या सर्व कृत्यांचें, आचरणाचें आणि त्यांच्या परिणामांचें वर्णन असतें, ते चरित्रग्रंथ अत्यंत हितावह व बोधप्रद होत. त्यांतही स्वदेशांत निर्माण होऊन केवळ स्वपराक्रमानें जे उदयास आले, व ज्यांनीं स्वदेशसेवेंत आपला देह झिजविला, अशा पुरुषांचीं चरित्रें मनुष्यांच्या हृदयांत फारच बिंबतात.

स्वदेशांतील इतिहासप्रसिद्ध पुरुषां पैकीं एखाद्याचें तरी चरित्र लिहावें, असा माझा पुष्कळ दिवस विचार होता. इतक्यांत गुदस्तसालीं "**परशुरामपंतभाऊ पटवर्धन**" यांच्या चरित्रा बद्दल **मराठी ग्रंथोत्तेजकमंडळी** कडून जाहिरात लागली. तेव्हां आपला फार दिवसांचा हेतु सिद्धीस नेण्याला ही सर्वोत्तम संधि आहे, असें मनांत आणून भाऊंच्या चरित्राचीं साधनें मिळविण्याचा प्रयत्न चालविला. मित्रांच्या साह्यानें कागदपत्र मिळविले. वृद्ध व बहुश्रुत गृहस्थांच्या भेटी घेऊन त्यांनीं सांगितलेल्या हकीकतींचीं व माहितीचीं टिपणें करून घेतलीं. आणि सर्वांची जुळवा करून हें चरित्र तयार केलें. असो. माझा हा यथाशक्ति केलेला अल्पयत्न **मंडळीस** पसंत पडला व त्याला तिनें पूर्ण बक्षीस दिलें हें कळविण्यास फार संतोष वाटतो.

केवळ इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें चरित्र न लिहितां, स्वतंत्र कागदपत्र व लेख मिळवून त्यांच्या आधारानें ग्रंथरचना करावी, अशी **मंडळीची** विशेष सूचना होती. त्याप्रमाणें कागदपत्र मिळविण्याविषयीं मी आप-

त्याकडून होईल तितका प्रयत्न केला आहे. जेथें जेथें भाऊंच्या संबंधाचे जुने कागदपत्र व लेख मिळण्याचा संभव होता, तेथें तेथें ते मिळण्यासाठीं स्वतः किंवा मित्रांच्या साह्यानें खटपट केली. या कामांत पुष्कळ श्रम पडले, अनेक अडचणी आल्या आणि बराच काल व पैसा घालावा लागला. तथापि, समाधान एवढेंच मानावयाचें कीं, हे प्राचीन लेख मिळविण्याविषयींचे श्रम पुष्कळ अंशीं सफळ झाले. अनेक लेख उपलब्ध झाले; पुष्कळ नव्या गोष्टी समजल्या; व कित्येक महत्वाच्या विषयांची माहिती लागली. जे लेख व कागदपत्र मिळाले त्यांची यादी खालीं जोडली आहे. या कागदपत्रांच्या साह्यानें तयार केलेला ग्रंथ कितपत चांगला उतरला आहे, त्याचा निर्णय मार्मिक वाचकांनीं करावा.

चरित्रनायक परशुरामपंत भाऊ हे पराक्रमी पुरुष सुमारें ८०।८५ वर्षांपूर्वीं या महाराष्ट्रदेशांत होऊन गेले. पेशव्यांच्या पदरीं एका लहानशा पथकाचे अधिकारी असतां ते स्वपराक्रमानें सर्व सेनानायकांत आद्यस्थान पावले आणि मराठ्यांच्या संपूर्ण सैन्यावर त्यांनीं आधिपत्य चालविलें. त्यांचें चरित्र फार मनोरम आहे. शिवाय, ज्या कालीं भाऊ उदयास आले, तो काल मराठ्यांच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचा आहे. अनेक लढाया, धामधुमी व राजक्रांति त्या कालीं घडल्या आहेत, आणि त्यांमध्यें कित्येकांत प्रधानत्वें करून व कित्येकांत गौणत्वें करून, भाऊंचा संबंध आहेच. त्यांचाही मनोरंजक वृत्तांत चरित्रांत आला आहे.

श्री० रा० रा० बाबासाहेब यादवाडकर व रा० रा० कोन्हेर कृष्ण ऊर्फ आबासा० जोशी यांनीं अनेक विषयांची माहिती सांगून आणि कागदपत्र देऊन ग्रंथाची पूर्णता केली. या उभयतांच्या परिश्रमानें ग्रंथाची उपयुक्तता फार वाढली. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. तसेंच श्री० रा० रा० बापूसा० आंबेकर, रावसा० आण्णासा० धायगुडे, रा० रा० केशव बळवंत काळे व रा० रा० जनार्दन हरि करंदीकर यांनीं आपल्या संग्रहांतील कित्येक महत्वाचे लेख दिले आणि रा० रा० व्यंकटेश राजाराम ऊर्फ आपाराव वैद्य व रा० रा० बळवंत रावजी आपटे, यांनीं अशाच प्रकारचे लेख व माहिती तासगांवाहून पाठविली. त्यांचा मी फार आभारी आहे.

चरित्रांतील खर्ड्याच्या स्वारीचा वृत्तांत श्री० रा० चिंतामणराव आपास्रा० सांगलीकर यांच्या लेखावरून बहुतेक घेतला आहे. आपास्रा० या स्वारीस गेले होते ; तेव्हां हा लेख फार तथ्य मानिला पाहिजे. हा महत्वाचा लेख राव ब० माधवराव गोविंद रानडे यांनीं मला दिला, त्यांचे कृतज्ञता पूर्वक आभार मानतों.

चरितांतील अनेक विषयांचें विवेचन करितांना प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांचा " कर्नाटक प्रांतांतील संस्थानांचा इतिहास " फार उपयोगी पडला. त्यांचे ही उपकार स्मरणें योग्य आहे.

मला मिळाले आहेत त्यांशिवाय भाऊंच्या संबंधाचे अनेक कागदपत्र व लेख निरनिराळ्या ठिकाणीं असण्याचा संभव आहे. तसे कोणापाशीं असल्यास त्यानें ते मजकडे पाठविल्यास फार मेहरबानी होईल.

सुज्ञ वाचकांनीं ग्रंथांतील अल्पस्वल्प दोषांकडे दृष्टि न देतां त्यांत गुणलेश दिसेल तो ग्रहण करावा अशी माझी विनंती आहे.

पुणें,
आगस्ट सन १८८२ इ० } भिकाजी धोंडदेव निगुडकर.

---

ज्या ग्रंथांच्या व कागदपत्रांच्या आधारानें हा ग्रंथ रचिला, त्यांची याद :—

## छापलेले ग्रंथ.

१ क्यापटन ग्रांट डफ यांचा " मराठ्यांचा इतिहास. " ( इंग्रजी )

१ प्रो० बा० प्र० मोडक यांचा " कर्नाटक प्रांतांतील संस्थानांचा इतिहास "

## कागदपत्र वगैरे.

१ हरिवंशाचीबखर अथवा हरभट्टजी पटवर्धन यांच्या घराण्यांती-
ल पुरुषांच्या पराक्रमाच्या कथा. पूर्वार्ध-

३ इंचलकरंजीकरांच्या घराण्याची मूळपीठिका.

१ सांगलीकरांच्या घराण्याची हकीकत. श्री० चिंतामणराव
आपासाहेब सांगलीकर यांनीं स्वतः लिहिलेली पूर्वार्ध.

३ जमखंडीकरांचा वृत्तांत. जमखंडी संस्थानांतून सरकारांत
पाठविलेला.

१ कुरुंदवाडकरांचावृत्तांत. कुरुंदवाडकरांनीं सरकारांत पाठविलेला.

१ श्रीरंगपट्टणच्या स्वारीची हकीकत. येसाजी रघुनाथ फाटक
त्या स्वारीस गेले होते, त्यांनीं लिहिलेली.

१ आळत्याच्या लढाईची हकीकत.

३ पट्टणकुडीच्या लढाईची हकीकत. नारो हरी करंदीकर त्या
लढाईंत होते त्यांनीं लिहिलेली.

१ इंग्रजसरकार व भाऊ यांची दोस्ती झाली, ती हकीकत.

१ पेशव्यांचीबखर वर्षानुक्रमानें जमाखर्चाच्या पद्धतीनें लिहिलेली.

१ भाऊंचीं पत्रे निरनिराळ्या प्रसंगीं लिहिलेलीं २५.

१ गोविंद हरी पटवर्धन यांचीं भाऊंस आलेलीं पत्रें २.

१ नाना फडणविसाचीं पत्रें ९.

१ सखाराम बापूचीं पत्रें ३.

१ पेशवे सरकारचीं पत्रें ४

१ भाऊ प्रतिबंधांत पडले, त्यावेळच्या हकीकतीचें पत्र.

१ दौलतराव शिंदे यांचें भाऊंच्या मुक्ततेविषयीं पत्र.

२ भाऊंच्या कुटुंबांतील मनुष्यांची हकीकत.

१ भाऊंच्या धर्मकृत्यांची याद.

१ भाऊंच्या मरणाच्या संबधानें श्री० बाळासाहेब मिरजकरांचें पत्र.

*** याशिवाय अनेक पत्रें, सनदा, तैनातजाबते, तहनामे, यादी, वंशवृक्ष वगैरेंचा उपयोग ग्रंथ लिहितांना केला आहे. हे आधार टिपा देऊन दाखविणें अवश्य वाटलें नाहीं.

गोविंद महादेव
गोरे
बुकनंबर
भिवंडी.
खासगी पुस्तकालय

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | कुलवृत्तांत | १ |
| २. | बालपण व विद्याभ्यास. | १२ |
| ३. | प्रथमपराक्रम. | १७ |
| ४. | किरकोळ स्वाऱ्या. | २१ |
| ५. | राघोबादादाचा पाठलाग. | ३२ |
| ६. | कोल्हापूरकर, हैदर अल्ली व इंग्लिशलोक यांजबरोबर संग्राम. | ३९ |
| ७. | नरगुंदचें प्रकरण. बदामीची स्वारी. | ४७ |
| ८. | श्रीरंगपट्टणावर स्वारी. इंग्लिशांचें साह्य. | ५४ |
| ९. | आळत्याची लढाई. | ६९ |
| १०. | खर्ड्याची स्वारी. | ७५ |
| ११. | राजकारस्थानें | ९६ |
| १२. | नानाफडणविसांचीं कारस्थानें. | १०३ |
| १३. | बंधविमोचन. सातारचें बंड | १११ |
| १४. | कोल्हापूरचें प्रकरण. भाऊंचा मृत्यु. | ११५ |
| १५. | गृहस्थिति व धर्मकृत्यें. | १२८ |
| १६. | उपसंहार. | १३४ |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| ३ | १५ | दारिद्यावस्था | दारिद्र्यावस्था |
| ,, | २ टी० | कलोपाध्याय | कुलोपाध्याय |
| १६ | १० टी० | खजिनदरा | खजिनदार |
| २४ | १ | यांमध्य | यांमध्यें |
| २५ | २ | चालते | चालत |
| २९ | १० | धडकं | धडकूं |
| ३१ | १७ | बंघु | बंधु |
| ३८ | ३ | साताहून | सातान्याहून |
| ४३ | २८ | धांट | घाट |
| ५७ | २९ | केली | केली, |
| ६५ | २६ | निमीत्तानें | निमित्तानें |
| ७३ | १ | कोल्हापूरकरांच्या | कोल्हापूरच्या |
| ७४ | ११ | वृतांताचें | वृत्तांताचें |
| ,, | ३ टी० | आपासाहेब | आण्णासाहेब |
| ८३ | ६ | खुण | खूण |
| ८६ | २१ | आपापल्य | आपापल्या |
| ९० | २४ | पर्णपणें | पूर्णपणें |
| ९३ | १ | रागोळी | रांगोळी |
| ११० | २६,२७ | काराग्रहवास | कारागृहवास |
| ११२ | १५,१६ | मुक्ततेच | मुक्ततेचे |
| १२१ | १ | तोफाचे | तोफांचे |
| १२७ | १८ | देऊन | येऊन |
| १२९ | २४ | होत | होते |

# परशुरामपंत भाऊ पटवर्धन यांचें चरित्र.

गोविंद महादेव दिक्षीत
बुकनंबर
भिवंडी.
खासगी पुस्तकालय.

## भाग १.

### कुलवृत्तांत.

या भरतखंडाची संपन्नता, सृष्टिसौंदर्य इत्यादि गोष्टींविषयीं ज्याप्रमाणें प्राचीन काळापासून प्रख्याति आहे, त्याचप्रमाणें येथिल लोकांची बुद्धिमत्ता, ज्ञान, धैर्य व शौर्य इत्यादि अनेक गुणांविषयीं ही प्रख्याति आहे. आरिस्टाटला सारखे तत्ववेत्ते; ग्यालीलियो सारखे ज्योतिषि; न्यूटना सारखे गणिती; बोनापार्टा सारखे महावीर; म्याकियावेली सारखे राज्यकारस्थानी, असे अनेक पुरुष या आर्यभूमींत निर्माण झाले. त्यांनीं आपल्या कृतींनीं, गुणांनीं, आणि पराक्रमांनीं या देशास उत्कर्षास आणिलें, आणि आपली कीर्ति अजरामर केली. परकीयांच्या सत्तेंत हा देश बहुत काल राहिल्यामुळें वरील कांहीं गुणांचा उत्कर्ष प्रस्तुत पूर्वींप्रमाणें अनुभवास येत नाहीं हें खरें; परंतु ते नष्ट झाले नाहींत. ते प्रदर्शित करण्याचा समय यावा, आणि अवकाश मिळावा, ह्मणजे निःसंशय ते पुनरुज्जित होतील. या गोष्टीची सत्यता अनेकवेळां अनुभवास आली आहे. या महाराष्ट्रदेशास मध्यंतरीं सुमारें दीडशें वर्षें स्वराज्याचा लाभ दैवयोगानें प्राप्त झाला, त्यावेळीं येथें अनेक शहाणे, राज्यकारस्थानी, बुद्धिवान्, धैर्यशील आणि पराक्रमी पुरुष उदयास आले. त्यांनीं अल्प कालांत सर्वांवर आपली छाप बसवून मोठें राज्य संपादिलें, आणि मराठ्यांची कीर्ति देशांतरीं आणि द्वीपांतरीं प्रसिद्ध केली. मराठ्यांच्या पूर्ण वैभवाच्या कालीं त्यांमध्यें जे पराक्रमी आणि शूर पुरुष गाजत होते, त्यांत परशुरामभाऊ हा मुख्य मानिला आहे. त्याचें चरित्र सादर करावें असें आम्ही योजिलें आहे.

परशुरामभाऊ पुणें येथें शके १६६२ श्रावण शुद्ध ८ इंदुवारीं जन्मले. (इ० स० १७४०.) यांचे आजे हरभट्टजी पटवर्धन हे कोंकणांत रत्नागिरीनजवळ कोतवडें ह्मणून लहानसें गांव आहे, तेथचे मूळचे राहणारे. कोतवडें येथें वडिलोपार्जित कांहीं जमीनजुमला होता. तेंच कायतें हरभट्ट व त्यांचे बंधु विठ्ठलभट्ट व केशवभट्ट या त्रिवर्गांच्या कुटुंबाच्या उपजीविकेस साधन होतें. त्रिवर्गबंधु, आणि त्यांतही विशेषेकरून हरभट्टजी हे वेदविद्येंत मोठे पारंगत होते. तथापि, कोंकणासारख्या निर्धन देशांत, आणि त्यांतही रत्नागिरीसारख्या प्रसिद्ध कंगाल प्रांतांत वैदिकास प्राप्ती ती काय होणार? कुटुंब दिवसेंदिवस वाढत चाललें. कुटुंबाच्या उदरपोषणापुरती देखील प्राप्ती होतां होतां मारामार पडे. मग कार्यप्रस्थाच्या खर्चाचा निभाव कसा लागावा? निर्वाहाचें अन्य साधन तर कांहीं नाहीं. हरभट्टजींनीं कसें तरी करून दोन मुलांस ब्राह्मण केलें; आणखी दोन मुलगे मोठे होऊन उपनयनास आले. हें कार्य कसें पार पडतें, याची भट्टजींना रात्रंदिवस चिंता लागली. पुष्कळ स्थळीं त्यांनीं प्रयत्न केले. परंतु सर्व व्यर्थ. द्रव्योत्पत्ति होईना. जिकडे जावें तिकडे नन्नाचा पाडा. निरुपाय झाला, तेव्हां भट्टजींनीं आपले कुलोपाध्याय वझे उपनांवाचे कोणी गृहस्थ होते, त्यांजजवळ याचना केली, आणि आपण आमचे पुरातन कुलोपाध्याय आहां, तेव्हां चिरंजिवांच्या व्रतबंधाची योजना करून त्यांस ब्राह्मण करणें आपणाकडे आहे, अशी मोठ्या आर्जवानें त्यांची विनंती केली. पण पडत्या काळांत साह्य कोण करणार? वृत्तीच्या आशेनें वझे यांनीं साह्य करावयास उद्युक्त व्हावयाचें, परंतु निष्कांचन यजमानापासून वृत्तीची आशा तरी त्यांस काय असावयाची? अशा ठिकाणची वृत्ति असली काय, आणि नसली काय सारखेंच. वझे यांनीं कानावर हात ठेविले; आणि साफ सांगितलें "भट्टजीबावा, आपलें कार्य आमच्या हातून व्हावयाचें नाहीं. येऊन जाऊन वृत्तीच्या संबंधानें आपली निकीर, तर आपण आपल्या घरची वृत्ति पाहिजे त्यास द्यावी. आमची अगदीं ना नाहीं. तिनें कोणी लक्षाधीश होत असेल तर सुखेनैव होवो."

पुढें मुलांच्या उपनयनाचा योग चमत्कारिक रीतीनें घडून आला.

तो प्रकार असा:—हरभट्टजींची आका ह्मणून वडील बहीण होती, ती
दरगडास दिली होती. आपला पाठचा बंधु मुलांच्या कार्याच्या
iवंचनेत आहे, त्याच्या करितां कांहीं तरी खटपट केली पाहिजे,
सें आकानें मनांत आणिलें. तिच्याच घरांत दांडेकर उपनांवाचे
ाळंभट्ट ह्मणून कोणी स्नानसंध्यानिष्ठ, शुचिर्भूत, वेदवेदांगपारग गृहस्थ
हत होते. त्यांस तिनें आपल्या बंधूची सर्व दैन्यावस्था कळविली.
ाईचा वृत्तांत ऐकून दांडेकर यांस दया आली. त्यांनी अनाथाच्या
ार्यास हात लावण्याचें मनांत आणिलें. याचना करून कांहीं द्रव्य
ाळविलें, आणि आकासमागमें कोतवडें येथें जाऊन हरभट्टजींच्या मुलांचे
तबंध करविले. मौंजीबंधनाच्या समयीं हरभट्टजींनीं दांडेकर * यांस
ापले कुलोपाध्याय केलें.

यापमाणें मुलांचे व्रतबंध कसे तरी एकदां शेवटास गेले. आणि
रभट्टजींची एक मोठी चिंता दूर झाली. तथापि, वाढत चाललेल्या
पंचाची काळजी त्यांच्यामागें होतीच. ती त्यांना चैन पडूं देईना.
ारिद्यावस्था ही संसारांत विटंबनेस कशी कारण होते, तिच्या योगानें
उग्र पुरुषही कसे कलाहीन होतात, ही गोष्ट त्यांच्या नुकतीच
नुभवास आली होती. ती त्यांच्या मनांत घोळूं लागली. कोठें
री जाऊन ईश्वरोपासना करावी, आणि कांहीं तरी सिद्धि प्राप्त
रून घ्यावी अशी त्यांस बुद्धि उत्पन्न झाली. तोच संकल्प दृढ करून
ट्टजी घरांतून बाहेर निघाले, आणि कोतवड्यानजवळ दोन तीन को-
वर पुळें येथें श्रीगणपतीचें स्थान आहे, तेथें गेले. या स्थळीं
र्व भक्ष्य पदार्थ वर्ज्य करून, केवल दुर्वारस प्राशन करून भट्टजींनीं
ादशवर्षेंपर्यंत अत्युग्र तपश्चर्या केली. द्वादश वर्षांच्या समाप्तीस त्यांना
ाराध्यदेवतेचा दृष्टांत झाला कीं, "त्वां आतां देशांतर करावेंस.
शावर गेल्या नंतर जो पुरुष प्रथम भेटेल, त्याला आपला यजमान
र. तो तुझी सर्व विपत्ति दूर करील, आणि तद्वारें तुझा वंश उद-
ास येईल."

---

* हे बाळंभट्टजी दांडेकर प्रस्तुत पटवर्धन संस्थानिकांचे वाटवे उपनांवाचे जे
ुलोपाध्याय आहेत त्यांचे मूळ पुरुष.

या शुभसूचक दृष्टांताची मनांत गांठ घालून भट्टजींनीं आपल्या तपश्चर्येची यथाशक्ति सांगता केली, आणि. श्रीगजाननाची आज्ञा घेऊन ते स्वग्रामीं गेले. आपली पत्नि लक्ष्मीबाई * हिला व कुटुंबांतील मंडळीला त्यांनीं आपणास झालेला श्रीचा दृष्टांत सांगितला, आणि ते देशावर जाण्याच्या तयारीस लागले.

प्रयाणाचा एक सुमुहूर्त पाहून भट्टजींनीं प्रस्थान ठेविलें, आणि घरांतून बाहेर पडले. घरचा उंबरठा सोडून निघणें मोठें कठीण जातें. स्वकीय, परिचित आणि लोभ करणाऱ्या मनुष्यांचा वियोग होण्याचा समय येतो तेव्हां अंतःकरण फार सद्गदित होतें; दुःखाचे उमाळे येऊं लागतात, आणि प्रसंगवशात् अश्रुधारांचेही लोट चालूं लागतात. याचा अनुभव सर्वांस आहेच. कुटुंबांतील मनुष्यें आणि लहान लहान मुलें यांस सोडून जाणें भट्टजींच्या फार जिवावर आलें. तथापि, पुढील चांगल्या काळाच्या आशेवर दृष्टि देऊन त्यांनीं आपलें सर्व दुःख क्षणभर एकीकडे ठेविलें, आणि खांद्यावर पडशी टाकून मार्गक्रमण आरंभिलें.

आशा ही मोठी चमत्कारिक चीज आहे. तिच्या जोरावर सर्व सृष्टिक्रम चालला आहे. पहा, महत्संकटांत मनुष्य पडला असतो तेव्हां त्याला धीर देऊन तो प्रसंग सहन करण्यास समर्थ करणारें आशे सारखें दुसरें कोणतें साधन आहे ? देशावर गेल्यावर आपणास कोणी तरी संपन्न यजमान लाभेल, आणि मग आपली सर्व दैन्यावस्था दूर होईल, अशी भट्टजींस मोठी आशा लागली. आणि तिनें त्यांचें पाऊल लवकर उचलूं लागलें. धिप्पाड आणि उंच अशा त्या सह्याद्रिपर्वताच्या अरुंद व अवघड मार्गांतून सत्वर मार्ग कंठून भट्टजी घांटमाथ्यावर येऊन ठेपले; आणि ज्या यजमानाविषयीं त्यांना श्रीचा दृष्टांत झाला होता, त्याचा मोठ्या उत्कंठेनें शोध करूं लागले, तों जवळ एका वृक्षाच्या छायेखालीं एक विधवा स्त्री, जवळ ९।१० वर्षांचा मुलगा घेऊन बसलेली त्यांनीं पाहिली. भट्टजींनीं, जवळ जाऊन विचार पूस केली तों ती आपण गांवाकडील कोणी अनाथ

---

* ही लक्ष्मीबाई पुळें येथील शेंड्ये याच्या घराण्यांतील कन्या होय.

गणेश ... विभाग

स्त्री असून, आपल्या मुलाच्या उपनयनार्थ कांहीं द्रव्य मिळवावें, ह्मणून याचना करण्याकरितां जात आहे असें समजलें. ही हकीकत ऐकून भट्टजींच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनीच कल्पना करावी. त्यांची भावी आशा सर्व नष्ट झाली. सर्व मनोरथ एकदम लयास गेले. द्वादश वर्षे तपश्चर्या केल्याचें हें शेवटीं फल प्राप्त झालें, यामुळें त्यांचें मन अगदीं खट्टू झालें. दारिद्र्यावस्था आपल्या जन्मास खिळली आहे, तींतून मुक्त होण्याची आशा करणें व्यर्थ आहे, असा त्यांच्या मनाचा पक्का निर्धार झाला.

आतां पुढें काय करावें हें भट्टजींस सुचेना. बाईस व मुलास यजमान मानून त्यांच्या समागमें याचना करीत हिंडावें, किंवा हा सर्व नाद सोडून आल्या पायानें घरची वाट धरावी, हा त्यांस विचार येऊन पडला. त्यांचें मन द्विधा होऊं लागलें. तथापि, शेवटीं काय होईल तें होवो ; श्रीगजाननावर विश्वास ठेवावा, आणि त्याच्या आज्ञेनुरूप आचरावें, असा त्यांनीं निश्चय केला ; बाईस व मुलास आपण आमचे यजमान असें त्यांनीं सांगितलें, आणि त्यांस समागमें घेऊन भट्टजी त्या मुलाच्या उपनयनाकारितां याचना करण्याच्या उद्देशानें निघाले. ( या बाईचें नांव गंगाबाई व मुलाचें नांव नारायण असें होतें. )

फिरत फिरत हरभट्टजी इचलकरंजीस आले. तेथें त्यावेळीं घोरपडे या उपनांवाचे कोणी मराठे सरदार होते त्यांजकडून कांहीं आश्रय मिळावा या आशेनें भट्टजींनीं आपला येण्याचा हेतु त्यांच्या कानावर घातला. आणि भेटीस येण्याविषयीं सूचना येतांच मुलास घेऊन सरदारांच्या भेटीस गेले. भट्टजींची वेदवेदांगपारंगतता, कर्मनिष्ठा आणि शुचिर्भूतपणा पाहून सरदार त्यांच्याठायीं लीन झाले ; आणि त्या मुलाचा व्रतबंध करण्यास्तव भट्टजींची याचना होती, तें कार्य आपणच करावें असें त्यांनीं मनांत योजिलें ; व भट्टजींस, बाईस व मुलास ठेवून घेतलें.

तो मुलगा नारायण मोठा हुशार होता. वाड्यांत सरदारांच्या भेटीस प्रतिदिवशीं जाण्याचा त्यानें पाठ घातला. सरदारांस मूलबाळ नव्हतें. त्यांची त्याजवर मर्जी बसली. ती इतकी कीं, त्याच्याशिवाय त्यांना चैन पडेनासें झालें. मुलाचा व्रतबंध झाला. तरी त्यांना निरोप देण्याची सरदारांस इच्छा होईना. मुलाचा वियोग त्यांस दुःस-

ह वाटूं लागला. म्हणून त्यांनीं त्या सर्वांस ठेवून घेतलें. सरदारांच्या पदरीं मोठी पागा होती. या मुलानें पागेंत जावें व स्वारांबरोबर गोडगोड भाषणें करावीं. अशा रीतीनें स्वारांचा लोभ संपादून त्यानें घोड्यावर बसणें, पट्टा खेळणें इत्यादि विद्यांचा अभ्यास केला. कर्मधर्मसंयोगानें एकेसमयीं राज्यांत बंड झालें. त्याचा बंदोबस्त करण्याकरितां सरदारांनीं या मुलाची योजना केली. तें काम त्यानें मोठ्या संतोषानें पतकरून त्यांत यश संपादिलें. तेणें करून त्याजवर सरदारांची व त्यांच्या पदरच्या मंडळीची मर्जी प्यार झाली व सरदार त्याला आपला मुलगा असें ह्मणूं लागले. एके दिवशीं हा मुलगा नित्यक्रमाप्रमाणें वाड्यांत गेला तों सरदार भोजनास बसले होते, त्यांनीं सहज विनोदानें ह्मटलें "नारायणा, तूं आमचा मुलगा ह्मणवितोस, तर आमच्या ताटांत जेवायास येशील काय ?" हें ऐकतांच मुलानें आपल्या आंगरख्याच्या अस्तन्या वर सारिल्या, आणि सरदारांबरोबर एके ताटांत भोजन करण्यास सिद्ध झाला. हा त्याचा निर्धार पाहून सरदारांचा त्याच्या निष्ठेबद्दल संशय फिटला, आणि भोजन करण्याविषयीं त्यांनीं त्याला अधिक आग्रह केला नाहीं. सरदार वयातीत झाले होते. त्यांनीं पुढें लवकरच या गुणवान् व पराक्रमी मुलास आपल्या पागेचा संपूर्ण अधिकार देवविला. मुलाच्या उपनयनाच्या वेळीं हरभट्टजींनीं त्याचें पुरोहितत्व स्वीकारिलें होतें. मुलाच्या अभ्युदयानें हरभट्टजी हे इचलकरंजीकर घोरपडे यांचे पुरोहित बनले.

याप्रमाणें हरभट्टजींनीं घोरपडे यांचें पुरोहितत्व संपादिलें असें जमखंडी येथील राजोपाध्याय वाटवे (दांडेकर) यांच्या घराण्यांतील एका बहुश्रुत वृद्ध गृहस्थाच्या माहितीवरून समजतें. इचलकरंजी येथें घोरपडे यांच्या मूळपीठिकेविषयीं व हरभट्टजी पटवर्धन आणि घोरपडे यांचा पुरोहित यजमान हा संबंध कसा जडला याविषयीं कांहीं निराळी माहिती मिळते तिचा सारांश असा:—इचलकरंजीकरांचे मूळ पुरुष नारो महादेव झापणकर हे झापण, प्रांत कुडाल, येथील कुळकरणी होते. ते लहान असतांच त्यांचे वडील वारले. कांहीं दिवस त्यांची आई गंगाबाई तेथें राहिली. नंतर कालदशा प्राप्त होऊन गरीबीस आली. कालक्षेप चालेना, तेव्हां मुलास घेऊन बाई देशांत आली,

आणि कापशीकर संताजी घोरपडे यांच्या आश्रयानें राहिलो. मुलानें सेनापतींची मर्जी संपादून एक दोन स्वाऱ्यांमध्यें मोठें पराक्रम केले. त्यावरून सेनापतींनीं त्यास एक लहानशी जहागीर दिली, आणि आगेचें काम सांगितलें. तदनंतर नारो महादेवानें सातारकर व कोल्हापूरकर यांच्या उपयोगीं पडून त्यांजपासूनही इनामें व जहागिरी संपादिल्या- नारो महादेव यांस पुत्रसंतान नव्हतें. एकेसमयीं हरभट्टजी पटवर्धन कोंकणांतून देशांत आले आणि कर्मधर्मसंयोगानें, इचलकरंजीस येऊन वाड्यांत दोन प्रहरीं भोजनास गेले. तेथें नारो महादेव यांची पत्नि लक्ष्मीबाई चिंतातुर, दिलगीर असलेली त्यांनीं पाहिली. भोजनोत्तर भट्टजींनीं बाईस प्रश्न केला कीं, आपण चित्तांत फार खेदयुक्त आहां असें दिसतें, याचें कारण काय ? आपल्या पोटीं पुत्र संतति नाहीं, हेंच कायतें आपल्या चिंतेचें कारण असें बाईनीं कळविल्यावर भट्टजींनीं बाईस आश्वासन दिलें कीं, आपण कांहीं चिंता करूं नये. श्रीव्यंकटेशगिरी देवास नवस करून यात्रा करावी, ह्मणजे तो आपले सकल मनोरथ परिपूर्ण करील. लक्ष्मीबाईनें भट्टजींस ठेवून घेतलें आणि हा सर्व मजकूर आपले पति नारो महादेव यांस विदित केला. हरभट्टजींची विद्वत्ता, कर्मनिष्ठा व धार्मिकपणा पाहून, नारो महादेव यांची त्यांच्याठायीं पूज्यबुद्धि जडली, आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं श्रीव्यंकटेशास नवस करून आपल्या पत्नीस, हरभट्टजीस बरोबर देऊन सेवेकरितां, गिरीस पाठविलें. भट्टजींनीं व बाईनीं एकनिष्ठेनें सेवा केल्यानंतर दृष्टांत होऊन श्रीचा प्रसाद घेऊन तीं परत आलीं. नंतर लक्ष्मीबाईस पुत्र झाला. त्याच्या उपनयनाच्यासमयीं हरभट्टजींस नारो महादेवानें आपले कुलोपाध्याय केलें. घोरपडे यांच्या घरचें उपाध्यायत्व अजूनही पटवर्धन यांच्या वंशाकडे चालत आहे.

इचलकरंजीकर यांचा थोर आश्रय मिळाल्यानंतर हरभट्टजींनीं आपलें सर्व कुटुंब कोंकणांतून वर आणिलें, आणि इचलकरंजी येथें कांहीं वर्षें वास्तव्य केलें. त्यांचा चरितार्थ चांगल्या प्रकारें चालूं लागला. नारो महादेव यांच्या आश्रयानें हरभट्टजींचा व बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा परिचय झाला, आणि पुणें, सातारा येथें त्यांचें जाणें येणें होऊं लागलें. पुढें बाळाजी विश्वनाथ यांची कन्या अनूबाई उपवर झाली,

तेव्हां नारो महादेव घोरपडे यांचा पुत्र व्यंकटराव याला ती द्यावी, असें बाजीराव बल्लाळ पेशवे यांनीं योजिलें. या लग्नाच्या कामांत हरभट्टजी हे उभयपक्षांकडून मध्यस्थ होते व त्यांनीं तें कार्य सिद्धीस नेलें. यामुळें पेशव्यांच्या दरबारांत हरभट्टजींचा चांगलाच प्रवेश झाला.

हरभट्टजींस पुत्र सात, त्यांचीं नांवें:—१ कृष्णंभट्ट २ बाळंभट्ट; ३ त्रिंबकपंत; ४ गोविंदपंत; ५ महादेवभट्ट; ६ रामचंद्रपंत आणि ७ भास्करपंत. यांपैकीं महादेवभट्टजी लहानपणींच निवर्तले. बाकींच्या सहांपैकीं त्रिंबकपंत, गोविंदपंत आणि रामचंद्रपंत यांनीं मोठमोठीं पराक्रमाचीं व साहसाचीं कृत्यें करून जहागिरी संपादिल्या. अन्य बंधूंनींही स्वराज्यांत शौर्यादि गुणांविषयीं मोठी मान्यता मिळविली. त्याचें सविस्तर वर्णन करण्यास हें स्थळ योग्य नव्हे. याजकरितां तें सोडून देऊन प्रस्तुत चरित्राचा नायक जो परशुरामभाऊ, त्याचा पिता रामचंद्रपंत याचा राजदरबारांत कसा प्रवेश झाला, व त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष कसा होत गेला, याचें संक्षेपतः वर्णन करूं.

पेशवे व घोरपडे यांचा शरीर संबंध झाल्यानंतर बाजीरावाची वहिण अनूबाई इचलकरंजीस सासरीं येऊं जाऊं लागली. पुढें हरभट्टजींचा तिसरा पुत्र त्रिंबक हरी यानें अक्कलकोटास जाऊन भोसले यांचा आश्रय संपादिला, तें पाहून हरभट्टजींचे चौथे व सहावे पुत्र गोविंदपंत व रामचंद्रपंत, यांस राजदरबारांत आपला प्रवेश करून घ्यावा अशी फार इच्छा उत्पन्न झाली. एके समयीं अनूबाई सासऱ्याहून माहेरीं पुण्यास जावयास निघाली, तेव्हां या उभयता मुलांनीं तिजबरोबर जाण्याविषयीं फार खटपट केली. हरभट्टजींकडून व घोरपडे यांजकडून अनूबाईला त्यांनीं सांगविलें, आणि तिची मर्जी राखून ते पुण्यास गेले. तेथें ते कांहीं दिवस तिच्याच दिमतींत होते. पुण्यांत त्यावेळीं पहिला बाजीराव पेशवा याची कारकीर्द होती. अनूबाईच्या आश्रयानें या मुलांचा बाजीरावाजवळ प्रवेश झाला. आणि त्यानें त्यांस प्रथमतः कांहीं खासगीकडील काम सांगितलें. बाजीरावाची कारकीर्द लढाईची व धामधुमीची होती. त्यावेळीं शूर व धैर्यवान् पुरुषांची फार चहा होती; व त्यांचा त्यांच्या आंगच्या गुणानुरूप उदय होत असे. या मुलांची हुशारी व कामांत दक्षता पाहून बाजीरावाचें मन सुप्रसन्न झालें, आणि

त्यानें यांस हातीं धरिलें. इंद्रोजी कदम ह्मणून कोणी पागेचा सरदार होता, त्याच्या [illegible] फडणविशी प्रथमतः यांजकडे सांगितली. कदम यांची पागा बाजीरावाबरोबर स्वारीस जाई, त्यामुळें या मुलांचें शौर्य व कर्तुत्व बाजीराव व त्याचा बंधु चिमणाजी आपा यांच्या वारंवार दृष्टीस पडे. कदम मरण पावल्यानंतर त्याची संपूर्ण पागा गोविंद हरीच्या स्वाधीन झाली. आणि रामचंद्र हरी याच्या आंगचे पराक्रम पाहून चिमणाजी आपाची मर्जी त्याजवर अगदीं खुश झाली होती, त्यास त्यानें आपल्या खासगी स्वारांच्या पथकांत घेतलें. तेथें तो स्वाराच्या पेशानें राहिला.

रामचंद्र हरी, चिमणाजी आपाच्या पथकांत चाकरी करीत असतां एकेवेळीं बाजीराव पेशवे यांची स्वारी उत्तरहिंदुस्थानांत गेली व जयपूरचा राजा सवाई जयसिंग याजबरोबर युद्धसंग्राम सुरू झाला. या युद्धांत रामचंद्र हरी याणें बाजीरावासमक्ष शौर्यानें लढून फारच पराक्रम केला, त्यावरून बाजीरावानें त्याला पालखी व पागेचीं वस्त्रें दिलीं. याच प्रसंगाची रामचंद्र हरीच्या धैर्याची व साहसाची एक चमत्कारिक गोष्ट लिहिली आहे. सवाई जयसिंग व बाजीराव पेशवा यांचा तह झाल्यानंतर बाजीराव आपल्या मंडळीसुद्धां जयसिंगाच्या डेऱ्यांत भेटीस गेला, तेव्हां बाजीरावास चमत्कार दाखविण्याकरितां जयसिंगानें डेऱ्या समोर हत्तींचें झुंज लाविलें. या झुंजांत एक हत्ती बिचलला, आणि आवरेनासा झाला. माहुताचेही सर्व उपाय थकले. तेव्हां उभयपक्षांकडील मंडळीमध्यें या हत्तीच्या आंगावर चालून जाऊन त्याला ठाणबंदी करण्याचें कोणास सामर्थ्य आहे काय? असा बूट निघाला. पण कोणाचीही छाती होईना. इतक्यांत रामचंद्र हरी, पुढें सरसावला, आणि त्यानें तें काम पतकरिलें. तो लागलाच आपल्या घोड्यावर बसला, आणि भाले, बर्च्या घेऊन त्या त्वेषास चढलेल्या जनावराशीं संग्राम करण्यास सिद्ध झाला. आपल्या आयुधांच्या तीक्ष्ण व जलद प्रहारांनीं त्यानें त्या जनावरास एका क्षणांत गर्भगळित केलें, आणि ठाणावर नेऊन बांधिलें. तेव्हां या पुरुषाच्या अलौकिक धैर्याविषयीं सर्वांची खातरी झाली.

इ० स० १७३९ त कोंकणांत जंजिऱ्याचे शिदी यांनीं मोठा पुंडा-

चा मांडिला, व ते सर्वांस अजिंक्य होऊन बसले. तेव्हां शाहुराजाच्या आज्ञेवरून बाजीराव पेशवे यांनीं शिद्दीच्या पारिपत्यास आपले बंधु चिमणाजी आपा यांस पाठविले. या प्रसंगीं रामचंद्र हरी बरोबर होते. शिद्दी, रेवदंड्याच्या बळकट किल्ल्याचा आश्रय धरून बसला होता, त्याला चिमणाजी आपानें वेढा दिला. बरेच दिवस लोटले तरी शिद्दी दाद देईना. तेव्हां हल्ला करून किल्ला सर करण्याचा आपांनीं निश्चय केला. हल्ल्याच्या कामीं रामचंद्र हरीनें फारच मेहनत केली. किल्ला सर करितांना जें निकराचें युद्ध जुंपलें, त्यांत रामचंद्र हरी किल्ल्यावर जात असतां, त्याच्या उजवे हातास गोळीची मोठी जखम लागली. नंतर तें स्थल प्राप्त झालें, आणि चिमणाजी आपा यशस्वी होऊन पुण्यास परत आले.

इ० स० १७३७ त कोंकणांत पोर्तुगीज (फिरंगी) लोकांनीं हिंदूंस धर्मभ्रष्ट करण्याचा व मराठ्यांच्या राज्यास पीडा देण्याचा क्रम आरंभिला, तेव्हां त्यांचें शासन करण्याकरितां बाजीराव स्वतः मोठें सैन्य समागमें घेऊन कोंकणांत उतरला, आणि फिरंग्यांस त्यानें बहुतेक जेरीस आणिलें. इतक्यांत, उत्तरहिंदुस्थानांत इराणचा बादशहा नादिरशहा यानें स्वारी केल्याचें वर्तमान आलें, तेव्हां कोंकणांतील कार्यभाग चिमणाजी आपा व शिंदे, होळकर, भोंसले इ० सरदारांकडे सोंपवून बाजीरावाची स्वारी उत्तरहिंदुस्थानांत गेली. कोंकणांत चिमणाजी आपाचीं व फिरंग्यांचीं जीं अनेक स्थळीं युद्धें झालीं, त्यांत रामचंद्र हरीनें फार कीर्ति संपादिली. ते सडे स्वार होते; तथापि, चिमणाजी आपाजवळ त्यांचें वजन असे; आणि अनेक प्रसंगीं त्यांचा सल्ला विचार चिमणाजी आपा घेत असे.

फिरंग्यांबरोबर युद्ध चाललें असतां, त्यांचे पुष्कळ लोक वसईच्या किल्ल्याचा आश्रय धरून बसल्यामुळें त्या किल्ल्यास चिमणाजी आपानें वेढा दिला. वसईचा किल्ला बळकट; फिरंगीलोक युद्ध कलेंत निपुण; आणि त्यांचीं शस्त्रास्त्रें उत्तम; यामुळें पुष्कळ दिवस मराठ्यांचा उपाय कांहीं चालेना. शेवटीं हल्ल्याचा विचार ठरला. शत्रूच्या तोफांचा मारा चुकविण्याकरितां चिमणाजी आपानें मोर्च्यामागें मोर्चे बांधिले, आणि चर खणून आंतून जाण्यास मार्ग केले. सुरुंग उडवून किल्ल्याच्या त-

टास खिंडार पाडावें, आणि त्यांतून आंत प्रवेश करावा म्हणून मराठ्यांनीं आपणाकडून होती तितकी शर्थ केली; पण फिरंगीलोक मोठे सावध व दक्ष. खिंडार पाडतांच ते तें बुजवून घेत, यामुळें मराठ्यांस यश येईना. दैवाची परीक्षा पाहण्याकरितां मराठ्यांनीं पुनः एकवार ९ सुरुंग पाडले, आणि त्यांतून चोहोंस एकदम सरबत्ती देऊन, ते लागलेच मागोमाग "हर" "हर" शब्दाचा घोष करीत आंत घुसले. फिरंग्यांनीं किल्ल्याच्या तटावरून गरनाळा, बंदुका यांचा पाऊस पाडला. त्या माऱ्यापुढें मराठ्यांचें पाऊल पुढें पडेना. इतक्यांत, फिरंग्यांनीं तें खिंडारही बुजवून टाकिलें. मग मराठ्यांनीं पांचवा राहिलेला सुरुंग उडविला. त्यानें किल्ल्याचा मोठा बुरूज धाडकर कोसळला. यावेळीं मराठ्यांचें सैन्य जिवावर उदार होऊन पुढें सरसावलें. त्यांना कांहीं विलक्षण आवेश आला, आणि शत्रूंनीं आंतून, मोठमोठे दगड, जळजळीत शिसें, यांचा त्यांच्या आंगावर वर्षाव एक सारखा चालविला होता, तरी त्यास कांहीं एक न जुमानितां ते रेटीत आंत चालले. या अत्यंत निकराच्या प्रसंगीं रामचंद्र हरीनें आपल्या धैर्याची, साहसाची व पराक्रमाची केवळ कमाल केली. शत्रूचा वरून एकसारखा प्राणविघातक मारा चालला आहे; शूर व धैर्यशील शिपाई एका मागून एक पटापट जवळ मरत आहेत; आणि कसा प्रसंग गुदरतो कोण जाणे, अशा विवंचनेत जो तो पडला आहे, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं रामचंद्र हरी सर्व लोकांच्या पुढें झाला; आणि त्यानें मराठ्यांचें निशाण वसईच्या किल्ल्यावर नेऊन लाविलें!

हा अतुल पराक्रम पाहून सर्व मराठे सरदार थक्क झाले, खुद्द चिमणाजी आपांनींही त्याच्या गुणाची फार प्रशंसा केली. आणि लागलेच आपलें खासगी पथक २४०० स्वारांचें होतें तें रामचंद्र हरीच्या नांवानें करून देऊन त्याला सरदारीचीं वस्त्रें व पोषाख दिले. याप्रमाणें रामचंद्र हरी हा चिमणाजी आपाबरोबर एक स्वार होता, त्यानें आपल्या पराक्रमानें या लढाईंत विजय संपादून २४०० स्वारांचें आधिपत्य मिळविलें. दैवाची करणी किती अगाध आहे पहा!

यानंतर रामचंद्र हरीचा उत्कर्ष सत्वर होत गेला. चिमणाजी आपाची त्याच्यावर फारच मर्जी बसली. स्वारीच्या व लढाईच्या कामांत

सरदार त्याचें मत घेऊं लागले. आणि श्रीमन्महाराज शाहुराजे छत्रपति यांजपर्यंत त्याची ख्याति झाली. वसईची मोहीम आटोपल्यानंतर रामचंद्र हरी पुण्यास आले. तेथें आप्त स्वकीय आणि इष्टमित्र यांमध्यें आनंदांत सुखानें कालक्रमण करीत असतां, त्यांची पत्नि जानकीबाई गरोदर झाली, आणि योग्य कालीं प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झालें. ( श्रावण शुद्ध ८ शके १६६२. ) रामचंद्ररावास हा एक अनुपम लाभ झाला. या पुत्राचें नांव 'परशुराम' असें ठेविलें. पुत्रलाभासारखा स्त्रीपुरूषांस दुसरा कोणताही आनंद नाहीं. तो लाभ भाग्य कालीं प्राप्त झाल्यामुळें त्या उभयतांचा आनंद गगनांत मावेना.

## भाग २.

सार्वजनिक महादेव विद्याभवन लुकनंबर भिवंडी. सार्वजनिक पुस्तकालय.

### बालपण व विद्याभ्यास.

इसवी सन १७४० च्या एप्रिल महिन्यांत पाहिला बाजीराव पेशवा मृत्यु पावला तेव्हां बादशहा व निजाम आदिकरून राजांच्या दरबारांत मराठ्यांचें वजन फिकें पडत चाललें. यास्तव नवीन पेशवा बाळाजी बाजीराव व चिमणाजी आपा, बरोबर मोठी फौज घेऊन माळव्यांत गेले. या स्वारीस रामचंद्रराव हरि गेले होते. पुढें चिमणाजी आपा स्वर्गस्थ झाले, त्यामुळें रामचंद्ररावाचा एक मोठा पुरस्कर्ता नाहींसा झाला. तथापि, बाळाजी बाजीराव पेशव्यांचा त्याच्यावर चांगला लोभ जडला. तो आपल्या स्वारी बरोबर त्याला घेऊन जाई. बाळाजी बाजीरावाची भोंसल्याच्या संबंधानें जी बंगाल्यांत स्वारी झाली, तींत रामचंद्रराव फार उपयोगीं पडला. इतक्यांत दक्षिणेमध्यें कांहीं राजकारणाचा रंग दिसूं लागल्यामुळें, पेशव्यांची स्वारी पुण्यास परत आली.

राजकारणाचा बंदोबस्त करून पेशव्यांनीं थोडे दिवस विश्रांति घेतली, तों पुनरपि उत्तरहिंदुस्थानांत गडबडीचीं चिन्हें दिसूं लागलीं.

अहमदशहा अबदाली, आफगाण लोकांचा सरदार हा वायव्येकडील भागास पीडा देऊं लागला. पंजाबांतले दिल्ली सरकारचे कित्येक अंमलदार त्याला आंतून मिळाले, आणि हें बंड चांगलें नांवारूपास येऊं लागलें. तेव्हां पेशव्यांना तिकडे दुर्लक्ष्य करितां येईना. यास्तव बंदोबस्ताकरितां बाळाजी बाजीराव मोठें सैन्य घेऊन उत्तरहिंदुस्थानांत गेला. बुंदेलखंडांतील राजांबरोवर त्यानें अनुकूल तह केले, आणि बादशहाच्या प्रांतांतील बंडाई मोडिली. या स्वारीस रामचंद्र हरीचें पथक समागमें होतें, व अंतर्वेदींत अंमल बसविण्याकरितां बाळाजी बाजीरावानें त्याची योजना केली होती. तें काम त्यानें अशा उत्कृष्ठ रीतीनें बजाविलें कीं, यावरून याजकडे स्वतंत्र स्वारीचें काम सांगितलें असतां करण्यासारखी याची योग्यता आहे, अशी पेशव्यांची खातरी झाली. नंतर पेशव्यांची स्वारी दक्षिणेंत यावयास निघाली, तेव्हां त्यांनीं रामचंद्ररावाजवळ, त्याचें पथक व आणखी बरीच मोठी फौज ठेवून, अंतर्वेदीचा बंदोबस्त करण्याकरितां त्याला मागें ठेविलें. आज्ञे प्रमाणें अंतर्वेदींत ब्रह्मवर्त्तानजीक शिवराजपूर येथें फौजेची छावणी करून राहिले असतां, रामचंद्ररावास उदराची भावना झाली, आणि एकाएकीं रोगाचा प्रादुर्भाव होऊन आश्विन शुद्ध ७ शके १६७१ रोजीं त्यांतच त्याचा अंत झाला.

रामचंद्रराव निवर्तले तेव्हां परशुरामभाऊंस नुकतें दहावें वर्ष लागलें होतें. अल्पवयांत पितृवियोग घडणें मोठें दुर्भाग्य होय. पिता हा आपल्या पुत्राचा पुरस्कर्ता, शास्ता व शिक्षक असतो. त्याच्या सहवासानें पुत्रास पदोपदीं ज्ञान. सदुपदेश, अनुभव आणि नीति यांचा लाभ होत असतो. मुलाच्या विद्याभ्यासाची, किंवा त्याला सुमार्गाला लावण्याची व रीतभात शिकविण्याची पिता जशी काळजी वहातो तशी अन्य मनुष्यांस असणें विरळा. आणि या गोष्टींची लहानपणीं एकदां हेळसांड झाली किंवा अनास्था झाली, म्हणजे तिचे दुःखकारक परिणाम मुलास आजन्म भोगावे लागतात. या अनास्थेनें अनेक होतकरू मुलें विद्याहीन व कलाहीन होतात. आणि त्यांची पुढें योग्यतेस चढण्याची सर्व आशा नष्ट होते. भाऊ लहान होते तेव्हां भाऊंचे तीर्थरूप बहुतकरून कोठें तरी स्वारींत गुंतले असत, आणि पुढें लव-

रच त्यांचा स्वारींतच अंत झाला, यामुळें भाऊंच्या विद्याभ्यासाची व शिक्षणाची अनास्था व्हावयाची. पण सुदैवानें तसें घडलें नाहीं. पटवर्धनांचे सर्व पुरुष मोठ्या एकोप्यानें व जुटीनें असत, आणि मी एक आणि माझा बंधु परका हा भाव त्यांच्या मनांत अगदीं नसे. रामचंद्रराव स्वारीस जात तरी त्यांचे बंधु घरीं असत ते भाऊंच्या विद्याभ्यासाविषयीं काळजी घेत. त्यामुळें वाचन, लेखन, हिशेब इत्यादि त्यावेळीं मानलेलीं जीं विद्येचीं मुख्य अंगें त्यांत भाऊंचा लहानपणींच बराच प्रवेश झाला. मधुन मधुन कांहीं दिवस भाऊंचे राहणें पुण्यास खासगीवाले त्यांचे मातुळ होते, त्यांच्या घरीं होत असे. खासगीवाले हे पेशवे सरकारच्या मोठ्या प्रतिष्ठित सरदारांपैकीं असून, त्यांजकडे खासगीकडचें काम असे. त्यांच्या घरीं अनेक प्रकारचें सरकारी काम चाले व पुष्कळ कारकून असत. खासगीवाले काम पाहण्यास जात तेव्हां भाऊंना बरोबर नेत. त्यामुळें कामकाजाची, व जबाबी व हिशेबी लिहिण्याची भाऊंना बरीच माहिती होऊं लागली.

पुढें वडील निवर्तले तेव्हां भाऊ अल्पवयस्क होते म्हणून त्यांच्या पथकाचें काम भाऊंचे चुलत बंधु पुरुषोत्तमराव दाजी पाहूं लागले. पुरुषोत्तमराव हे हरभट्टजीचे जेष्ठ पुत्र कृष्णंभट्ट यांचे पुत्र. रामचंद्ररावांस पुष्कळ दिवस पुत्रसंतान नव्हतें ह्मणून त्यांनीं पुरुषोत्तमरावास जवळ बाळगिलें होतें, व ते त्याला आपणाबरोबर स्वारीस नेत असत. अनेक स्वाऱ्यांत जाऊन शत्रूच्या प्राणाशीं गांठ घातल्यामुळें पुरुषोत्तमराव याच्या आंगीं शौर्य, धैर्य इत्यादि गुण उत्तम आले होते ; आणि पेशव्यांच्या दरबारापर्यंत त्याची ख्याति जाऊन दरबारांतील थोरथोर पुरुषांशीं त्याचा चांगला परिचय झाला होता. आपला चुलता रामचंद्र हरी याच्या आश्रयानें आपला उदय झाला, ह्मणून तो त्याला व त्याच्या कुटुंबाला आपल्या मातापितरांप्रमाणें मानीत असे रामचंद्ररावाचेंही त्याजवर फार प्रेम असे. रामचंद्रराव मरण पावला तेव्हां त्याचा पुत्र लहान, ह्मणून त्याचें पथक कोणी संभाळावें, व पेशवे सरकारची नौकरी कोणी करावी याविषयीं विचार चालला. पेशव्यांस त्या काळीं मनुष्याची फार गरज असे, ह्मणून भाऊंच्या लहान वयामुळें

त्यांचें पथक दुसऱ्या एखाद्या सरदाराच्याही स्वाधीन व्हावयाचें,* पण तसें घडलें नाहीं. पुरुषोत्तमरावानें भाऊ मोठे होईपर्यंत आपण पथकाचें काम करितों व सरकारची नौकरी बजावितों असें पेशवे सरकारास सुचविलें. ही सूचना मान्य होऊन पथक त्यांच्या स्वाधीन झालें. या पुरुषोत्तमरावानें परशुरामभाऊच्या विद्याभ्यासासाठीं व त्याला युद्धकलेचें उत्तम शिक्षण देण्यासाठीं फार परिश्रम केले. पुरुषोत्तमराव जातीनें फांकडा कारकून होता. त्यानें झाडे, झडत्या आदिकरून पागेकडील हिशेबाचे कागद व तसलमात, अनामत, दुबेज्यां आदिकरून जमाखर्चाच्या भानगडी, आणि जाबजबाबी लिहिणें, यांची भाऊंस उत्तम माहिती करून दिली. पागेकडील हिशेब त्यांच्या देखरेखीखालीं तयार करविले. आणि पथकाच्यासंबंधानें जीं सरकारांत पत्रें वगैरे जात, तीं भाऊंच्या विचारानें किंवा त्यांस दाखवून लिहिण्याचा परिपाठ ठेविला.

याप्रमाणें विद्याभ्यास किंवा त्या काळीं ज्यास "कारकुनी कसब" असें ह्मणत, त्यांत भाऊ चांगले निपुण झाले. त्यांच्या हातचीं कित्येक पत्रें आहेत, त्यावरून पाहतां त्यांचें अक्षर चांगलें वळणदार असून लिहिण्याचें मर्मही त्यांस चांगलें अवगत होतें. त्यांच्या मोठमोठ्या स्वाऱ्यांच्या हकीकतीचीं पत्रें आतां फारशीं उपलब्ध होत नाहींत, ही फार दुःखाची गोष्ट होय. तथापि, धारवाडास वेढा पडला होता त्यावेळचीं सुमारें २९।३० पत्रें एका गृहस्थाजवळ मिळालीं व इतर घरगुती कित्येक पत्रेंही पाहिलीं, त्यावरून लिहिण्याचा आळस त्यांस अगदीं नसावा असें स्पष्ट दिसतें.

---

* असें सांगतात कीं, रामचंद्ररावाचें पथक ते मरण पावले तेव्हां पुरुषोत्तमरावाच्या स्वाधीन होतें, त्याच्याच नांवानें तें करून द्यावें असें पेशव्यांच्या व कित्येक प्रधानांच्या मनांत होतें. पण पुरुषोत्तमराव त्या गोष्टीस मान्य झाला नाहीं. आपल्या चुलत्यानें आपणास मोठ्या प्रीतीनें वागविलें व वाढविलें, त्याच्या मुलास एकीकडे सारून आपण पुढें व्हावें हें त्या पुरुषास आवडलें नाहीं. त्यानें पथक दुसऱ्याच्या हातीं न जावें म्हणून यत्न केला. पण तें आपल्या नांवानें करून न घेतां आपल्या अल्पवयस्क चुलत बंधूच्या (भाऊंच्या) नांवानें करून घेतलें. पुरुषोत्तमरावासारखे सत्यास जागणारे, सरळमार्गी, पापभीरु व विश्वासु पुरुष फार थोडे सांपडतील. "हरिवंशाची बखर" ह्मणून पटव-

(पुढील पानावर पहा.)

युद्धकलेची व सरदारी बाण्याची भाऊंस जन्मत:च मोठी आवड होती. पित्याच्या पराक्रमाविषयीं व शौर्याविषयीं सर्वांच्या मुखांतून ख्याति श्रवण केल्यानें, तोच उत्तम " सरदारी पेशा " आपण स्वीकारावा, व त्यांत पित्याप्रमाणें आपणही यश संपादावें, असा भाऊंच्या मनाचा लहानपणींच निश्चय झाला. शिलेदारीच्या कसबाकडे, त्यांचें लहानपणींच लक्ष्य लागलें, आणि त्याकडे त्यांचा पराकाष्ठेचा ओढा लागला. पुरुषोत्तमरावाच्या सान्निध्यास राहिल्यानंतर या कलेचें भाऊंस सर्वोत्तम ज्ञान प्राप्त करून घेण्याची मोठीच सोय झाली. पुरुषोत्तमराव नामांकित शिलेदार होता. शिलेदारीचीं सर्व अंगें आणि युद्धकलेची पद्धति त्यास उत्तम प्रकारें अवगत होती, आणि रामचंद्ररावाबरोबर अनेक स्वाऱ्या केल्यामुळें, त्याला अनुभवही चांगला प्राप्त झाला होता. पटवर्धनांची ख्याति व लौकिक, त्यांच्या सरदारपणाच्या महत्कृत्यावरून झाला व तो वृद्धिंगत करण्यास, त्यांनीं त्याच पेशाचें साधन केलें पाहिजे, हें बीज पुरुषोत्तमराव जाणून होता. त्यानें भाऊंस या कलांचें सर्वोत्तम शिक्षण देण्याचें योजिलें. हें काम त्यानें स्वत: आपणाकडे घेतलें. घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, घोड्यावर बसून बोथाटी खेळणें, घोडा मंडळावर धरणें, तिरंदाजी करणें, निशाणमारणें इत्यादि शिलेदाराच्या अनेक कसबांची त्यानें भाऊंस मार्मिक माहिती करूनादिली. भाऊंनीं हा व्यासंग अत्यंत आस्थापूर्वक केला. त्यांच्या पथकांत, नलगे, पांढरे, शिंदे इत्यादि जे शूर व गुणी शिलेदार होते, त्यांस आपलें कसब वरचेवर दाखवून, त्यांतील न्यूनता भाऊंनीं परिपूर्ण

---

(मागील पानावरून पुढें चालू.)

धनाच्या व मुख्यत्वेंकरून पुरुषोत्तमराव यांच्या घराण्याचा एक ( लेखी ) वृत्तांत उपलब्ध आहे, त्यांत पुरुषोत्तमरावाच्या शौर्याविषयीं, धैर्याविषयीं, प्रामाणिकपणाविषयीं आणि निस्पृहतेविषयीं अनेक सुरस गोष्टी आहेत. नारायणरावाची पत्नि गंगाबाई गरोदर असल्यामुळें तिला प्रधानांनीं पुरंधरास ठेविलें, तेव्हां तिच्या रक्षणार्थ जे सरदार होते, त्यांत पुरुषोत्तमराव मुख्य होते. भाऊंच्या घराण्याचा व पुरुषोत्तमराव यांच्या घराण्याचा, पुरुषोत्तमरावाच्या वेळेपासून जो निकट संबंध जडला-तो अद्यापि कायम आहे. पुरुषोत्तमरावाच्या वंशजांनीं जमखंडी येथें अनेक वर्षें कारभार केला. सांप्रत पुरुषोत्तमरावाचे निपणतु ( नातवाचे नातु ) रावसाहेब विश्वनाथ गणेश ऊर्फ बापूसाहेब आंबेकर हे जमखंडी येथें हुजूर खजिनदार आहेत.

केल्या. आणि पुरुषोत्तमरावानें सांगितलेला अभ्यास दृढ केला. पुरुषोत्तमराव वारंवार भाऊंची परीक्षा घेत, व त्यांचें कौशल्य पाहून वाहवा करीत. अशा रीतीनें क्रम चालल्यानंतर भाऊ अल्प काळांतच या विद्येत फार निष्णात झाले. त्यांचें मार्मिक ज्ञान पाहून मोठमोठे शिलेदार थक्क झाले. आणि हा आपल्या कसबांत बापावर ताण करून "शूर सरदार" होणार असें ह्मणूं लागले.

पेशव्यांच्या दरबारांतील रीतरिवाज समजून घेण्यास भाऊंना उत्तम साधनें होतीं. त्यांचे मातुल खासगीवाले व चुलते गोविंद हरी यांचें दरबारांत वजन असे, व ते या मुलाच्या उत्कर्षाविषयीं दक्ष असल्यामुळें वारंवार आपणासमागमें दरबारास त्याला नेत. पुरुषोत्तमरावदाजीनें तर भाऊंना बरोबर घेतल्याशिवाय दरबारास कधींही जावयाचें नाहीं, असा पाठच ठेविला होता. यामुळें दरबारांतील लहान मोठ्या सर्व मंडळीची व खुद्द पेशवे सरकारचीही त्यांना चांगली ओळख झाली. त्यांच्या बापाच्या पराक्रमाबद्दल ते सर्व त्यांच्यावर लोभ करीत, व त्यांच्या ऐटीवरून व हुशारीवरून हा मुलगा आपल्या बापाप्रमाणें शौर्य व पराक्रम प्रकट करून उदयास येईल, असे आशीर्वाद देत. वरचेवर दरबारांत जाणें घडूं लागल्यामुळें भाऊंना दरबारांत वागण्याची रीत उत्तम लागली.

# भाग ३.

## प्रथम पराक्रम.

भाऊंच्या वयाला चवदावें वर्ष लागलें नव्हतें, तोंच मागील भागांत सांगितल्याप्रमाणें त्या काळच्या चालीप्रमाणें विद्या संपादून, सरदारी बाण्याचीं मानलेलीं जीं विशेष अंगें त्यांत त्यांची उत्तम प्रकारची निपुणता झाली. नंतर एखाद्या मोहिमेवर जावें व संग्राम प्रत्यक्ष अवलो-

कन करून, त्यांत विशेष प्रकार काय दृष्टीस पडतात ते पाहावे, अशी त्यांस फार उत्कंठा झाली. याच समयास बाळाजी बाजीराव पेशवे यांची कर्नाटकांत स्वारी होण्याचा विचार होऊन, पटवर्धन सरदारांचीं पथकें त्यांच्या समागमें जावींत, असें ठरलें. तेव्हां या स्वारीस आपल्या पथकाबरोबर आपण जावें असा भाऊंनीं बेत केला. त्यांनीं ही गोष्ट त्यांचे बंधु पुरुषोत्तमरावदादा, ज्यांच्या पथकाचें काम पहात होते, त्यांजवळ काढिली व स्वारीस येण्याचा आग्रह धरिला. "तुमचें वय लहान, प्रवासाचें काम, स्वारीचें काम कठीण आहे, त्याला मोठमोठे पुरुष कंटाळतात, याजकरितां अमळ मोठे होईपर्यंत हा बेत तुह्मी रहित करावा, त्याच जन्मास आलां आहां. पेशवेसरकारचे राज्यांत मोहिमेचे प्रसंग वरचेवर आहेत. तुमची संग्राम पाहण्याची इच्छा पूर्ण होण्याला फार अवकाश लागेल असें नाहीं." अशी पुरुषोत्तमरावानें भाऊंची अनेक प्रकारची समजूत केली, पण त्यांचें सर्व लक्ष्य स्वारीस जाण्याकडे लागलें होतें. त्यांना हे विचार कसे मानवतील ? भाऊंच्या मातुश्रीनेंही त्यांना पुष्कळ प्रकारें सांगितलें, पण कोणाच्यानेंही त्यांचें मन फिरवेना. शेवटीं ही गोष्ट श्रीमंत पेशवेसरकारच्या कानापर्यंत गेली. अशा लहान वयांत या मुलानें स्वारीस येण्याचा आग्रह चालविला आहे हें पाहून पेशव्यांस फार कौतुक वाटलें. शूराच्या पोटीं निपजलेल्या या मुलाचे अंगीं शूराचे गुण कांहीं विलक्षण आहेत, व हा आपले वंशांत यश संपादून अखंड कीर्ति जोडील असें सर्व म्हणूं लागले. "भाऊचा स्वारीस येण्याविषयीं फारच आग्रह असेल तर त्याला बरोबर घ्या," असा पेशव्यांनीं पुरुषोत्तमदाजीस निरोप पाठविला, आणि सर्व तयारी होऊन भाऊ, पुरुषोत्तमरावाबरोबर आपल्या पथकासमागमें स्वारीस निघाले.

पेशवेसरकारची ही मोहिम सावनूरकरांवर होती. पेशवेसरकारच्या आश्रयास असलेला मुजफरजंग नांवाचा कोणी इसम पुण्यास कांहीं धांदल करून पळून गेला व सावनूरकर नबाबाच्या पाठीस पडला. त्यास नबाब स्वाधीन करीना. तेव्हां पेशवे व नबाब यांच्यामध्यें लढाई उपस्थित झाली. पेशवेसरकारची स्वारी मोठ्या फौजेनिशीं येऊन सावनुराजवळ तळ पडला व तोफांचा मारा सुरू झाला.

नबाबास गुत्तीकर सेनापती घोरपडे यांचें चांगलें पाठबळ होतें, यामुळें तो डगमगला नाहीं. तीन महिनेपर्यंत मारा सुरू होता, तरी किल्ला स्वाधीन होईना. तेंव्हां हल्ला करून शहर हस्तगत करून घेण्याचा विचार ठरला. त्यावेळीं तेथें मोठें तुंबळ युद्ध झालें. त्यांत पटवर्धनांनीं फारच पराक्रम केला. आपलीं पथकें घेऊन ते अघाडीस उभे राहिले होते, त्यामुळें शत्रूंचा सर्व मारा त्यांजवर पडला. गोपाळराव गोविंद मिरजकर यांस डाव्या भुजावर एक व पायास एक अशा दोन जखमा लागल्या, इतर भाऊबंदांसही जखमा झाल्या. भाऊंच्या पथकांतील लोकांनीं तर आपल्या पराक्रमाची या प्रसंगीं शिकस्त केली. भाऊ व पुरुषोत्तमरावदाजी अघाडीस होते व मागल्या बाजूस श्रीमंत पेशवे सरकारची स्वारी युद्धचमत्कार पाहत होती. आपला बाहुपराक्रम श्रीमंतांस दाखविण्याचा हा उत्तम प्रसंग आहे असें वाटून भाऊंस व पुरुषोत्तमरावास मोठें स्फुरण चढलें, आणि आपल्या पथकांतील लोकांच्या अग्रभागीं आपण होऊन ते ज्या बाजूस शत्रूंची बळकटी होती त्या बाजूवर लांडग्यासारखे तुटून पडले. त्यांचा शस्त्रांचा मारा थोडा वेळ शत्रूंनीं मोठ्या धैर्यानें सहन केला व त्यांना मागें हटविण्याविषयीं होते तेवढे प्रयत्न केले. युद्ध अगदीं निकराचें चाललें असतां एक बाण सूं सूं करीत जोरानें येऊन पुरुषोत्तमरावाच्या बाहूंत शिरला, तथापि, त्या प्रसंगीं तिकडे लक्ष न देतां त्यानें व भाऊंनीं शत्रूंची एकसारखी कत्तल चालविली. मराठ्यांच्या सर्व सरदारांचें लक्ष तिकडे वेधलें, आणि ते क्षणभर तटस्थ होऊन तो चमत्कार पाहूं लागले. भाऊंचा व दाजींचा पराक्रम पाहून "शाबास" "शाबास" असा मराठ्यांचे सैन्यांत जयघोष सुरू झाला, आणि शत्रूचीं निशाणें मागें परतलीं. मराठयांचा जय होऊन ते आपल्या तळावर परत आले !!

सावनूरकरावरची स्वारी ही भाऊंची प्रथम मोहीम होय. त्यांनीं त्या युद्धांत जें शौर्य व युद्धकौशल्य प्रकट केलें तें पाहून मोठमोठे सरदारांनीं व शूर पुरुषांनीं तोंडांत बोटें घातलीं. वय पाहूं गेलें असतां चवदा वर्षांचें, आईच्या मांडीवर लोळण्याचें, असें असतां मोठ्या अनुभविक योद्ध्याप्रमाणें त्यांनीं शत्रूंशीं संग्राम केला, या आश्चर्यांत सर्व गर्क झाले. कित्येकांस या प्रसंगीं पुराणप्रसिद्ध अभिमन्यु वीराचें स्मरण

झालें. श्रीमंत पेशवेसरकारही आश्चर्य सागरांत निमग्न झाले. त्यांनीं आजच्या लढाईचें यश या मुलाकडे आहे असें सांगून त्याला बहुमोलाचे पोषाख दिले, व भाऊंच्या अद्वितीय पराक्रमाबद्दल बक्षीस ह्मणून को-रेगांव प्रांत जुन्नर हा गांव बक्षिस दिला. तो त्यांच्या वंशजांकडे अद्यापि चालत आहे. पुरुषोत्तमरावदाजी यांनीं जो पराक्रम केला त्याबद्दल त्यांस पालखी व साडेतीन हजार रुपयांची तैनात करून दिली, व आंत्रे परगणे मंगळवेढें हा गांव इनाम दिला.

पराक्रमी व गुणवान् पुरुषांस त्यांच्या कर्तुत्वाच्या योग्यतेनुरूप बक्षी-स देणें व त्यांची प्रतिष्ठा राखणें हा थोर पुरुषांच्या गुणांपैकीं एक गुण होय. बक्षीस व प्रतिष्ठा ही एक प्रकारची लालुच आहे. इनें सर्व मनुष्यें सहज वश होतात, व इच्या आशेनें जिवापाड पराक्रम करण्यास मनुष्यें समर्थ होतात. मनुष्यानें उचललेल्या कामांत त्याला उत्तेजन देऊन त्या-च्याठायीं ईर्ष्या व आवेश उत्पन्न करणारी दुसरी अशी कोणतीही वस्तु नाहीं. सुज्ञ प्रभु असतात ते इचा योग्य उपयोग करून सेवकांच्या हातून मोठमोठे कार्य भाग साधितात, व लोकप्रिय होतात. पेशव्यांच्या अमदानीच्या वेळीं हें बीज राज्यकर्त्यांस माहीत होतें व ते गुणी व परा-क्रमी पुरुषांची संभावना चांगली करीत. यामुळें त्या कालीं अनेक थोर पुरुष उदयास आले. बाळाजी बाजीरावानें या प्रसंगीं जें भाऊंस बक्षिस दिलें, त्याच्या योगानें त्यानें केवळ भाऊंचा सन्मान केला इतकें-च नव्हे, तर जे पुरुष मराठ्यांच्या राज्याच्या हिताकारितां काया, वाचा मनें करून झटतील त्यांच्या महत्कृत्याबद्दल सरकार खचीत उतराई होईल, असेंही सुचविलें. पेशव्यांची या थोर कृत्याबद्दल जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे.

कोणत्याही एखाद्या कार्यास किंवा व्यवसायास मनुष्य उद्युक्त होतो तेव्हां, त्याचा आरंभ कोणत्या रीतीनें होतो या गोष्टीकडे त्याचें मोठें लक्ष असतें. जी गोष्ट आरंभीं यशस्कर होते, ती गोष्ट अधिक आ-स्थेनें व श्रमानें करण्यास मनुष्यास उत्तेजन येतें. आणि मग अर्थात् ती सुलभ व सुकर होते. कदाचित् असें न घडलें तर उलटही परिणाम होतो. ज्या कार्याचा आरंभ चांगल्या प्रकारें होतो तें कार्य अर्धें झा-ल्यासारखेंच आहे अशी एक इंग्रजींत म्हण आहे तिचेंही तात्पर्य हेंच

आहे. पहिल्याच मोहिमेंत यश प्राप्त झालें व त्याबद्दल पेशवेसरकारांतून सन्मान झाला, यामुळें स्वीकारलेला सरदारीपणाचा धंदा अधिक उत्सुकतेनें करण्याविषयीं भाऊंस उत्तेजन आलें. सावनूरच्या रणभूमीवर सर्वांकडून त्यांनीं वाहवा ह्मणून घेतली, तीच वाहवा त्यांनीं अखंड संपादिली. तेथें स्वामिकार्याविषयीं जी त्यांनीं तत्परता दर्शविली, तीच त्यांनीं अबाधित चालविली. आणि त्या प्रसंगीं पेशवेसरकारांनीं " शूर वीर " असें म्हणून जो वरदहस्त मस्तकीं ठेविला, याची आंजन्म सार्थता केली.

यानंतर त्यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्यांचा वृत्तांत क्रमशः पुढील भागापासून सादर करूं.

---

# भाग ४.

## किरकोळ स्वाऱ्या.

इ० स० १७६० त पेशवेसरकार व निजामसरकार यांचा बेबनाव होऊन लढाई झाली, त्यांत निजामसरकार जेरीस आले. तेव्हां दौलताबाद व औरंगाबाद हीं शहरें व तेथील किल्ले आणि आसपासचा सुमारें ६२ लक्षांचा मुलूख निजामसरकारानें पेशवेसरकारचे स्वाधीन करावा, असें ठरून तह झाला. आणि किल्ले व मुलूख ताब्यांत करून घेण्याचें काम सरदारांकडे सोंपवून पेशवेसरकारची स्वारी पुण्यास परत आली. बहुतेक मुलूख पेशवेसरकारचे अमलांत आला, परंतु दौलताबादचा किल्ला, तेथील किल्लेदार स्वाधीन करीना. तेव्हां तो हस्तगत करण्याकरितां कोणाची तरी योजना करणें आवश्यक झालें. आलीकडील अनेक संग्रामांत पटवर्धन सरदारांनीं मोठें शौर्य व पराक्रम केले होते, व पेशवेसरकारांनीं ते पराक्रम प्रत्यक्ष पाहिले होते. यास्तव ही थोर कामगिरी त्यांच्या वांट्यास आली, गोपाळराव गोविंद पटवर्धन मिरजकर यांस फौज व तोफखाना देऊन रवाना केलें. या स्वारीस गो-

पाळरावाबरोबर परशुरामभाऊ व नीलकंठराव त्रिंबक आपापल्या पथकांनिशीं गेले होते. दौलताबाद किल्ला, किल्लेदार गोडीगुलाबीनें स्वाधीन करीना, तेव्हां पटवर्धनांनीं त्याला गराडा घातला ; मोर्चेबंदी करून आंत दाणा वैरण जाण्याची बंदी केली ; आणि पांचहजार फौजेनिशीं हल्ला करून किल्ला हस्तगत करून घेतला. नंतर किल्लेदारानें पेशवेसरकारची पायधरणी केल्यावर पुढें लढाई बंद ठेवावी, अशीं पत्रें आल्यावरून पटवर्धन सरदार आपापलीं पथकें घेऊन परत आले.

इ० स० १७६० त मराठ्यांच्या राज्यांत जिकडे तिकडे लढाईची झपाट्यानें तयारी चालली होती. अहमदशहा अबदाली हा आफगाण लोकांचा राजा, बरीच वर्षे वायव्येकडील प्रांतावर स्वाऱ्या करीत होता. त्यानें या वर्षी मोठें प्रचंड सैन्य जमवून दिल्लीचा रोख धरिला होता. त्याशीं सामना करण्याकरितां तयारी करणें मराठ्यांना आवश्य होतें. त्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले आदिकरून सर्व सरदारांस फौजेनिशीं या स्वारीस येण्याविषयीं पत्रें लिहिलीं, व मोठे जंगी स्वारीची तयारी केली. या स्वारीचें आधिपत्य सदाशिवरावभाऊ यांजकडे होतें. परशुरामभाऊ आदिकरून पटवर्धन सरदार या प्रसंगीं पुण्यास आपापल्या पथकांनिशीं तयारीनें होते. परंतु सैन्याची व्यवस्था लाविली, तेव्हां त्यांत पटवर्धन सरदारांचीं सैन्यें मुलुखाच्या बंदोबस्ताकरितां मागें पेशवेसरकार यांजवळ कुमकेस राहावीं, असें ठरलें. त्यामुळें पाणिपताच्या घोर कंदनाचा वांटा भाऊ आदिकरून पटवर्धन सरदारांस प्राप्त झाला नाहीं. पुढें सदाशिवरावभाऊंच्या कुमकेकरितां पेशवेसरकारची स्वारी फौजेची कुमक घेऊन नर्मदेपर्यंत गेली, त्यावेळीं भाऊ समागमें होते.

बाळाजी बाजीराव पेशवे यांची स्वारी पुण्यास परत आल्यानंतर लवकरच त्यांचा अंत झाला. व त्यांचे वडील पुत्र माधवराव पेशवाईचें पद पावले. बाळाजी बाजीरावाची पटवर्धन सरदारांवर व विशेषेंकरून भाऊंवर फार कृपा होती. पुढें माधवराव पेशव्यांनीं त्यांजवर तसाच लोभ ठेविला. इ० स० १७६१ पर्यंत पटवर्धनांच्या पथकांस सरकारांतून नक्त रोजमुरे पावत होते ; ती भानगड काढून टाकून माधवरावानें इ० स० १७६२ त त्यांस पथकांच्या खर्चाकरितां सुमारें २५ पंचवीस लक्षांचा सरंजाम लावून दिला. त्या सरंजामाचा बेहडा इ० स०

१७६४ त झाला. पटवर्धनाचे पुरुष त्या वेळीं एकत्र होते, म्हणून गोविंद हरी, परशुराम रामचंद्र, आणि नीलकंठ त्रिंबक या त्रिवर्गांचीं नांवें लावून एकच बेहडा केला. तथापि, सरंजामाचीं गांवें व तैनाता प्रत्येकाच्या निरनिराळ्या होत्या. परशुराम भाऊंचें पथक २४०० स्वारांचें होतें, व त्यांची तैनात आरंभीं १०,००० रुपये होती. पटवर्धनांस सरंजाम दिला, त्याचे प्रांत पेशव्यांच्या राज्याच्या दक्षिण सरहद्दीवर होते. अशी मोठी जहागीर या प्रदेशीं स्थापन करण्यांत पेशवेसरकारचा मुख्य उद्देश हा असावा कीं, पटवर्धन सरदार जातीचे शूर, त्यांना या बाजूस सरंजाम दिला म्हणजे पेशव्यांच्या राज्याला कोल्हापूरकर व म्हैसूरकर हे तिकडे प्रबळ शत्रू होते, त्यांजवर चांगला दाब राहील, व त्यांस, वर डोकें काढतां येणार नाहीं. भाऊंच्या सरंजामाला मुलूख लावून दिला, तो कांहीं मिरजेजवळ, ( तासगांव, चिंचणी वगैरे, ) कांहीं बेळगांवच्या आसपास, ( जमखंडी, यादवाड, गोकाक इत्यादि, ) आणि कांहीं धारवाडच्या जवळ, ( कुंदगोळ ) असा होता. सरंजाम मिळाल्यापासून पटवर्धन सरदारांस पहिल्यापेक्षां बरेंच स्वातंत्र्य आलें, व पेशवेसरकारच्या कायम सरदारांत त्यांची गणना होऊं लागली. त्यांचें दरबारांत प्रस्थ वाढत चाललें, आणि राज्यकारभाराच्या उलाढालींत त्यांच्या साह्याची आवश्यकता पडूं लागली.

माधवराव बल्लाळ यांस पेशवाईचें पद प्राप्त झालें, तेव्हां त्यांचें वय लहान होतें, सबब सर्व कारभार त्यांचे चुलते रघुनाथरावदादा पाहात होते. पुढें त्या उभयमतांमध्यें अधिकाराच्यासंबंधानें कलह लागला. माधवराव स्वतंत्र होण्याची इच्छा करूं लागला, व त्यानें पटवर्धन सरदारांस अनुकूल करून घेतलें. याची गुणगुण रघुनाथरावाच्या कानावर येतांच पटवर्धनांचें व त्याचें वैमनस्य पडलें. पटवर्धनांची सर्व मंडळी त्यावेळीं मिरज येथें राहात होती. तेथें फौजबंद जाऊन रघुनाथरावानें किल्ल्यास वेढा घातला. पटवर्धनांनीं किल्ला स्वाधीन केला, आणि गोविंद हरी, कुटुंबाचीं सर्व मनुष्यें घेऊन, त्यांचे जेष्ठ बंधु कृष्णंभट्ट, मंगळवेढ्यास राहात होते, तेथें जाऊन राहिले. तथापि, गोविंद हरी यांचे शूर पुत्र गोपाळराव हे निसटून हैदराबादेस गेले, आणि त्यांनीं निजामसरकाराकडे संधानकरून मिरज परत घेण्याकरितां

निजामसरकारची कुमक आणिली. त्यामुळें पेशवे व निजाम यांमध्य युद्ध जुंपलें; आणि राक्षसभुवन येथें मोठी लढाई झाली, तींत निजामाचा प्रसिद्ध दिवाण विठ्ठल सुंदर मारला गेला. हें प्रकरण अधिकच पेटावयाचें, परंतु माधवराव पेशवा शहाणा होता. त्यानें गोपाळराव, रघुनाथराव व आपण यांचा एक विचार केला, आणि निजामसरकाराशीं तह करून तें प्रकरण शांत केलें. पटवर्धन सरदारांनीं आपला पक्ष स्वीकारला, म्हणून माधवरावाची त्यांजवर फार कृपा झाली.

इसवी सन १७६४ त हैदरअल्लीनें कर्नाटकांत पुंडावा केला, व पाळेगार व संस्थानिक यांस पादाक्रांत करून खंडणी वसूल केली. त्याच्या राज्याची सरहद्द उत्तरेस वाढतां वाढतां सावनुराजवळ पेशव्यांच्या राज्यास येऊन भिडली. सावनूरकरास त्याजपासून पीडा होऊं लागली तेव्हां त्यानें पेशवेसरकाराकडे आश्रय मागितला. त्याचें साह्य करण्यास्तव, व हैदरावर आपली छाप बसविण्याकरितां पेशवेसरकारानें कर्नाटकांत स्वारी करण्याचा निश्चय केला. पटवर्धन सरदार, त्रिंबकरावमामा, व आनंदराव रास्ते यांजवरावर ४०,००० सैन्य देऊन शत्रूवर जाण्याची त्यांस आज्ञा झाली. आणि मागून पेशवेसरकारची स्वारी, २०,००० स्वार व १५,००० पायदळ घेऊन कर्नाटकांत उतरली. या स्वारी समागमें परशुरामभाऊ आपल्या पथकासहवर्तमान होते, आणि त्यांचे चुलत बंधु गोपाळराव गोविंद यांची व हैदराकडील चंद्रोजी जाधव व बाळाजीपंत यांची येलुरी येथें मोठी लढाई झाली त्यांत भाऊंनीं फार कामकाज केलें. या लढाईंत शत्रूचे २,००० लोक ठार झाले, आणि पुष्कळ पाडाव होऊन युद्धोपयोगीं सामानही पटवर्धनांनीं घेतलें. या लढाईबद्दल त्रिंबकरावमामांनीं गोपाळराव, परशुरामभाऊ आदिकरून पटवर्धनांची फार तारीफ केली. नंतर तह होऊन सर्व सैन्य माघारें परतलें.

इ० स० १७६७।६८ सालांत गोपाळराव गोविंद पटवर्धन यांस निजामसरकारावर जाण्याची आज्ञा झाली तेव्हां त्यांचे समागमें भाऊ होते. पटवर्धन सरदारांत यावेळीं गोपाळराव प्रमुख होते. स्वारीच्या कामास ते निघत तेव्हां नीलकंठराव त्रिंबक, व परशुरामभाऊ हे आपापल्या पथकांसह त्यांजबरोबर कुमकेस जात असत. या तिघांचे चुलत

बंधूचें परस्पर फारच सख्य असे. आणि स्वारीच्या सर्व मसलती त्यांच्या एक विचारें चालते. ते एकमेकांच्या जिवाकरितां जीव देण्यास सिद्ध असत, आणि सरकारचा कार्यभाग सिद्धीस नेणें हें सर्वांचेंही कर्तव्य-कर्म सारखेंच आहे असें मानीत. या स्वारींत पटवर्धनांनीं निजामसर-कारचा नक्षा उतरून पुढें हैदरावर रोख फिरविला. आणि अर्काटपर्यंत जाऊन पेशव्यांचा अंमल बसविला, व त्यांचें स्वामित्व मान्य करविलें.

या मोहिमेचें काम संपवून गोपाळराव, भाऊ आदिकरून सर्व सर-दार पुण्यास परत आले तों नागपूरकर जानोजी भोंसले यांजबरोबर पेशवेसरकारचा बिघाड झाला व भोंसले सैन्यासह पुण्यास येण्यास नि-घाले. त्यांच्याशीं सामना करण्याकरितां पेशवेसरकारांनीं मोठें सैन्य तयार केलें. निजामसरकारचें, आणि भोंसल्याचें वांकडें होतें यामुळें त्याचेंही सैन्य पेशवेसरकारच्या सैन्याबरोबर या मोहिमेस जाण्या-करितां सिद्ध झालें. पेशव्यांची कडेकोट तयारी पाहून भोंसले यांनीं पुण्यास येण्याचा बेत रहित करून आल्या पायानें नागपूरची वाट ध-रिली. तेव्हां त्यांचा पाठलाग करण्याकरितां पटवर्धन सरदारांस आज्ञा झाली. भोंसले यांस हें वर्तमान कळतांच त्यांनीं जलदीनें कूच केलें. त्यांचा पाठलाग करितां करितां पटवर्धन जिकीरीस आले. त्यांचीं घोडीं थकलीं, आणि त्यांच्यानें पुढें चालवेना. भोंसले झाडींत शिरले तथापि, लगट करून पटवर्धनांनीं त्यांस गांठण्याचा प्रयत्न केला. पण अगदीं निसटून ते दाट झाडींत गेले तेव्हां पाठलागाचा इलाज थकला, ह्मणून पेशवेसरकारची परत फिरण्याविषयीं पत्रें येतांच ते पुनः स्वारीस येऊन मिळाले.

इ० स० १७७० त हैदरानें पेशवेसरकाराबरोबर, पूर्वी (इ० स० १७६८) तह केला होता, त्याच्याविरुद्ध आचरण सुरू केलें. पेशवेसरकारास दिलेला मुलूख परत घेण्याचा इलाज चालविला; सा-वनूरकरास पुनः तो उपद्रव देऊं लागला; आणि सेनापती घोरपडे गुत्तीकर यांचा मुलूख काबीज करण्याकरितां त्यानें स्वार, पायदळ, व तोफखाना असें जंगी सामान तयार केलें, आणि लवकरच गुत्तीस वेढा घातला. तीन साडेतीन महिने सेनापतींनीं गुत्तीचा किल्ला लढ-

विला, परंतु शेवटीं आंत पाण्याचा व सर्पणाचा तोटा पडल्यामुळें त्यांस कौलानें किल्ला उतरून जाणें भाग पडलें. हैदरानें या प्रकारची वंडाळी मांडिली, तेव्हां त्याजवर पुनः शस्त्र धरणें भाग पडलें, आणि त्रिंबकरावमामा यांजबरोबर हुजूरची फौज देऊन, त्यांस व पटवर्धन सरदार व आनंदराव रास्ते, यांस सैन्यासह पुनः हैदरावर स्वारी करावयाची, याजकरितां पुढें जाण्याविषयीं आज्ञा झाली. या स्वारीस गोपाळराव गोविंद, परशुराम रामचंद्र व नीळकंठराव त्रिंबक गेले होते.

या सरदारांचीं सैन्यें तोरुगल्ल्यासुद्धां कोपाळ, सोंदूर, शिवरुद्र या शहरांवरून सावनुराजवळ दाखल झाली. तेथील नबाबास हैदरानें जेरीस आणिलें होंते, व तो त्याजबरोबर तह करण्यास सिद्ध झाला होता, त्याला या ) सरदारांनीं धीर देऊन हैदराच्या स्वाधीन होऊं दिलें नाहीं. आणि त्याच्या संरक्षणाकारितां कांहीं सैन्य तेथें ठेवून, त्यांनीं बाकीची फौज चिकबाळापूर, शिरहंसकोटाकडे नेली. इतक्यांत, मागाहून श्री० माधवराव पेशवेही ३९,००० फौजेनिशीं पुण्याहून येऊन दाखल झाले.

नंतर बाळापूर, कोल्हार, नंदिदुर्ग, मनवगळ, बेंगळूर इत्यादि शहरें एकामागून एक हस्तगत झालीं. थोरले बाळापूरचा किल्ला फार मजबूत होता तो पटवर्धनांनीं सर केला. दुसरेही लहान मोठे १९।१६ डोंगरी किल्ले, व पंचवीस भुईकोट त्यांच्या स्वाधीन झाले.

नंतर मराठ्यांच्या सैन्यापुढें आपला टिकाव लागत नाहीं असें पाहून आपल्या राज्याच्या पश्चिमेकडील भागांत दाट झाडी आहे, तिकडे मराठ्यांच्या स्वारांचा कांहीं इलाज चालावयाचा नाहीं, असें समजून हैदरानें तिकडची वाट धरिली. त्याच्यामागें पटवर्धन व रास्ते यांचीं सैन्यें रवाना करून पेशवेसरकारची स्वारी बाळापुराकडे गेली. मराठ्यांचें सैन्य फांकलें आहे असें वर्तमान येतांच हैदरानें आपल्या पाठलाग करणारांवर एकाएकीं छापा घालण्याचा निश्चय केला. चिनादुर्ग नजीक बुद्धिविहाळ येथें रास्ते व पटवर्धन सरदार आपल्या भाऊबंदमंडळीसह फौजेसहित आहेत अशी बातमी ठेवून तो जलदीनें तेथें येऊन ठेपला, व मराठ्यांच्या लष्करास कांहीं वार्ता नव्हती, तों पहांटेच्या

पांच घटका रात्रीस त्यानें एकाएकीं त्यांजवर छापा घातला. मराठ्यांच्या सैन्यावर एकदम तोफांचा गोळ्यांचा व बाणांचा भडिमार सुरू झाला. मराठ्यांची त्यावेळीं संग्रामाची मुळींच सिद्धता नव्हती. मुख्य मुख्य सरदारांच्या घोड्यावर कायर्ती सामानें घातलीं होतीं. बाकीची सर्व फौज युद्धास सिद्ध नव्हती. गाफील होती. हैदराच्या लष्करांतून गोळा येऊं लागतांच पटवर्धन सरदार व रास्ते आपापल्या घोड्यावर बसून अघाडीस गेले, आणि स्वारांस युद्धास सिद्ध होण्याकरितां नौबत वाजविण्याविषयीं त्यांनी आज्ञा केली. तेव्हां स्वार जमूं लागले. मराठ्यांकडील नौबतीचा आवाज ऐकतांच हैदरानें तोफांचा व बाणांचा सनाटा मार चालू केला. अघाडीस गेलेल्या सरदारांवर गोळ्यांचा व बाणांचा त्यावेळीं केवळ पाऊसच पडला. तथापि, तो सर्व सोसून ते होते तेथेंच उभे राहिले. परशुराम भाऊ अघाडीस होते, त्यांच्या बसलेल्या घोड्यास तोफेचे गोळे लागून एकामागूनएक अशीं तीन घोडीं पडलीं; तथापि, तो धैर्यशाली पुरुष जाग्यावरून तिळमात्र ढळला नाहीं. भाऊंचे जवळच त्यांचे चुलतबंधु माधवराव कृष्ण मंगळवेढेकर होते, त्यांच्या घोड्याला एक मोठा गोळा लागून त्याच्या कातड्याच्या चिंधाड्या उडाल्या. सूर्योदय होईपावेतों सर्व सरदार व मंडळी जागच्याजागीं उभी होती, नंतर डाव्या बाजूस ओढा होता त्याच्या आश्रयास गेली. सूर्योदय झाल्या नंतर हैदराकडील मारा अधिकच सुरू झाला. पटवर्धनांनीं एकदिल होऊन दोन चार वेळां हैदराच्या फौजेवर नेटानें जाण्याचा हिय्या केला, परंतु गोळ्यांच्या अति तीव्र मारापुढें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. घोडीं पुढें पाय उचलीनात, आणि घोडीं व माणसें फारच जाया होऊं लागलीं. तेव्हां सरदार तसाच दम धरून राहिले, व त्यांणीं लष्कराचें बुणगे मुक्कामास पाठविलें. तिसरा प्रहरपर्यंत युद्ध करून शेवटीं मराठ्यांचा तळ व गांव लुटून हैदर कडलुराकडे परत गेला. ह्मणून पटवर्धन व रास्ते सरदार मुक्कामास आले. या लढाईंत भाऊंच्या पथकानें फार पराकाष्ठा केली, व त्यांच्या पथकापैकीं माधवराव कृष्ण हे याच लढाईंत लागलेल्या गोळीनें मरण पावले. त्यांस पेशवेसरकारांनीं मौजे नांदोरें हा गांव इनाम करून दिला.

ही लढाई झाल्यानंतर माधवराव पेशवे यांच्या प्रकृतीस अस्वस्थ वाटूं लागलें ह्मणून, त्रिंबकरावमामा, पटवर्धन व रास्ते वगैरे सरदारांस, हुजुरातची फौज व तोफखाना यांसुद्धां मागें मोहिमेवर ठेवून स्वारी पुण्यास परत आली.

मामा आदिकरून सर्व सरदार गुडपल्ली येथें तळ देऊन स्वस्थ राहिले आहेत, व त्यांची कांहीं फौज रामदुर्ग व नीलगड वगैरे ठिकाणीं गेली आहे, असें पाहून चिकबाळापूर येथें पेशवेसरकारचा जानोजीराव धुळप ह्मणून सरदार होता त्याला हैदरानें वेढा दिला. जानोजीरावाजवळ फौज थोडी होती, त्यानें पेशवे यांचे सरदारांस कुमकेस येण्याविषयीं निकडीचें पत्र लिहिलें. त्यावरून सर्व सरदार तिकडे जाण्यास निघाले. या प्रसंगीं पटवर्धन सरदारांनीं फार चलाखी दाखविली. सर्व सरदार कित्येक मुक्काम मागें होते, तोंच गोपाळराव, परशुराम भाऊ, व नीलकंठराव यांनीं अघाडीस जाऊन हैदराला बाळापुराजवळ गांठिलें, आणि बरोबर नुसते सात आठशें स्वार असतां हल्ला करून त्याची दाणादाण उडविली. त्याचे ४००।५०० लोक ठार केले, आणि त्याचा गोट लुटून तोफा व घोडे पाडाव करून आणिले.

नंतर त्रिंबकरावमामा हैदराचे तोंडावर जावयास निघाले, आणि गोपाळराव, परशुरामभाऊ व नीलकंठराव, थोरल्या बाळापुराकडे चालते झाले. त्रिंबकरावमामांनीं गुरमकोंड्याच्या किल्ल्यास मोर्चेबंदी करून लढाईची सुरुवात केली. किल्ला फार मजबूत, त्याला दुहेरी खंदक, दुहेरी तट, दुहेरी बुरूज होते. तीन महिने लढाई थांबून थांबून चालली होती. पटवर्धनांचीं सैन्यें हैदराच्या पाठीवर असल्यामुळें त्यांना किल्ल्याच्या रक्षणार्थ कुमकेस फौज पाठवितां येईना. शेवटीं निरुपाय होऊन किल्लेदार शरण आला, आणि पेशव्यांचें निशाण किल्ल्यावर लागलें.

याच सुमारास गोपाळराव गोविंद यांची प्रकृति बिघडली. तेव्हां आपलें पथक आपले बंधु वामनराव व गंगाधरराव यांच्या स्वाधीन करून ते मिरजेस परत आले व उदराची भावना होऊन तेथेंच त्यांचा अंत झाला. गोपाळरावाबरोबर भाऊंनीं अनेक लढाया मारिल्या होत्या. त्यांच्या मरणाचें भाऊंस फार दुःख झालें. ते चुलत बंधु होते तरी

त्यांचा एकमेकांविषयीं कळवळा सख्ख्या बंधूंपेक्षांही कांकणभर ज्यास्त होता.

गुरमकोंडा सर झाल्यावर सर्व सरदार श्रीरंगपट्टणावर जाण्याच्या तयारीनें निघाले. तिकडून हैदरही त्यांशीं सामना करण्याकरितां मोठ्या सैन्यानिशीं आला. उभयपक्षांची गांठ मोतीतलाव येथें पडली. मराठ्यांच्या लष्करांत त्यावेळीं त्रिंबकरावमामा, रास्ते, सेनापती, धुळप, आणि अनेक शूर पटवर्धन सरदार होते. त्यांनीं आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या टोळ्या करून हैदराच्या फौजेस वेढिलें आणि पुढून, मागून, बाजूनें, एकसारखा मारा चालू केला. चार दिवस शर्थ केल्यानंतर हैदरानें श्रीरंगपट्टणची पुनः वाट धरिली. परंतु पटवर्धनांच्या स्वारांनीं निकड लाविल्यामुळें त्याचे सर्व उपाय थकले. शेवटीं आपलें सर्व सैन्य मागें टाकून हैदर व त्याचा पुत्र टिपू यांनीं रात्रीं २५ स्वारानिशीं पोबारा केला. मग त्या सैन्याची वार्ता काय पुसावयाची आहे ? मराठ्यांनीं सर्व फौज लुटून फस्त केली. हैदराचा सर्व तोफखाना, हत्ती, निशाणें, घोडे, खजीना, जवाहीर यच्चयावत् मराठ्यांच्या हस्तगत झालें. हैदराचीं हजारों मनुष्यें व १,९०० स्वार पडले, आणि मराठ्यांच्या सरदारांच्या नाशार्थ जें त्यानें मोठें सैन्य आणिलें होतें त्याची वाताहत झाली. मोतीतलावाच्या लढाईंत भाऊंचे दुसरे चुलतबंधु नीलकंठराव त्रिंबक हे शत्रूवर तुटून पडत असतां उरास गोळी लागून मरण पावले. गोपाळरावाच्या मरणाचा विसर पडला नव्हता, तोंच हा दुसरा दुःखकारक प्रसंग घडून आला त्यामुळें भाऊंचें चित्त अगदीं उद्विग्न झालें. हें दुःख त्यांनीं आपलें मनास फारच लावून घेतलें. त्यांस युद्धाची मसलत सुचेना, आणि ते अगदीं उदास झाले. त्यांचीं पत्रें लष्करांतून येत असत, त्यावरून हा सर्व प्रकार त्यांचे चुलते गोविंद हरी यांस समजला. तेव्हां त्यांनीं अनेक प्रकारें त्यांचें सांत्वन केलें.

मोतीतलावरून सर्व सरदार श्रीरंगपट्टणावर गेले, आणि कावेरीच्या उत्तर तीरावर तळ पडला. शत्रूकडून तहाचें बोलणें आलें, त्यावरून सर्व प्रकरण आटोपतें असें दिसलें. इतक्यांत, एके दिवशीं रात्रीं दोन तीन तोफा सुरू होऊन मराठ्यांच्या लष्करांत गोळे येऊन धडकं ला-

गले. या कृतूमाबद्दल मराठ्यांच्या सरदारांस फार राग आला. त्यांनीं उजाडतांच लढाईची तयारी करून शहरावर तोफा सुरू केल्या. शहरावर नेमानें मारा चालू होतांच मोठमोठ्या हवेल्या धडाधड पडूं लागल्या. शहरांतील रस्ते बंद पडले, मनुष्यसुद्धां फिरकेना. पटवर्धन व रास्ते आदिकरून सरदारांनीं कावेरीच्या पलीकडच्या बाजूस रस्ता अडविला, आणि आंत दाणा वैरण येत असे, ती बंद केली. असें होतांच हैदर घाबरला. पोंदिचरी येथील फ्रेंच लोकांस कुमक पाठविण्याकरितां त्यानें पत्रें लिहिलीं, व त्यांस पाहिजे तें देण्यास तो कबूल झाला. सव्वा महिना किल्ल्यास घेरा पडला होता व मारागिरी चालली होती, तथापि तो बळकट किल्ला हातीं येईना. तेव्हां वेढा ठेवून त्रिंबकरावमामा आसपासच्या मुलुखाची खंडणी घेत चालले. शेवटीं हैदरासही कंटाळा आला, आणि त्यानें तहाचें बोलणें लाविलें. याच समयास माधवराव बल्लाळ पेशवे यांची प्रकृति फार बिघडली, म्हणून छावणींत पत्रें आलीं, तेव्हां सरदारांनीं हैदराचें बोलणें तत्काळ मान्य केलें. आणि रास्ते, व सेनापती यांच्या विद्यमानें तह करून सरदार पुण्याकडे परत फिरले. पुढें लवकरच माधवराव पेशव्यांचा अंत झाला. ( इ० स० १७७२ नवंबर )

ही हैदरावरची मोहीम सुमारें दोन वर्षें चालू होती. तिचा सर्व सरदारांस कंटाळा आला. शिपाई व स्वार त्रासून परत जाण्याकरितां जिकीर करूं लागले. स्वारीस निघतांना जो त्यांचा आवेश होता, व त्यांच्या मुखश्रीवर जें तेज होतें तें सर्व नाहींसें झालें. लढाईंत दुखण्यानें, व हालआपत्तीनें त्यांचे अनेक सोबती मरण पावले. आणि फार दिवस मोहीम चालली तर आपणास मुलांमाणसांची भेट होते किंवा कसें याची त्यांना चिंता लागली. भाऊंकडे कावेरीनदीच्या बाजूच्या चौकीपाहाऱ्याचें काम सांगितलें होतें; रात्रीच्या जागरणानें व थंडीनें त्यांची प्रकृति क्षीण झाली. शिवाय त्यांचे जिवास जीव देणारे दोघे चुलतबंधु या मोहिमेंत मरण पावले, यामुळें काळजी लागून त्यांच्या चित्तास स्वस्थता अगदीं वाटेनाशी झाली. त्यांचेबरोबरचे स्वारही परत जातों म्हणून त्यांच्यामागें लागले. त्रिंबकरावमामाजवळ भाऊंनी रजा मिळण्याविषयीं विनंती केली, परंतु पटवर्धनांचे साह्याची योग्यता

[library stamp]

ह्माला पहिल्यापासून माहित होती, तो त्यांना रजा देणें, हें त्यास नको आणि नोकरीही नको असें भाऊंस झालें. ह्यांनीं आपले चुलते गोविंदराव हरी यांस या प्रसंगीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यावरून हें सर्व व्यक्त होतें. तथापि, गोविंद हरी यांनीं अनेक योग्य विचार लिहून भाऊंचें समाधान केलें. आणि पेशवेसरकारास पत्र लिहून सर्वांचें लवकरच परत येणें घडेल असें करितों, असें भाऊंस कळविलें.

आपले पुत्र व पुतणे मोहिमेवर जाऊन फार दिवस झाले. आपला आतां वृद्धापकाळ झाला व प्रकृतीसही फार बरें नाहीं याजकरितां भेटून जाण्याविषयीं ह्मांना रजा मिळावी, ह्मणून गोविंद हरींनीं पेशवेसरकारास पत्र लिहिलें ह्याचें श्रीमंत माधवराव बल्लाळ यांजकडून उत्तर आलें. ह्यांतील सारांश:—" गोपाळराव गेले, ह्या मागें वामनराव व परशुराम रामचंद्र यांनीं हिम्मत मर्दुमकीची शर्थ केली. नीलकंठरावजी धन्य पावले. प्रस्तुत सरदारीचा बोजा उभयतांवर ( भाऊ व वामनराव यांवर ) आहे. हैदरखानाच्या छातीवर त्रिंबकराव विश्वनाथ आदि-करून सर्व सरदार राहून त्यास श्रीरंगपट्टणांत कोंडलें आहे. तोफां-चा मारा नित्य देतात. चंदीकवाड त्याचें बंद केलें. अत:पर ह्या-चा निकाल थोडे दिवसांत होणार आहे. असें असतां ते नांवचे सरदार, त्यांस येण्यास कसें लिहावें. तिकडील निर्गम झाल्यावर तुह्मी लिहिलें तसें करण्यास सोय पडेल." या पत्रावरून पेशवेसरकार आ-पल्या सरदारांस किती मानीत होते व त्यांच्या पराक्रमास किती चहात होतें, हें कळेल. तसेंच भाऊंच्या शौर्याची कशी चीज होत होती, याचेंही याजवरून सहज अनुमान करितां येईल.

याप्रमाणें बाळाजी बाजीराव यांच्या कारकीर्दींत भाऊंचा प्रतापसूर्य नुकता उदय पावला होता. त्याचें तेज उत्तरोत्तर फांकत जाऊन श्रीमंत माधवरावांच्या कारकीर्दींत त्याचा प्रकाश ह्मैसूरच्या दाट अरण्यापर्यंत पोहोंचला. माधवरावांच्या मरणानंतर त्यांचे बंधु नारायणराव गादीवर बसले, त्यांचेंही पटवर्धनांकडे लक्ष्य चांगलें होतें. त्यांनीं पटवर्धनां-स नवीन बेहडा करून दिला, त्यांत चिकोडी व मनोळी हे दोन परग-णे त्यांच्या सरंजामास आणखी लावून दिले. पुढें नारायणरावाचा

वध होऊन नंतर जें प्रकरण घडलें, त्याचें कथन आतां पुढच्या भागावर ठेविलें पाहिजे.

# भाग ५.

## राघोबादादाचा पाठलाग.

इसवी सन १७७३ च्या आगष्ट महिन्यांत नारायणराव पेशवे यांचा दिवसाढवळ्या पुणें येथें वध झाला. राज्यलोभाच्या दुर्निवार आशेस गुंतून रघुनाथरावाची स्त्री आनंदीबाई हिनें मारेकऱ्यांकडून हें घोरकृत्य करविलें. या कृत्यापासून तें करविणारांचा हेतु तर सफळ झाला नाहींच; परंतु मराठ्यांच्या राज्यावर अनेक अकल्पित संकटें ओढवलीं. राज्यांत दुफळी झाली; सरदारांत कलह लागले; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहींसा झाला; परक्यांचा राज्यांत पाय शिरला, व विक्रय होऊं लागला; आणि जे राजे मराठ्यांच्या एकोप्यामुळें त्यांस भिऊन होते, व त्यांच्या ओंजळीनें पाणी पीत होते तेच त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करूं लागले. अशीं एक नव्हे, दोन नव्हेत, अनेक अरिष्टें उद्भवलीं. मराठ्यांच्या राज्यांत ही एक राज्यक्रांतिच झाली असें म्हटलें पाहिजे. असो, या सर्व वृत्तांताचें कथन करण्याचें आम्हांस प्रयोजन नाहीं. या चरित्राचा नायक जो परशुरामभाऊ, त्यानें या प्रसंगीं कसें वर्तन केलें त्याचें कथन करणें इतकेंच आमचें कर्तव्य आहे.

नारायणरावाचा वध झाल्यानंतर राघोबादादास पेशवाईचें पद प्राप्त झालें. तथापि, राज्यकारभारांत प्रधान होते, ते, व राघोबादादा, यांचीं मनें परस्परांविषयीं पूर्वीपासून शुद्ध नव्हतीं. त्यांनीं त्याच्या हातीं राज्याधिकार न राहावा, म्हणून उद्योग चालविला. या मसलतींत नाना फडणवीस मुख्य होता. राघोबादादा जवळ फौजफांटा मोठा होता, व तो जातीनेंही शूर पुरुष होता, म्हणून आपल्या पक्षास सरदारांचें

साध्य असल्याशिवाय तो सिद्धीस जाण्याची आशा नाहीं, असें समजून नानानें कित्येक सरदारांचीं मनें आपल्या पक्षाकडे ओढून घेतलीं. भाऊ आदिकरून पटवर्धन सरदारांचें नानाबरोबर सख्य होतें. तेही या मसलतींत सामील झाले. राघोबाची उचलबांगडी करावयाचा बेत ठरला. सर्व गोष्टींची यथास्थित व्यवस्था लागेपर्यंत आपली मसलत बाहेर फुटली, तर राघोबादादाकडून पारिपत्य होण्यास उशीर लागणार नाहीं, ह्मणून हा सर्व प्रकार नानानें अत्यंत गुप्तपणें चालविला होता. मसलतींत असलेल्या सर्व मंडळीनें बाह्यात्कारीं राघोबाशीं सख्यानें वागावें व आपल्याविषयीं त्याच्या मनांत आशंका उत्पन्न होऊं देऊंनये अशी नानाची सूचना होती.

आपल्या दुष्ट कृत्यानें जनसमुदायाची प्रीति आपणावरून उडाली आहे, ती, एखादी मोहीम करून यशसंपादून पुनः प्राप्त करून घ्यावी, असा विचार राघोबानें मनांत आणिला, आणि निजामावर स्वारी करण्याचा बेत ठरविला. चालीप्रमाणें सरदारांस आपापल्या फौजेसह येण्याविषयीं पत्रें गेलीं. भाऊ आदिकरून पटवर्धन सरदारांस पत्र आलें, त्यांत "फौज जमा करण्याची तजवीज ठेवावी, आणि हुजूर स्वारी निघतांच लष्करास येऊन मिळावें. तूर्त कोणीतरी एक असामी दोन तीनशें स्वारांसह पुढें पाठवावा," असा मजकूर होता. नानाची सूचना आंतून आली कीं, गडबड न करितां फक्त परशुरामभाऊंस चार पांचशें स्वारांसह स्वारीस रवाना करावें. त्याप्रमाणें, भाऊ राघोबाच्या स्वारींत दाखल झाले.

नानाफडणवीस, सखारामबापू, आदिकरून प्रधान मंडळी व सरदार आणि फौजफाटा, बरोबर घेऊन राघोबाची स्वारी निजामावर जाण्याकरितां निघाली. नवंबर महिन्यांत त्याची व निजामाच्या सैन्याची बेदराजवळ गांठ पडली. तेथें एक लहानशी लढाई झाली. तींतच निजाम टेंकीस आला, आणि तह करण्यास कबूल झाला. वीस लक्षांचा मुलूख निजामसरकारानें पेशवेसरकारास द्यावा, असा करार झाला.

निजामाबरोबर तह झाल्यानंतर राघोबानें कांहीं दिवस कलबुर्ग्याजवळ तळ दिला, आणि तेथून त्रिंबकरावमामा पेंठे याजबरोबर कांहीं

सैन्य देऊन औरंगाबादेकडे साबाजी भोंसला यानें बंड करण्याचा घाट घातला होता, त्याच्यावर त्यास रवाना केलें. राघोबाच्या विरुद्धपक्षाचे जे प्रधान त्याजबरोबर छावणींत होते, त्यांस हेंच पाहिजे होतें. सरदार सर्व राघोबाबरोबर होते, तोंपर्यंत त्यांनीं केलेली मसलत सिद्धीस जाण्याची आशा नव्हती. सरदार राघोबापासून दूर गेले म्हणजे राघोबाचें सैन्य अर्थात् कमी होईल, आणि मग त्याजवर उलटून पडण्यास ठीक पडेल असे त्यांचे मनोदय होते. पुढें निजामावरची स्वारी संपल्यानंतर राघोबानें हैदरावर रोख धरिला, आणि लांब कर्नाटकांत मोहीम करण्याचा त्यानें बेत घातला. तेव्हां तर त्याच्या शत्रूंस फारच आनंद झाला. राघोबा मोहिमेच्या तयारींत गर्क झाला, तेव्हां त्यांचा इष्ट हेतु सिद्धीस नेण्याला त्यांना उत्तम समय आला. राघोबाच्या विरुद्धपक्षांतले प्रमुख, नानाफडणवीस व सखारामबापू हे कांहीं तरी बाहणा करून लष्करांतून पुण्यास आले. गणपतराव रास्ते, बाबाजीराव बारामतीकर, मोरोबा फडणवीस, झाडून सारे कांहींना कांहीं सबब सांगून मागाहून आले.

प्रमुखप्रधान छावणींतून एकेक परत येऊं लागले, तेव्हां कांहीं तरी राज्यक्रांति होणार असें सर्वांनीं अनुमान केलें. कोणी ह्मणत कीं, सदोबा म्हणून जो नगरच्या किल्ल्यांत कैदेंत आहे, त्याला मुक्त करून पेशव्यांचे गादीवर बसविणार. कोणी म्हणत कीं, साताऱ्याच्या राजास मुक्त करणार. असा जो तो आपल्या इच्छेप्रमाणें तर्क करूं लागला.

प्रधानमंडळी पुण्यास आल्यानंतर त्यांची सर्व मसलत अगदीं तयार झाली. आणि मग त्यांनीं तिची परिस्फुटता केली. नारायणराव पेशवे यांची स्त्री गरोदर होती तिला बंदोबस्तानें नेऊन पुरंधर किल्ल्यावर ठेविलें. गंगाबाईच्या नांवानें राज्यकारभार चालू केला. राघोबाच्या पक्षाकडील लोकांस कैदेंत टाकिलें; आणि निजाम व साबाजी भोंसले यांनीं आपल्या पक्षास मिळावें ह्मणून त्यांजकडे बोलणें सुरू केलें. इकडे राघोबाच्या लष्करांत भाऊ आदिकरून पटवर्धन सरदार व अन्य सरदार होते, त्यांस पुण्यांत ठरलेल्या मसलती कृष्णराव बळवंत याच्याद्वारें कळतच होत्या; व सूचना येतांच राघोबावर फिरून पडण्याची सिद्धता होतीच. प्रधानमंडळी गंगाबाईच्या नांवानें कारभार पाहूं लागतांच

राघोबाच्या पक्षांतील लोकांनीं त्याला पुण्यास घडलेला सर्व वृत्तांत कळविला, आणि सुचविलें कीं, "तुमच्या सरदारांत फितूर आहे. सावध राहणें. प्रतिनिधीवर मुख्य नजर ठेवावी." हैदराकडूनही दादांस अशी सूचना आली. त्यावरून राघोबा विचारांत पडला. कोणावर विश्वास ठेवावा व कोणावर न ठेवावा; कोण मित्र व कोण शत्रु; हें त्याला समजेना. या प्रकारें चित्त व्यग्र झालें असतां त्यानें प्रतिनिधीस पाचारण केलें, आणि विचारलें कीं, "तुम्हीं तीनशें स्वारांसह सरकारची चाकरी करावी, असें असतां बरोबर ४,००० स्वार बाळगले आहेत, हें किमर्थ"? प्रतिनिधी निरुत्तर झाले. तेव्हां राघोबानें मुरारराव घोरपडे सेनापती यांस प्रतिनिधीचा गोट लुटण्यास आज्ञा केली. "सरकारचा शत्रु असेल त्याजवर चालून जाऊं, पण घरच्या कलहांत आम्ही आपली तलवार चालविणार नाहीं" असें सेनापतींनीं स्पष्ट उत्तर दिलें. नंतर वामनराव, परशुरामभाऊ इत्यादि सरदारांसही राघोबानें तीच आज्ञा केली; पण त्यांनींही त्याला तेंच उत्तर दिलें. तेव्हां बरोबरच्या सरदारांत सर्व फितूर आहे, असें राघोबास वाटलें, आणि त्यानें पुण्याची वाट धरिली.

सरदारांचीं व राघोबादादाचीं वर सांगितल्याप्रमाणें उत्तरें प्रत्युत्तरें झाल्यानंतर, कांहीं सरदार त्याच्या छावणींत राहिले. परंतु परशुरामभाऊ आदिकरून पटवर्धन मंडळीनें लागलीच त्याची छावणी सोडिली, व राघोबाशीं संग्राम करण्याकरितां तीन फौजा येत असल्याची त्यांस सूचना आली होती, त्यांपैकीं कोणी आले म्हणजे राघोबावर हल्ला करावा अशा हेतूनें मार्गप्रतीक्षा करीत बसले. राघोबाच्या फौजेला एक मजलेचा छाटा ठेवून ते चालले. सांगोलें मुक्कामीं त्रिंबकरावमामाबरोबरची फौज राघोबावरोबर संग्राम करण्याकरितां येत होती, त्यांची व भाऊ आदिकरून पटवर्धन सरदारांची भेट झाली. राघोबाचा मुक्काम पंढरपूर येथें जवळच होता, यामुळें मामांच्या फौजेला विश्रांति मिळाली नाहीं, तोंच तिची गांठ घेण्याचा त्यानें बेत केला. राघोबाचा दररोज कूच व्हावयाचा, तो झाला नाहीं, तेव्हां मामांनींही त्याचा लढाई देण्याचा हेतु जाणला. परशुरामभाऊ आदिकरून मंडळीस लढाईस सिद्ध होण्याविषयीं आज्ञा केली. मामांचा तळ कासेगांव येथें

होता. पटवर्धनाचें सैन्य त्या दिवशीं दहा बारा कोस चालून आलें होतें. घोडीं, माणसें थकून गेलीं होतीं, म्हणून लढाईचा मनसुबा आज न करितां उद्यां करावा, म्हणजे सर्व फौज जमा होईल. लोक हुशार, ताजेतवान होतील, अशी त्यांनीं विनंती केली. परंतु मामांचा आग्रह दिसला. राघोबाही फौज, तोफखाना घेऊन संग्रामास आले. तेव्हां लागलेंच युद्ध जुंपलें. राघोबानें आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. त्यानें दोन टोळ्या दोन बाजूंकडे नेमून, एका टोळीचें काम स्वतः आपणाकडे घेतलें. इकडे मामांनींही तीन टोळ्या केल्या. एका टोळीचें काम भाऊ आदिकरून पटवर्धनांकडे सांगितलें. एकीचें रास्ते व नारो शंकर यांजकडे सांगितलें. आणि तिसरी आपणाकडे घेऊन निघाले. राघोबाच्या तुकडीनें पटवर्धनांवर रोख धरिला. पटवर्धनांचें व राघोबाचें लढाईचें तोंड लागतें आहे तों मामा आपली हुजुरातची टोळी घेऊन राघोबावर चालून गेले. राघोबाची हुजुरात मागें फिरूं लागली होती, इतक्यांत त्यानें पुनः सांवरासांवर केली, आणि उभयतांचें थोडावेळ युद्ध जुंपलें. मामांच्या साह्यास, भाऊ बरोबर ५०० स्वार घेऊन त्या बाजूस आले, तों तत्पूर्वींच मामांची फौज उधळली. मामाच्या हुजुरातींत कांहीं फितूर झाला होता, असें म्हणतात. मग सर्व लढाईचा भार भाऊ व पटवर्धन यांजवरच पडला. राघोबाकडल्या बाजूला महंमद युसफ हा गारद्यांवरचा मुख्य अंमलदार होता. ज्यानें सुमेरसिंगाबरोबर नारायणराव पेशव्याचा वध केला, तो हाच युसफ राघोबानें त्याला सरदारीचें काम सांगितलें होतें. तो, या लढाईचे वेळीं डोकीवर अबदागिरी धरून समरांगणावर उभा होता. त्यास पाहतांच भाऊंस संताप आला. या निमकहराम पुरुषाचा येथच्या येथें प्राण घ्यावा असें त्यांनीं मनांत आणिलें. आणि त्याजवर चालून गेले. उभयतांची लढाई चांगली झाली. भाऊंनीं स्वतः आपण त्या दुष्टाला वार केले. इतक्यांत राघोबानें आपली सर्व फौज त्या बाजूला आणिली. एवढ्या मोठ्या सैन्याबरोबर भाऊंच्या थोड्याशा स्वारांचें कांहीं चालेना; ते मागें सरूं लागले. गांवाजवळ चांगली दाट शेरताटी होती, तिच्या मागें बाकीचे पटवर्धन सरदार आश्रयानें होते. त्यांत भाऊ मिळतांच राघोबाच्या सैन्याचा पाठलाग व मारा कमी झाला. मग आपलीं नि:

शार्णे घेऊन ते समरांगणांतून निघून गेले. उभयपक्षांकडचे पुष्कळ लोक पतन पावले. त्रिंबकरावमामा ठार मारला गेला.

कांसेगांवच्या लढाईच्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात. ती अशी आहे कीं, राघोबाच्या फौजेचा मुक्काम पंढरपुरास आला. त्याच्या पाठीवर मामा व पटवर्धन यांची फौज होती, व बरोबरच्या सरदारांचाही त्यास भरंवसा नव्हताच. ह्मणून राघोबा जयाविषयीं उदासीन झाला होता. त्यावेळीं पंढरपुरांत कोणी 'बडीबया' ह्मणून भगवद्भक्त निर्माण झाली होती. तिचे दाखले व अनुभव पुष्कळांस आले होते, व तिची लोकांत मान्यता झाली होती. राघोबादादाच्या हितचिंतकांनीं तिला बोलावून आणिलें, आणि ह्या लढाईत यश येईल किंवा कसें हा प्रश्न केला. "आज लढाई कराल तर खास यश येईल" असें तिनें सांगितलें. त्यावरून राघोबास व त्याच्या हितचिंतकांस मोठी हुशारी आली. त्यांनीं त्याच दिवशीं लढाईचा बेत निश्चित केला, व शत्रूवर चालून गेले. या लढाईत बडीबया गजारूढ होऊन सैन्याच्या अग्रभागीं होती, आणि राघोबाच्या सैन्यास "काय पाहतां चला चालून, आज मात आहे" असें उत्तेजन देत होती. बडीबया ही या युद्धांत एक "जोन आफ् आर्क" म्हणावयाची.

कांसेगांवच्या लढाईत जय मिळाल्यानें राघोबाचा मोडता पक्ष कांहींसा सांवरतो असें दिसलें. त्याच्या सैन्यांत पुष्कळ भरती होऊं लागली, आणि निजामही त्याच्याकडेसच वळतो असें दिसूं लागलें. हें पाहून त्याचे प्रतिपक्षी प्रधान यांची पांचावर धारण बसली. आतां आपले सर्व बेत फसतात कीं काय, असें त्यांस वाटूं लागलें. हें वर्तमान हरीपंत फडके व परशुरामभाऊ यांस कळतांच त्यांनीं रुकणउद्दवला नामें निजामसरकारच्या लोभांतला दिवाण होता, त्याच्याजवळ संधान बांधून निजामाचें तोंड बंद केलें. दोघांच्या वादांत तिसऱ्याचा लाभ म्हणतात, तसें यावेळीं निजामानें चालविलें होतें.

पुढें राघोबानें पुण्याची वाट सोडिली, आणि शिंदे, होळकर यांच्या पाठीशीं पडावें, ह्मणून तो बऱ्हाणपुराकडे वळला. यामुळें पुण्यांतील प्रधानमंडळीस बराच धीर आला. त्याच सुमारास गंगाबाई प्रसूत होऊन पुत्र झाला, हेच सवाई माधवराव. हें एक अधिकच

आनंदास कारण झालें. राघोबाच्या मागें हरीपंत, भाऊ आदिकरून पटवर्धन सरदार, भोंसले व निजाम लागलेच होते. सवाई माधवराव ४९ दिवसांचे होतांच त्यांस नानांनीं सातांहून पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं, आणि राघोबाचा आतां पेशवाईचे गादीवर कांहींएक हक्क राहिला नाहीं अशीं सर्व सरदारांस पत्रें गेलीं.

राघोबाकडील गारद्यांचा सरदार महंमद युसफ, ज्यावर त्याच्या निमकहरामपणाबद्दल भाऊंचा फार डोळा होता, आणि ज्याला शासन करण्याकरितां कासेगांवच्या युद्धप्रसंगांत त्यांनीं शिकस्त केली, तो बऱ्हाणपुरासमीप आहे असें कळतांच भाऊंनीं आपल्या बरोबर आपले चुलत बंधु वामनराव गोविंद मिरजकर यांस घेऊन त्याच्या शोधार्थ गेले. त्याची कही धरून लुटली. आणि त्याजवर चालून जाऊन त्याचा पूर्ण मोड केला, आणि गोट लुटला. तेव्हां युसफ पळून जाऊन स्वारांचा प्रवेश होऊंनये अशा दाट झाडींत लपला.

शिंदे, होळकर यांच्या साह्याची राघोबानें फार आशा धरिली होती, पण परस्परांच्या भेटी झाल्या, तेव्हां वरकांती आदरसत्काराची मात्र लयलूट. साह्याची गोष्ट काढिली कीं, कानावर हात. पडत्या काळांत साह्य कोण करितो ? मनुष्याचा फळफळाट असतो तोंपर्यंत मी तुमचा, तुह्मी माझे असें ह्मणणारे अनेक असतात, पण विपत्काळीं साह्य करणारा व जीवाकरितां जीव देणारा असा मनुष्य विरळा.

नंतर राघोबानें बडोद्याची वाट धरिली. पण तेथेंही त्याचा इच्छितार्थ साधला नाहीं. ह्मणून अत्यंत निराश होऊन परत फिरला. संपगांवाजवळ त्याच्या मागें फौजा लागल्या होत्या, त्यांनीं त्याजवर छापा घालून त्याचा मोड केला. मग स्वारी एका इंग्लिशांच्या गलबतांत बसून हजार लोकांनिशीं तेथून पळाली, आणि सुरतेस दाखल झाली. सुरतेंत इंग्लिशाबरोबर तह केला, आणि त्यांचीं पलटणें घेऊन भडोचास गेली. मागोमाग हरीपंताचें व भाऊ आदिकरून सरदारांचें सैन्य होतेंच. नापार गांवाजवळ मोठी लढाई झाली, त्यांत भाऊ, नीलकंठराव व वामनराव यांची अघाडीस योजना झाली होती. इंग्रजांच्या फौजेचा मारा त्यांजवर फार होत होता, तरी त्यांनीं आपले स्वार बेधडक त्यांजवर चालवून नेले, आणि त्यांस मागें हटविलें.

ही लढाई झाल्यानंतर लवकरच शिंदे, होळकर व भोंसले यांनीं आपलें अंग लढाईंतून काढिलें. हरीपंतही पुण्यास गेले, तेव्हां लढाईचा सर्व भार भाऊ आदिकरून पटवर्धन सरदार यांजवरच मुख्यत्वें पडला. तरी, त्यांनीं राघोबाची पाठ सोडिली नाहीं. त्याची फौज पुढें व हे मागें, असें चाललें होतें.

पर्जन्यकाळ संपल्यावर राघोबाच्या मदतीस आणखी फौज पाठवावी, ह्मणून मुंबईसरकारानें तयारी चालविली होती. पण इतक्यांत कलकत्याहून त्यांस लढाई तावडतोब बंद करण्याविषयीं हुकूम आला. मुंबईसरकारानें उलट लिहिलें, पण उपयोग झाला नाहीं. पार्लमेंतानें केलेल्या रेग्युलेटिंग आक्टावरून मुंबईइलाख्यावर कलकत्याच्या गव्हर्नर जनरलाची हुकमत चालावी असें नुकतेंच ठरलें होतें. तेव्हां तो अधिकार पहिल्याच गोष्टींत ढिला पडावा, ही गोष्ट कलकत्याच्या सरकारास कशी मंजूर होईल ? शेवटीं मुंबईसरकारचा निरुपाय होऊन त्यांनीं राघोबाचा पक्ष सोडिला, आणि कलकत्याहून वकील येऊन इंग्रज व प्रधानमंडळी यांचा पुरंधर येथें तह ठरला.

याप्रमाणें राघोबाच्या मित्रांपैकीं एका मागून एक सर्वांनीं त्याचा त्याग केल्यामुळें बिचारा निराश्रित आणि निरुपाय होऊन आपल्या शत्रूंच्या स्वाधीन झाला. राज्यलोभानें बिचाऱ्यास इतक्या साऱ्या फेऱ्यांत घातलें.

कांहीं काळ गेल्यावर पुन्हां आणखी इंग्लिशांनीं राघोबास एकवार हातीं धरिलें. त्या वेळींही भाऊंनीं आपली तलवार गाजविली. तो वृत्तांत निराळ्याच एका भागांत सादर केला आहे.

## भाग ५.

## कोल्हापूरकर, हैदरअल्ली व इंग्लिशलोक यांजबरोबर संग्राम.

पुरंधरच्या तहानें प्रधानमंडळीची चिंता कांहीं अंशीं दूर झाली ; पण ती सर्वांशीं दूर झाली नाहीं. प्रधानमंडळीनें ज्या वेळीं राघोबादा-

दास देशाटनास लाविलें, त्यावेळीं, त्यांच्या नाशार्थ राघोबानें कोल्हापूरकर यांस पेशव्यांच्या राज्यावर स्वारी करण्याविषयीं आंतून फूस दिली. आणि हैदरासही तसेंच सुचविलें. हे उभयतांही राजे पेशव्यांचे हाडवैरी. त्यांस ही राघोबाची सूचना अगदीं पथ्यावर पडली. पेशव्यांच्या दरबारांत आपसांत यादवी सुरू झाली, हें पाहून त्यांस अत्यानंद झाला, आणि या प्रसंगीं आपले होईल तितकें कल्याण करून घेण्याकरितां त्यांनीं कंबर बांधिली. सरहद्दीवर जे पेशव्यांचे सुपीक प्रांत होते, त्यांत त्यांनीं दंगे सुरू केले; पेशव्यांच्या मुलखांतलीं ठाणीं मारलीं; गांवें जाळलीं; आणि नानाप्रकारची नासाडी मांडली. सरकारांत वसूल येईनासा झाला. प्रधानमंडळीला हें सर्व कळलें. परंतु राघोबाच्या पाठीवर मोठें सैन्य ठेवणें जरूर पडल्यामुळे त्यावेळीं या दूरच्या शत्रूंच्या खेळीकडे त्यांना चांगलेंसें लक्ष देतां येईना. राघोबानें अविचारानें या राजांस फूस दिली, पण त्याचें तें कृत्य प्रधानमंडळीस फार दिवस भोंवलें.

राघोबाचें प्रकरण मिटल्यानंतर परशुरामभाऊंचें पथक, कोंकणांत सदाशिवराव भाऊचा तोतया झाला होता व त्याचें प्राबल्य उत्तरोत्तर वाढत चाललें होतें, त्याच्या बंदोबस्ताकरितां, शिंद्याच्या सैन्याच्या कुमकेस पाठविलें. तोतयानें कोंकणांत बरेच पाय पसरून २०।२५ किल्लेही हस्तगत केले होते आणि राजधानीवर जाण्याच्या रोखानें वर बोरघांट चढून राजमाची जवळ तो उतरला होता. इतक्यांत, शिंद्याच्या व भाऊंच्या सैन्यांनीं त्याजवर एकाएकीं छापा घातला. तेव्हां तोतयाचा अगदीं मोड झाला, आणि त्याचे लोक दशदिशेस पळून गेले. इंग्रजांच्या आश्रयाची आशा धरून त्यानें पुनः कोंकणाची वाट धरिली; पण, तेथेंही त्याचे पाय लागेनात. शेवटीं, त्याचें दुर्दैव ओढवलें, आणि तो कुलाबेकर आंग्र्याच्या स्वाधीन झाला. त्यानें त्यास पुण्यास पाठविलें. तेथें तो हत्तीच्या पायांखालीं मारला गेला.

राघोबाच्या धामधुमींत मराठे सरदार गुंतले असतां कोल्हापूरकरांनीं दंगा सुरू केला, ह्मणून वर सांगितलेंच. या प्रसंगीं परशुरामभाऊंच्या चुलत बंधूंनीं त्यांचें चांगलें शासन केलें. पण अंमळ संधि सांपडली कीं उचल करावी, हा कोल्हापूरकरांचा नित्यक्रम होता. त्याप्रमाणें त्यांनीं पुनः पुंडावा फारच मांडिला. तेव्हां नाना फडणविसानें महादजी

शिंदे यांची त्यांजवर रवानगी केली, आणि तोतयाचा बंदोबस्त करून भाऊंचें सैन्य परत येतांच त्यांनाही साह्यार्थ रवाना केलें. भाऊ कोल्हापुरास दाखल होतात तों शिंद्यांनीं बहुतेक कार्यभाग आटोपिला होता.

कोल्हापूरकरांचा बंदोबस्त झाल्यानंतर प्रधानमंडळीनें हैदराचें प्रकरण हातीं धरिलें. त्यानें धामधूमीच्या समयीं कोल्हापूरकरांप्रमाणें किंबहुना त्याहीपेक्षां अधिक त्रास दिला होता. त्याच्या राज्याची सरहद्द तुंगभद्रेच्याखालीं पुष्कळ दक्षिणेस होती, ती त्यानें वाढवीत वाढवीत कृष्णेच्या तीरापर्यंत आणून भिडविली होती. त्याच्याविषयीं डोळेझांक करण्याचा आतां समय नव्हता. कोल्हापूरचें प्रकरण संपतांच भाऊ आदिकरून पटवर्धन सरदारांस "हैदराच्या तोंडावर लवकर जावें, मागाहून मातबर सरकारी फौज कुमकेस येत आहे" अशा मजकुराचीं पत्रें दाखल झालीं. पटवर्धन सरदारांस आज्ञा होण्याची फुरसत. ते स्वामिकार्यावर जाण्यास निरंतर सिद्ध असत. सरकारची आज्ञापत्रें येतांच परशुरामभाऊंचे चुलत बंधु, कोन्हेरराव त्रिंबक कुरुंदवाडकर व पांडुरंगराव गोविंद मिरजकर कोल्हापूराहून निघून हैदरखान याजवर मोहिमेस गेले. पेशवेसरकारचीं ठाणीं व अंमल बसवीत आणि किल्ले सर करीत हे उभयतां सरदार बंकापुराजवळ गेले, तों तेथें हैदराचा कुमदानअल्ली नांवाचा सरदार ६,००० पायदळ, ९,००० स्वार व नऊ तोफा, इतकें सैन्य घेऊन होता, त्याची गांठ पडली. सांवशी तालुका कुंदगोळ येथें मैदानांत मोठी लढाई झाली. पटवर्धन यांजपाशीं सैन्य अगदीं थोडें होतें, तरी त्यांनीं धैर्यानें कुमदानाच्या सैन्यावर चाल केली. त्यासमयीं युद्धांत कोन्हेरराव ठार झाले, आणि पांडुरंगरावास पाठीवर व डोक्यावर जखमा होऊन ते व इतर कित्येक मंडळी शत्रूच्या हस्तगत झाली. त्यांस श्रीरंगपट्टण येथें नेऊन लोखंडी पिंजऱ्यांत ठेविलें. तेथेंच पांडुरंगराव यांचा अंत झाला. (कार्तिक शु० ४ शके १६९९) भाऊंची व पेशवेसरकारची फौज कुमकेस येण्यापूर्वींच या सरदारांनीं लढाईची गडबड केली, त्यामुळें असा अनर्थ ओढवला.

या जयानें हैदराला अधिकच उत्तेजन आलें. त्यानें कोपाळ व बहादूरभेंडा हे किल्ले सर केले, आणि एप्रिल इ० स० १७७८ च्या अखेरी-

स मोठी फौज व तोफखाना पाठवून धारवाडास वेढा दिला.

कोन्हेरराव व पांडुरंगराव यांच्या फौजेची सावशी येथें दुर्दशा झाली, तेव्हां भाऊ, कोल्हापुरास होते. पेशवेसरकारास त्या युद्धाचें वर्तमान कळतांच त्यांनीं, या अपजयाचा डाग पुसून टाकण्याकरितां, हैदरावर जाण्याकरितां जें सैन्य तयार होत होतें, त्याची सत्वर रवानगी केली, आणि त्याचें आधिपत्य हरीपंत फडके यांजकडे देऊन, कोल्हापूर येथें असलेलें शिंद्याचें व परशुरामभाऊंचें सैन्य आणि रास्ते व धायगुडे यांचीं सैन्यें त्यांच्या कुमकेस दिलीं. भाऊंची व हरीपंताची मिरज मुक्कामीं गांठ पडली. नंतर हे सरदार कर्नाटकांत गेले. तुंगभद्रेपर्यंत त्यांनीं पेशवेसरकारचा अंमल पूर्ववत् बसविला. हें सैन्य ठिकठिकाणीं जय मिळवून हैदराच्या राज्यांत प्रवेश करूं लागलें तेव्हां हैदर भयाभीत झाला; आणि जयाची आशा सोडून सरदारांस शरण आला. याच समयास पुण्यास आणखी कांहीं कारस्थानें उपस्थित झालीं. तेव्हां सरदारांनीं हैदराचें तहाचें भाषण मान्य करून त्याजपासून मोठी खंडणी घेऊन ते पुण्याकडे परतले.

इतक्यांत कोल्हापूरकरांचा पुनः उपसर्ग लागूं लागला होता. भाऊंनीं कर्नाटकांतून परत आल्यावर पुनः त्यांजवर शस्त्र धरिलें, आणि अकिवाटच्या ठाण्याला मोर्चे देऊन हल्ला केला. तेथें दोघा शूर भावांनीं भाऊंबरोबर मोठ्या हिमतीनें युद्ध केलें; पण ते दोघेही युद्धांत पडले, आणि दोन अडीचशें माणूस ठार झालें, व सात आठशें खराब झालें, तेव्हां तें शहर भाऊंच्या हस्तगत झालें. नंतर कोल्हापूरकरांच्या शिरोळच्या ठाण्यावर भाऊंनीं हल्ला केला व तेंही हस्तगत केलें. दोन ठिकाणीं भाऊंना यश मिळतांच त्यांचा वचक बसला, तो इतका कीं, भुदरगडच्या गडकऱ्यांनीं आपण होऊन किल्ला भाऊंच्या हवालीं केला. भाऊंच्या पराक्रमामुळें कोल्हापूरकरांस पुनः शरण यावें लागलें, आणि तहाचा ठराव होण्याकरितां त्यांनीं पुण्यास वकील रवाना केले.

हरीपंत फडके, परशुरामपंतभाऊ आदिकरून सरदार हैदराच्या मोहिमेवर असतां व ती मोहीम यशस्कर होत असतां त्यांनीं मध्येंच लढाई बंद केली व हैदराशीं तह करून ते परत पुण्याकडे फिरले, याचें कारण राघोबाच्या प्रकरणाचा पुनरुद्भव हें होय. पुरंधरचा तह झाल्या-

नंतर राघोबाचा पक्ष, वास्तविक पाहतां मुंबईसरकारानें सोडावयाचा, आणि तहांतील शर्तीप्रमाणें त्याला निरोप द्यावयाचा, पण तसें घडलें नाहीं. "माझा उत्कर्ष झाला ह्मणजे मी तुम्हांस मुंबईजवळचीं कित्येक ठिकाणें देईन, व तुमचे उपकार विसरणार नाहीं," असें राघोबानें गोड भाषण केलें होतें, त्याच्या योगानें मुंबईसरकारच्या तोंडाला पाणी सुटलें होतें. ते त्याचा नाद सोडीनात. बंगालसरकारचा सैन्य परत फिरविण्याविषयीं सक्त हुकूम आला, तेव्हां निरुपायानें त्यांनीं सैन्य परत बोलाविलें. परंतु आंतून राघोबास ते पूर्वीप्रमाणेंच वश होते. त्याला बरोबरच्या २०० लोकांसह मुंबईंत त्यांनीं आश्रय दिला; त्याच्याकडून विलायतेंत कोर्ट आफ् डिरेक्टर्स या मंडळीस व राजास अर्ज करविले; आणि त्याच्या प्रकरणाचे कागदपत्र आपल्या अनुकूल अभिप्रायासह विलायतेस पाठविले. राघोबाच्या वचनानें आणि मुंबईसरकारच्या गौरवाच्या लेखानें कोर्ट आफ् डिरेक्टर्स मोहित झाले, आणि मुंबईसरकारानें राघोबाबरोबर सुरत येथें तह केला होता, तो त्यांनीं मंजूर केला. इतक्यांत, कोणी फ्रेंच कामगार पुण्यास आला आहे, व तेथें दरबारांत त्याचा चांगला आदरसत्कार होत आहे, असें कलकत्त्यास वर्तमान आलें. त्यावरून बंगालसरकारासही प्रधानमंडळीच्या कृतीविषयीं चांगला संशय आला.

नंतर, बंगालसरकार व मुंबईसरकारयांमध्यें कांहीं पत्रव्यवहार चालून, राघोबाचें साह्य करावयाचें व त्यास पेशवाईच्या गादीवर स्थापावयाचें, असा इंग्लिशांचा विचार ठरला. आणि, या कामाकरितां बंगाल्याहून व मुंबईहून अशीं दोन सैन्यें पाठवावीं असें त्यांनीं योजिलें. या ठरावाप्रमाणें राघोबास समागमें घेऊन सुमारें तीनहजार लोकांचें सैन्य मुंबईहून पुण्यास जाण्याकरितां निघालें. इंग्लिशांच्या मसलतीची बातमी नानाफडणविसास पूर्वींच कळली होती. त्यानें शत्रूशीं सामना करण्याकरितां महादजी शिंदे यांजबरोबर मोठें सैन्य देऊन त्यांची रवानगी केली.

इंग्लिशांचें लश्कर घांट चढून वर आलें व त्याचा तळेगांव येथें तळ पडला. तेथें, मराठ्यांचें मोठें सैन्य आपल्या रोखानें येत आहे असें त्यांस समजलें. तें ऐकून त्या सैन्यावरील अधिकारी भयाभीत

झाले. आणि त्यांचें धैर्य सुटलें. तेव्हां युद्धाचा सर्व विचार गुंडाळून ठेवून त्यांनीं आल्या पायानें मुंबईची वाट धरिली. मराठ्यांस हें कळतांच त्यांनीं मागोमाग पाठलाग केला, आणि वडगांव येथें त्यांस गांठून कोंडिलें. तेथें थोडीशी चकमक झडली त्यांत भाऊंच्या पथकांतील बळवंतराव अनंत यादवाडकर यांस जखमा लागल्या. चोहोंकडून कोंडले, तेव्हां इंग्लिशसैन्यावरचे अधिकारी पाहिजे ते करार लिहून देण्यास निमूटपणें मान्य झाले; आणि शिंद्याच्या मध्यस्तीनें उभयपक्षांचा तह ठरला. यांत इंग्लिशांनीं राघोबास स्वाधीन करावें; त्याचा पक्ष अत:पर धरूं नये; भडोच शिंद्यास द्यावी; बंगाल्यांतून सैन्य येत असेल तें परत फिरवावें; दोन मोठे कामगार ओलीस द्यावे; आणि साधारणपणें इ० स० १७७३ त जी स्थिति होती ती कायम राहावी, अशीं मुख्य कलमें होतीं. नंतर राघोबा शिंद्याच्या स्वाधीन झाला.

युद्धाचें मूळ कारण राघोबा तो स्वाधीन झाला, तरी हें प्रकरण संपलें नाहीं. सैन्यावरच्या अधिकाऱ्यांनीं जो लज्जास्पद तह केला, तो मुंबईसरकारानें नामंजूर केला, आणि पुन: युद्धाची तयारी चालविली. इतक्यांत, बंगाल्यांतून निघालेलें सैन्य नर्मदेच्या अलीकडे आलें. या सैन्याचा सर्व अधिकार जनरल गाडर्ड याजकडे होता. भोंसल्याचें पाठबळ आपणास मिळेल तर फार उत्तम होईल, अशा आशेनें गाडर्ड साहेबानें पुष्कळ खटपट केली. पण ती सर्व निष्फळ झाली. नंतर अनेक संकटांतून पार पडून गाडर्डचें सैन्य पश्चिमेस सुरतेस दाखल झालें. तेथें राघोबा त्यास पुन: येऊन मिळाला. नानांचीं व गाडर्ड साहेबाचीं तहाविषयीं बोलणीं चाललीं होतीं; पण 'राघोबास आधीं स्वाधीन करा, आणि मग काय तें बोला,' असा नानांनीं आग्रह धरल्यामुळें तहाचा योग जमेना. गाइकवाडाचें साह्य मिळेल तर पाहावें, ह्मणून गाडर्ड साहेब उत्तरेकडे वळले. त्यांच्या पाठीवर शिंदे, होळकर यांच्या फौजा लागल्या. गाइकवाडाशीं बोलणें साधलेंसें दिसेना, तेव्हां गाडर्ड साहेब पुन: मुंबईकडे वळले आणि पुण्यावर जावें या हेतूनें खोपवलीजवळ आले. नानांस हें वर्तमान कळतांच त्यांनीं त्यांजबरोबर सामना करण्याची झपाट्यानें तयारी केली. हुजुरात फौज व तोफखाना

बरोबर देऊन, पानशे, धुळप व रास्ते यांस बोरघांटाखालीं पाठविलें; आणि परशुरामभाऊंस त्यांच्या बंधूंसह पुण्यास जलदीनें येण्याविषयीं लिहिलें.

आज्ञेप्रमाणें भाऊ पुण्यास येतांच त्यांजबरोबर १२,००० बारा हजार फौज देऊन गाडर्ड साहेबांस मुंबईहून रसद येत असे, ती बंद करण्याच्या कामावर नानानीं त्यांची योजना केली, आणि हरीपंत फडके व होळकर यांचीं सैन्यें घांटमाथ्यावर ठेविलीं. या प्रसंगीं भाऊंकडे सोंपविलेलें काम फार जोखमीचें होतें. तथापि, त्यांनीं त्यांत पूर्ण यश संपादिलें. कोंकणांत पोंचतांच भाऊंनीं, म्याकेसाहेब पनवेलीहून गाडर्ड साहेबाच्या लष्करास पोंचविण्याकरितां रसद घेऊन येत होता, त्याजवर एकदम छापा घातला. तो मार सोसून, भाऊंच्या तडाक्यांतून निसटून जावें ह्मणून म्याकेसाहेबानें रातोरात बारा मैल कूच केलें, आणि चौकगांवाजवळ पोंचला. पण भाऊंनीं त्याचा पिच्छा सोडला नाहीं. येथें पुनः छापा घालून म्याकेबरोबरची बहुतेक रसद भाऊंनीं मारून आणिली. युद्ध चाललें असतां बंगालच्या पलटणींतील कांहीं लोक पुढें चालून आले; त्यांस भाऊंनीं प्रथमतः आंगावर घेतलें. पण त्यांच्या मुख्य सैन्यापासून ते चांगले दूर आले आहेत असें पाहतांच, त्यांना चोहोंकडून वेढिलें, आणि त्यांचा बहुतेक फडशा उडविला. दिवसां उभय पक्षाकडील लोक स्तब्ध होते. रात्र पडतांच म्याकेसाहेब राहिलेली रसद व लोक घेऊन गाडर्डसाहेबाकडे जाण्यास निघाला. आणि अंधारांतून मोठ्या कष्टानें खोंपवलीस पोंचला.

यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं गाडर्ड साहेबानें कर्नेल ब्राऊन साहेबाबरोबर तीन पलटणें, दहा तोफा आणि बहुतेक स्वार देऊन पुनः रसद आणण्याकरितां त्याला पनवेलीस पाठविलें. वाटेंत भाऊंनीं ब्राऊन साहेबावर हल्ला केला, आणि साहेबाबरोबर ओझ्याचे पुष्कळ बैल होते ते भाऊंच्या हातीं लागूं नयेत ह्मणून त्यानें पराकाष्टा केली, तरी बहुतेक बैल भाऊंनीं लांबविले. नानानीं भाऊंच्या साह्यार्थ तुकोजी होळकरास पाठविलें, त्यानें त्यांचा फार उपयोग केला. वाटेंत बहुतेक सामान लुटलें गेल्यामुळें ब्राऊन साहेबास पुढें जातां येईना व मागेंही जातां येईना. इकडे गाडर्ड साहेबाचे ओझ्याचे बैल नाहींसे झाल्यामुळें

त्यालाही डेरे उठवून परत जाण्याची शक्ति राहिली नाहीं. असा गाडर्डसाहेब चोहोंकडून घोंटाळ्यांत पडला. शेवटीं, त्यानें मुंबईहून नवी कुमक आणविली. आणि नंतर वाटेंत भाऊंच्या सैन्यापासून एक सारखा त्रास सोशीत, तीन दिवसांनीं ब्राऊन साहेब, रसद घेऊन खोपवली येथें गाडर्ड साहेबाच्या छावणींत परत येऊन पोंचला. या प्रसंगीं इंग्लिशांचें पुष्कळ सामान भाऊंच्या हातीं लागलें, आणि त्यांचे शेंकडों लोक मरण पावले.

रसद पोंचण्यास अशा हरकती होऊं लागल्या, तेंव्हां पुण्यावर जाण्याचा नाद सोडून देऊन मुंबईची वाट धरावी हें चांगलें असा गाडर्डसाहेबानें विचार केला; आणि मुंबईहून आयती कुमक आली आहे तेंव्हां परत फिरण्यास अशी पुनः संधि सांपडावयाची नाहीं, असें समजून त्यानें प्रथमतः जडसामान, बुणगें व तोफा पुढें पाठविल्या. मग कोणास न समजूं देतां आपण निघून जाण्याची तयारी केली. या समयीं भाऊ आपल्या सैन्यासह भीमाशंकर घांटाच्या पायथ्याशीं होते; होळकर कुसुरघांटाच्या पायथ्याशीं, आणि हरीपंत फडके घांटावर खंडाळें आणि कार्लें यांच्या दरम्यान फौज व तोफखाना घेऊन होते. गाडर्डसाहेबांच्या बेताची मराठ्यांच्या सरदारांस बातमी लागली होती. त्यांनीं त्याला चांगला घेऱ्यांत घालण्याचा बेत केला. गाडर्डसाहेब तळ सोडून निघाला, तों दुसऱ्याच दिवशीं हरीपंत फडक्यानें त्याजवर अकस्मात् हल्ला केला, आणि त्याचे डेरे, बंदुका, दारुगोळ्याच्या पेट्या आणि २,००० गोळे, असें बरेंच सामान लुटून नेलें. त्या दिवशीं साहेबांनीं तेथेंच मुक्काम केला, आणि दुसरे दिवशीं पुनः कुच सुरू केलें. त्यांनीं तळ सोडून फार वेळ झाला नाहीं तोंच दारूच्या एका पेटीवर हरीपंताच्या लष्करांतून आलेला एक मोठा गोळा पडला आणि आगीनें पुष्कळ सामान नाश पावलें. हा प्रथमतःच अपशकून झाला. गाडर्डसाहेब पुढेंसे जातात तों परशुरामभाऊ व होळकर आपापल्या सैन्यासह येऊन दाखल झाले आणि अघाडीस जाऊन त्यांनीं साहेबांची वाट अडवून धरिली. याप्रमाणें पुढें भाऊंचा व होळकराचा त्रास आणि मागें हरीपंताचा त्रास, अशा मोठ्या बिकट स्थितींत गाडर्डसाहेब सांपडले. त्यादिवशीं मोठ्या निकरानें इंग्लिश लोक लढले. उ-

भय पक्षांकडील पुष्कळ लोक पडले व जाया झाले. खुद्द गाडर्डसा-
साहेबांस तीन जखमा लागल्या. अशा प्रकारें हाल सोशीत आणि भाऊंच्या हातचा मार खात गाडर्डसाहेब पनवेलीस पोंचले. या मोहिमेंत मराठ्यांनीं इंग्लिशांस जर्जर केलें, याचें यश भाऊंस आहे.

इंग्लिशलोक याप्रमाणें मराठ्यांबरोबर युद्धांत गुंतले आहेत असें पाहून तिकडे दक्षिणहिंदुस्थानांत हैदरअल्लीनें पुनः दंगा मांडिला, आणि तो इंग्लिशांच्या मुलुखास पीडा देऊं लागला. यामुळें, आणि मराठ्यांबरोबरच्या युद्धापासून फलनिष्पत्ति कांहींच दिसेना यामुळें, हें प्रकरण आतां मिटवावें, असें इंग्लिशांनीं मनांत आणिलें, आणि महादजी शिंद्याच्या विद्यमानें सालपें येथें मराठ्यांबरोबर तह केला. (इसवी सन १७८२.) याप्रमाणें राघोबाचें प्रकरण शांत झालें.

यानंतर राज्यपदाची सर्व आशा सोडून राघोबा कोंपरगांवास गोदातीरीं जाऊन राहिला. पुढें यानें राज्यकारभारांत ढवळाढवळ केली नाहीं.

गोविंद महादेव दिक्षीत
भिवंडी.
खासगी पुस्तकालय.

## भाग ७.

## नरगुंदचें प्रकरण. बदामीची स्वारी.

इ० स० १७८२ च्या दिसेंबर महिन्यांत हैदरअल्ली निवर्तला. तेव्हां कित्येकांस असें वाटलें कीं, कर्नाटकांतलें एक अरिष्ट नाहींसें झालें; आतां तिकडे स्वस्थता होईल, आणि पेशव्यांच्या सरदारांस त्या प्रांतांत पुनः आपलीं सैन्यें नेण्याची गरज पडणार नाहीं. पण हैदराची गादी त्याचा पुत्र टिपूसुलतान यास प्राप्त झाली, त्याची दुष्कर्मांत बापावर कडी. हैदरानें पेशव्यांच्या सरदारांचे जे प्रांत घेतले, ते त्यांजकडून मामूल खंडणी घेण्याच्या करारानें त्यांजकडे पुनः चालविले होते; टिपू मनास वाटेल त्याप्रमाणें खंडणी चढवूं लागला; हैदराची धर्मसंबंधीं कृत्यांत कोणास फारशी पीडा नसे; टिपूनें तर स्वधर्माच्या

प्रसाराकरितां छळ आरंभिला. तेव्हां कर्नाटकप्रांताच्या स्वस्थतेची आशा नष्ट झाली. पुढें लवकरच टिपूच्या दुष्ट कृत्यांचा संबंध पुण्याच्या दरबारापर्यंत येऊन पोंचला; त्याचा प्रकार असा:-

कर्नाटकांत नरगुंद ह्मणून एक लहानसें ब्राह्मणीसंस्थान होतें. तेथील संस्थानिक भावे हे पेशव्यांचे अंकित होते. तथापि, हैदरानें तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा मुलूख जिंकिला, त्यांत नरगुंदसंस्थानही जिंकिलें; त्या वेळेपासून नरगुंदकर, पूर्वीं पेशव्यांस जी खंडणी देत असत, तीच हैदरास देऊं लागले. टिपूस राज्यपद प्राप्त झाल्यावर तो नरगुंदकरांजवळ फार अधिक खंडणी मागूं लागला. टिपूच्या राज्यांत "बोलेल तो कायदा आणि ह्मणेल तो न्याय" असा प्रकार होता. त्याचें मागणें अमान्य करण्याची नरगुंदकर यांची प्राज्ञा नव्हती. आणि एकदां ज्यास्त खंडणी द्यावी, तर तीच कायम होऊन बसणार. अशी दोन्हीकडून अडचण आली. नरगुंदकर यांनीं जास्त खंडणीबद्दल टिपूस कांहींच स्पष्ट लिहिलें नाहीं. पण या गोष्टींत टिपूचा व आपला संग्रामापर्यंत प्रसंग येणार असें पक्कें समजून सैन्याची कुमक मिळविण्याकरितां गुप्तपणें यत्न चालविले. प्रथमतः मुंबईसरकाराकडे संधान लाविलें. पण मुंबईसरकारानें नन्नाचा पाढा वाचिला. मग पेशव्यांच्या दरबारीं पत्र लिहिलें. त्यांत "मी पेशवेसरकारचा सेवक; मला या प्रसंगीं स्वामींनीं साह्य केलें पाहिजे;" अशी मोठ्या आर्जवानें विनंती केली. नरगुंदकर हे जातीचे ब्राह्मण; आणि पटवर्धन सरदारांचे आप्त; यामुळें नानांनीं त्यांचा अभिमान धरिला, आणि त्यांचें कार्य हातीं धरिलें. सैन्याची कुमक मिळावी, म्हणून नरगुंदकरांची विनंती होती, तिचा विचार प्रथमतः एकीकडे ठेविला, आणि खंडणीच्या पैशाविषयीं टिपूनें नरगुंदकरांस निकड लाविली होती, त्याला निषेधून लिहिलें कीं, "जहागीरदारांचीं संस्थानें एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत गेलीं असतां, त्यांजकडून खंडणी मामूल ठरावापेक्षां जास्त घ्यावी अशी वहिवाट नाहीं. जे जहागीरदार आपल्या सरकारापाशीं राज्यनिष्ठेनें वागतात त्यांचे सर्व हक्क पाळिले जाण्याची आजपावेतों एकसारखी वहिवाट आहे." या पत्राचें टिपूनें उत्तर पाठविलें, त्यांत आपल्या राज्यांत पाहिजे तितकी खंडणी घेण्यास आपण मुक्त्यार आहों, असा

त्यानें उद्धटपणाचा प्रकार लिहिला. आणि नानांच्या लिहिण्याचा उपहास करावा या हेतूनें लागलीच सैन्याच्या दोन टोळ्या नरगुंद घेण्याकरितां पाठविल्या. यामुळें लढाईवर प्रसंग ओढवला.

नरगुंदचें प्रकरण सामोपचारानें न मिटतां एकाएकीं निकरावर आलें, तेव्हां नानांस नरगुंदकरांच्या कुमकेस सैन्य पाठविणें भाग पडलें. या सैन्याचें आधिपत्य भाऊ व गणेशपंत बेहरे यांजकडे दिलें. हे उभयतां सरदार नरगुंदाजवळ येऊन पोहोंचले तों टिपूच्या सरदारांनीं लढाई न करितां नरगुंदचा वेढा उठविला, आणि दूर अंतरावर जाऊन तळ दिला. तेथून त्यांनीं भाऊ व बेहरे यांस निरोप पाठविला कीं, 'आम्ही नरगुंद सोडून येथें सैन्याचा तळ दिला हा आपले सरकार पेशवे यांची अदब ठेवण्याकरितां.' या थट्टास्पद व धिट्टाईच्या निरोपानें भाऊ व बेहरे हे उभयतां क्रुद्ध झाले. आणि त्यांनीं एकदम टिपूच्या गोटावर छापा घालून त्याच्या सैन्यावर ते तुटून पडले, आणि त्यांनीं त्यास मागें हटवीत नेलें. इतक्यांत, टिपूचीं दोन पलटणें व स्वार ताज्या दमानें त्यांच्या सैन्यावर चालून आले, तेव्हां त्यांस मागें पाय घ्यावा लागला.

भाऊ व बेहरे यांच्याबरोबरचें सैन्य थोडें होतें, आणि लढाईचें तोंड तर चांगलें जुंपलें. हें वर्तमान नानांस कळतांच त्यांनीं तुकोजी होळकर याजबरोबर बरेंच मोठें सैन्य देऊन त्याला भाऊ व बेहरे यांचे कुमकेस पाठविलें. तथापि, या सैन्यापासून या प्रसंगीं मोठीशी कार्य निष्पत्ति झाली नाहीं. मराठ्यांची मोठी फौज युद्धसंग्रामाकरितां येत आहे असें वर्तमान टिपूला समजतांच त्यानें कपटानें पेशव्यांच्या दरबारीं तहाचें बोलणें सुरू केलें. नरगुंदकरांनीं आपलें स्वामित्व कबूल करावें, म्हणजे आपलें दुसरें कांहीं मागणें नाहीं; व नरगुंदकरांकडून यावयाची दोन वर्षांची खंडणीही आपण पेशवेसरकारास देण्यास कबूल आहों असें निजामअलीच्या मार्फत त्यानें गोडीचें बोलणें लाविलें. नानांस टिपूच्या वर्तनाचा व कृत्रिमाचा अद्यापि अनुभव नव्हता. त्यांस हा मायावीपणा न वाटतां खराच प्रकार आहे असें वाटून त्यांनीं त्याच्या ह्मणण्यास रुकार दिला, आणि भाऊ व बेहरे यांच्या सैन्यास परत येण्याविषयीं आज्ञा केली.

टिपूचें हें सर्व कृत्य कपटाचें होतें. पेशव्यांशीं तह झाला ह्मणजे अर्थात् त्यांचें सैन्य परत जाईल, आणि मग नरगुंदकर आपल्या मुठींत येऊन त्यांच्या धिट्टाईच्या अपराधाबद्दल आपणास त्यांचें यथेच्छ कंदन कादितां येईल, असा त्याचा अंतस्थ हेतु होता, आणि तो त्यानें सिद्धीस नेला. पेशव्यांचें सैन्य कृष्णेच्या पार झालें नाहीं, तोंच त्यानें नरगुंदावर हल्ला करून तें शहर घेतलें. तेव्हां बिचाऱ्या नरगुंदकरांस निरुपायानें शरण जाऊन त्या राक्षसाच्या स्वाधीन व्हावें लागलें. नरगुंदकरांस आणि त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांस टिपूनें बंदिवान करून श्रीरंगपट्टणास नेलें. नरगुंदकरांच्या कन्येस आपली स्त्री केली, आणि बाकीच्यांस अक्षय्य बंदींत ठेविलें. नरगुंदकरांच्या प्रकरणांत पेशव्यांनीं हात घातला, ही गोष्ट टिपूला आवडली नाहीं. तो फक्त नरगुंदकरांचेंच शासन करून राहिला नाहीं. नरगुंदकरांची व्यवस्था लाविल्यावर पेशव्यांच्या मुलुखांत त्यानें दंगा सुरू केला. हिंदूंवर त्यानें शस्त्र धरिलें. अनेक प्रकारें त्यांस तो छळूं लागला. कृष्णेच्या दक्षिणचे पुष्कळ हिंदूंस धरून बलात्कारानें त्यानें त्यांच्या सुंता केल्या, आणि त्यांस मुसलमान केलें. ब्राह्मणांवर जो कहर गुदरला तो तर सांगतां येत नाहीं. असें सांगतात कीं, त्याच्या राक्षसी यातनांपासून मुक्त होण्याकरितां दोन हजार ब्राह्मणांनीं प्राणत्याग केला.

टिपूनें तह केला आहे, तेव्हां आतां नरगुंदचें प्रकरण लवकरच मिटेल असे नानांचे विचार चालले होते, इतक्यांत कर्नाटकांत टिपूनें चालविलेल्या अघोर कृत्यांचें वर्तमान पुण्यास आलें, तेव्हां नानांस अतिशय संताप आला. 'शेरास सव्वाशेर' या ह्मणीप्रमाणें टिपूनें आपणांस पूर्णपणें फसविलें असें त्यांच्या मनांत आलें. पण गोष्ट होऊन चुकली, आतां काय उपयोग ? तथापि, मराठी राज्याचा उपमर्द करून ब्राह्मणसरदारांस कैदेंत टाकिलें, ही टिपूनें सर्व हिंदूंची मोठी अप्रतिष्ठा केली. याजबद्दल त्यास योग्य शासन झालें पाहिजे असा त्यांचा संकल्प झाला आणि मोठी जंगी तयारी करून टिपूचा चांगला समाचार घ्यावयाचा त्यांनीं निश्चय केला.

या मोहिमेवर जाण्याकरितां पुण्यास आपल्या सैन्यानिशीं येण्याविषयीं पेशव्यांच्या सरदारांस दरबारांतून पत्रें गेलीं. आणि पुण्यास सैन्य

नमूं लागलें. इंग्रजांसही कुमकेस येण्याविषयीं लिहून गेलें. पण त्यांच्या काहीं हरकती होत्या, त्यामुळें ते आले नाहींत. शिंदे, होळकर यांच्या फौजा आणि पेशव्यांची हुजुरात फौज पुण्याहून निघून भीमा तटाकानें टिपूच्या रोखावर चालली. नाना स्वतः पंढरपूर येथें छावणींत आले. नंतर यादगिरीजवळ भोंसल्याचें व निजामाचें सैन्य येऊन मिळालें. सर्व सैन्याचें आधिपत्य हरीपंततात्या फडके यांजकडे होतें. पटवर्धन सरदारांस या स्वारीस येऊन मिळण्याविषयीं हुकूम झाला होता. त्याप्रमाणें भाऊ व त्यांचे चुलतबंधु गंगाधरराव गोविंद आणि पुतणे रघुनाथराव नीलकंठ हे आपापलीं पथकें घेऊन लष्करास मिळाले. कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधील सर्व किल्ले व ठाणीं घेण्याकरितां तुकोजी होळकर व गणेशपंत बेहरे यांस पंचवीस हजार सैन्य घेऊन कित्तूरच्या बाजूला जाण्याविषयीं आज्ञा झाली. आणि बाकीचें सर्व सैन्य बदामीकडे वळलें. भाऊंचें पथक या मुख्य सैन्याबरोबर होतें. प्रथमतः बदामीस या सैन्यानें वेढा दिला. बदामी हें तटबंदीस्त शहर मोठ्या मैदानावर आहे. त्याच्या मध्यभागीं लहानशी गढी आहे, आणि दोन बाजूंस दोन डोंगरी किल्ले आहेत. पेशव्यांच्या सैन्यानें वीस दिवस तोफांचा मारा चालविला होता, पण त्याच्या मजबूत तटाला फारसा कोठें धक्का लागला नाहीं. तेव्हां शिड्या लावून वर चढून जाऊन किल्ला घेण्याचा विचार ठरला. मोंगल व मराठे मिळून वीस हजार सैन्यांची या कामावर योजना झाली. कोटांतील ३,५०० लोक त्यांच्या नाशार्थ व त्यांचा आंत प्रवेश न होऊं देण्याकरितां सिद्ध झाले. यावेळीं जे लोक जिवाची आशा न धरितां शिड्यांवरून वर चढले त्यांत भाऊ व त्यांच्या बरोबरची मंडळी होती. किल्ल्यांतल्या लोकांनीं तटासभोंवतालें आंत जाण्याच्या रस्त्याखालीं दारूनें भरलेले लहान लहान बुधले पुरले होते आणि हल्ला करणारें सैन्य त्या स्थळीं येऊन पोंचतांच कोटांतील लोकांनीं बुधल्यांस बत्ती दिली. यामुळें सैन्याचा फार नाश झाला. तथापि, लोक न डगमगतां एकमेकांच्या चढाओढीनें पुढें चालले, आणि तटास शिड्या लावून वर चढून गेले. हे लोक वर चढतांच तटावरचे लोक पळत सुटले आणि बाजूच्या दोन्ही डोंगरी किल्ल्यांचा त्यांनीं आश्रय धरला. पेशव्यांचें सैन्य हे किल्ले घे-

ण्याकरितां लागलेंच पुढें गेलें. त्यांजवर आंतून त्यांनीं मोठमोठे दगड लोटिले व गोळ्यांचा पाऊस पाडिला. पण हल्ला करणाऱ्यांचा निस्सीम उद्योग व त्वेष यांपुढें त्यांचा सर्व इलाज थकला. ते अगदीं गर्भगळीत झाले. आणि जीवदान मागून त्यांनीं ते दोन्ही किल्ले स्वाधीन केले.

भाऊंनीं व इतर पटवर्धन सरदारांनींही या प्रसंगीं आपली तलवार चांगली गाजविली. त्यांच्या पथकास हल्ल्यांत एका बाजूचें काम सांगितलें होतें. त्या बाजूनें वर चढून जात असतां त्यांचे पुष्कळ लोक पडले. आणि अनेक लोक जखमी व घायाळ झाले. त्यांच्या कामागिरीबद्दल मुख्य सेनापतींनीं त्यांची फार वाहवा केली. बदामीच्या लढाईची गणना पेशव्यांच्या कारकीर्दींत ज्या कितीएक थोर व निकराच्या लढाया झाल्या, त्यांत केली पाहिजे. पेशव्यांच्या सर्वच सैन्यानें या प्रसंगीं शौर्य, धैर्य, आणि सहनशीलता प्रकट केली. कर्नाटकांतल्या वृद्ध मनुष्यांच्या मुखांतून या लढाईविषयीं परंपरा चालत आलेल्या कितीएक गोष्टी अद्यापि ऐकण्यांत येतात. त्यांत पटवर्धन सरदारांचें बहुत वर्णन असतें. त्यांपैकीं एक चमत्कारिक गोष्ट आम्ही आपल्या वाचकांस सादर करितों.

बदामीस वेढा पडून बरेच दिवस झाले तरी, हल्ल्याची कांहीं हाल चाल दिसेना. लष्करांत पाहावें तों जिकडे तिकडे सामसूम. तेव्हां नानांस फार आश्चर्य वाटलें. एक वेळ रात्रीं लष्करांत काय चाललें आहे हें पाहाण्याकरितां टोपी पांघरून कोणास समजूं न देतां सरदारांच्या डेऱ्यांतून फिरत असतां ते पटवर्धन सरदारांच्या डेऱ्यांत आले, आणि पाहातात तों तेथें मंडळी बुद्धिबळाच्या खेळांत मग्न आहे. नाना डेऱ्याच्या तोंडाजवळ उभे होते, इतक्यांत, भाऊंची दृष्टि सहज तिकडे गेली. हें नानांच्या तत्काळ लक्षांत आलें, आणि ते झटदिशीं निघून चालते झाले. नानांचा सरदारांस मोठा वचक होता. आपणास नानांनीं संग्रामाकरितां आणिलें आणि आपले हे खेळ त्यांनीं पाहिले तेव्हां ते आतां आपली चांगली पूजा करतील असें सर्वांस भय पडलें. त्याच रात्रीं हरीपंताच्या डेऱ्यास सरदार मंडळी गेली, आणि दुसऱ्या दिवशींच हल्ला करण्याचा निश्चय सर्वांनीं ठरविला व [illegible]

बदामी सर झाल्यानंतर भाऊ, हरीपंताच्या लष्कराबरोबर गजेंद्रगडाकडे वळले. वाटेनें शिरहट्टीचा लहानसा किल्ला लागला. त्याजवर हल्ला करून तो सर केला. इतक्यांत टिपू सामना करण्याकरितां अगदीं समीप ठेपला असें वर्तमान आलें. निजाम जातीचा मुसलमान असून तो या वेळीं पेशव्यांस साह्य झाला. या रागानें टिपूनें अध्वनी येथें निजामाचें ठाणें होतें त्याजवर रोख धरिला. अध्वनी येथें निजामाचा पुतण्या मोहबतजंग होता, त्यानें पेशव्यांच्या सरदारांस व हैदराबादच्या दरबारास जलदीनें कुमक पाठविण्याविषयीं लिहिलें. हरीपंतानें भाऊ व दुसरे एक दोन सरदार यांचीं सैन्यें मात्र आपणाजवळ ठेवून घेऊन निजामाकडचें सर्व सैन्य आणि वीस हजार मराठ्यांचें सैन्य कृष्णराव बळवंत व रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर यांजबरोबर रवाना केलें. या सैन्यास आणखी हैदराबादेहून सैन्य येऊन मिळालें तेव्हां एकंदर फौज साठ हजार झाली. ही मोठी कुमक येऊन पोंचण्यापूर्वीच अध्वनी हस्तगत करून घ्यावी ह्मणून टिपूनें दोन तीन वेळां हिय्या केला. पण मोहबतजंगानें त्यास दाद दिली नाहीं. सैन्य दाखल होतांच टिपूनें वेढा उठविला आणि दक्षिणेकडे निघून गेला.

मोहबतजंगाच्या कुमकेस सैन्य पाठवून दिल्यानंतर हरीपंत व भाऊ वगैरे सरदार राहिलेलें सैन्य घेऊन शिरहट्टीहून गजेंद्रगडावर गेले. आणि वरील सैन्य कार्यभाग आटोपून येण्यापूर्वींच त्यांनीं गजेंद्रगडचा किल्ला हस्तगत करून घेतला.

गजेंद्रगड हस्तगत झाल्यावर सैन्याचा रोख बहादूरभेंडा व कोपाळ या शहरांकडे वळला. बहादूरभेंडा स्वाधीन झाला, आणि कोपाळ स्वाधीन होणार, इतक्यांत टिपू मोठ्या सैन्यासह टोंकाऱ्यांत बसून तुंगभद्रेच्या आलीकडे आल्याची खबर आली. तेव्हां टिपूवर जाण्याची सिद्धता झाली. पण तिकडे संग्रामाला योग्य असें स्थळ दिसेना, ह्मणून पेशव्यांचें सैन्य सावनुराजवळ आलें. टिपूनेंही जवळच तीन कोसांवर तळ दिला. दोन्हीं सैन्यें पंधरा दिवस कांहीं एक न करितां तळावर पडून राहिलीं. आक्टोबरच्या पहिल्या तारखेस पाहांटेची पांच घटका रात्र असतां पूर्वीं कांहीं एक कळूं न देतां टिपूनें मराठ्यांच्या तोफखान्यावर छापा घातला. व स्वतः पुढें होऊन तोफा घेण्याविषयीं होती तितकी शि-

कस्त केली. पण त्याचे सर्व यत्न निष्फळ झाले. टिपूला निराश होऊन आपल्या छावणीस परत जावें लागलें.

टिपूनें आणखी दोन तीन वेळां पेशव्यांच्या सैन्यावर छापा घालण्याचा यत्न केला. पण त्याचें कांहीं चालेना. त्याचा छापा येतो असें कळतांच मराठ्यांचे घोडेस्वार संग्रामास सिद्ध असत, आणि त्यास पिटून लावीत. त्यामुळें त्याचे यत्न व्यर्थ झाले. शेवटीं त्रासून त्यानें होळकराच्या मार्फत तहाचें बोलणें लाविलें. मागें नुकतेंच टिपूनें पहिल्यानें लीनता दाखवून तह केला, व सैन्य परत फिरतांच त्यानें तद्विरुद्ध वर्तन आरंभिलें. यावरून त्याचें तहाचें बोलणें खरेंपणाचें आहे किंवा कृत्रिमाचें आहे याची सरदारांस मोठी शंका आली. आपल्या मनांत कृत्रिमभाव नाहीं हें दर्शविण्याकरितां टिपू आपले दोन मुख्य सरदारही ओलीस पाठविण्यास कबूल झाला. तथापि, त्याचें तहाचें बोलणें कोणी मनास आणीना. तहाची गोष्ट चार महिने तशीच भिजत पडली. शेवटीं, एप्रील सन १७८७ त उभयपक्षांच्या तहावर सह्या झाल्या. या तहांत नरगुंद, बदामी, व कित्तूर हीं टिपूनें मराठ्यांस द्यावीं, आणि पंचेचाळीस लक्ष रुपये खंडणी द्यावी, इत्यादि मुख्य कलमें होतीं.

याप्रमाणें टिपूला त्याच्या कृत्रिमाबद्दल व दुष्कर्माबद्दल योग्य शासन करून व स्वामिकार्य सिद्धीस नेऊन, पेशव्यांच्या सैन्यासह हरिपंत पुण्यास गेले आणि भाऊ तासगांवास आले. इतर सरदारमंडळीही स्वस्थानीं गेलीं.

गार्डन मराठे विद्यालय ... ... ग्रंथालय

## भाग ८.

### श्रीरंगपट्टणावर स्वारी. इंग्लिशांचें साह्य.

दुष्कर्माबद्दल आणि उद्दामपणाबद्दल टिपूला पेशव्यांनीं चांगलें शासन केलें. त्यावरून शुद्धीवर येऊन, त्यानें आपलें आचरण सुधारावयाचें होतें, आणि पेशव्यांबरोबर केलेल्या तहाप्रमाणें वागावयाचें

होतें, परंतु त्या मदांधास अशी बुद्धि कोठून सुचणार ! जेरीस आणिलें ह्मणजे निरुपायानें तह करावा, आणि थोडासा धीर येतांच, तो मोडावा, हा त्याच्या वर्त्तनाचा क्रम होता. तह काय, आणि एक खर्डा काय, दोन्हीं तो सारखींच लेखीत होता. तह ह्मणजे आपल्या सर्वस्वावर बाणी येऊन ठेपते, तेव्हां एक रक्षणाचें उत्तम साधन आहे, असें तो मानीत असे. अशा विचित्र गुणाच्या मूर्तीस पेशव्यांनीं मागील स्वारींत राजास योग्य अशा प्रतिष्ठेनें वागविलें. हा त्यांनीं त्यावर मोठा उपकार केला. पण या उपकाराची कृतज्ञता कोणाला ! टिपूला पेशव्यांनीं दिलेल्या सवडीनें अधिकच उत्तेजन आलें. तो आपल्या उपकारकर्त्यांच्या नाशाविषयीं पहिल्यापेक्षां अधिकच यत्न करूं लागला. फ्रेंच लोकांना आश्रय देऊन सैन्याची सिद्धता त्यानें जलदीनें चालविली, आणि सैन्यामध्यें नवीन भरती करूं लागला. नुकत्याच झालेल्या मोहिमेंत इंग्रजांनीं त्यास साह्य केलें नाहीं ; आणि निजामानें तर पेशव्यांस अनुकूल होऊन त्याजबरोबर संग्राम केला, ह्मणून हीं तिन्ही राष्ट्रें अंतस्थ एकचित्तानें आहेत, आणि आपल्या नाशाविषयीं त्यांचा कृतसंकल्प झाला आहे, असें त्याचें मन त्याला खाऊं लागलें. दुष्कर्मी पुरुषाचें मन नेहमीं साशंक असतें. आणि दुसऱ्याच्या प्रत्येक क्षुल्लक कृत्यांत व वर्त्तनांत त्यास आपला नाश दिसतो. हीच अवस्था टिपूची झाली. मागील भागांत वर्णिलेली मोहीम संपल्यानंतर निजामसरकारचा वकील पुण्यास होता, त्याचे व पेशव्यांचे कांहीं करारमदार झाले, हे आपल्या नाशाचे विचार असावेत असें त्यास वाटलें. आणि नंतर लवकरच निजामसरकारचा व इंग्रजसरकारचा तह झाला. त्यांत उभयपक्षांच्या दोस्त राजांमध्यें मराठयांचें नांव लिहिलें असून टिपूचा उल्लेख मुळींच नव्हता. तेव्हां तर हे त्रिवर्ग आपल्या नाशाविषयीं निःसंशय उद्युक्त झाले आहेत, असा टिपूचा पूर्ण ग्रह झाला. प्रथम कांहीं कारण नसतां टिपू आपण होऊन आपल्या नाशास कारण झाला. मराठ्यांबरोबर तह झाला असतां, हरीपंत फडके यांजबरोबरचें सैन्य कृष्णेच्या पलीकडे गेलें नाहीं तोंच, त्यानें कित्तूर घेऊन तहाविरुद्ध आचरण केलें. आणि बेदनूर येथें मोठें सैन्य जमवून कोंकणप्रांतावर स्वारी करण्याची भीति घातली ;

वेदनूर येथें सैन्य जमूं लागतांच नाना फडणविसास टिपूच्या मनांतला मराठ्यांच्या नाशाचा हेतु समजला. आणि त्यानें लागलेंच या नवीन उपस्थित झालेल्या संकटाच्या निवारणाचे उपाय चालविले. इंग्लिशांची कुमक मिळण्यास्तव त्याजबरोबर तह करण्याचा विचार करून, त्यांचा पुणें येथें वकील होता, त्याच्याद्वारें बोलणें सुरू केलें. टिपूच्या नाशाविषयीं इंग्लिशांचा अंतस्थ हेतु होताच. त्यांस हा नानांचा विचार रुचला. तथापि, टिपूनें इंग्लिशांस उपद्रव दिला नव्हता, म्हणून त्याच्या नाशाविषयीं तह करण्यापूर्वीं इंग्लिशलोक कांहींतरी कारण शोधूं लागले. इतक्यांत, इंग्लिशांचा दोस्त त्रावणकोरचा राजा याच्या मुलूखावर विनाकारण टिपूनें स्वारी केली, तेव्हां हें कारण इंग्लिशांस आपतेंच मिळालें, आणि नाना फडणविसानें मधाचें बोट लाविलेंच होतें, त्यास ते तत्काळ मोहित झाले. इंग्लिशांचा व निजामसरकारचा तह झालाच होता. यामुळें या त्रिवर्ग राष्ट्रांच्या एकीचा चमत्कारीक योग लागलाच घडून आला.

त्रिवर्ग राष्ट्रांचा पुणें येथें इसवी सन १७९० च्या जूनच्या पहिले तारखेस तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, निजामसरकार व पेशवेसरकार यांनीं पंचवीस हजार सैन्य घेऊन टिपूच्या राज्याचा उत्तरभाग पर्जन्यकाळांतच घ्यावा. पर्जन्यकाळ संपल्यानंतर त्रिवर्ग राष्ट्रांनीं मिळेल तितकें सैन्य घेऊन टिपूचा सर्व मुलूख घ्यावा. इंग्लिशांस जरूर पडलें तर, दहाहजार सैन्य पेशवे व निजामसरकार यांनीं द्यावें, व त्याचा खर्च इंग्लिशांनीं द्यावा. इंग्लिशांनीं पेशव्यांच्या सैन्याच्या कुमकेस दोन पलटणें द्यावीं व दोन पलटणें निजामाच्या मदतीस द्यावीं. या पलटणांचा खर्च त्या उभयतांनीं द्यावा, आणि लढाईंत जो मुलूख मिळेल तो त्रिवर्गांनीं सारखा वाटून घ्यावा वगैरे.

तहाप्रमाणें टिपूच्या राज्यावर सैन्य पाठविण्याचा निश्चय झाला, तेव्हां त्या सैन्याचें आधिपत्य कोणाकडे सांगावें, याचा विचार निघाला. पेशव्यांच्या पदरीं अनेक सरदार होते, व त्यांपैकीं कांहीं शौर्यादि गुणांत नांवाजण्याजोगे होते. तथापि, त्यांचे गुण केवळ एकदेशीय होते. स्वतंत्र स्वारीचें काम ज्या पुरुषाकडे सांगावयाचें, त्याच्याठायीं शौर्य, धैर्य इत्यादि गुण असून शिवाय आणखी कितीएक गुण असावे लाग-

तात. पहिला आणि मुख्य, हाताखालच्या लोकांवर अधिकार चालविण्याची कुशलता, त्याच्या अंगीं असली पाहिजे. ह्मणजे, त्यांच्यावर वचक तर त्यानें ठेविलाच पाहिजे, कारण तसें न होईल, तर सर्व बेबंदशाई व फितुरी होईल; पण त्यांस ममताळूपणानें वागविलें पाहिजे. अशासाठीं कीं, त्यांनीं वेळ पडेल तर जिवाची आशा न धरितां स्वामिकार्यास उपयोगीं पडावें; अशा पुरुषाच्याठायीं समयस्फूर्ति असली पाहिजे; अशासाठीं कीं, कसाही प्रसंग येवो, न डगमगतां त्यांतून पार पडण्याची युक्ति त्याला तत्काळ सुचली पाहिजे; आणि हाताखालचे लोक संतुष्ट राखण्याची त्यानें दक्षता ठेविली पाहिजे. याशिवाय शत्रूचे विचार आणि त्याचें बलाबल, आणि ज्या प्रांतांवर स्वारी करावयाची त्याची माहितीही त्यास अवश्य असली पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार नानांनीं केला, तेव्हां अवघ्या सरदारांत दोन योग्य पुरुष त्यांना आढळले. एक परशुरामपंतभाऊ व दुसरे हरीपंत फडके. त्यांत कर्नाटक प्रांतांतल्या लढायांचा भाऊंस अनुभव पुष्कळ अधिक; ह्मणून या पुरुषाकडेच या मोहिमेचें सेनापतित्व देण्याचा नानांनीं निश्चय केला.

भाऊंस तो थोर अधिकार देण्याकरितां नानांनी तारिख ९ मे इ०स० १७९१ रोजीं दरबार भरविला. श्रीमंत सवाई माधवराव साहेब पेशवे, कारभारी, सरदार, मानकरी, आदिकरून सर्व मंडळी, स्वस्थानापन्न झाल्यानंतर नानांनीं टिपूवर स्वारी करण्याविषयीं पेशवेसरकारचा ठरलेला विचार सर्वांस विदित केला. आणि टिपूनें आपल्या दुष्ट आचरणानें हिंदुज्ञातीस, हिंदुधर्मास आणि हिंदुराज्यास सर्व प्रकारें पीडा देण्याचा क्रम चालविला आहे, याजकरितां तो यावज्जन्म विसरणार नाहीं, असें त्याला योग्य शासन करण्यास्तव सरकारांतून नामांकित सरदार परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांची योजना झाली आहे; तरी ज्या सरदारांस या स्वारीस जाण्याची आज्ञा होईल, त्यांनीं भाऊंच्या अभिप्रायानुरूप वर्तन करावें, आणि "हिंदु" या पदाचा व सरकारच्या गादीचा अभिमान धरून स्वामिकार्याविषयीं मनःपूर्वक व एकचित्तानें सर्वांनीं उद्योग करावा असें सुचविलें. भाऊंस सेनापतीचीं वस्त्रें व पोषाग दिले. आणि त्यांच्या हुद्याचीं सरकारी पत्रेंहीं त्यांच्या स्वाधीन केलीं.

श्रीमंतांचा, व नानाआदिकरून प्रमुख मंडळीचा निरोप घेऊन भाऊ निघाले, ते तासगांवास आले. पेशव्यांच्या हुजुरातींतील कांहीं स्वार व पायदळ आणि तोफा व सर्व पटवर्धन सरदार, प्रतिनिधी, गोखले, व दुसरे कित्येक लहान लहान सरदार इतक्यांचेंच काय तें सैन्य, पेशव्यांस यावेळीं भाऊंबरोबर देण्याची सवड होती. पण हें सैन्य तहांतील ठरलेल्या संख्येपेक्षां फारच कमी होतें. ह्मणून नवीन लोकांची भरती करण्याविषयीं भाऊंस आज्ञा झाली. तासगांवास आल्यावर ते प्रथमत: या उद्योगास लागले. स्वारीच्या सिद्धतेचीही त्यांनीं तयारी चालविली. लांबच्या स्वारीची तयारी करणें ह्मणजे मोठ्या जिकीरीचें काम. शिपायांच्या वस्त्रप्रावर्णापासून तों त्यांच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांपर्यंत, आणि स्वारांच्या घोड्यांच्या नालापासून तों त्यांच्या लगामापर्यंत सर्व गोष्टींची तरतूद बरोबर आहे किंवा नाहीं हें पाहणें ; त्यांचीं बरोबरचीं शस्त्रास्त्रें व युद्धोपयोगी सामान व्यवस्थित व पुरेसें आहे किंवा नाहीं इकडे लक्ष देणें ; आणि निरनिराळ्या कामावर योग्य मनुष्यांची योजना करणें ; या सर्व कामांत अतिशय जिकीर असते. भाऊंनीं मोठ्या निकडीनें सर्व तयारी चालविली. तरी त्यांचे तीन महिने या कामांत गेले.

सर्व सिद्धता झाल्यावर, आषाढ अखेरीस भाऊ तासगांवाहून निघाले. तेव्हां त्यांजबरोबर पांच हजार स्वार व दोन हजार पायदळ इतकें काय तें सैन्य होतें. पहिला मुक्काम कौठ्यास झाला. दुसरा कुमठें येथें झाला. तेथेंच इंग्लिशांकडून, मुंबईहून आलेलीं पलटणें सैन्यास येऊन मिळालीं. दिवस ऐन पावसाळ्याचे होते. यामुळें, नद्या, नाले, व ओढे पाण्यानें तुडुंब भरून चालले होते. मार्गांतून ठिकठिकाणीं ढोंपर इतका चिखल. त्यांतून जातांना घोड्यांचे, मनुष्यांचे, व जनावरांचे जीव मट्यास आले. कुडची गांवाजवळ नावेंतून हें सैन्य कृष्णेच्या पलीकडे उतरलें. कऱ्हाडकर पंतप्रतिनिधी व विजयदुर्गचे सुभेदार धोंडोपंत गोखले आपल्या सैन्यासह छावणींत दाखल झाले. लहान लहान सरदार दर मुक्कामास येऊन मिळतच होते. एक दोन मुक्कामांनंतर गोकाकेजवळ तळ पडला. तेथून तोफखाना, व अवजड सामान, घटप्रभा पार होण्याकरितां पुढें पाठवून देऊन मुख्य मुख्य सरदारांच्या स्वाऱ्या जवळच घटप्रभेचा मोठा धबधबा आहे, तो पाहण्यास गेल्या;

हा धबधबा सृष्टींतील एक अद्भुत चमत्कार आहे. येथें नदीच्या पाण्याचा मोठा प्रवाह मोठ्या वेगानें वाहत जाऊन सुमारें दोनशें फूट उंच तुटलेल्या कड्यावरून खालीं पडतो. आणि खालीं वेगानें जातांना इतका छिन्नविच्छिन्न होतो, कीं जणूकाय, बारीक पिंजलेला शुभ्र कापूस, वायु वेगानें खालीं जात आहे असें दिसतें. मेघगर्जनेपेक्षांही अति भयंकर अशा घोर शब्दांचा अस्खलित घोष चालला असतो. या भयंकर आवाजामुळें पशुपक्षी, तेथें प्रवेश करण्यास धजत नाहींत. सर्व प्राणीमात्रांनीं सोडून दिलेलें तें काळाचें वसतिस्थानच कीं काय, असें भासतें. आणि भयंकर देखावा पाहून चित्त थक्क होऊन जातें. परशुरामभाऊ यांची स्वारी तें स्थळ पाहण्यास गेली, त्यावेळीं श्रावण मासाचे ऐन पावसाळ्याचे दिवस होते. नदीला पाणी फार आलें होतें, ह्मणून धबधब्याची शोभा व मजा फारच अवर्णनीय होती. हा सृष्टिचमत्काराचा अपूर्व देखावा पाहून स्वाऱ्या डेऱ्यास दाखल झाल्या.

पुढें चार दिवसांनंतर एकुंडी गांवाजवळ हें सैन्य मलप्रभा ( मलापहारी ) नदी उतरून दक्षिणतीरास आलें. तेथून टिपूचा मुलूख लागला. लढाईची कामगिरी थोडथोडी सुरू झाली. रस्ता पाहण्याकरितां व शत्रूच्या प्रांताची व हालचालीची टेहळणी करण्याकरितां भाऊंचे जेष्ठ पुत्र आपासाहेब हे लष्कराच्या अघाडीस बरोबर पांचशें, सहाशें निवडक लोक घेऊन जात असत. नवलगुंद येथें लष्कराचा मुक्काम असतां आपासाहेब, नित्यक्रमाप्रमाणें पुढें गेले, तों शत्रूकडचे सुमारें तीनशें लोक, कांहीं स्वार व तोफा घेऊन जवळच्या किल्ल्यांतून आडवे आले. उभयतांची चकमक उडाली. त्यांत शत्रूकडचे लोक मागें हटले. नंतर मराठ्यांनीं तो किल्ला सर केला. असाच प्रकार आणखी दोन तीन वेळां झाला. तेव्हां किल्लेकरी यांस धाक बसला. ते भाऊंच्या सैन्याला सामना देण्याला, धजावतनासे झाले. घेतलेल्या मुलुखांत भाऊ अंमलही बसवित चालले. टिपूच्या जुलुमाला लोक इतके त्रासले होते कीं, टिपूच्या सैन्याला पिटाळून लावण्याकरितां ते भाऊंस आपण होऊन साह्य देऊं लागले; व बिनहरकत वसूल देऊं लागले. सैन्याचा ज्या गांवीं तळ पडे, तेथें जे कोणी शिलेदार, बारगीर किंवा सरदारी बाण्याचे पुरुष असत, त्यांना बोलावून आणावें, आणि घोडे

फिरवणें, बोथाटी खेळणें इत्यादि खेळ पाहावे ; आणि त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांना कडी तोडे बक्षिस द्यावे, असा भाऊंचा पाठ होता. या त्यांच्या लहानशा बक्षिसांनीं हजारोंजण त्यांच्या चाकरीस राहिले. असें होतां होतां थोड्याच काळांत भाऊंचें सैन्य जें पूर्वीं फार थोडें होते, तें १०,००० स्वार व ३,००० पायदळ इतकें जमलें.

नंतर मजल दर मजल कूच करीत लष्कराचा तळ हुबळीवरून धारवाडाजवळ आला. धारवाडच्या किल्ल्यांत 'बद्रीजमानखान' ह्मणून कोणी टिपूचा सरदार मोठें सैन्य घेऊन मराठ्यांशीं सामना करण्याकरितां राहिला होता. त्या किल्ल्याला भाऊंच्या सैन्यानें तारीख १८ सप्तंबर रोजीं घेरा दिला. किल्ल्याचे तट मातीचे होते. तरी इतके बळकट होते कीं, खिंडार पाडणें मोठें दुर्घट होतें. हा किल्ला मैदानामध्यें असून त्याला सभोंवतीं शिंगी पंचवीस तीस हात रुंदीची, आंत जनावरांचा व मनुष्यांचा प्रवेश होऊं नये ; अशा बंदोबस्ताची होती. शिंगीच्यापुढें रेवण ; त्याच्या आंत वीस पासून तीस हात रुंदीचा व तितक्याच खोलीचा पहिला खंदक, व आणखी तट असा तो किल्ला मजबूत होता. कोणालाही तो किल्ला हल्यानें घेतां आला नाहीं, अशी त्याची ख्याति होती. किल्ल्यास लागून दक्षिणेस धारवाडची पेंठ पूर्व पश्चिम असून तिलाही, एक लहानसा तट व खंदक आहे. सुमारें दीड महिना किल्ल्यावर व पेठेवर तोफांचा मारा चालू होता. मग लढाईचें थोडेसें तोंड लागलें. शत्रूचे कित्येक लोक पेठेंतून बाहेर येऊन लढाईच्या बेतानें राहिले होते, त्यांजवर भाऊंनीं हल्लाकरून त्यांस परत पाठविलें, आणि त्यांच्या तीन तोफा घेतल्या. नंतर आक्टोबरच्या तिसाव्या तारखेस भाऊंच्या सैन्यानें पेठेवर चाल केली, आणि निकरानें लढून पेंठ घेतली. या लढाईंत इंग्लिशांनीं फार श्रम घेतले. त्यांच्या दोघां मुख्य कामगारांस मोठमोठ्या जखमा लागल्या ; आणि बरेच लोक पडले. भाऊंच्या सैन्यांतील सुमारें पांचशें लोक पतन पावले, व पुष्कळ जखमी झाले. त्यांचा पुतण्या जनार्दन मेघःशाम आपले लोक शत्रूवर नेत असतां ठार झाला. शत्रूचा नाश याहीपेक्षां अधिक झाला.

नंतर किल्ला घेण्याचें काम राहिलें. किल्ल्यावर तोफांचा मारा

पुष्कळ दिवस चालला होता. पण आंतील लोक दाद देईनात. भाऊंच्या बरोबरचा दारूगोळा व सामान दिवसेंदिवस संपत चाललें. किल्ल्यापुढें पडून राहण्यापेक्षां तटाला खिंडार पाडून आंत शिरण्याचा यत्न करावा असा पुष्कळांचा आग्रह दिसला. तेव्हां भाऊंनीं तसें केलें. पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. फुकट मनुष्यें मात्र खराब झालीं. तथापि, भाऊ घाबरले नाहींत. वेढा सक्त होऊन आंतल्या लोकांस दाणावैरण मिळेनाशी झाली म्हणजे, किल्ला आपल्या सहज हस्तगत होईल; हें त्यांस माहीत होतें; म्हणून तोफांचा मारा वेताबाताचा ठेवून त्यांनीं वेढा अगदीं सक्त केला. शेवटीं भाऊंचे अनुमान प्रत्ययास आलें. वेढा सक्त होतांच आंतल्या लोकांचे हाल होऊं लागले. दाणावैरण मिळेना. आणि बाहेरच्या लोकांबरोबर संग्राम करण्याचें तर सामर्थ्य राहिलें नाहीं. याप्रमाणें साडेसहामहिने किल्ला संभाळून शेवटीं बद्रीजमालखान जेरीस आला, आणि त्रिंबकरावआणा हेरवाडकर यांचेद्वारें त्यानें भाऊंस सांगून पाठविलें कीं, मला जिनगीसुद्धां आपण पार करीत असाल तर मी किल्ला आपल्या स्वाधीन करितों. हें भाऊंनीं मान्य केलें, आणि पेशवेसरकारचें निशाण किल्ल्यावर लागलें.

बद्रीजमालखान याचा व भाऊंचा करार असा झाला होता कीं, त्यानें किल्ल्यांत असलेलें सर्व सामानसुमान असेल तसें स्वाधीन करावें. या कराराप्रमाणें खानानें आचरण केलें नाहीं. यावरून भाऊ त्याला फार टाकून बोलले. त्याचा खानास राग आला आणि त्यानें त्या त्वेषांत भाऊंवर आपली तरवार उगारली. त्यामुळें खानाचें व भाऊंचें तेथच्या तेथें युद्ध जुंपलें. खानाकडील पांचहजार लोकांचा भाऊंनीं फडशा उडविला. आणि खान घायाळ होऊन पळत जात असतां, त्यास पकडलें. त्याची सर्व मिळकत घेतली, आणि त्याला बंदीवान करून नरगुंदचे किल्ल्यावर टाकिलें. विश्वासघात व अविचार या गुन्ह्यांबद्दल हें त्यास योग्य शासन झालें.

श्रीरंगपट्टणाकडे सत्वर जावें ह्मणून दरबारांतून नानांची वरचेवर पत्रें येत होतीं. तथापि, धारवाडची कामगिरी पूर्ण झाल्याशिवाय जावें तर घेतलेला सर्व अम्मल हातचा जाईल, आणि मागें शिलशिला राहील. आणि सामानाचा व सामुग्रीचा मागून पुरवठा होणार नाहीं.

याजकरितां धारवाड घेतल्याशिवाय पुढें जातां येत नव्हतें. धारवाड हस्तगत होतांच कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या मधील प्रदेशांत मराठ्यांचा अम्मल बसला. कुसेगळ इत्यादि लहान मोठीं ठाणीं शत्रूंनीं पटापट स्वाधीन केलीं. आणि घेतलेल्या प्रांताचा वसूलही सुरळीत येऊं लागला.

तिकडे मद्रासच्या बाजूनें लार्ड कार्नवालिस साहेबानें टिपूच्या प्रांतावर स्वारी करून पुष्कळ प्रदेश व किल्ले काबिज केले. आणि बंगळूर हें मोठें तटबंदिस्त ठाणें घेतलें. मग राजधानीवर जाण्याकरितां मराठ्यांचें व निजामांचें सैन्य केव्हां येऊन मिळतें, याची तो मार्गप्रतीक्षा करीत बसला. निजामाचें थोडेसें सैन्य त्याला पूर्वीं येऊन मिळालें होतें. पण मराठयांची त्याला कांहीं वार्ता कळेना. भाऊंचें सैन्य धारवाडाला शह देऊन बसलें आहे, इतकें एकदां पूर्वीं त्याला समजलें होतें. पण पुढें काय झालें हें त्याला समजलें नव्हतें. सैन्याची कुमक लौकर पाठवावी, अशी त्यानें पेशव्यांच्या दरबारांत निकड लाविली. तेव्हां नानाफडणविसानें आणखी तीस हजार सैन्य तयार केलें, आणि हरीपंताकडे या सैन्याचें आधिपत्य देऊन त्याची रवानगी केली. हें सैन्य भीमेच्या कांठानें जाऊन निजामाकडून जें मुख्य सैन्य कुमकेकरितां पट्टणावर जात होतें त्याला जाऊन मिळालें. नंतर हीं सैन्यें पुढें चालतीं झालीं.

इकडे भाऊंची स्वारी धारवाडाहून दरकुच दरमजल श्रीरंगपट्टणाकडे चालली. पेशवेसरकारचीं ठाणीं टिपूनें घेतलीं होतीं, तीं त्यांनीं सर्व सोडविलीं. आणि चितलदुर्ग आणि मायकोंडे वगैरे घेतलीं. मायसमुद्र येथें मुक्कामास आले, तेथें असें वर्तमान आलें कीं, लार्ड कार्नवालिससाहेब श्रीरंगपट्टणाकडे गेले आहेत, व तेथें दाणा व वैरण यांच्या आसीमुळें फार संकटांत आहेत. हें ऐकतांच भाऊंनीं आपले चिरंजीव आपासाहेब यांजबरोबर पांच सहा हजार फौज व सामानानें भरलेले पांच सहा हजार लमाण दिले. आणि लार्ड साहेब असतील तिकडे जावें, त्यांची भेट घ्यावी, त्यांची दाणावैरणीची सोय करावी, आणि आपण आल्याचा मजकूर साहेबांस कळवावा ह्मणून त्यांस आज्ञा केली. आपणही फौज घेऊन मागोमाग जलदीनें निघाले.

लार्ड कार्नवालिस साहेब मराठ्यांच्या सैन्याची वाट पाहून दमले, व शेवटीं निराश होऊन निजामसरकाराकडून जें थोडेंसें सैन्य आलें होतें ह्मणून वर सांगितलें तें, व आपलें सैन्य घेऊन श्रीरंगपट्टणाकडे गेले होते. टिपूनें वाटेंत त्यांना फारसा कोठें अडथळा केला नाहीं. पण त्यांची फजीती करण्याची एक चमत्कारिक युक्ति लढविली. त्यानें लार्ड कार्नवालिस साहेबाच्या मार्गावरचे व श्रीरंगपट्टणाच्या आसपासचे गांव जाळून उजाड केले. त्यामुळें लार्ड कार्नवालिस साहेबाला दाणावैरण व सामान कांहीं मिळेनासें झालें. श्रीरंगपट्टणाच्या समीप जाऊन मोर्चे वगैरे लावून हल्ल्याची त्यानें तयारी केली; इतक्यांतच लष्करांत दुष्काळ पडला. सैन्याला खावयाला बरोबर शिधा मिळेना, आणि बैल घोड्यांना वैरणचारा मिळेना, तेव्हां श्रीरंगपट्टण घेण्याचा विचार सोडून, त्याला परत बंगळुराकडे मोहरा वळवणें भाग आलें. लार्ड कार्नवालिस साहेब श्रीरंगपट्टणाजवळचे मोर्चे उठवून एक मजल मागें आले, तों आपल्याकडे चोहोंकडून स्वारांच्या टोळ्या येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. सकृद्दर्शनीं साहेबांस असें वाटलें कीं, हे कोणी शत्रूकडील लोक असावेत. आणि त्यांजबरोबर संग्राम करण्याकरितां त्यांनीं युद्धाची तयारीही केली. पुढें शोध केल्यावर त्यांना असें समजलें कीं, परशुरामपंतभाऊंचे पुत्र आपासाहेब आपल्या आगमनाची सुवार्ता कळविण्यास येत आहेत. लार्ड कार्नवालिस साहेबानें आपासाहेब यांचा फार सत्कार केला. बरोबर अन्न किती आहे, व भाऊसाहेब कोठें आहेत, असें साहेबांनीं विचारिलें. पांच हजार लमाण मजबरोबर आहे व मागाहून दहा हजार येत आहे व भाऊसाहेबांची स्वारीही जवळच मागें एक दोन मुक्काम आहे, असें आपासाहेबांनीं कळवितांच कार्नवालिस साहेब फार खुष झाले, आणि आनंदप्रदर्शित करण्याकरितां त्यांनीं तोफा सोडिल्या. आपासाहेब मेलकोटें येथें भाऊंच्या लष्करांत परत दाखल झाले.

मेलकोट्याहून भाऊंचा तळ मोतीतलावानजीक पडला. तेथून भाऊंनीं लार्डसाहेबांस आपण आल्याचा मजकूर कळविण्याकरितां आपल्या पदरचे एसाजी रघुनाथ फाटक यांस पाठविलें. त्यांचाही साहेबांनीं फार आदरसत्कार केला. साहेबांचा मुक्काम रामनायछत्र येथें भाऊंच्या छावणीपासून तीन कोसांवर होता, इतक्यांत हरीपंत फडकेही

अगदीं समीप आले. हरीपंत पुण्याहून निघाल्याची भाऊंस खबर लागली होती. पण अलीकडे त्यांजबद्दल त्यांना कांहींच वार्ता कळली नव्हती. हे तिघेही शूर सरदार परस्पर इतके जवळ असतां त्यांची परस्परांस कशी बातमी मिळाली नाहीं, याचें मोठें नवल वाटतें. तथापि, याचें कारण असें होतें कीं, या लष्करांस परस्परांची बातमी पोचविणारे बेरड होते, त्यांस टिपूनें कंठस्नान घातलें होतें.

तिन्ही सरकारच्या सरदारांच्या मोठ्या आनंदानें भेटी झाल्या, आणि मराठ्यांचें सामान मागाहून यावयाचें होतें, ह्मणून तेथें दहा दिवस सर्वांचा तळ पडला. नंतर हें अवाढव्य लष्कर मेलकोट्यावरून नागमंगलास गेलें. पुढें भैरवदुर्ग व उत्तरदुर्ग हे किल्ले वाटेंत लागले, ते त्यांनीं सर केले. आणि चार पांच दिवसांनीं मांगल्यदुर्गानजीक मुक्काम झाला. तेथें लढाईच्या पुढील व्यवस्थेविषयीं तिन्ही सरकारच्या सरदारांचा विचार चालला. मराठ्यांचें म्हणणें पडलें कीं, शिरें शहराकडे मोहीम करून तिकडून कृष्णेपावेतों मुलुख जिंकावा, आणि कार्नवालिस साहेबांचें ह्मणणें पडलें कीं, बारामहाल व बंगळूर हे प्रांत जिंकावे. वाटाघाट होऊन शेवटीं कार्नवालिस साहेबांचें म्हणणें मान्य झालें.

एवढें मोठें सैन्य एकत्र राहिल्यानें घासदाण्याचा व धान्याचा निभाव लागणार नाहीं, याजकरितां सरदारांच्या सैन्याचे निरनिराळे भाग करून त्यांस निरनिराळीं कामें सांगावीं असा विचार निघाला. असें ठरलें कीं, उत्तरेकडील प्रांताशीं दळणवळण चालू ठेवण्याकरितां व तिकडे जिंकिलेल्या प्रांतांत अंमल ठेवण्याकरितां परशुरामपंतभाऊबरोबरच्या सैन्यानें शिरें शहराकडे जावें; हरीपंतांनीं कार्नवालिस साहेबांच्या लष्कराबरोबर राहावें; आणि निजामसरकारच्या फौजेनें गंजीकोटाकडे जावें.

याप्रमाणें व्यवस्था होतांच भाऊ तेथून निघाले, ते शिवगंगेवरून निजगडास आले. हें स्थळ तेथील अम्मलदारानें भाऊंचें सैन्य येतांच स्वाधीन केलें. तेथें अम्मल बसवून स्वारी शिरें शहराकडे गेली. तें स्थल तसेंच भस्मंगी, रत्नागिरी, देवरायदुर्ग, मंदागिरी चंद्रराय इत्यादि अनेक ठाणीं घेऊन व तेथें अम्मल बसवून गुत्तीजवळ आले.

जेथें जावें तेथें यश. अपयश असें त्या पुरुषाला कोठेंच प्राप्त झालें नाहीं. इतर सरदारांकडे सांगितलेल्या कामास त्यांनीं अद्यापि हातही लाविला नव्हता. तोंच या शूर व चतुर पुरुषानें आपण पतकरलेला कार्यभाग सर्व सिद्धीस नेला. आणि सर्वांस आपल्या पराक्रमानें खालीं पहावयास लावलें. धन्य त्या प्राण्याची !

नंतर चित्रदुर्ग प्रांतांत ठाणीं बसविण्याकरितां त्यांनीं आपले पुतणे रघुनाथराव दादासाहेब कुरुंदवाडकर यांची रवानगी केली. कुरुंदवाडकर, चितदुर्ग येथें गेले तों किल्ल्याबाहेर शत्रूकडील तीनशें लोकांची गांठ पडली. त्यांजवर छापा घालून त्यांनीं सर्वांस कापून काढिलें, व किल्ल्यास वेढा दिला, आणि लाडूर, बाणावर, अजमपूर इत्यादि ठाणीं घेतलीं.

भाऊंनीं उत्तरेकडील कार्यभाग फारच अल्प काळांत मोठ्या शौर्यानें साधला, याचें कार्नवालीस साहेबास फार आश्चर्य वाटलें. त्यानें या वेळीं श्रीरंगपट्टणास वेढा घातला होता. भाऊंच्या पराक्रमी स्वारांचे साह्य मिळेल तर टिपूची राजधानी घेण्यास त्यांचा मोठा उपयोग होईल, या हेतूनें त्यानें श्रीरंगपट्टणाकडे सत्वर येण्याविषयीं भाऊंस अनेक पत्रें लिहिलीं. परंतु, स्वतंत्र यश संपादन करावयाचा हा उत्तम प्रसंग हातचा घालविणें त्यांना आवडेना. भाऊंस श्रीरंगपट्टणाकडे न जाण्याचें आणखी एक अंतस्थ कारण होतें. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीपासून मराठ्यांच्या मनांत बेदनूर हा सुपीक प्रांत हाताखालीं घालावा असें फार होतें. भाऊंच्या जयाचें वर्तमान ऐकून, मराठ्यांचा बहुतकालचा इष्ट हेतु साधावयाला ही संधि उत्कृष्ट आहे, असें नानांस साहजिकच वाटलें, आणि भाऊंना या कामीं यथेच्छ वर्तन करण्याला त्यांचें आंतून उत्तेजन मिळत गेलें.

कार्नवालिस साहेबाच्या लिहिण्याचा भाऊंनीं अनादर न करितां अजारीपणाच्या निमीत्तानें ते चित्रदुर्गप्रांतींच पुष्कळ दिवस राहिले. नंतर इष्ट कार्य साधण्याकारितां ते बेदनुराकडे वळले. होलीनूरचा किल्ला प्रथम लागला, तो त्यांनीं हस्तगत केला. नंतर तुंगेच्या उत्तर तटाकानें जात असतां शिमोगा नांवाचा मोठा बळकट किल्ला लागला.

या किल्ल्याजवळ रेजाखान ह्मणून टिपूचा कोणी आप्त, आठशें स्वार सात हजार पायदळ आणि दहा तोफा घेऊन उतरला होता. हें स्थळ घेण्याचा भाऊंनीं बेत केला. भाऊ किल्ल्याकडे येत आहेत असें वर्तमान ऐकून रेजाखान यानें किल्ल्याजवळचा तळ उठवून जवळच्या दाट जंगलांत जाऊन दबून बसला. यांत त्याचा हेतु असा होता कीं, भाऊंच्या सैन्यानें वेढा घातल्यानंतर आपण बाहेरून त्यांच्यावर चाल करावी. रेजाखान जेथें राहिला, त्या झाडीच्या उजवे बाजूस तुंगभद्रा नदी, डावे बाजूस दाट निबिडझाडी असलेली, कडा तुटलेली सुळक्यासारखी टेंकडी, आणि आघाडीस व पिछाडीस उंच व दाट अशा बांबूंचे वन; असें असल्यामुळें ती जागा शत्रूचा प्रवेश न होण्यास मोठी उत्तम होती. आंत प्रवेश करण्यास एकमात्र कायती लहानशी वाट होती. अशा सुरक्षित स्थळीं रेजाखान निर्भयपणें बसले होते. पण भाऊ अशा शत्रूला सोडून कसे जातील? किल्ल्याजवळ आल्यावर त्यांना रेजाखानाचें वर्तमान समजलें. तेव्हां त्यांनीं किल्ला घेण्याचें काम प्रथमतः एकीकडे ठेविलें, आणि या खानाची गांठ घेण्याकरितां निघाले. किल्ल्याला प्रदक्षिणा घालून तो खान ज्या जंगलांत बसला होता, त्याच्या समीप आले, आणि तेथें त्यांनीं सैन्याचा तळ दिला.

भाऊंचे जेष्ठपुत्र आपासाहेब यांनीं भाऊंबरोबर अनेक प्रसंगीं शौर्य व युद्धकौशल्य दाखविलें होतें. तथापि स्वतः सेनाधिपत्य करून ते संग्राम गुणाच्या कसास कसे उतरतात ही परीक्षा पहावयाची भाऊंची फार दिवस इच्छा होती. खान हा आखेयचा शत्रु आहे; व तो दबून राहिलेलें स्थळ फार मजबूत व सुरक्षित आहे; याजकरितां खानाशीं संग्राम करण्याचें काम पुत्राकडे देण्याचें भाऊंनीं योजिलें. आपासाहेबांनींही हें काम मोठ्या हौसेनें पतकरिलें.

बरोबरचें सैन्य व इंग्लिशांचीं पलटणें घेऊन आपासाहेबांनीं त्या झाडींत प्रवेश केला. रेजाखान निर्भय बसला होता. त्याच्यावर हें सैन्य जाऊन तुटून पडलें. शत्रूंनीं सावध होऊन लागलीच मारा सुरू केला. मारा सुरू होतांच शत्रूंनीं जंगलांत पळून जाऊंनये, ह्मणून त्यांच्या उजवे बाजूस व डावे बाजूस दोन पलटणींच्या टोळ्या आपासाहेबांनीं ठेविल्या, आणि इंग्लिशांच्या पलटणीवरचे मुख्य लिटलसाहेब

यांस बरोबर घेऊन समोरून शत्रूच्या मध्यभागावर चाल केली. लढाई मोठ्या निकराची झाली. खान मोठ्या आवेशानें व फार वेळ लढला. आणि कित्येक वेळां आपासाहेबांस मागें हटावें लागलें. परशुरामभाऊ जवळ होते. पण आजचें यश किंवा अपयश, पुत्राचें असा निश्चय करून ते संग्रामास गेले नाहींत. यशाची बहुतेक निराशा झाली होती. पण आपासाहेबानें व लिटलसाहेबानें सैन्यास उत्तेजन देऊन एकवार त्वेषानें व वेगानें जिवाची पर्वा न करितां शत्रूवर चाल केली. हा निकराचा मारा शत्रूस सोसवला नाहीं. ते बाजूस जंगलांत शिरूं लागले तों तिकडे पूर्वीं टोळ्या ठेविल्या होत्या त्यांनीं तोंड धरिलें. चांगलासा वाव मिळेना. खान मोठ्या कैचेंत सांपडला व त्याचा अगदीं कोंडमारा झाला. शेवटीं शत्रूंनीं बाजूस लहानसा मार्ग काढून त्यांतून ते प्राण मुठींत घेऊन सूं पळत सुटले. त्यांचा फौजेनें पाठलाग केला. सर्व तोफा हिसकावून घेतल्या. छावणी लुटली. त्यांत पुष्कळ सामान आपासाहेबांच्या हातीं लागलें. इंग्लिशांनीं वाहवा करण्या जोगें आपासाहेबांस साह्य केलें. शत्रूचे, इंग्लिशांचें, व मराठ्यांचें मिळून सुमारें १५०० मनुष्य समरांगणावर पडले. यश संपादून आपासाहेबांची स्वारी छावणीस परत आली. पुत्राचे पराक्रम पाहून भाऊंना किती आनंद झाला असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी.

रेजाखानाचें सैन्य दशदिशेस लाविल्यानंतर शिमोग्याचा किल्ला भाऊंच्या सहज हस्तगत झाला. त्या मुलुखांत मराठ्यांचा अंमल बसविण्यांत कांहीं दिवस गेले. नंतर बेदनूरचा मुख्य कार्यभाग राहिला. तो साधण्याकरितां भाऊ रानांतून तिकडे गेले. आणि बेदनुरास, वेढा घालण्याची सर्व तयारी केली. इतक्यांत तो बेत तहकूब करून त्यांस श्रीरंगपट्टणाकडे जावें लागलें. त्याचा प्रकार असा:—

कार्नवालिस साहेबांस श्रीरंगपट्टणाकडे भाऊंच्या साह्याची फार जरूरी होती, ह्मणून त्यांनीं त्यांना तिकडे येण्याविषयीं पुष्कळ पत्रें लिहिलीं. परंतु भाऊ उत्तरभागीं एका मागून एक जय मिळवीत होते, ते तिकडे जाईनात. शेवटीं कार्नवालिसानें पुण्यास नानांस लिहिलें. भाऊ जें जें करीत होते त्यास नानांचें आंतून अनुमोदन होतें. ह्मणून नानांनींही भाऊंच्या तिकडे येण्याला अनेक अडचणी लिहिल्या. शेवटीं कार्न

वालिस साहेबांच्या, व निजामसरकार व हरीपंत यांच्या फौजेनें श्रीरंगपट्टणाकडे बहुतेक कार्यभाग उरकला. टिपू शरण आला, आणि त्रिवर्ग राष्ट्रें सांगतील त्याप्रमाणें तह करण्यास कबूल झाला. असें वर्तमान नानांस समजतांच त्यांनीं आतां भाऊंनीं बेदनुराकडे संग्राम चालू ठेवणें प्रशस्त दिसणार नाहीं, ह्मणून बेदनूरचा बेत रहित करून पत्रदर्शनीं श्रीरंगपट्टणाकडे जरूर जावें असें भाऊंस पत्र लिहिलें.

भाऊ सैन्यासह श्रीरंगपट्टणास पोंचले. तत्पूर्वीं एक दोन दिवस टिपूचे, व त्रिवर्ग राष्ट्रांच्या सरदारांचे तहाविषयीं करार मदार झाले होते. टिपूनें आपलें अर्धे राज्य त्रिवर्गास मिळून द्यावें; लढाईच्या खर्चाबद्दल तीन कोट तीस लक्ष रुपये द्यावे; आणि दोन पुत्र इंग्लिशांकडे ओलीस पाठवावे; हीं तहांत मुख्य कलमें होतीं. कलमें मान्य करणें टिपूला मोठें जिवावर आलें. पण काय करतो ? मान्य केल्याशिवाय, दुसरा उपायच नव्हता. टिपू आपणास ह्मैसूरचा "वाघ" असें ह्मणवीत असे. पण त्या व्याघ्राला या सरदारांनीं "गाय" केलें.

टिपूनें दिलेलें अर्धराज्य या तीन सरकारच्या सरदारांनीं सारखें वाटून घेतलें. गंजीकोट, कडपा, हे प्रांत निजामास दिले; बारामहाल, दिंदिगल व मलबार किनाऱ्यावरचा प्रांत इंग्लिशांनीं घेतला. आणि तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा सर्व प्रांत मराठ्यांस मिळाला.

मिळालेल्या प्रांताच्या सनदा भाऊंनीं हरीपंताच्या स्वाधीन करून त्यांना पुण्याकडे हुजुरातच्या सैन्यासह रवाना केलें. आणि बाकीच्या फौजा, जडसामान, व इंग्लिशांनीं पेशवेसरकारास नजर केलेल्या १७ तोफा यांसह आपण आलेल्या वाटेनें परत निघाले. वाटेनें भाऊंच्या फौजेचे जे हाल झाले ते सांगतां पुरवत नाहींत. ते ऐन उन्हाळ्याचे दिवस होते. रखरखीत ऊन व रणरणीत काळीभोर जमीन, क्षणभर विश्रांति घेईन ह्मटलें तर झाड नाहीं; डोळ्यास लावण्यास पाणीही नाहीं; बरोबर मोठें अवजड सामान; घोडें, गुरें ढोरें वैरण नसल्यामुळें थकलीं, व त्यांचे अस्थिपंजर दिसूं लागले; घास मिळेना, दाणा मिळेना, आणि पाणी मिळेना. येथून तेथून नन्नाचा पाडा. टिपूचे पटाईत बेरड व पेंढारी हे लुटण्यास, व एकटा दुकटा सांपडल्यास त्याची मान मुरगळण्यास मागोमाग तयार आहेतच. अशा सर्व गोष्टींनीं परशुरामभाऊंचे व सैन्याचे फार

हाल झाले. १७९२ च्या पर्जन्यकाळच्या आरंभाच्या सुमारास हें सैन्य तुंगा उतरून अलीकडे आलें. मग सर्व गोष्टींची अनुकूलता झाली. नंतर बरोबरच्या सरदारांस निरोप देऊन, व सामानाची व्यवस्था लावून भाऊंची स्वारी तासगांवास परत आली,

# भाग ९.

## आळत्याची लढाई.

कर्नाटकांतील मोठी कष्टाची मोहीम करून आल्यावर भाऊंनीं कांहीं दिवस तासगांवीं गृहसुखांत घालविले. स्वकीय आणि आप्तवर्गांतील मनुष्यांचा दीर्घकाल वियोग घडून पुन्हां भेट होते, त्या प्रसंगीं उभय पक्षींही जो आनंद होतो, तो एक विशेष आनंद होय. त्यांत शत्रूशीं संग्रामास जाणें ह्मणजे मुठींत प्राण घेऊन मागें बायकामुलांची व आप्तस्वकीयांची आशा सोडून जाणें होय. परत येणें ही केवळ दैवाधीन गोष्ट, म्हणून लढाईच्या मोहिमेवर गेलेल्या मनुष्यांची भेट झाली ह्मणजे जो आनंद व्हावयाचा तो तर केवळ अवर्णनीय आहे. त्याची रुचि ज्यांनीं अनुभविली असेल, त्यांसच माहीत. भाऊंनीं या सुखाचा लाभ घेतला. श्रीरंगपट्टणच्या मोहिमेवर पुष्कळ दिवस राहिल्यामुळें आणि मार्गानें परत येतांना अनेक प्रकारें कष्ट सोसिल्यामुळें ही विश्रांति त्यांस फार सुखदायक झाली. कांहीं दिवस आपल्या कुटुंबांत घालविल्यामुळें त्यांचें मन समाधान पावलें. आणि श्रम परिहार झाले. आणखी कांहीं अधिक विश्रांति त्यांनीं घेतली असती, पण पुण्यास निघून येण्याविषयीं नानांचीं वरचेवर पत्रें येऊं लागलीं. तेव्हां अधिक विश्रांतीचा सर्व विचार एकीकडे ठेवून त्यांनीं पुण्यास जाण्याकरितां प्रस्थान ठेविलें.

पुण्यास निघून येण्याविषयीं नानांचीं भाऊंस पत्रें आलीं, त्यांचे

कारण कोल्हापूरकरांच्या दंग्याचा पुनरुद्भव झाला हें होय. कोल्हापूरकर व पेशवे यांचें वैमनस्य कां होतें याचें, आणि पेशव्यांच्या आज्ञेवरून भाऊंनीं कोल्हापूरकरांचीं शिरोळ, अकिवाट, वगैरे मजबूत ठाणीं एक वेळ हल्ला करून घेतल्याचें, मागें एका स्थळीं वर्णन केलेंच आहे. कोल्हापूरकर हे स्वस्थ बसणारे नव्हते. पटवर्धनांचें किंवा दुसऱ्या कोणा सरदारांचें सैन्य त्यांच्या राज्याच्या समीप असे, तोंपर्यंत ते हालचाल फारशी करीत नसत. पण पेशव्यांच्या सरदारांच्या सैन्याचा मोहरा दुसरीकडे वळला म्हणजे पुरे. कोल्हापूरकर लागलेच आसपास पेशवेसरकारचा मुलूख असे, त्यांत शिरत; गांवें उजाड करीत; आणि नासधूस करीत. श्रीरंगपट्टणच्या मोहिमेवर पटवर्धन सरदार आणि हरीपंत फडके गुंतले आहेत; आणि शिंदे, होळकर यांचीं सैन्यें उत्तरहिंदुस्थानांत आहेत; ही त्यांस यावेळीं उत्तम संधि सांपडली. पेशव्यांचा मुलुख आतां आपलाच आहे, त्यांत आपण पाहिजे तें केलें तरी कोणाच्यानें आपल्यास प्रतिबंध करवणार नाहीं, असें समजून त्यांनीं मोठी धुमाळी मांडिली. कित्येक किल्ले व ठाणीं घेतलीं, पेशव्यांस वसूल सुरळीत पोहोंचेनासा झाला. अनेक गिल्ले पेशव्यांच्या दरबारापर्यंत गेले. नाना फडणविसानें हा दंगा मोडण्याचा यत्न करावयाचा, पण सैन्य चोहोंकडे फांकलें होतें, ह्मणून त्यांचा कांहीं उपाय चालेना. शेवटीं, श्रीरंगपट्टणची मोहीम करून आपल्या मनोदयानुरूप भाऊ यशस्वी होऊन आले आहेत त्यांची भेट घ्यावी, आणि कोल्हापूरकरांवर पुनः त्यांचीच योजना करावी, असा विचार मनांत आणून पुण्यास येण्याविषयीं नानानें भाऊंस पत्र लिहिलें.

भाऊंची स्वारी सैन्यासह तासगांवाहून निघाली, ती रहिमतपुरावरून सालप्याच्या घाटानें पुण्यास आली. मुळामुठेच्या संगमाजवळ त्यांनीं तळ दिला. भाऊंच्या, श्रीमंतांच्या व नानांच्या भेटी झाल्या. कोल्हापूरकरांवर स्वारी करण्याचा विचार कायम ठरला; भाऊंची त्या कामावर योजना झाली; आणि दरबार भरून चाली प्रमाणें भाऊंस वस्त्रें व विडे देऊन शत्रूवर जाण्याविषयीं आज्ञा झाली. पेशव्यांच्या हुजुरातीचें कांहीं सैन्य व फिरंग्यांचीं कांहीं पलटणेंही त्यांच्या ताब्यांत दिलीं.

श्रीमंतांची आज्ञा घेऊन भाऊ [illegible]

बुकनंबर

चिरंजीव रामचंद्ररावआपा यांस स्वारीची तयारी करण्याविषयीं आज्ञा केली. रामचंद्ररावआपा यांनीं आपलें युद्धकौशल्य अनेक प्रसंगीं प्रदर्शित केलें होतें. श्रीरंगपट्टणाच्या मोहिमेंत एका लढाईंत तर त्यांनीं सैन्याचें आधिपत्य चालवून यश संपादिलें होतें. कोल्हापूरची स्वारी मजकडे सांगा, मी वडिलांच्या आशीर्वादानें या दंग्याचा हं हं ह्मणतां बंदोबस्त करून येतों, असा आपासाहेबांनीं मोठा आग्रह धरिला. भाऊंच्यानें आपल्या शूर पुत्राचें वीरास अनुरूप असें मागणें अमान्य करवेना. पित्यास निजपुत्राचे पराक्रम पाहण्याची मोठी हौस असते. पुत्राचा आग्रह आहे तर त्यासच त्या कामावर पाठवावें. त्याच्या हातून कार्यभाग सिद्धीस गेला, तर उत्तमच. कार्यभाग नच झालातर स्वतां जावें असा भाऊंनीं विचार करून स्वारीचें सर्व काम त्यांजकडेसच सोंपाविलें.

आपासाहेबांची स्वारी सैन्यसमागमें घेऊन निघाली. पहिला मुक्काम कोलापूर गांवाजवळ झाला. नदीपार होऊन आळतेगांवाजवळ गेले, तेथें महिनाभर माळावर तळ पडला. तोफा चालवून ठाणें हस्तगत करून घेण्याचा बेत सर्वानुमतें ठरला. त्याप्रमाणें जनोबा सुभेदार यादवाडकर यांनीं गांवावर तोफा रोंखिल्या, आणि मारा सुरू केला. फिरंग्यांचीं पलटणें गांवांत शिरून त्यांनीं पेठ लुटली. आणि आपासाहेबांनीं बरोबर निवडक लोक घेऊन शत्रूवर ते वेगानें चाल करून गेले. तेथें बाणांची व गोळ्यांची वृष्टि झाली. कोल्हापूरकरांचीं फार मनुष्यें खराब झालीं. आणि राहिलेल्या लोकांस 'दे माय धरणी ठाय' असें झालें.

आळत्याच्या लढाईचें वर्तमान महाराजांस कोल्हापुरास कळतांच त्यांनीं सर्जेराव घाटगे म्हणून कोणी त्यांच्या पदरचा सरदार होता, त्यास आळत्याच्या सैन्याच्या कुमकेस तावडतोब रवाना केलें; मिळतील तितके लोक मिळविण्याविषयीं रत्नाकरपंत दिवाण यांस हुकूम केला; व सैन्याचें आधिपत्य स्वतः करण्याचा निश्चय केला. जितीच्या ओढ्यावर महाराजांच्या सैन्याचा तळ पडला. आपासाहेब गांवचें ठाणें धरून बसले होते. त्यास दोन टोळ्यांनीं दोहों बाजूंनीं चालून जाऊन वेढा द्यावा असें योजिलें. एक टोळीचें काम रत्नाकरपंत यांजकडे

दिलें आणि एक टोळी स्वत: घेऊन निघाले. आपासाहेबाच्या सैन्यास चोहोंकडून वेढा पडला. आपासाहेबाचें व या सैन्याचें निकराचें युद्ध जुंपलें. शस्त्रांचा खणखणाट, बाणांचा सणसणाट, यांनीं समरांगण दणाणून गेलें. आपासाहेबांनीं व त्यांच्याबरोबरच्या मंडळीनें शिकस्त केली. फिरंग्यांनींही बहुत साह्य केलें; पण शत्रूचे लोक फार असल्यामुळें यशाची आशा दूर होऊं लागली. हत्ती व तोफा शत्रूंनीं घेतल्या, तेव्हां आपासाहेबांनीं स्वारांस घेऊन आपण पुढें होऊन शत्रूवर चाल केली; पण तिचाही उपयोग झाला नाहीं. आपासाहेबांस डोकीवर मोठी जखम लागून ते घायाळ झाले. शेवटीं राहिलेल्या लोकांस धीर देऊन ते जवळ शिरगांवास गेले. महाराजांच्या सैन्यानें मागोमाग पाठलाग केल्यामुळें तेथेंही चांगली तयारी करण्यास अवकाश सांपडला नाहीं. शिरगांवीं पुन्हां युद्ध झालें. त्यांत आपासाहेब, त्यांच्या पदरची मंडळी व सैन्य यांनी फारच शिकस्त केली. शत्रूंचे पुष्कळ लोक मारिले. विठ्ठल धोंडदेव पटवर्धन, व बाबा फडणीस, इत्यादिकांस जखमा लागल्या. पहिल्या जखमेमुळें आपासाहेब बेजार होते. तथापि, त्यांनीं जिवाची पर्वा न करितां शत्रूंवर तुटून पडून त्यांच्या पंधरा वीस सरदारांस ठार केलें. शेवटीं आपासाहेब शत्रूंच्या सैन्यांत एकटे सांपडले. तेव्हां शत्रूकडील सर्जेराव घाटग्यानें लगट करून त्यांस गांठिलें. आणि त्यांचे दोन्ही हात पाय धरून पालखींत घालून त्यांस महाराजाकडे नेलें. आपासाहेबांच्या बरोबरची इतर मंडळीही पाडाव गेली. या प्रकारें आपासाहेबांच्या स्वारीचा विपरीत परिणाम झाला.

प्रियपुत्राच्या पराभवाचें व त्यास शत्रूंनीं धरून नेल्याचें वर्तमान भाऊंस कळतांच त्यांच्या सर्वांगाची आग झाली. पुढें कोल्हापूरकरांनीं आपासाहेबांच्या जखमा वगैरे बऱ्याझाल्यावर त्यांचा बहुमान करून त्यांस वस्त्रें अलंकार व पोषाग आणि पांच गांव इनाम देऊन, परत पाठविलें. त्यामुळें तर भाऊंस अतिशय त्वेष आला. माझी मानखंडना करण्याकरितां कोल्हापूरकरांनीं हा पुत्राचा बहुमान केला असें त्यांचे मनं टोंचूं लागलें. शत्रूपासून इनामाची इच्छा धरण्यापेक्षां शूरांस मरणें बरें, असा त्यांनीं पुत्राचा बहुत निषेध केला. आणि या अपमानाचा सूड घेण्याकारितां स्वत: कंबर बांधिली. कोल्हापूरकरांस आपलें ... जे...

केव्हां दाखवीन असें त्यांस झालें. कोल्हापूरकरांच्या स्वारीशिवाय त्यांस दुसरा विचार सुचेना. लढाईची कडेकोट तयारी सुरू झाली. गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांस पत्र पाठवून तोफा व कांहीं सैन्य चालू केलें; आपले द्वितीय पुत्र बाबासाहेब व चिंतामणराव आपा सांगलीकर आणि रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर यांस सैन्यासह बरोबर घेतलें; आणि पेशवे सरकारचे गारदी लोक व तोफा घेऊन स्वतः संग्रामास निघाले. उदगांव येथें सर्व सैन्य कृष्णापार झालें. तेथूनच कोल्हापूरकरांवर भाऊंनीं शस्त्र धरिलें. प्रथमतः उदगांवाला चोहींकडून मोर्चेबंदी केली. सामना करण्याकरितां शत्रु आले, त्यांजवर हल्ला करून त्यांस पळावयास लाविलें. हें यश येतांच भाऊंच्या लोकांस स्फुरण चढलें. ते आस पासच्या मुलखावर तुटून पडले आणि त्यांनीं मार्गांतला कोल्हापूरकरांचा सुपीक प्रांत उजाड केला. कोल्हापूरकरांच्या सरदारांस, व सैन्यास न जुमानतां त्यांस कापून काढीत, भाऊंचें विजयी सैन्य लवकरच कोल्हापुरास दाखल झालें. टेंबलाईच्या टेंकडीवरून कोल्हापुरावर तोफांचा धों धों मारा सुरू झाला; शहरांतल्या भव्य इमारती धडधडा पडूं लागल्या. शेवटीं मारा असह्य होऊन तोंड देण्याकरितां महाराजांचें सैन्य शहराबाहेर निघालें. भाऊंस शत्रूच्या हालचालीची वार्त्ता कळतांच त्यांनीं बरोबरच्या सैन्यास निरनिराळीं कामें वाटून दिलीं, आणि स्वतः कंबर बांधून, हातांत समशेर फडकावीत सैन्यास उत्तेजन देत पुढें झाले. भाऊंच्या प्रोत्साहजनक भाषणामुळें व ते स्वतः पुढें झाल्यामुळें बरोबरच्या मंडळीस व सैन्यास आवेश आला. आणि "मारूं किंवा मरूं" असा त्यांचा निर्धार झाला. अशा निर्धारानें संग्रामास निघालेल्या सैन्याबरोबर महाराजांचा कसा निभाव लागतो? शहराजवळ लढाईचें तोंड लागलें. लढाई मोठ्या निकरानें झाली. उभयपक्षींहि वीर मोठ्या ईर्ष्येनें व हिंमतीनें लढले. पण भाऊंच्या सैन्यापुढें कोल्हापूरकरांचें तेज अगदीं पडेना. तरवारींच्या वारांचा, आणि फिरंग्यांच्या गोळ्यांचा, मारा त्यांस दुःसह झाला. अल्प काळांतच भाऊंच्या सैन्यानें शत्रूस त्राही करून सोडिलें. शत्रूंचे नामी नामी सरदार एका मागून एक समरांगणावर पतन पावले. भाऊ व त्यांच्या बरोबरचे इतर वीर व्याघ्रा-

सारखे शत्रूस फाडून खातात कीं काय, असें झालें. त्यापुढें शत्रु गाई सारखे जीव घेऊन पळत सुटले आणि गांवांत शिरले.* महाराज अगदीं जेरीस आले आणि त्यांनीं निरुपायानें तहाचें बोलणें सुरू केलें. तेव्हां लढाई बंद झाली.

उभयपक्षीं पुष्कळ वाटाघाट झाल्यानंतर शेवटीं तह ठरला. त्यांत कोल्हापूरकरांनीं पुन्हां कोणताही उपद्रव देऊं नये, तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी, आणि खंडणीचा ऐवज आदा होईपर्यंत, आपले दोन नामांकित सरदार भाऊंजवळ ओलीस ठेवावे अशीं कलमें होतीं. करारप्रमाणें उदाजीराव राजाज्ञ व दौलतराव गाइकवाड हे दोघे सरदार महाराजांनीं भाऊंकडे पाठविले. कोल्हापूरच्या संग्रामाच्या आणि तहाच्या वृत्तांताचें सविस्तर पत्र भाऊंनीं कोल्हापुराहून पेशव्यांच्या दरबारास व-नाना फडणविसास पाठवून आपण तासगांवास परत आले.

कोल्हापुरच्या जयाचें वर्तमान पुण्यास कळलें तेव्हां दरबारांत जिकडे तिकडे आनंद झाला. सर्वांनीं भाऊंची मोठी वाहवा केली. त्यांची मान्यता फार वाढली. हरीपंत फडके व परशुरामपंतभाऊ पटवर्धन हे मराठी राज्याचे आधारस्तंभ होत असें सर्व ह्मणूं लागले. नानांस मनुष्याच्या गुणाची परीक्षा उत्तम असे. त्यांचा भाऊंवर पहिल्या पासून लोभ होता, तो या योगानें वृद्धिंगत झाला. उत्तर हिंदुस्थानांत, जशी शिंदे, होळकर यांची, तशी कर्नाटक प्रांतांत भाऊंची तलवार गाजूं लागली, आणि त्या प्रांतांतील राजे त्यांच्या नांवाला भिऊं लागले. बरींच वर्षे पर्यंत भाऊंच्या पराक्रमाचें स्थळ कर्नाटक प्रांत हें होतें, तें लवकरच बदलून त्यांचे श्रीमंतांच्या सन्निकट वास्तव्य झालें. आणि त्यांचा याहीपेक्षां अभ्यूदय झाला, ती सुरस कथा आम्ही वाचकांस पुढील भागांत सादर करूं.

---

* या प्रसंगीं भाऊंच्या पदरच्या कोणी घायगुडे उपनावाच्या सरदारानें कोल्हापूरच्या तटावर निशाण चढविलें असें सांगतात. हे घायगुडे, जमखिंडी येथील रा० रा० आपासाहेब घायगुडे यांचे पूर्वज होत.

# भाग १०.

## खर्ड्याची स्वारी

पराक्रमी व थोर पुरुष आपल्या देशाचे बंदे नोकर होत असें ह्मणतात तें सत्य आहे. अशा पुरुषांस विश्रांति लेश मात्र नसते. एक कार्यभाग उरकावा, तों दुसरा उपस्थित होतो; तो सिद्धीस न्यावा, तों तिसरा तयार आहेच. अशी एक सारखी मालिका लागली असते. निजकर्त्तव्य योग्य प्रकारें केल्यानें जें मनास एक प्रकारचें समाधान वाटतें, तेंच काय तें त्यांचें सुख; आणि जनसमूहाकडून बरें ह्मणून घेणें, हाच त्यांचा आनंद असतो. स्वराज्यरूप नौकेचे ते नाविक असतात. बंडें, दंगे, धोपे, परचक्रें इत्यादि जीं अनेक वादळें उत्पन्न होतात, त्यांतून तिला सुरक्षित पार नेणें हें त्यांचें कर्त्तव्यकर्म असतें. सर्व लोकांचे डोळे त्यांच्या कृतींकडे लागलेले असतात. आणि त्यांच्या यशावर सर्व राष्ट्राचें हित अवलंबून असतें. आह्मी ज्या कालाविषयीं कथन करीत आहों, त्या कालीं महाराष्ट्राचा या प्रकारें भार वाहणारे, जे मराठ्यांच्या राज्यांत पुरुष होते, त्यांतच भाऊंची गणना केली पाहिजे. त्यांच्या जिवाला विश्रांति मिळत नसे. पेशव्यांच्या अफाट राज्यांत कोठेंना कोठें तरी शत्रूनें वर डोकें उचलिलें ह्मणजे पुरे, लागलेंच भाऊंना त्याच्या शासनार्थ जाण्याची आज्ञा होई. पेशव्यांच्या दरबारांत त्यावेळीं नानांची मोठी सलामत होती; आणि नानांचा भाऊंवर अत्यंत लोभ. यामुळें, राज्यांतील नाजूक, विश्वासाचीं व महत्वाचीं सर्व कामें भाऊंच्या वांट्यास येत. भाऊही नानांच्या अर्ध्या वचनांत असत. आणि त्यांच्या इच्छेनुरूप वर्तण्यास सिद्ध असत. त्यामुळें या उभयतां थोर पुरुषांचें परस्परांविषयीं प्रेम वृद्धिंगत झालें, आणि दोघांचाही फार उत्कर्ष झाला. असो.

कोल्हापूरच्या स्वारीचा कार्यभाग पूर्णपणें सिद्धीस नेल्यानंतर भाऊ यशस्वी होऊन तासगांवास परत आले. पण तेथें येऊन फार दिवस

झाले नाहींत, तों सैन्यासह पुण्यास दाखल होण्याविषयीं नानांकडून पत्र आलें. त्याचा प्रकार असा:—

महादजी शिंद्यानें स्वपराक्रमावर उत्तर हिंदुस्थानांत देश काबीज केला; रजपूत राजांस जिंकिलें, आणि दिल्लीस जाऊन तेथील बादशाहाकडून मराठ्यांचे स्वामित्व कबूल करविलें आणि पेशव्यांस "वकील मुतलख" असा नवीन किताब व नालकीचा मान संपादिला. महादजी शिंदा मोठा कारस्थानी पुरुष होता. मराठ्यांच्या राज्यांत ब्राह्मणांचाच काय तो भरभराट असावा हें त्याला अगदीं आवडत नसे. पेशव्यांचा कारभारी आपण व्हावें अशी त्याची फार इच्छा होती, आणि जरी तो बाह्यात्कारीं नानांशीं मोठ्या नम्रतेनें व आर्जवानें वागे, तथापि आंतून त्यांचीं मनें शुद्ध नव्हतीं. महादजीचा उत्कर्ष नानांस सहन होत नसे. महादजीनें दिल्लीकडे केलेले पराक्रम नानांस आवडले नाहींत. तिकडे जयजयकार केल्यानंतर महादजी दक्षिणेंत आला. बादशहाकडून आणलेली "वकील मुतलख" पदवी पेशव्यांस अर्पण करण्याकरितां आपण आलों असें महादजीनें बाह्यात्कारीं दर्शविलें. पण, त्याच्या मनांतला हेतु असा होता कीं, पुण्यास अल्पवयस्क पेशवे आहेत, त्यांना या मानाची नजर करून त्यांचें मन सुप्रसन्न करावें, आणि त्यांना वश करून, संपूर्ण राज्यकारभार हाताखालीं घालावा. नानांस हा हेतु स्पष्ट कळला. आणि त्यांना या शत्रूच्या आगमनानें मोठी भीति पडली. महादजीच्या व पेशवे सरकारच्या भेटी झाल्या; महादजीच्या गोडगोड भाषणानें पेशवे मोहित झाले; आणि नानांच्या मनांत नसतां दरबार भरून नालकी व "वकील मुतलक" ही पदवी महादजीनें पेशव्यांस समर्पण केली. तेव्हां अर्थात् नानांचें तेज अगदीं फिकें पडत चाललें. इतक्यांत नानांचा जिवलग मित्र, होळकर याच्या फौजेची व शिंद्याच्या फौजेची कांहीं अल्प कारणावरून उत्तर हिंदुस्थानांत लढाई होऊन, होळकराचा पराभव झाल्याचें वर्तमान पुण्यास आलें. यामुळें नाना व महादजी यांच्या मर्यादेंत ही उत्तरोत्तर अधिकच अंतर पडूं लागलें. शिंद्याचा त्याला कांहीं भरवसा लागेना. केव्हां दंगा होईल, व संकट गुदरेल याचा नेम नाहींसा झाला. तेव्हां संरक्षणाचें कांहींतरी साधन जवळ असावें, ह्मणून नानांनीं भाऊंस पुण्यास बोलाविलें.

मराठी ... डेकनंबर ... भिवंडी ... वाचनालय

भाऊ तासगांवाहून २००० स्वारांसह निघाले आणि पुण्यास दाखल झाले. असें होतांच शिंद्यानेंही आपली बरीच फौज पुण्यास आणिली. नानांचें व महादजीचें वितुष्ट वाढत चाललें. एखादा भयंकर रक्तपाताचाही प्रसंग यावयाचा; परंतु हरिपंत फडके मध्यस्त झाले, व त्यांनीं तो प्रसंग टाळला.

महादजी शिंदे पेशवे सरकारास बरोबर घेऊन शिकारीस वगैरे जात त्यावेळीं, त्यांजबरोबर जाण्याकरितां नानांनीं भाऊंची योजना केली. पूर्वी पेशवे ( सवाई माधवराव ) यांच्या बालपणीं, त्यांच्या रक्षणार्थ पुरंधरास जे सरदार ठेविले होते, त्यांत भाऊंच्या पथकांतले पुरुषोत्तम राव दाजी हे प्रमुख होते व भाऊंचें ही तेथें फार वरचेवर जाणें होत असे. माधवरावास दाजींचा व भाऊंचा फार लळा होता. नाना फडणविसानें भाऊंची त्यांच्या बरोबर राहण्याकरितां योजना केली, ती मुख्यत्वें करून हीच गोष्ट लक्षांत आणून केली असावी. या प्रसंगीं भाऊ नानांच्या फार उपयोगीं पडले. सवाई माधवराव भाऊंच्या ह्मणण्यास फार मान देत व त्यांच्या बाहेर जात नसत. महादजीनें आपल्या मोहक भाषणानें सवाई माधवरावांस अगदीं वश केलें होतें तरी, भाऊंनीं माधवरावांस अनेक हितगोष्टी सांगून त्यांच्या मनांत नानांविषयीं पूज्यबुद्धि स्थापित केली.

महादजी शिंदे व भाऊ परस्पर अगदीं भिन्न अशा उद्देशानें पेशव्यांजवळ होते, ( ह्मणजे एक नानांविषयीं त्यांचें मन भ्रष्ट करण्याकरितां व दुसरे नानांचे वजन ठेवण्याकरितां ) तथापि, परस्परांच्या गुणांस ते चहात असत. भाऊंचे पूर्वींचे कित्येक पराक्रम महादजीनें पाहिले होते व अलीकडील पराक्रमांविषयीं त्यानें सर्वांच्या तोंडून वाहवा ऐकिली होती. दृढ परिचय होतांच त्यांस परस्परांच्या गुणांची विशेषच माहिती झाली. महादजी शिंदा मोठा स्वाभिमानी; तथापि, तो भाऊंस मान देऊं लागला; आणि तो आपल्या बरोबरीचा सरदार आहे असें समजूं लागला. याविषयीं एक गोष्ट ऐकण्यांत आहे ती अशीः—

एकदां श्रीमंत पेशवे, महादजी शिंदे, नाना व भाऊ वगैरे मंडळी श्रीपर्वतीवर दर्शनास गेली' परत येतांना पर्वतीच्या तळ्यांत नौकाक्रीडा करावी, असें पेशव्यांच्या मनांत आलें. लागलीच नौका तयार

होऊन श्रीमंत पेशवे, शिंदे व भाऊ आंत बसले, आणि राहिलेली परिवाराची मंडळी तटाकावर उभी राहिली. नौकाक्रीडा सुरू होणार, इतक्यांत नानांनीं महादजी शिंदे यांस उद्देशून ह्मटलें "महादजीबावा श्रीमंतांस जपण्याकरितां आणखी कोणास नौकेंत घेत नाहीं काय ?" त्या चतुर पुरुषानें उत्तर दिलें "नाना, उत्तरेस हा सेवक व दक्षिणेस भाऊ असतां सरकारच्या केंसास धक्का लावण्याची कोणाची प्राज्ञा आहे? आपण स्वस्थ असावें"

महादजीच्या लाघवानें पेशवे सरकार त्यास वश व्हावयाचे, ती गोष्ट भाऊंनीं होऊं दिली नाहीं, ही भाऊंनीं नानांची मोठीच कामगिरी केली. त्याच्या योगानें नानांचा कारभार सुरळीत चालूं लागला. महादजी शिंद्याच्या अंकित पेशवे झाले असते ह्मणजे मराठ्यांच्या राज्याची व नानांची काय अवस्था झाली असती, याचें अनुमान करणें कठीण आहे. पुढें थोड्याच दिवसांत महादजीला एकाएकीं मोठा ज्वर येऊन पुण्याजवळ वानवडी येथें देवाज्ञा झाली, त्यामुळें हें एक विघ्न दूर झालें.

महादजीच्या कारस्थानीपणाच्या कृत्यापासून नाना आदिकरून प्रधान मंडळी मुक्त होऊन फार दिवस झाले नाहींत तोंच पेशव्यांच्या राज्याला अनिष्टकारक एक अरिष्ट उद्भवलें. आणि प्रधानांस व सरदारांस आणखी एक विचाराचें काम येऊन पडलें.

पेशवे व निजामसरकार यांचा अलीकडे पुष्कळ वर्षें स्नेहभाव होता तो इ० सन १७९१ त एकाएकीं मोडून उभयतांचा मोठा बिघाड आला. निजामसरकाराकडे चौथाई, सरदेशमुखी वगैरे बाबींबद्दल पेशवेसरकारची पुष्कळ बाकी येणें होती, ती मागण्याकरितां पेशव्यांचे वकील हैदराबादेस गेले. निजामसरकारच्या दिवाणांनीं त्यांच्या आंगावर एक वीस कलमांची याद टाकिली, तींत भलभलत्या सबबी लिहून पेशव्यांच्या मागण्याची निर्गत लाविली होती. नाना फडणविसानें या यादीचीं उत्तरें समर्पक मोठ्या चातुर्यानें लिहून दुसरी एक याद पाठविली. तींत निजामसरकाराकडे २ कोटी ३० लक्ष रुपये बाकी काढिली होती. या यादीवर पेशव्यांचे वकील व निजामसरकारचे दिवाण मशीर-उल्-मुल्क यांचा वादविवाद झाला. परंतु शेवट व्हावा तसा गोड न होतां दिवाण वकिलांस टाकून बोलिले कीं, "हिशेबांत

अतिकुटिल जो तुमचा यजमान ( नाना ) त्यानें येऊन येथें आपल्या लिहिण्याचा अर्थ सांगावा. एरव्हीं तो कोणास कळावयाचा नाहीं." हें अमर्याद भाषण ऐकतांच पेशवेसरकारच्या वकिलांस फार संताप आला. तथापि, त्यांनीं तो न दाखवितां सामोपचारानें ह्मटलें " आमच्या नानांमागें बहुत कामें आहेत. त्यांचें येथें येणें कसें घडेल ?" यावर दिवाणानें धमकीनें प्रत्युत्तर केलें कीं, " त्यांचें येणें येथें कसें घडेल हें दाखविण्यास आह्मांस उशीर लागावयाचा नाहीं." सारांश, उत्तरोत्तर एक एक गोष्ट विकोपास येत गेली आणि अमर्यादपणाबद्दल चांगलें निजामसरकारास शासन करण्याकरितां नानांनीं निजामसरकारावर स्वारी करण्याचा निश्चय ठरविला. निजामसरकारही आपल्या सैन्याची जमवाजमव करूं लागलें. याप्रमाणें या दोन सरकारांमध्यें एकाएकीं लढाई उपस्थित झाली.

निजामसरकारानें लढाईचा मोठाच आव घातला. एक लक्ष दहा-हजार फौज बेदर येथें जमा झाली. शस्त्रास्त्रादि युद्धोपयोगी सामान-ही त्यांजवळ चांगलें होतें. " पेशव्यांच्या सैन्याचा पाड काय ; त्याची तेव्हांच वाताहत करून पुणें शहर जाळून फस्त करूं," अशा त्यांच्या मनमानेल तशा अघळपघळ गप्पा चालल्या होत्या. पण एका गोष्टीची त्यांच्या सैन्यांत वाण होती. ती ही कीं, शिपाई लोक अंमलदारांच्या कह्यांत नव्हते, आणि जो तो आपणास " राव " असें समजत असे. हा अरेरावपणा लहानशा शिपायापासून तों दिवाणापर्यंत पसरला होता. दिवाणांच्या डोळ्यावर धूर आला होता आणि मदोन्मत होऊन देहभान गेलें होतें. एके दिवशीं भर दरबारांत तो ह्मणाला कीं, " इतोत्तर मराठ्यांच्या तगाद्यांतून निजामसरकार मुक्त झालें. आपण खानदेश व विजापूर हे प्रांत लवकरच परत घेऊं, आणि पेशव्यांचें सर्वस्व हरण करून, त्यांस एक लंगोटी लावून, एक भोंपळा पाणी पिण्याकरितां त्यांचे हातीं देऊन यथेच्छ स्नानसंध्या करण्याकरितां त्यांस काशीस लावून दिल्या खेरीज तह व्हावयाचा नाहीं." अशा सर्वत्र गर्वोक्ति चालल्या होत्या. पण आपली शक्ति किती, व आपण वरळतो काय याचा एकही विचार करीत नव्हता. शेवटीं

" बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो पडेल काय " या प्रचारांतील ह्मणीप्रमाणें परिणाम घडून आला.

या गर्वोक्तीच्या वार्त्ता ऐकून नानांस फारच कोप आला. त्यांनीं शत्रूची चांगली खोड मोडावयाचा निश्चय केला. सैन्याची उत्तम प्रकारची तयारी केली. हुजुरातींतील लोकांस स्वारी करितां तयार राहण्याविषयीं आज्ञा झाली. लहान मोठ्या सर्व सरदारांस फौजफांट्यांसह वर्तमान पुण्यास दाखल होण्याविषयीं आज्ञापत्रें रवाना झालीं. दौलतराव शिंदे अलिजा बहादर व तुकोजीराव होळकर हे त्या समयीं फौजबंद पुण्यांतच होते. शिंद्यांनीं या जंगी स्वारीकरितां आपले वृद्ध व अनुभविक शूर सेनापती जिऊबादादा बक्षी यांस कंपूसह उत्तरहिंदुस्थानांतून आणविलें. आज्ञापत्राप्रमाणें लवकरच रघूजी भोंसले नागपूरकर, शहाजी राजे भोंसले अक्कलकोटकर, परशुराम श्रीनिवास पंत प्रतिनिधी, पंत सचीव, फत्तेसिंग गाइकवाड, घोरपडे, दरेकर, सरलष्कर, नाईक निंबाळकर, फलटणकर, अंकलूजकर, दहीगांवकर, पाटणकर, चव्हाण, धुमाळ, ढमढेरे, भोपकर, पवार, मोहिते, रणदिवे, भोइटे, जाधव, शितोळे, घाटगे, थोरात, राजे बहादर, रास्ते, विंचूरकर, वाडेकर, आदिकरून सर्व सरदार व पागेपथके आपापल्या फौजेसुद्धां दाखल झाले. पटवर्धन सरदारांपैकीं रघुनाथराव नीलकंठ कुरुंदवाडकर त्यावेळीं पुण्यांतच होते. सरकारचें आज्ञापत्र येतांच परशुरामपंतभाऊ व चिंतामणराव आपा सांगलीकर आपापल्या पथकांसह स्वारीस दाखल झाले; आणि राहिलेले कांहीं स्वार घेऊन गंगाधरराव बाळासाहेब मिरजकर यांचे पुत्र नारायणराव व माधवराव मागून त्यांस येऊन मिळाले. निजाम ह्मणजे मराठ्यांचा पुरातन शत्रु यामुळें; आणि निजामाबरोबरच्या लढाईंत जी लूट मिळेल ती सर्वांनीं वाटून घ्यावी अशी पूर्वापार वहिवाट होती यामुळें, झाडून सर्व मराठे सरदार व शिलेदार आपसांतले सर्व द्वेषभाव विसरून या स्वारीस मोठ्या हौसेनें आले.

सरदार, जहागीरदार व मानकरी सैन्यासह दाखल होऊन स्वारी निघण्याची तयारी झाली, तेव्हां सेनाधिपत्य कोणाकडे सांगावें याचा नाना विचार करूं लागले. श्रीमंत पेशवेसरकारची स्वारी या मोहिमेस नि-

घण्याचा विचार ठरला होता आणि त्यामुळें "सेनापती" ची निवड करणें ती फार काळजीनें, अनेक गोष्टींकडे लक्ष देऊन करणें आवश्य होतें. शत्रु आधीं प्रबळ, आणि त्यांत त्यानें उत्तम प्रकारची तयारी केलेली ; तेव्हां ज्या पुरुषाकडे सेनाधिपत्य सोंपवावयाचें, तो युद्धविद्येंत अति निपुण व निढावलेला असून मोठ्या स्वारीचें काम करण्याची त्याच्या अंगीं हिंमत, शक्ति व पोंच असणें आवश्य होतें. सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या राज्यांत अनेक सरदार होते. पण ज्यांनीं आपल्या गुणानें व प्रतापानें आपली दिगंत कीर्त्ति केली असे काय ते त्यांत महादजी शिंदे, हरिपंत फडके व परशुरामपंतभाऊ हे त्रिवर्ग होत. त्यांपैकीं फडके व शिंदे हे नुकतेच निवर्तले होते. तेव्हां अर्थात् आधिपत्य भाऊंकडे निर्विवाद आलें होतें व तें सर्व सरदारांस मान्य होतें. सेनापतीची योजना करणें आलें तेव्हां नानांचेंही लक्ष्य याच सर्वमान्य पुरुषाकडे गेलें, यांत फारसें आश्चर्य नाहीं.

सेनाधिपत्य भाऊंकडे द्यावें असा नानांचा निश्चय झाल्यानंतर त्यांनीं भाऊंस पाचारण केलें. भाऊंना नानांच्या बेताची थोडीशी गुणगुण समजली होती. त्यांनीं नानांचें ह्मणणें मान्य करावें, किंवा कसें या गोष्टीचा विचार करण्याकरितां व सल्ला घेण्याकरितां आपली भाऊबंद मंडळी व मुच्छद्दीमंडळी यांस बोलाविलें. सर्व मंडळींनीं असें सांगितलें कीं, "निजामसरकारची फौज मोठी आणि तयारी कडेकोट आहे. श्रीमंतांच्या पक्षाकडे फौज पुष्कळ आहे खरी; तथापि, शिंदे, होळकर व गाइवाड इत्यादि मोठमोठे सरदार एकादिलानें वागून साह्य करतील किंवा नाहीं याचा संशय आहे. कदाचित् ब्राह्मणसरदाराकडे आधिपत्य सांगितल्यामुळें, त्यांस विषाद वाटेल आणि उदासीन राहातील. मग आयत्यावेळीं आपण तोंडघशीं पडून आपली फजीती होईल, आणि आजपर्यंत मिळविलेली कीर्त्ति नाहींशी होईल. याजकरितां हें जोखमीचें काम होईल तर आपल्या आंगाबाहेर टाकावें हें चांगलें." भाऊंना हा विचार मान्य झाला, व नंतर ते श्रीमंतांच्या व नानांच्या भेटीस गेले. सांप्रदायाप्रमाणें नमस्कार करून भाऊ बसल्यानंतर नानांनीं भाऊंस सांगितलें कीं, "निजामअलीवर श्रीमंतांची स्वारी होत

आहे. तिचें आधिपत्य आपण स्वीकारावें अशी श्रीमंतांची आज्ञा होत आहे. आपण आधिपत्य करून यश संपादन करावें." यावर भाऊंनीं लीनतेनें उत्तर केलें, "स्वामींची आज्ञा शिरसावंद्य आहे. तथापि, स्वामींच्या पदरीं मजपेक्षां मोठमोठे अनेक सरदार आहेत. मी य:कश्चित; माझी आज्ञा त्यांनीं मानावी हें कसें घडणार? हा सर्व विचार स्वामींनीं ध्यानांत आणावा. स्वामी सांगतील ती अन्य कोणतीही सेवा करण्यास सेवक सिद्ध आहे." भाऊंनीं या प्रकारें टाळाटाळी केली, पण काम महत्वाचें व जोखमीचें; दुसऱ्याच्या हातून तें निभावण्यासारखें नव्हे; हें सर्व नानांस माहीत होतें, त्यांनीं भाऊंस उत्तर केलें, "भाऊ, तुह्मी श्रीमंतांची सेवा एकनिष्ठपणें करीत आहां हें श्रीमंतांच्या ध्यानांत आहे. तुम्ही सरदारांस जी आज्ञा कराल, ती श्रीमंतांची आज्ञा आहे. आणि तिचें कोणाकडून उल्लंघन झाल्यास, त्यास वाटेल तें शासन करण्यास तुम्हास श्रीमंतांची परवानगी आहे. आज्ञेप्रमाणें आधिपत्य स्वीकारून यश संपादन करावें." असें बोलून नानांनीं श्रीमंतांकडून भाऊंस पोषाख व विडे देवविले. नंतर सरदारांचे वकील व हलकारे होते, त्या सर्वांस नानांनीं कळविलें कीं, "स्वारीचें सर्व आधिपत्य श्रीमंतांनीं भाऊंकडे सांगितलें आहे. तरी भाऊ जी आज्ञा करतील ती श्रीमंतांची आज्ञा आहे असें समजावें आणि तदनुरूप वर्तावें."

या भेटीच्या प्रसंगीं आणखी एक दोन गोष्टी घडल्या. भाऊंना आधिपत्य स्वीकारण्याविषयीं नानांचा आग्रह होऊं लागला, तेव्हां त्यांनीं मागील स्वाऱ्यांचे हिशेब अद्यापि सरकारांत मंजूर झाले नाहींत व त्यामुळें सावकारांचा आपणामागें सक्त तगादा आहे, अशी जिकीर केली. ती ऐकतांच नानांनीं आपल्या खिशांतून एक श्रीमंतांच्या शिक्क्याची याद काढिली, आणि भाऊंच्या स्वाधीन केली. तींत मागील सर्व स्वाऱ्यांचा मोजवा सरकारास पावला, असें लिहिलें होतें; आणि स्वाऱ्यांच्या खर्चाचा ऐवज भाऊंस देण्याविषयीं जामदारावर वराती दिल्या. या लहानशा गोष्टीवरून नानांची धूर्तता व दूरदृष्टि स्पष्ट समजते.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, स्वारीचें आधिपत्य स्वीकारल्यानंतर

भाऊंनीं श्रीमंतांस वंदन केलें आणि मग नानांस ते म्हणाले, " स्वामी पुण्यवान् आहेत. यश येईलच, तथापि, हें लढाईचें काम आहे. सर्व वेळा सारख्या असतात असा नेम नाहीं. म्हणून बऱ्या वाईट सर्व गोष्टींचा बंदोबस्त अगोदरच करून ठेवावा हा उत्तम मार्ग होय. तेव्हां याची व्यवस्था कशी केली आहे? इतकें बोलतांच नानांनीं जासुदास खुण केली. त्यानें एक रुमाल नानांपुढें आणून ठेविला. तो सोडून त्यांतील एकएक कागद नानांनीं भाऊंस दाखविला. त्यांत लढाईचा विघाड झाल्यास सरकारच्या तोफखान्याची व्यवस्था कशी व्हावी; सैन्यानें कोठें आश्रयास जावें इत्यादि सर्व व्यवस्था लिहिली होती. निजामसरकारच्या सरहद्दीवर आसपास २५ कोसांत जे किल्ले व जीं ठाणीं पेशवेसरकारचीं होतीं, तेथील अंमलदाराकडून एक वर्षपर्यंत सर्व फौजेच्या शिधासामुग्रीचा बंदोबस्त असल्याचीं पत्रेंहीं त्यांत होतीं. या गोष्टीवरून स्वारीच्या कामांत भाऊंची दूर नजर व पोंच आणि नानांचें धोरण व शहाणपण हीं व्यक्त होतात.

याप्रमाणें परशुरामभाऊकडे नानांनीं या स्वारीचें आधिपत्य सांगितलें. शिंदे, होळकर, गाइकवाड, भोंसले अशीं मोठमोठीं घेंडें त्या समयीं आपापल्या मोठमोठ्या फौजांनिशीं पुण्यांत असतां त्या सर्वांस एकीकडे ठेवून नानांनीं भाऊंकडे या स्वारीचें सर्व काम सोंपविलें, यावरून भाऊंच्या शौर्यादिगुणांची व युद्धकौशल्याची मराठी राज्यांत त्यावेळीं किती वाहवा होती याचें सहज अनुमान करितां येईल. सर्व सरदार त्यांच्या पराक्रमाविषयीं माना डोलवीत होते. असें नसतें तर संपूर्ण मराठी सैन्याचें आधिपत्य त्यांना खास मिळालें नसतें. मराठे सरदार मानाविषयीं जीव देणारे; ते ज्याअर्थीं भाऊंच्या आज्ञेनुरूप वर्तण्यास मान्य झाले, त्या अर्थीं भाऊ युद्धकौशल्यांत सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेत असें त्यांनीं आपण होऊन कबूल केलें असें होतें.

सर्व तयारी झाल्यानंतर श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यांची स्वारी डेरे दाखल होण्याचा सुमुहूर्त मार्गशीर्ष* शुद्ध ८ शके १७१६ रविवारीं प्रातःकाळचे दहाघटका दिवसाचा ठरला. गारपिरानजीक शहरचे बाहेर डेरे दिले होते. डेऱ्यांत श्रीमंतांची स्वारी दाखल झाल्या-

* अन्यत्र 'पौषमास' असें लिहिलें आहे.

नंतर मोठा दरबार झाला. प्रधान, मानकरी, सरदार, शिलेदार वगैरे सर्वांनीं नजराणा दिला. गारपिरावर आठ दहा दिवस राहून मग पुढें स्वारी निघाली. पहिला मुक्काम थेऊर—कोलवडी यांच्यामध्यें मुळामुठा नदीच्या किनाऱ्यास झाला. येथेंच मकरसंक्रमण झालें. स्वारीबरोबर सैन्य फार मोठें, तेव्हां वाटेनें एकत्र गेलें असतां धान्याची व घासदाण्याची तूट पडेल असें समजून परशुरामपंतभाऊंनीं सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या केल्या आणि त्यांनीं निरनिराळ्या वाटेनें जावें व सूचना येतांच एकत्र जमावें अशी योजना केली. सैन्यासहवर्तमान आपण व होळकर अघाडीस आणि श्रीमंतांची स्वारी व नाना आदिकरून प्रधानमंडळी, बाबाराव फडके यांच्या हाताखालच्या हुजुरातीच्या सैन्यासह मागें एका मुक्कामाच्या छाप्यानें चालावी अशी व्यवस्था केली. तोफखाना आणि दुसरें अवजड सामान मागें घातलें. थेउराहून स्वारीचा मुक्काम दहिठण—खामगांवाजवळ मुळामुठेच्या काठीं झाला. तेथून शालूमालूचें पारगांव व वाळकी या गांवांच्यामध्यें श्रीभीमा व मुळामुठा यांच्या संगमाजवळ; तेथून मांडवगणावरून काष्टी व तांदळी यांच्यामध्यें, घोडनदीच्या काठीं; तेथून आडळगांवावर; तेथून भोंसेगांवाजवळ डोंगराची खिंड आहे ती उतरून मिरजगांवावरून पूर्वेस नागलवाडी व सांगवी यांच्यामध्यें सीना नदीच्या काठीं; आणि तेथून फकिराबाद—धानोरें येथें असे मुक्काम होत गेले. सैन्याचा तळ दोन दोन तीन तीन कोस पडे.

शत्रूच्या मुलुखांत पेशवेसरकारचीं ठाणीं व अंमल बसविण्याकरितां भाऊंनीं निरनिराळ्या दिशेनें लोकांस रवाना केलें; मोंगलांचा तळ पडला असेल त्याच्या आसपासचा प्रदेश लुटून अन्नाच्या बेगमीचा नाश करावा आणि फौजेची रसद बंद करावी, ह्मणून लष्कराबरोबर पेंढारी होते, त्यांजबरोबर स्वार देऊन त्यांना पुढें पाठविलें; आणि सामानसुमान मागें पक्कया बंदोबस्तानें ठेवून बाकीच्या सैन्यासह आपण निजामाच्या फौजेवर चालले. फकिराबाद धानोऱ्याजवळ, शिंदेसरकारचे वृद्ध व अनुभविक शूर सेनापती जिऊबादादा बक्षी, उत्तर हिंदुस्थानांतून शिंद्याची राहिलेली फौज, तोफखाना, पलटणें व कंपू घेऊन स्वारींत दाखल झाले. त्यांनीं आपल्या एकंदर फौजेचा मोहला श्री-

मंतांस दाखविला. कऊडगांव येथें भोंसले येऊन मिळाले. फकिराबाद येथें हुताशनीचा सण झाला.

या स्वारीस मराठ्यांच्या फौजेंत परशुरामभाऊशिवाय, दौलतराव शिंदे व त्यांचे शूर सेनापती जिऊबादादा बक्षी; हरिपंत फडक्याचे पुत्र बाबाराव फडके, हुजुरातीचे अधिकारी; तुकोजी होळकर; रघुजी भोंसले; फत्तेसिंग गाइकवाड; जानराव नाईक निंबाळकर इ० नामांकित वीर होते. शिंद्याचीं डिबोईन व पेरन या युरोपियन कामगारांनीं तयार केलेलीं पलटणें व तोफखाना आणि भोंसल्याचीं दुद्रेनी यानें तयार केलेलीं पलटणेंही या स्वारीस आलीं होतीं. पानशे आदिकरून ब्राह्मण सरदार, प्रतिनिधी आदिकरून अष्टप्रधान, आणि चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर, रघुनाथ नीलकंठ कुरुंदवाडकर, नारायणराव व माधवराव गंगाधर मिरजकर इ० पटवर्धन सरदार आपापल्या पथकांसह आले होते. परशुराम भाऊंचे शूर पुत्र रामचंद्रराव आपासाहेब व हरिपंत बाबासाहेब हेही आपल्या पित्या समागमें स्वारीस गेले होते. एकंदर अजमासें दीड लक्ष फौज व शिवाय बाजारबुणगें होतें. सारांश, पानिपतच्या स्वारीस जें मराठ्यांचें मोठें सैन्य गेलें, त्याच्या खालोखाल हें सैन्य होतें. एवढें अफाट सैन्य व इतके अनेक शूर सरदार मराठ्यांच्या राज्यांत पुनः कधींही एकत्र झाले नाहींत.

मराठ्यांचें लष्कर पुण्याहून निघण्यापूर्वींच निजाम आपल्या सैन्यासह बेदराहून निघाला होता. मराठ्यांचें सैन्य निघाल्याचें वर्तमान समजल्यावर त्यानें आपल्या स्वारीचा रोख मांजरा नदीच्या काठानें हळु हळु मराठ्यांच्या मुलुखाकडे धरिला. खर्ड्यास यावें या उद्देशानें फौजेसह मोहरीच्या घाटांतून उतरून येऊन खर नदीच्या काठीं तळसंगी गांवीं मराठ्यांच्या लष्करापासून सुमारें तीन कोसांवर त्यानें तळ दिला. हें वर्त्तमान भाऊंस कळतांच दौलतराव शिंदे व दुसरे कित्येक सरदार व शिलेदार यांस फौज व बुणगें यां सुद्धां श्रीमंतांजवळ ठेवून, बाबाराव फडके, जिऊबादादा बक्षी, होळकर, भोंसले व चिंतामणराव आपा पटवर्धन यांस समागमें घेऊन निवडक सड्या सैन्यासह आपण फाल्गुन वद्य १ (धुळवडी) च्या दिवशीं निजामाच्या तोंडावर गेले. द्वितीयेचे दिवशीं तिसरे प्रहरीं परस्परांची गोळागोळी सुरू झाली. त्या प-

संगीं पेशव्यांच्या हुजुरातीचे अधिकारी बाबाराव फडके यांनीं शत्रूवर एकाएकीं हल्ला केला. पण घाई फारच केल्यामुळें त्यांत त्यांना यशलाभ न होतां मागें हटावें लागलें. निजामाला या अल्प जयानेंच अत्यानंद झाला. आणि या स्वारींत आतां आपली खचीत फत्ते होते असें मानून त्यानें त्याच दिवशीं अस्तमानीं मोठें दरबार भरवून आनंदाच्या नजरा घेतल्या. भाऊसारखा प्रबळ शत्रु अद्यापि मागेंच आहे व त्याजबरोबर आपणास युद्धसंग्राम करावयाचा आहे, हें त्या आनंदाच्या भरांत तो अगदीं विसरला! निजामाची स्वारी मुक्कामास परत गेली आणि फडके सरदारांच्या फौजेस जाऊन मिळाले. त्या रात्रीं जिऊबादादा बक्षी पिंपळगांवीं; भाऊ, बाबाराव फडके, व चिंतामणराव आपा घोडेगांवीं; आणि होळकर व भोंसले बाघेगांवीं; असे चार कोसांच्या टप्प्यानें मुक्कामास जाऊन राहिले.

तृतीयेच्या दिवशीं उभयपक्षांकडील फौजा स्वस्थ राहिल्या. चतुर्थीचे दिवशीं निजाम तळ सोडून बाकीगांव येथें गेल्याची बातमी आली. त्यावरून फौज व तोफा घेऊन सरदार तयार होऊन गेले. निजामाच्या बुणग्यावर त्यांनीं गोळे टाकिले. पण विशेष कांहीं घडलें नाहीं. संध्याकाळीं सरदारांचा नाणजगांवीं मुक्काम झाला. रंगपंचमीचा सण तेथेंच झाला. षष्ठीच्या दिवशीं निजामानें परांड्याच्या रोखानें कूच केल्याची बातमी आली. शत्रु हातीं आलेला निसटून जाऊं दिल्यास मसलत लांबेल असा विचार करून भाऊंनीं त्याच दिवशीं लढाई देण्याचा निश्चय केला, आणि सर्व सरदारांस व शिलेदारांस आपापल्या सैन्यासह युद्धास सिद्ध राहण्याची सूचना दिली. जिकडे तिकडे तयारी झाली. तरडगांवचे रानांत टेकडी आहे, ती जागा भाऊंनीं युद्धास पसंत केली. शत्रूच्या फौजेची दुर्दशा करितां येईल अशी माऱ्याची उत्तम जागा टेकडीवर पाहून तेथें तोफा आणविल्या. तोफांच्या डाव्या बाजूस टेकडीच्या खालच्या लवणांत उत्तरेकडे जरीपटक्याचे अधिकारी बाबाराव फडके यांस हुजुरातीच्या फौजेसह उभे केलें. त्याच्या पलीकडे जिऊबादादा यांस शिंद्याचीं नामांकित पलटणें व तोफखाना यां सुद्धां निजामाचे तोंडावर ठेविलें. टेकडीच्या दक्षिणेच्या बाजूस चिंतामणराव आपा पटवर्धन, अक्कलकोटकर व होळकर यांस

नेमून, आपलें खाजगत पथक पुत्रांच्या हाताखालीं तेथेंच ठेविलें; आणि त्यांच्या पलीकडे रघुजी भोंसल्यास त्याच्या सैन्यासह उभे राहण्यास सांगितलें.

निजामसरकारची स्वारी, अघाडीस व त्रिनीवर आसतखान, रावरंभा वगैरेच्या फौजा, त्यांच्या मागें बुणगें व त्यांच्या मागें खासास्वारी अशा थाटानें परांड्याकडे जात असतां त्यांस उजव्या बाजूस ही मराठ्यांची फौज दृष्टीस पडली. तेव्हां निजामअल्लीनें तेथेंच आपला हत्ती उभा केला आणि बुणगें सर्व डाव्या बाजूस करून आसतखान नांवाचा त्याच्या स्वारांवरचा सरदार होता त्याजबरोबर १७००० पलटणी लोक देऊन, त्याला मराठ्यांवर तत्काल हल्ला करावयास सांगितलें. सर्व व्यवस्था लावून भाऊ टेंकडीवरून उजवे आंगास आपल्या सैन्याकडे खालीं आले व शत्रु कशा बेतानें आपणावर येत आहे हें पाहण्याकरितां पुढें निघाले, तों, निजामाच्या पक्षाकडचा लालखान नामक पठाण सरदार, त्यांजवर आपली ७००० पठाणी स्वारांची टोळी घेऊन वेगानें चालून आला. लागलेंच टेंकडीच्या उजव्या आंगास पठाणांचें व भाऊंचें युद्ध जुंपलें. खान मोठा शूर होता. तो भाऊंच्या सैन्यावर तुटून पडला. त्यानें भाऊंचे पुष्कळ लोक ठार केले. मग त्याची व भाऊंची चकमक सुरू झाली. खानानें भाऊंच्या कपाळावर दोन सपात्यानें वार केले. तेणेंकरून ते घोड्याखालीं आले. इतक्यांत, भाऊंचे पुत्र व भाऊबंद मंडळी दुसऱ्या बाजूस गुंतली होती त्यांनीं ह्या निकराचा प्रसंग पाहून, ते त्यांच्या साह्यार्थ वाघासारखे उड्या टाकीत आले. लालखान भाऊंना तिसरा वार करणार, इतक्यांत भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंतबाबा यांनीं एका सपात्या सरशीं खानाचें शिर उडविलें, आणि पित्याला मृत्युमुखांतून सोडविलें. याचें नांव पुत्रधर्म. याच गर्दीच्या प्रसंगांत भाऊंच्या चुलत बंधूचे पुत्र विठ्ठलराव धोंडदेव यांस छातींत गोळी लागून तेथल्या तेथें ठार झाले. खान गतप्राण झाला तरी त्याचे शूर पठाण डगमगले नाहींत. त्यांना लढण्याचा अधिकच आवेश आला. आणि ते लांडग्यासारखे मराठ्यांवर तुटून पडून सफा उडवीत चालले. पठाणांबरोबर कर्नूलच्या नबाबाचा पुत्र व इलिचपूरच्या नबाबाचा पुत्र हे दोघे तरुण बांडे सरदार होते. त्यांनीं तर त्यादिवशीं शिकस्त केली.

मराठ्यांचें सैन्य मोठ्या धैर्यानें व आवेशानें लढत होतें; भाऊ दोन जखमांनीं व्याकुल झाले होते तरी आपलें दुःख क्षणभर विसरून, ते अग्रभागीं होऊन आपल्या पटाईत स्वारांस उत्तेजन देत होते, तथापि पठाणांपुढें, त्यांचें कांहीं चालेना. इतक्यांत पठाणांस आणखी कुमक येऊन पोंचली. तेव्हां तर त्यांची सरशी होऊं लागली. मराठ्यांचें पाऊल मागें पडूं लागलें. त्या समयीं पेशव्यांच्या हुजुरातीचा कामगार बाबाराव हाही जरिपटका घेऊन शत्रूस पाठ दाखविण्यास सिद्ध झाला. हें पाहून शिंद्याकडील वृद्ध सेनापती जिऊबादादा बक्षी घोडा पिटाळीत गेला आणि फडक्याला शिव्या देऊन ह्मणाला, "अरे भित्र्या, जर तुला निर्भय जागा पाहिजे, तर शिंद्याच्या लष्कराच्या पाठीमागें येऊन स्वस्थ राहा." मग बाबास आपल्या वडिलांच्या पराक्रमांचें स्मरण झालें. आणि तो लज्जित होऊन तेथेंच उभा राहिला.

याप्रमाणें भाऊंच्या थोड्याशा सैन्याची व पठाणांची चांगली चकमक झडत होती; इतक्यांत, उभयपक्षांकडील सर्व सैन्यभार संग्रामस्थानीं प्राप्त झाला. शिंद्याचे सेनापती जिऊबादादा बक्षीही फौज व तोफखाना घेऊन दाखल झाले, आणि तरडगांवचे रानांत रणटेकडीवर निजामाच्या फौजेचा फार जमाव होता, त्यावर त्यांनीं तोफा रोंखून मारा सुरू केला. मग युद्धाची एकच गर्दी उडाली. प्रथमतः निजामाच्या स्वारांनीं मराठ्यांवर हल्ला मोठ्या नेटानें केला; परंतु एका बाजूनें भोंसल्यांच्या बाणांचा मारा, दुसऱ्या बाजूनें शिंद्यांच्या तोफांचा मारा, आणि समोरून भाऊंच्या बंदुकीचा व तलवारींचा मारा, एकदम सुरू होतांच स्वारांची त्रेधा उडून गेली, आणि त्यांस त्राही त्राही झालें. त्यांपैकीं पुष्कळ तेथच्या तेथें ठार झाले आणि थोडे बहुत राहिले त्यांनीं समरांगणांतून पळ काढिला. निजामाचा तोफखाना होता तें ठिकाण रोंखून पानशे यांनीं आपल्या तोफांचा बिनचूक मारा सुरू केल्यामुळें, निजामाच्या तोफांचा सर्व व्यापार बंद पडला, आणि त्या असून नसून सारख्या झाल्या. मग काय विचारावें? मराठ्यांच्या फौजा निजामाच्या फौजेवर चालून जाऊन अगदीं लगटल्या. जों जों यश येत चाललें तों तों त्यांस अधिकच स्फुरण येत चाललें. ते शत्रूस फाडून खातात कीं काय असे उग्र दिसूं लागले. अगदीं निकरावर येऊन ठेपलेसें पाहून निजामाकडील रावरंभा, भार-

मल्ल, सुभानखां असे मोठमोठे नामांकित सरदार व रेमंडच्या हाताखालीं कवाईत शिकून तयार झालेलीं पलटणें पुढें सरसावलीं आणि दोन तास अगदीं शर्थेची लढाई झाली. उभयपक्षांनीं आपल्या पराक्रमाची शिकस्त केली ; आणि एकमेकावर जिवाची आशा सोडून तुटून ते पडले. शेवटीं, परशुरामभाऊ, इतर पटवर्धन सरदार, शिंदे आणि बाबाराव फडके हे शत्रूस भिडले होते, त्यांनीं एकदांच आपल्या सैन्यास आवेश आणून "हर, हर, महादेव" असा घोर घोष करून निकराची एक चाल केली. तिच्या योगानें लढाईचें स्वरूप तत्काळ बदललें. निजामाच्या सैन्याचें धैर्य सुटलें, आणि त्यानें आपला मोहरा फिरविला. शृंगारलेल्या हत्तीवर सुशोभित अंबारीमध्यें निजामसरकारची स्वारी आरूढ होऊन हा युद्धचमत्कार अवलोकन करीत होती. त्यांनीं अपजयाचें चिन्ह पाहतांच समरांगणांतून पाय काढिला. आणि त्यांचाच कित्ता त्यांच्या सरदारांनीं व सैन्यानें वळविला. निजामसाहेब खर्ड्याच्या किल्ल्याकडे वळले आणि त्यांचें बहुतेक सैन्यही तिकडेच धांवलें. मराठ्यांनीं मागोमाग त्वरेनें पाठलाग केला. पण इतक्यांत रात्र होऊन काळोख पडला, तेव्हां उभयपक्षांकडील लोक थकले होते ते जागच्याजागीं विराम पावले.

इतक्यावरच आटोपलें असतें, तर निजामानें कांहीं सांवरासावर केली असती. पण त्याचें दुर्दैव पूर्ण ओढवलें होतें, तें आपला पगडा बसविल्याशिवाय कसें राहील ? वर सांगितल्याप्रमाणें थोडावेळ स्वस्थता झाली. इतक्यांत, मराठ्यांच्या सैन्यापैकीं कांहीं स्वार आपल्या घोड्यास पाणी पाजण्याकरितां नाला शोधीत होते, ते अकस्मात् निजामाच्या सैन्याची एक टोळी ज्या स्थळीं उतरली होती, त्याच स्थळीं प्राप्त झाले. त्यांस पाहून निजामाच्या लोकांनीं त्यांजवर बार काढिले. ते बार ऐकून तेथें पलटणीचे पाहरेकरी होते ते बार काढूं लागले. त्या सरसे पलटणीचे लोक घाबऱ्या घाबऱ्या उठले, आणि त्यांनीं उगाच बंदुकांचा भडिमार चालू केला. त्यामुळें सर्वच फौज जागी झाली, आणि काय प्रकार चालला आहे हें कांहीं एक मनांत न आणितां घाबरेपणानें पळत सुटली. इतकी त्यांस मराठ्यांची भीति बसली होती. मग पूर्व दिवशीं

जी गर्दी व धांदल उडाली होती त्याहीपेक्षां अधिक धांदल झाली. चंद्रोदय झाल्यानंतर निजामानें आपल्या सैन्याची दुर्दशा पाहिली, तेव्हां त्याची अमर्दी निराशा झाली, आणि तो खर्ड्याच्या किल्ल्यांत जाऊन बसला. पळून जातां जातां अखेरीस त्याच्या अफाट सैन्यापैकीं सुमारें $\frac{१}{१०}$ लोक मागें त्याजबरोबर राहिले. ते त्याच किल्ल्याच्या समीप उतरले.

त्या दिवशीं भाऊंना फारच खस्त मेहनत पडली. सकाळपासून रात्रपडेपर्यंत त्यांच्या जिवाला क्षणमात्र विश्रांति नाहीं. दिवसभर जिवापाड श्रम झाल्यामुळें त्यांचें सर्वांग ठणकत होतें. कपाळावर लागलेल्या जखमांस युद्धाच्या गर्दींत टांके देखील दिले नव्हते. त्यांना रग लागली. शेवटीं रात्रपडून जिकडे तिकडे स्थिर झालें, तेव्हां नाणजगांवावर बुणग्याचा तळ होता तेथें त्यांना डेऱ्यांत नेलें. मग त्यांच्या जखमांस टांके दिले व त्यांना थोडीशी विश्रांति मिळाली. निजामाचा बहुतेक निकाल लागल्यासारखा होता, ह्मणून त्यांनीं तेथेंच डेऱ्यांत राहावें अशी त्यांच्या मंडळीची फार इच्छा होती. व त्यांनीं तशी त्यांना विनंतीही केली. पण त्या शूर पुरुषाचें सर्व चित्त लढाईकडे व शत्रूकडे गुंतलेलें होतें. त्याला असले विचार कसे रुचतील? पहांट झाली नाहीं तोंच, भाऊ सर्वांच्या आधीं उठून, आपल्या फौजेस जाऊन मिळाले.

सूर्योदयानंतर भाऊंचें सैन्यपुढें चालू लागलें, तों निजामाच्या लष्कराच्या तळावर जिकडे तिकडे तोफा व नानाप्रकारचें युद्धसाहित्य त्यांच्या दृष्टीस पडलें. तें पाहून त्यांस मोठा चमत्कार वाटला, व शत्रु रातोरात निघून गेला असावा असें त्यांनीं अनुमान केलें. खर्ड्याजवळ गेले तेव्हां निजामाचें थोडेसें सैन्य त्यांस दृष्टीस पडलें आणि निजामसरकारची स्वारीही किल्ल्याचा आश्रय धरून बसल्याचें वर्त्तमान समजलें. तेव्हां त्यांचा आनंद पोटांत मावेना. शत्रु पर्णपणें आपल्या मुठींत सांपडला, त्याला चांगलें जेरीस आणावें व त्याच्या उद्दाम वर्त्तनाबद्दल योग्य शासन करावें, असा भाऊ आदिकरून सरदार व नाना आदिकरून मंडळी यांनीं विचार योजिला. भाऊंनीं लागलेंच पेंढाऱ्यांस बोलाविलें आणि निजामाचें सैन्य रात्रीं पळून गेलें होतें त्याच्या पाठीवर लवकर जाण्याविषयीं त्यांस आज्ञा केली. त्यांनीं त्यांची सर्व चिजबस्त हिसकावून घेतली.

निजामसरकारची स्वारी आयती खर्ड्याच्या किल्ल्यांत सांपडली,

त्याला मराठ्यांच्या सैन्यानें लागलाच वेढा घातला. आणि जिऊबादादा घोडेगांवांत; भोंसले चिंचपुरांत; होळकर (देवकर) चिंचपुरांत; आणि भाऊ, चिंतामणराव आपा, बाबा फडके व पागे पथके बोरलेगांवांत; असे त्याच्या सभोंवतीं तळ देऊन, पुढें काय काय चमत्कार घडतात ते पाहात बसले. श्रीमंतांचा तळ रत्नापुरांत होता. बोरलेगांवच्या मुक्कामीं श्रीमंत पेशवेसरकार, नाना फडणीस, जिऊबादादा वगैरे मोठमोठी मंडळी भाऊंच्या समाचारास आली होती.

निजामाला नुसतें कोंडून भाऊ आदिकरून मराठ्यांचे सरदार स्वस्थ राहिले नाहींत. त्यांनीं त्याला हैराण करून लवकर टेंकीस आणण्याच्या मसलती चालविल्या. त्याचा घासदाणा बंद केला. त्याच्या सैन्यास बाहेरून पाण्याचा पुरवठा होत होता तें स्थळ हस्तगत करून घेतलें. जागोजाग मोर्चे उभे केले; आणि तोफा लावून मारगिरी सुरू केली. याप्रमाणें निजामाचे हातपाय आंखडतांच त्याच्या नाड्या आकर्षण झाल्या. बाहेरून शत्रूंचा दुःसह मारा; आणि आंत घास नाहीं, दाणा नाहीं, पाणी नाहीं, अशा निकृष्टावस्थेंत त्यानें दोन दिवस युगाप्रमाणें काढिले. पण पुढें त्याच्यानें तो मारा सहन करवेना. तिसरे दिवशीं (मार्च तारीख १९ रोजीं) तो शत्रूंस शरण आला, आणि ते सांगतील तीं कलमें मान्य करून तह करण्यास कबूल झाला.

याप्रकारें निजामास हतवीर्य आणि हतगर्व केल्यावर मराठ्यांनीं त्याचें तहाचें बोलणें मान्य केलें; आणि उभयपक्षांचा तह झाला. निजामसरकारच्या ज्या वजिरानें भरदरबारांत नानांची निंदा करून अमर्याद भाषणें केलीं होतीं, त्याला निजामानें मराठ्यांच्या स्वाधीन करावें; पूर्वी सदाशिवराव भाऊनें जो मुलुख जिंकून घेतला होता, तो निजामानें सर्व परत द्यावा; परांड्यापासून तापी नदीपर्यंत जो निजामसरकारचा उत्तरदक्षिण प्रांत, त्यांतला कांहीं भाग व दौलताबाद किल्ला मराठ्यांस द्यावा; मागील बाकीबद्दल तीन कोट रुपये व लढाईचा खर्च सर्व द्यावा; आणि रघुजी भोंसल्याची घांसदाण्याबद्दलची मागील बाकी सर्व फडशा करून, पुढें घांस दाण्याच्या ऐवजाची भानगड राहूं नये ह्मणून सुमारें तीन लक्ष रुपये उत्पन्नाचा, गंगथडींत त्याला प्रांत द्यावा; हीं तहाचीं मुख्य कलमें होतीं. पहिलें कलम सोडून बाकीचीं कलमें निजामास तत्काल

मान्य झाली. प्रथम कलमाबद्दल मात्र त्याला मोठा विचार पडला. आपला प्रियपात्र वजीर, मराठ्यांच्या स्वाधीन करणें ह्मणजे आपल्या मानखंडनेची सीमा झाली, असें त्या मानी पुरुषास साहजिक वाटलें; आणि ती गोष्ट त्याच्या अगदीं जिवावर आली. ही गोष्ट सोडून मराठे मागतील तें देण्यास तो सिद्ध झाला. पण मराठ्यांना त्या वजिराच्या मदोन्मत्तपणाबद्दल त्याची विटंबना करावयाची होती. ते कांहीं केल्यानें ऐकेनात. अगोदर मशीर-उल्-मुल्क स्वाधीन करा, आणि मग काय ती दुसरी गोष्ट बोला, असा त्यांचा आग्रह पडला. तेव्हां निरुपायानें त्या वजिरास मराठ्यांच्या हवालीं करणें निजामास प्राप्त झालें.

मशीर-उल्-मुल्क मराठ्यांच्या डेऱ्यांत आला तेव्हां मराठ्यांच्या पक्षाकडील सर्व लोकांस किती आनंद झाला असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. श्रीमंत पेशवे, नाना, आणि भाऊ हे त्रिवर्ग तर आनंदसागरांत, त्यावेळीं निमग्न पाले असतील. तथापि, या आनंदांत ते शिष्टपणाच्या कर्त्तव्यांस विसरले नाहींत. मशीर-मुल्कास पेशवेसरकारानें सामोरें जाऊन आपल्या तंबूंत आणिलें आणि त्याचा उत्तम प्रकारें सन्मान करून त्याला आपल्या पदरच्या मोठ्या सरदाराप्रमाणें वागविलें. शत्रूला त्याच्या वर्त्तनाबद्दल शरम वाटवण्याचें उत्तम साधन ह्मटलें ह्मणजे त्याचा बहुमान करणें हें होय. तसें या प्रसंगीं नानांनीं केलें.

सल्ल्याचें सर्व कारारमदार कायम ठरून तहनाम्यावर उभयपक्षांच्या सह्या झाल्या. नंतर श्रीमंत पेशवेसरकारची स्वारी, नाना आदिकरून प्रधान मंडळी व भाऊ आदिकरून सरदार व त्यांच्या फौजा यांसहवर्त्तमान राजधानीकडे जाण्याकरितां निघाली. स्वारी जातांना भाऊंनीं ज्याप्रमाणें व्यवस्था केली होती, त्याचप्रमाणें परत येतांनाही केली; आणि मार्गांत कोणताही अपघात न होतां, रमत रमत व मौजा करीत, हें सर्व लष्कर पुण्यास दाखल झालें.

श्रीमंतांची स्वारी विजयी होऊन परत आली, त्यांचा समारंभानें नगरप्रवेश करण्याचा मुहूर्त वैशाख शुद्ध १३ भृगुवारीं पूर्व रात्रींचा ठरला. त्यादिवशीं सर्व पुणेंशहर महानंदांत दंग होऊन गेलें होतें. सर्व शहर शृंगारलें होतें. जागजागीं गुढ्या उभ्या केल्या होत्या व तोरणें बांधिलीं होतीं. सर्व मार्ग स्वच्छ करून त्यांजवर चंदनाचे व कुंकुमा-

चे खडे घातले होते, व त्यांजवर सुशोभित चित्रविचित्र रांगोळी घातल्या होत्या. शहरभर चिराकदान केलें होतें. नगरवासी सुवासिनी स्त्रिया उत्तम वस्त्रालंकार घालून पंचार्ती घेऊन दुमजल्यावर व तिमजल्यावर उभ्या होत्या आणि आबालवृद्ध सर्व लोक स्वारीचा थाट व शोभा पाहाण्याकरितां स्वारी जाण्याच्या मार्गावर लोटले होते. भवानीपेठेच्या मार्गानें श्रीमंतांची स्वारी शहरांत आली आणि शुक्रवारांतून खासगीवाल्यांच्या वाड्याच्या पूर्वेस बुधवारच्या रस्त्यास मिळून, नानांच्या वाड्यावरून सरकारवाडा उजवा घालून दिल्लीदरवाज्यानें वाड्यांत दाखल झाली. स्वारी मार्गांतून जात असतां लोकांनीं सोन्यारुप्याचीं फुलें उधळलीं. वाड्यांत जातांच खुषीच्या तोफांची सुरवात झाली व दरबार होऊन सरदार, मानकरी व मुत्सद्दी यांनीं नजराणा दिला. असा हा मोठा अपूर्व समारंभ झाला,

खर्ड्यांच्या स्वारींत मराठ्यांच्या अफाट सैन्यांत जी एकसारखी शिस्त होती, आणि तींत जो मराठ्यांस मोठा जय प्राप्त झाला, त्याचें सर्व यश भाऊंकडे आहे. या प्रसंगीं भाऊंनीं आपल्या पराक्रमाची, युद्धकौशल्याची, व्यवस्थेशीरपणाची आणि मनमिळाऊपणाची कमाल केली असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. मराठ्यांच्या सरदारांत परस्परांचीं अनेक वैमनस्यें असत, तेव्हां कुरापती काढून केव्हां एकमेकांच्या नाशास ते प्रवृत्त होतील, याचा भरंवसा नसे. अशा सरदारांस एकचित्तानें वागविणें व त्यांच्या हातून आपला कार्यभाग साधून घेणें, हें काम अत्यंत कठीण होतें. त्यांतही या पुरुषानें पूर्ण यश संपादिलें, हें त्यास मोठें भूषण होय. केवळ "**समशेरबहादूर**" असे पुरुष मराठ्यांच्या राज्यांत अनेक झाले. पण शौर्यादिगुण उत्तम असून, ज्याला निजपक्षाकडे जनांचीं मनें आकर्षित करून घेण्याची युक्ति उत्तम प्रकारची साधिली होती असे पुरुष त्यांत थोडे होते. अशा पुरुषांत भाऊंची गणना आद्यस्थानीं केली पाहिजे.

खर्ड्याच्या स्वारीचें आधिपत्य केल्यामुळें भाऊंची पूर्वीपेक्षां फारच ख्याति झाली. या स्वारीस मराठ्यांच्या राज्यांतील लहान मोठे सर्व सरदार, संस्थानिक, मानकरी आले होते, त्यांनीं भाऊंचें कौशल्य प्रत्यक्ष पाहिलें. त्यांच्या पराक्रमांची व गुणांची सर्वांनीं फार वाहवा केली.

अनेक मोठमोठया सरदारांनीं त्यांचें मित्रत्व संपादिलें. निजामासारख्या महाबलाढ्य व गर्विष्ट शत्रूवर, समरभूमीवर मराठयांचा नक्षा झाला, तो केवळ त्यांच्या पराक्रमावर असें सर्व ह्मणूं लागले. त्यांचें अप्रतिम युद्धकौशल्य ब्राह्मण व मराठे उभयतांही सरदारांस निर्विवाद मान्य झालें; सर्वांवर त्यांची छाप बसली. राजदरबारांत, सरदार आणि मानकरी मंडळीमध्यें, आणि संपूर्ण सैन्यांत भाऊंची स्तुति गाजूं लागली, आणि सर्व त्यांस धन्य म्हणूं लागले.

पेशवेसरकारची स्वारी पुण्यास आल्यानंतर, ज्यांनीं या स्वारींत पराक्रमाचीं कृत्यें केलीं त्यांस त्यांच्या गुणांप्रमाणें पोषाख व मानाप्रमाणें बक्षिसें देऊन त्यांचा सन्मान करण्याकरितां नानांनीं प्रधान, सरदार, मानकरी आदिकरून मंडळीचा सरकारवाड्याच्या भव्य दिवाणखान्यांत मोठया थाटाचा दरबार केला. शिंदे, भोंसले, होळकर, गाइकवाड इत्यादि, स्वारीस गेलेले सर्व सरदार व मानकरी या दरबारास आले होते. सर्व सरदारांची त्यांच्या साह्याबद्दल, पराक्रमाबद्दल आणि एकनिष्ठतेबद्दल नानांनीं दरबारांत स्तुति केली आणि या स्वारीच्या आपल्या यशाचें सर्व श्रेय परशुरामभाऊंकडे आहे, असें सांगून त्यांचें शौर्य, धैर्य, पराक्रम, स्वामिकार्यनिष्ठा, सहनशीलता आणि मनमिळाऊपणा इत्यादि गुणांविषयीं फारच प्रशंसा केली. त्यांस बहुमोलाचा पोषाख, मोत्यांची कंठी, शिरपेंच व तुरा हीं सरकारांतून बक्षिस देवविलीं, आणि नगारखान्याची नेमणूक करून दिली. त्यांची जातीची तैनात, वीस हजार रुपये होती, ती चाळीस हजार केली. आणि त्यांचें कायमचें पथक चोवीसशें स्वारांचें होतें, तें वाढवून आणखी १६०० स्वार त्यांनीं अधिक ठेवावे असें ठरविलें. या नवीन स्वारांच्या खर्चाबद्दल व तैनातीबद्दल चार लक्ष सत्तर हजार रुपये वसुलाचा नवीन * सरंजाम लावून देण्याच्या यादीही ठरल्या. भाऊबरोबर त्यांचे पुत्र, पुतण्ये, भाऊबंद वगैरे स्वारीस होते, त्यांनींही चांगला पराक्रम केला, ह्मणून

---

* या सरंजामापैकीं साडे चार लक्षांचा मुलुख सावनूर प्रांतीं, व वीस हजाराचा स्वदेशीं द्यावा असा यादींत ठराव होता. पुढें लवकरच पेशव्यांच्या दरबाराची सर्व घडी बिघडली व दंगे उत्पन्न होऊन प्रमुख पुरुष फेऱ्यांत पडले, त्यामुळें हा सरंजाम भाऊंच्या ताब्यांत आला नाहीं.

गोविंद महादेव हिर्लीकर
बुकसेलर
मिरजी
... पुस्तकालय

त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांस पोषाख व बक्षिसें देऊन, त्यांचाही सरकारानें बहुमान केला. *

खर्ड्यांची स्वारी मराठ्यांच्या राज्याच्या वैभवाचा व ऐश्वर्याचा कळस होय. पानिपताच्या मैदानावर जो मराठ्यांच्या वैभवरूपचंद्राचा ऱ्हास झाला होता, त्यांतून तो पुनरुदय पावून, मध्यंतरीं राज्यक्रांतिरूप अनेक अभ्रपटलें आलीं तरी लोप न पावतां उत्तरोत्तर अधिकाधिक तेजानें प्रकाशत गेला, आणि खर्ड्यांच्या मैदानावर पूर्ण तेजानें झळकूं लागला. त्याच्या योगानें मराठ्यांच्या भाग्यसागरास महोन्नति प्राप्त झाली. आणि त्याच्या लाटा लांब लांब पसरल्या. त्याच्या पूर्ण प्रकाशामध्यें यवन आदिकरून लहान तारा तेजहीन व कलाहीन दिसूं लागल्या. मराठ्यांच्या राज्यास असें वैभव पूर्वीं कधीं प्राप्त झालें नव्हतें व पुढेंही कधीं प्राप्त झालें नाहीं.

परशुरामभाऊ व नाना फडणवीस यांच्या वैभवाच्या परमोन्नतीचाही हाच काल होय. या पुरुषांचा एकाच अमदानींत राजदरबारांत प्रवेश झाला आणि त्यांच्या वैभवाची वृद्धिही सारख्याच मानानें होत गेली. त्यांनीं परस्परांचें साह्य करून परस्परांचे उदय केले; आणि आपले शत्रु एका मागून एक नाहींसे करून इसवी सन १७९५ त ते निःशत्रु झाले. आणि त्यांच्या वैभवाचा कळस झाला. निजामसरकाराबरोबर संग्राम होऊन, मराठयांस जो विजय प्राप्त झाला, त्यानें मराठ्यांचें संपूर्ण राष्ट्रांत प्रमुखत्व स्थापित झालें; त्यांची प्रतिस्पर्धा करणारें कोणी राष्ट्र नाहींसें झालें; आणि त्यांचा सर्वत्र दरारा बसला. मराठ्यांस हें ऐश्वर्य येण्यास नानाचें शहाणपण व भाऊंचें पराक्रम हेच कारण असें सर्व ह्मणूं लागले. त्यांचे गुणानुवाद आबालवृद्ध वर्णन करूं लागले, आणि त्यांचा कीर्तिध्वज दूर दूर देशीं फडकूं लागला. सारांश, महाराष्ट्रराज्यरूप विस्तीर्ण आकाशांत त्या कालीं परशुरामभाऊ व नाना फडणवीस ही दुक्कल सूर्यचंद्राप्रमाणें झळकूं लागली.

---

* भाऊंचें पुत्र आपासाहेब व बाबासाहेब यांची जाततैनात पूर्वीं दरसाल पांचहजार होती, ती दहाहजार केली.

# भाग ११.

## राजकारस्थानें.

खर्ड्यांच्या लढाईंत प्राप्त झालेल्या जयानें संपूर्ण महाराष्ट्रदेश आनंदसागरांत निमग्न झाला होता. विजयी सरदारांची व शूरशिपायांची जिकडे तिकडे वडेजाई चालली होती. प्रत्येकाचे आप्त, इष्ट, मित्र, आपल्या प्रिय मनुष्यांचा पराक्रम व गुण वर्णन करीत होते. नाच, रंग, तमाशे यांचा जिकडे तिकडे रंग उडाला होता. परशुरामभाऊंच्या प्रतापाचा हा सर्व प्रभाव ह्मणून त्यांचा व त्यांच्या मंडळीचा तर तासगांव येथें फारच आदरसत्कार चालला होता. त्या शहराच्या लोकांनीं आपले अन्य व्यवसाय सर्व एकीकडे ठेवून ते ह्यांच्या गुणानुवादामध्यें गर्क होते. संपूर्ण महाराष्ट्रदेशाची बाजू आपल्या प्रिय सरदारानें संभाळिली, आणि मोंगला सारख्या महाबलाढ्य व गर्व वाहणाऱ्या शत्रूलाही पराक्रांत केलें याजबद्दल त्यांना योग्य अभिमान वाटत होता. महाराष्ट्रदेशांतले हें वीरशिरोरत्न आपल्या ग्रामांत आहे, याची ते मोठी प्रतिष्ठा मानीत. भाऊंच्या नांवचे पवाडे मोठ्या आनंदानें म्हणत. मजलसा, नाच, रंग, मेजवान्या यांचा त्या लहानशा शहरांत मोठा पूर लोटला होता. भाऊंचा सत्कार करण्यामध्यें मी पुढें कीं तूं पुढें अशी त्यांना ईर्ष्या आली होती.

एके दिवशीं सरकारांतून मोठें वनभोजन करण्याचा बेत ठरला. या भोजनास बरोबरचे सर्व आश्रित, वैदिक, शास्त्री, सरदार, मानकरी, दरकदार, वतनदार आणि गांवांतील सभ्य शिष्ट यांस निमंत्रण केलें होतें. पंचपक्वान्नाचा बेत होता. तासगांवाजवळच्या विस्तीर्ण आणि गार नारळीबागेची या समारंभास योजना केली होती व सुमारें पांच सहाशें मंडळी होती. वर वैदिक, शास्त्री, खालीं भाऊबंद मानकरी आणि त्यांच्या खालीं इतर मंडळीं याप्रमाणें सर्व आपापल्या योग्यतेनें बसले होते. भोजनाला अनेक पदार्थ केले होते त्यांचे वाढप चाललें होतें. इकडे मंडळीमध्यें खर्ड्यांच्या लढाईच्या गोष्टींची रेलचेल उडाली होती.

जो तो आपला पराक्रम सांगत होता. असा तो समाज मोठ्या आनंदांत होता. सर्व मंडळी आतां भोजनास बसणार; इतक्यांत, पुण्याच्या मार्गानें एक सांडणी स्वार मोठ्या जलदीनें येत आहे, असें सर्वांनीं पाहिलें. इतक्या जरूरीचें काय असावें, याचा जो तो विचार करूं लागला. इतक्यांत स्वार येऊन थडकला आणि त्यानें सांगितलें कीं, भाऊसाहेबांस वर्दी कळवा. त्याप्रमाणें वर्दी येतांच भाऊ समक्ष आले. चालीप्रमाणें स्वारानें अदबशीर नम्रतेनें मुजरा करून एक पत्र भाऊंच्या स्वाधीन केलें. पत्र नाना फडणविसांच्या हातचें होतें. भाऊंनीं मनांतच पत्रांतील मजकूर वाचला. वाचतां वाचतां त्यांची मुखचर्या अगदीं पालटली. आनंदाचीं सर्व चिन्हें जाऊन उदासीनता आली. त्यांचें तोंड अगदीं उतरलें, आणि त्यांनीं मोठ्यानें सुस्कारा टाकिला. वरचेवर पत्र वाचावें, पुनः सुस्कारा टाकावा आणि अधोमुख बसावें असा क्रम चालला. जवळच्या मंडळींनीं कांहींतरी विपरीत प्रसंग आहे असें जाणलें. सर्व मंडळी आपआपसांत कुजबुजूं लागली. तथापि, काय प्रकार आहे हें विचारण्याचें कोणास धैर्य होईना. शेवटीं, भाऊंच्या पदरीं गोपाळपंतमामा सोहनी ह्मणून कोणी त्यांच्या अत्यंत लोभांतले पोक्त गृहस्थ होते. त्यांनीं हळूच काय प्रसंग आहे ह्मणून विचारिलें. भाऊंच्यानें उत्तर देववेना. त्यांनीं तें नानांचें पत्र गोपाळपंत यांच्या आंगावर टाकिलें. त्यांत मजकूर होता कीं, "आश्विन शुद्ध एकादशी रोजीं श्रीमंतांनीं शनवारवाड्याच्या दुमजल्यावरून खालीं चौकांत कारंज्यावर उडी घेतली. पायांत नळी शिरून फार बेआराम आहेत. बहुधा निभावतील अशी आशा नाहीं. आपले सर्व बेत फसण्याचा रंग आला आहे. ईश्वर ठेवील तसें राहणें प्राप्त आहे. येथें काय काय घडेल, याचें आतां सांगतां येत नाहीं. तुह्मी पत्रदर्शनीं असाल तसे फौजेसह येजे. विलंब करण्याचा प्रसंग नव्हे. वरकड मजकूर भेटी अंतीं कळेल." मामांनीं पत्र वाचतांच त्यांच्याही मनोवृत्ति स्तब्ध झाल्या. मंडळीलाही पुण्यांत घडलेला प्रकार समजला. सर्व तटस्थ झाले. मग कसचें भोजन आणि कसचें काय? कोणालाही अन्न गोड लागेना. थट्टा वि-

नोंद यांचें तर नांव नाहीं. जो तो आपल्या विचारांत मग्न. याप्रमाणें ह्या समारंभाचा सर्व बेरंग झाला.

नानांच्या पत्राप्रमाणें भाऊ आपल्या पथकासह लागलेच निघाले ते टाकोटाक दुसऱ्या दिवशीं पुण्यास दाखल झाले. तासगांवाहून पुणें ६०।६५ कोस आहे. मध्यें झोंप नाहीं, विश्रांति नाहीं, एकसारखें मार्गक्रमण चाललें होतें. पुण्यास जाऊन नानांची गांठ केव्हां घेईन असें त्यांस झालें होतें. पुण्यास जाण्याचे पूर्वीं सवाई माधवराव पंतप्रधान कैलासवासी झाल्याचें वर्तमान वाटेंत समजलें. भाऊ पुण्यास दाखल झाल्यानंतर नानांनीं शिंदे, होळकर आदिकरून प्रमुख सरदारांचा व मुत्सद्यांचा दरबार भरविला आणि पेशवाईच्या गादीबद्दल पुढें काय तजवीज करावयाची याचा विचार दरबारांत काढिला. त्यावेळच्या स्थितीचें नानांनीं मोठें हृदयभेदक वर्णन केलें. राघोबाचा पुत्र बाजीराव यास गादीवर बसवावा, असें शिंद्याकडील बाळोबातात्या याचें ह्मणणें पडलें, त्याजवर तो चतुर पुरुष बोलला, "आतां अशा स्थितींत राघोबादादाचा पुत्र, बाजीराव यास गादीवर बसवावा असें ह्मणतां, तर आपलें सर्वांचें राघोबाशीं मोठें हाडवैर. त्याचे पाय जमिनीस न लागावे ह्मणून आपणा सर्वांचे प्रयत्न. हें सर्व त्याचा पुत्र विसरला नसेल. त्याच्या आईनें सरदारांचा नाश करण्याविषयीं लहानपणापासूनच त्याला बाळकडूं पाजिलें आहे. तेव्हां त्याच्या पासून सरदारांस, प्रधानांस आणि मराठी राज्यास सुखप्राप्ति होण्याची आशा कितीशी आहे ? राघोबानें इंग्रजांचा स्नेह संपादिला आहेच. तोच वृद्धिंगत करून मुलगा त्यांच्या आश्रयानें सरदारांच्या माना मुरगाळील आणि अनेक प्राणांच्या आहुती युद्धकुंडांत समर्पून, मोठ्या कष्टानें प्राप्त केलेलें हें मराठ्यांचें राज्य परकीयांच्या घरांत घालील, याचा पूर्वीं विचार झाला पाहिजे. राज्य प्रकरणीं फार दूरदृष्टि ठेविली पाहिजे. आपणास एव्हां दया येऊन एखादी गोष्ट आपण करूं. तसें करणें प्रस्तुत आपल्या स्वाधीन आहे. पण,एकदां आपल्या हातांतून एखादी गोष्ट घडून गेली, ह्मणजे मग ती फिरविणें आपल्या स्वाधीन नाहीं, यास्तव याचा पूर्वींच विचार होणें योग्य आहे."

नानांचे हे पोक्त विचार होळकरास मान्य झाले. भाऊ आदिकरून पटवर्धनांचा व राघोबाच्या घराण्याचा वद्धकटाक्ष, तेव्हां त्यांस तर ना-

नांचें ह्मणणें सर्व खरें दिसलें. दरबारास आलेल्या बाकीच्या सरदारांच्या मुखचर्येवरून आपला विचार त्यांसही रुचला असें, त्या धूर्त पुरुषानें तत्काळ जाणिलें, आणि मग पुढील व्यवस्थेविषयीं त्यांनीं सांगितलें; " आतां या प्रसंगीं काय व्यवस्था करावी, याजबद्दल मला एक विचार सुचतो. कैलासवासी सवाई माधवराव यांचे कुटुंबाच्या मांडीवर दत्तक द्यावा आणि पूर्वीप्रमाणें राज्यकारभार चालवावा. आपण मराठी राज्याचे स्तंभ आहां. पेशव्यांचे गादीच्या रक्षणाचा सर्व भार आपल्या शिरावर आहे. मराठी राज्याची ही थोर इमारत आपल्या पराक्रमावर अवलंबून आहे. आपलें साह्य असलें ह्मणजे सर्व गोष्टी यथास्थित घडून येतील. "

नाना फडणविसाचें प्रौढ व सुरस भाषण श्रवण करून सरदार व मुत्सद्दी अगदीं तल्लीन झाले. नानांचा विचार सर्वांस ग्राह्य झाला. आणि काय व्यवस्था करावयाची याजबद्दल याद ठरून तिजवर सर्वांनीं सह्या केल्या.

या यादींत ठराव झाल्याप्रमाणें व्यवस्था झाली असती तर सर्व राज्यसूत्रें सुरळीत चाललीं असतीं. मराठी राज्याचा बोज राहिला असता व लोकांस सुखप्राप्ति झाली असती. पण अनेक संकटें भोगणें त्यांच्या प्राक्तनीं लिहिलें होतें, तें कसें चुकावें ? मराठी राज्याचें दुर्दैव ओढवलें होतें. तें पुढें धांव घेत होतें. ठरलेल्या मसलतींत एक पुरुष होता त्याच्या बुद्धीस या दुर्दैवानें भ्रंश पाडिला आणि त्यानें हा सर्व रचलेला व्यूह ढासळला. यापुढें जीं कारस्थानें सुरू झालीं त्यांत आजपर्यंत भाऊ व नाना यांमध्यें जो अव्याहत दृढ स्नेहभाव होता तो भग्न झाला. आणि कोणास कोणाचा भरंवसा नाहींसा होऊन मराठीराज्यांतील शहाणपण, लौकिक, प्रतिष्ठा हीं सर्व लयास गेलीं. या गोष्टींचें आतां संक्षेपतः वर्णन करितों.

नाना फडणविसानें पेशवाईचें पद बाजीरावास न मिळावें ह्मणून व्यवस्था केली, तिचें वर्तमान बाजीरावास कळलें, त्यावेळीं शिंद्याचे दिवाण बाळोबातात्या यांचें आपणाकडे लक्ष्य आहे असें त्यानें ऐकिलें होतें त्याच्या बरोबर त्यानें पत्रव्यवहार सुरू केला. बाजीरावाच्या लेखांत व भाषणांत मोहकगुण कांहीं विलक्षण असे. त्यानें एक दोन पत्रांतच बाळोबाला अगदीं आपलासा केला. नंतर बाळोबाच्या तंत्रानें दौलतराव शिंदा याजपाशीं बोलणें लाविलें कीं, " मला पेशवाईचें पद प्राप्त करून

झाल तर तुम्हांस चार लक्षांचा मुलूख व फौजेस लागेल तो खर्च मी देईन.” दौलतराव त्यावेळीं तरुण होता व बाळोबाच्या मुठींत होता. त्यानें नानांजवळ केलेले करार सर्व विसरून बाळोबाच्या युक्तीस संमती दिली आणि मग गुप्तपणें उभयतांचे करारमदार ठरले.

नानांची बातमी काढण्याविषयीं मोठी शर्थ होती. बाजीराव व शिंदे यांचे करार झाले नाहींत, तोंच नानांस त्याची इत्थंभूत बातमी लागली. शिंद्याच्या खटपटीमुळें आतां आपला बेत सिद्धीस जात नाहीं असें त्यांना भय पडलें. लागलेंच त्यांनीं भाऊंना निमंत्रण केलें आणि उभयतांचा कांहीं एकांत झाला. उभयतांच्या विचारें असें ठरलें कीं, ज्याअर्थीं शिंद्यानें बाजीरावास गादीवर बसवावयाची खटपट चालविली आहे, त्याअर्थीं आतां आपणच त्याला आणून त्याची स्थापना करावी. असा निश्चय ठरून बाजीरावास आणण्याकरितां भाऊंची नानांनीं योजना केली. तेव्हां ते लागलेच कांहीं निवडक स्वार बरोबर घेऊन शिवनेरी किल्ल्यावर गेले, आणि अमृतरावास व बाजीरावास भेटून त्यांनीं आपल्या आगमनाचा हेतु त्यांस कळविला. नानांकडून आपणावर अशी कृपा होईल, याची बाजीरावास व अमृतरावास इतकी निराशा होती कीं, जेव्हां भाऊंनीं आपला येण्याचा हेतु कळविला, तेव्हां नानानें आपणास फसविण्याकरितां ही कांहींतरी खटपट चालविली आहे असें त्यांस वाटलें. शेवटीं भाऊंपासून आणाशपथा घेऊन अमृतरावानें आपल्या बंधूंस ( बाजीराव, चिमणाजीआपा यांस ) भाऊंच्या स्वाधीन केलें.

बाजीराव पुण्यास आल्यानंतर त्याच्या व नानांच्या भेटी झाल्या. पूर्वीचें सर्व वैमनस्य विसरून उभयतांच्या विचारें राज्यकारभार चालवावयाचा असे परस्परांचे लेखी करार ठरले. बाजीरावास पेशवाईचें पद प्राप्त झालें. आणि उभयतांसही आतां आपणास अधिकाराचा उपभोग घ्यावयास सांपडेल व सुखाचे दिवस येतील अशी मोठी आशा लागली. पण दैवाची करणी विचित्र आहे. मनुष्य करावयास जातें एक; आणि दैव घडवितें भलतेंच. यावेळींही असेंच झालें. त्याचा प्रकार असा:—

आपण केलेली सर्व खटपट नानांनीं बाजीरावास अनुकूल करून [illegible] व्यर्थ झाली, याचा बाळोबास व शिंद्यास फारच वि-

षाद वाटला. नानांनीं आपल्या शहाणपणावर कडी केली हें लोकिकांत आपणास फार लांछन होय असें बाळोबाचें मन खाऊं लागलें. बाजीरावानें पहिल्यानें आपणाकडे संधान लाविलें आणि शेवटीं आपल्या शत्रूंस तो अनुकूल झाला, याचा त्यास फार राग आला. नाना व बाजीराव या उभयतांसही फशीं पाडण्याचा बाळोबा विचार करूं लागला. तो मोठा स्वाभिमानी पुरुष होता, आणि उचलिलेलें कार्य सिद्धीस नेण्याविषयीं फार निग्रही होता. शिंदा त्याच्या केवळ मुठींत होता आणि सर्व मराठेसरदारांत शिंद्याजवळ फौजफांटा मोठा होता. म्हणून 'कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं' असें त्यावेळीं बाळोबाचें सामर्थ्य होतें. शिवाय, नानाचा भित्रा स्वभाव त्यास पूर्ण माहीत होता. यामुळें त्याची मसलत सहज सिद्धीस गेली. बाळोबानें दौलतराव शिंदा फौजबंद गोदावरीच्या तीरीं तळ देऊन होता त्याला फौजेसह पुण्यास बोलाविलें. इतक्यानें त्याचा कार्यभाग साधला.

शिंदा फौजेसह पुण्यास येत आहे असें समजतांच नाना फडणवीस घाबरून गेला. "मिळेल तितकी फौज मिळवून शिंद्याशीं लढाई करितों व त्याचा सर्व बलगर्व हरण करितों," असें भाऊंनीं नानाप्रकारें त्यास सांगितलें व धीर दिला. पण नानाची पुण्यांत राहण्याची छाती होईना. त्याला दोन प्रकारें मोठी भीति पडली. एकतर, बाजीरावाचा त्याला काडी मात्र भरंवसा नव्हता, आणि दुसरें, बाळोबाताम्याच्या हातीं लागलों तर तो एखाद्या किल्ल्यावर टाकील, किंवा प्राण घेईल याची त्याला मोठी भीति होती. यास्तव, 'शिंद्याचा डोळा मजवर आहे तर आपसांतील कलह न वाढावे याजकरितां मीच येथून निघून जावें हाच सर्वोत्तम उपाय आहे,' असें बाजीरावास सांगून आणि परशुरामभाऊंस बाजीरावाच्या संनिद्ध ठेवून नाना सातार्‍यास निघून गेले.

दौलतराव शिंदे फौजबंद दाखल झाले. बाजीरावाच्या व त्यांच्या स्नेहभावानें भेटी झाल्या. बाळोबानेंही बाजीरावाची वाह्यात्कारीं मोठ्या स्नेहभावानें भेट घेतली. तथापि, आपणाबरोबर उपक्रम सुरू करून बाजीराव शेवटीं आपल्या हितशत्रूंच्या म्हणण्यास मान्य झाला याजबद्दल बाळोबाला तो अगदीं नावडता झाला होता.

नंतर बाळोबा बाजीरावास कसें पदभ्रष्ट करावें याचा विचार करूं

लागला. अनेक विचार त्यानें योजिले. पण प्रत्येकांत कांहींना कांहीं तरी व्यंग असे. शेवटीं सवाई माधवराव यांच्या कुटुंबाच्या मांडीवर चिमणाजीआपा यास दत्तक द्यावें ; बाजीरावास प्रतिबंधांत ठेवावें; आणि परशुरामभाऊंनीं कारभार पहावा, हा मार्ग त्यास उत्तम दिसला. आणि त्यानें तो सर्व विचार बहिरोपंत मेहेंदळे याजकडून परशुरामभाऊंस कळविला.

भाऊंचें व नानांचें अत्यंत सख्य ; अलीकडे तर सर्व वाटाघाटींत दोघे-ही प्रमुख होते व एकमेकांच्या सल्ल्यानें व विचारानें वागत असत. ह्मणून, बाळोबानें उपस्थित केलेला सर्व विचार भाऊंनीं नानांस कळविला. बाजी-रावास नानांनीं निरूपायानेंच पेशवाईच्या पदावर आणिलें होतें, तेव्हां तो पदभ्रष्ट झाल्यांत त्यांस विशेष दुःखाचें कारण नव्हतें. ह्मणून, त्यांनीं त्या बेतास आपली संमति दिली. इतकेंच भाऊंस सुचविलें कीं, बाजीरा-वास आपल्या ताब्यांत चांगल्या बंदोबस्तानें ठेवण्याची खबरदारी घ्यावी.

बाजीरावाच्या नाशाविषयीं या झालेल्या बेताची त्याला वार्ताही न-व्हती. एके दिवशीं शिंद्याशीं कांहीं मजकूर बोलण्याचा होता म्हणून बाजीराव त्याच्या छावणींत गेला होता. उभयतांचें बोलणें बराच वेळ होऊन संध्याकाळ झाली. इतक्यांत, कोणी वर्दी दिली कीं, परशुरामभाऊ, चिमणाजिआपास घेऊन, गेले. कोठें गेले हें कोणी सांगेना. शिंद्यानें आपले लोक पाठोपाठ पाठवावे म्हणून बाजीरावानें शिंद्याची विनवणी केली ; पण शिंद्यानें अनेक हरकती घेतल्या, तेव्हां कांहीं तरी काळेंबेरें आहे असें बाजीराव समजला. रात्रीच्यारात्र तो तेथेंच मुक्कामास रा-हिला आणि दुसरें दिवशीं पाहतो तों आपण प्रतिबंधांत आहों.

परशुरामभाऊ व बाबाराव फडके यांनीं चिमणाजीआपास शहरांत नेलें आणि सवाई माधवराव यांच्या स्त्रीच्या मांडीवर त्यास दत्तक दिलें. नानाफडणवीस त्यावेळीं वाईस होते. त्यांनीं सातान्यास जाऊन महा-राज सरकारांतून चिमणाजीआपा यास पेशवाईचीं वस्त्रें पाठवून दिलीं. तारीख २६ माहे मे सन १७९६ पासून चिमणाजी माधव यांच्या नांवानें राज्यकारभार चालू झाला आणि परशुरामभाऊ कारभार पाहूं लागले.

चिमणाजीआपास पेशवाईचीं वस्त्रें दिल्यानंतर, नानांनीं पुण्यास पे-

ऊन कारभार करावा ; बाळोबाचें व नानांचें पुनः सख्य व्हावें ; व आपणाकडे फौजेसंबंधीं काम द्यावें ; अशा मजकुराचें भाऊंनीं नानांस दुसरेच दिवशीं पत्र लिहिलें. या पत्राचें नानांकडून उत्तर आलें, त्यांत, यासंबंधीं पूर्वीं कांहीं बोलणें आहे तर आपले पुत्र हरीपंत यास वाईस मजकडे पाठवून द्यावें म्हणून मजकूर होता. यावरून भाऊंनीं हरीपंताची रवानगी केली.

इतक्यांत, हरीपंत बरोबर ४,००० स्वार घेऊन येत आहेत असें वाईत वर्तमान आलें. त्यामुळें, आणि बाजीरावास चांगल्या बंदोबस्तानें ठेवण्याविषयीं सांगितलें असतां भाऊंनीं त्यास बाळोबाच्याच ताब्यांत राहूं दिला आहे, असें नानांस कळलें त्यामुळें, भाऊ बाळोबाच्या तंत्रानें वागत आहेत असें नानांस वाटलें. नानांचा स्वभाव फार संशयी व भित्रा होता, त्यांना येवढ्याशा क्षुल्लक गोष्टीवरून भाऊंच्या वर्त्तनाचा जो संशय आला तोच त्यांचा दृढतर होत गेला ; आणि त्या दोन पुरुषांचे मनांत परस्परांविषयीं जी आढी बसली ती चांगलीशी निघाली नाहीं. भाऊंचें व नानांचें फार दिवसांपासून सख्य होतें. परस्परांच्या प्रकृति परस्परांस पूर्ण अवगत होत्या. परस्परांच्या गुणांस ते चहातही असत. असा सर्व प्रकार असतां एकाएकीं असा बिघड झाला याचें मोठें आश्चर्य वाटतें. चित्त व्यग्र असलें म्हणजे अति क्षुल्लक गोष्टीवरूनही केव्हां केव्हां मन विटतें असें ह्मणतात, त्याचेंच हें एक उदाहरण होय.

याप्रमाणें नानांस भाऊंच्या वर्त्तनांविषयीं विनाकारण संशय आला. नंतर त्यांनीं त्यांस संकटांत घालण्याविषयीं अनेक कारस्थानें केलीं. तीं आतां पुढील भागीं सादर करूं.

# भाग १२.

## नानाफडणविसांचीं कारस्थानें.

भाऊंची इच्छा नसतां त्यांना श्रीमंत पंतप्रधान यांचे कारभारी हें पद कसें प्राप्त झालें, याविषयीं मागील भागांत निरूपण केलें. भाऊंकडे कारभार

आल्यानंतर त्यांना कोणतीं संकटें आलीं आणि भाऊ पदच्युत होऊन तें पद पुनः आपणास मिळावें ह्मणून गुप्त रीतीनें नानाफडणविसानें कशीं कशीं राज्यकारस्थानें मोठ्या चातुर्यानें रचिलीं, इत्यादि गोष्टींचा वृत्तांत आतां कथन करूं.

चिमणाजीआपाला पेशवाईच्या गादीवर बसवावें, ह्मणून शिंद्याचे दिवाण बाळोबातात्या यांनीं मसलत केली, तिला भाऊ अनुकूल झाले ते नानांच्या सल्ल्यावरून अनुकूल झाले, हें मागें सांगितलेंच. ही मसलत सिद्धीस गेली तेव्हां नानांनीं पुण्यास येऊन कारभार पाहावा आणि आपण फौजेसंबंधीं काम पाहावें, असें भाऊंनीं योजिलें व नानांस तसें पत्र लिहिलें. या दोन्ही गोष्टींवरून भाऊ नानांच्या गुणास किती चहात होते व राज्यकारभारांत त्यांचें आंग असलें पाहिजे, अशी त्यांची किती इच्छा होती, हें स्पष्ट दिसतें. अशा मान्य पुरुषाबरोबर भाऊंनीं आपण होऊन प्रतिस्पर्धा केली असावी, असा संभव दिसत नाहीं. तथापि, नानांच्या मनांत तसा विकल्प आला, ( आणि विकल्प येण्यासारख्या त्या प्रसंगीं एक दोन गोष्टीही घडल्या ) आणि नाना, भाऊंनीं सुचविल्याप्रमाणें पुण्यांत न येतां कोंकणांत माहाडाकडे निघून गेले. बाळोबातात्यानें शिंद्याचे लोक नानांच्या पाठीवर पाठविण्याचें योजिलें होतें. पण भाऊ त्या गोष्टीस अगदीं मान्य झाले नाहींत. उलटा त्यांनीं बाळोबाचा निषेधच केला. यावरूनही नानांविषयीं भाऊंच्या मनांत वैरभाव नव्हता, याविषयीं संशय राहात नाहीं. पण इतकें झालें तरी नानांला भाऊंचा भरंवसा लागेना आणि ते त्यांच्याशीं द्वेष करूं लागले. या वैमनस्यानें उभयतांसही अनेक संकटें भोगावीं लागलीं.

पुण्यास येऊन कारभार करण्याचा नानांचा मानस दिसेना तेव्हां कारभाराचें काम भाऊंना स्वतः स्वीकारावें लागलें. पुण्यांत त्यावेळीं काय तें शिंद्याचें प्रस्थ मोठें होतें. त्याच्या इच्छेवर सर्व घडामोडी होत. चिमणाजीआपाला स्थापन करण्याची मसलतही शिंद्याचे दिवाणाकडूनच उपस्थित झाली व ती त्याच्या साह्यानेंच सिद्धीस गेली. यामुळें, परशुरामभाऊंकडे पेशवाईचा कारभार आला तरी त्यांना शिंद्याचे दिवाण बाळोबातात्या यांच्याच विचारानें पुष्कळअंशीं चालावें लागे. पेशव्यांच्या दरबारांत आपला पगडा असावा अशी बाळोबाची मोठी इच्छा होती;

ती या वेळीं सफळ झाली. नानाफडणविसाचा व बाळोबाचा द्वेष होता. त्याचा या वेळीं चांगला सूड घेण्याला बाळोबाला साधलें. या सर्व गोष्टींत त्यानें भाऊंचें नांव पुढें केलें. भाऊंना हा प्रकार आवडत नव्हता-तथापि, दरबारांत कोणा मोठ्याचें साह्य नाहीं; पेशवेसरकार तर लहान; आणि शिंद्याची सलामत मोठी; म्हणून त्यांना तें निरुपायानें मान्य करावें लागे.

भाऊंकडे कारभार आल्यानंतर शिंद्याच्या फौजेचा पगार फार तुंबला होता, तो मिळण्याविषयीं शिंद्यानें फार निकड लाविली. खजिन्यांत तर शिल्लक नाहीं. खर्ड्याच्या लढाईच्या खर्चानें सर्व पैसा फस्त झाला होता, म्हणून त्या वेळीं भाऊंस मोठा विचार पडला. सर्व सोंगें येतात, पण पैशाचें येत नाहीं. शेवटीं खर्ड्याच्या लढाईंत निजामसरकारचे दिवाण मशीर-उल्-मुल्क यांस धरून आणिलें होतें त्यांजकडून सदहू लढाईपैकीं तीन कोट रुपये निजामसरकाराकडे येणें होते, त्यापैकीं कांहीं रक्कम घेऊन त्यांना बंधमुक्त केलें, आणि तो ऐवज शिंद्यास दिला. निजामकडचा सर्व ऐवज फिटेपर्यंत दिवाणांनीं गारपिरावर राहावें अशी त्यांना परवानगी दिली. याप्रमाणें शिंद्याचें तोंड थोडेसें बंद केलें, व एका संकटाचें कसें तरी निवारण झालें.

नवीन संकटांचा उद्भव चालू होताच. इकडे नाना फडणवीस माहाडास स्वस्थ बसले नाहींत. भाऊंनीं बाळोबाच्या नादास लागून आपणास विदेश दाखविला व कारभारांतून दूर केलें, असा त्यांचा पूर्ण ग्रह झाला होताच. मग त्यांच्या नाशार्थ व आपणास आपला गताधिकार पुनः प्राप्त करून घेण्यास्तव त्यांनीं अनेक कारस्थानें रचिलीं. या कामांत त्यांनीं आपलें अद्वितीय शहाणपण व अपूर्व चातुर्य प्रदर्शित केलें. त्याबद्दल परकीय लोक देखील त्यांची फार प्रशंसा करितात.

नाना व बाजीराव उभयतांही अधिकार भ्रष्ट होऊन अज्ञातवास काढीत होते. समदुःखी असल्यामुळें पूर्वींचा वैरभाव जाऊन त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. बाजीरावाच्या पदरीं बाळाजी कुंजर ह्मणून कोणी मराठा सरदार होता, त्याच्या द्वारानें उभयतांचें लवकरच सख्य

झालें. नाना फडणविसास कोणाचा तरी आधार पाहिजे होता. बाजीरावाचें साह्य मिळतांच त्यानें सर्व सरदारांस वश करून घेण्याचे उपाय चालविले. सरदारांत त्याचें मोठें वजन असे; त्याला द्रव्याचें मोठें पाठबळ होतें आणि सरदारांच्या हिताहिताच्या गोष्टी त्यास पूर्ण अवगत होत्या; यामुळें त्याला इष्टकार्यांत सहज यश आलें. बाबूराव फडके याजकडे पेशव्यांचे हुजुरात फौजेचें काम होतें, तो त्याच्या पक्षास मिळण्यास कबूल होताच. तुकोजी होळकर तर त्याचा अगदीं अंकित होता आणि त्याजकडून सूचना येतांच आपली सर्व फौज त्याच्या साह्यार्थ पाठविण्यास सिद्ध झाला. नागपूरकर रघूजी भोंसल्यालाही नानांनीं वश केला. फौजेच्या खर्चाकरितां पंधरा लक्ष रुपये रोख देऊन त्याची तुंबडी भरली, आणि मंडळें प्रांत, सूर्यगडचा किल्ला व त्याच्या खालचा मुलूख, हें कार्य सिद्धीस गेल्यानंतर त्याला देण्याचें वचन दिलें. कोल्हापुरच्या राजाला भाऊंच्या जहागिरीवर स्वारी करण्याची मोकळीक देऊन आणि निजामसरकाराला चौथाईचे वगैरे कितीएक हक्क माफकरून त्यांनाही या मसलतींत नानानें अनुकूळ केलें. आतां कायतें शिंद्याला वश करून घेण्याचें राहिलें. हेंच मोठें कठीण काम होतें. शिंद्याच्या दरबारांत बाळोबाचें मोठें प्रस्थ होतें. दरबारचे बहुतेक अंमलदार व खुद्द शिंदाही बाळोबाच्या आज्ञेत असे. तेव्हां तेथें वशीकरणाचा उपाय चालण्याची आशा फार कमी होती. तथापि, नाना डगमगले नाहींत. शिंद्याच्या जवळच्या गृहस्थांत रायाजीपाटील ह्मणून कोणी गृहस्थ बाळोबाचा शत्रु होता. त्याजकडे नानांनीं संधान लाविलें. सखाराम घाटगे * ह्मणून कोणी हलकट मनुष्य होता, त्याला मध्यस्थ केलें. घाटगे हा

* हाच घाटगे "सर्जेराव घाटगे" या प्रतिष्ठित नांवानें पुढें प्रसिद्धीस आला. घाटगे हा कोल्हापुराजवळ कागल संस्थान आहे, तेथील संस्थानिकाचाच कोणी नातलग होता. कागलचें संस्थान आपणास मिळावें म्हणून यानें खटपट केली. ती व्यर्थ झाल्यानंतर याला कागलास थारा मिळेना, तेव्हां हा परशुरामपंतभाऊ याजकडे आला. त्यांनीं आपल्या पदरीं याला ठेवून घेतलें, व त्यांच्याच आश्रयानें याचा पुढें नाना फडणविसाजवळ प्रवेश झाला. परशुरामभाऊंनीं त्याला विपत्काळीं आश्रय दिला, त्याचे उपकार त्यानें हे या प्रकारें फेडले ! !

पूर्वी नाना फडणविसाजवळ असून नुकताच शिंद्याच्या चाकरीस राहिला होता. घाटगे याची कन्या फारच सुंदर व लावण्याची केवळ खाण अशी होती, ती प्राप्त व्हावी म्हणून शिंद्याला फार इच्छा होती व यामुळें तो घाटग्याचे शब्द झेलीत होता. तेव्हां शिंदा निजपक्षास अनुकूल करून घेण्याला हा घाटगा नानांस फारच उपयोगी पडला. त्याच्याद्वारें एक दोन वेळां बोलणें काढतांच शिंदा वश झाला. बाळोबातात्यावर शिंद्याचा पूर्ण विश्वास असे आणि त्याच्या शब्दा बाहेर तो वागत नसे; पण या स्त्रीच्या प्राप्त्यर्थ तें सर्व एकीकडे ठेवण्याला तो मान्य झाला. स्त्रियांचा मोह किती बलवत्तर आहे पहा.

वर लिहिल्याप्रमाणें घाटगे व रायाजी पाटील यांच्याद्वारें नानांनीं शिंद्याला अनुकूळ केलें. आणि शिंदा भाऊंस व बाळोबातात्यास प्रतिबंधांत ठेवील आणि बाजीरावास पेशवाईच्या गादीवर बसवून हिंदुस्थानांत जाईल, तर परशुरामभाऊंची सर्व जहागीर, अहमदनगरचा किल्ला व त्याच्या खालचा दहा लक्षांचा मुलूखही याला देण्याचें नानांनीं कबूल केलें. उभयपक्षाकडून हे सर्व करार कायम झाले.

नानांनीं भाऊंच्या व बाळोबाच्या नाशार्थ इतकें जाळें पसरलें. पण तें अशा गुप्त रीतीनें पसरलें कीं, त्या उभयतांसही त्याची कांहीं वार्ता नव्हती. बाजीराव शिंद्याच्या छावणींत होता, त्याजकडे नानांनीं पैसा पाठवून बाजीरावाजवळ मानाजी फांकडे म्हणून कोणी गृहस्थ होता त्याजकडून फौज ठेवण्याचें काम चालविलें. तेव्हां बाळोबास संशय आला. तथापि, यांत नानांचें आंग असावें असें त्यावेळीं त्यास वाटलें नाहीं. हे सर्व बाजीरावानें खेळ चालविले असावेत असें तो समजला. शिंद्याविषयीं तर त्याच्या मनांत शंका देखील आली नाहीं. शिंद्याचा त्याच्यावर अत्यंत लोभ होता. त्यामुळें आपल्या नाशार्थ तेथें कोणाचें वशीकरण चालेल, अशी त्याच्या मनांत कल्पना देखील आली नाहीं. घाटगे याच्याविषयींही त्याला कांहीं संशय आला नाहीं. बाळोबा मोठा धूर्त व चतुर होता. पण, त्याचें यावेळचें अनुमान सर्वच फसलें.

फांकड्याविषयीं संशय येतांच बाळोबा बाजीरावाच्या बंदोबस्तास लागला. बाबूराव फडके यास धरून त्यानें चाकणच्या किल्ल्यावर पोंचविलें; बाजीरावाजवळचा पहारा सक्त केला; मानाजी फांकडे यानें जमविलेल्या फौ-

नेस फांटा दिला; आणि बाजीरावास पुण्यास ठेविलें असतां अशीं कृत्यें तो वरचेवर उपस्थित करणार, ह्मणून त्याची उत्तर हिंदुस्थानांत रवानगी केली. घाटगे याच्याविषयीं बाळोबाच्या मनांत संशय नव्हताच. त्यानें या प्रसंगीं दुर्दैवानें बाजीरावाबरोबर घाटगे यासच बंदोबस्तास दिलें. बाजीरावास हेंच पाहिजे होतें. आपण हिंदुस्थानांत दूर गेलों तर न जाणो नानाफडणवीस, दुसरे कोणाची पेशवाईच्या गादीवर स्थापना करील, अशी बाजीरावाला भीति होती. तो घाटग्याची मनोधारणा करूं लागला. शिंद्याला घाटग्यानें आपली कन्या द्यावी, म्हणून त्यानें घाटग्याचें आर्जव चालविलें. जों जों बाजीराव आर्जव करी, तों तों घाटग्यानें फारच ओढतें घेतलें. शेवटीं बाजीरावानें पेशवाईचें पद प्राप्त झाल्यानंतर शिंद्यास दोन कोट रुपये द्यावे, घाटग्याला शिंद्याची दिवाणगिरी मिळवून द्यावी, आणि कागलगांव त्याला इनाम द्यावें, असा त्यानें बाजीरावापासून करार करून घेतला तेव्हां तो त्याच्या म्हणण्यास मान्य झाला. मग बाजीरावानें दुखण्याचा कांहीं बाहाणा केला आणि नानांचीं कारस्थानें पूर्ण होईं पावेतों पेरानदीच्या कांठीं मुक्काम केला.

शिंद्याच्या छावणींत बाजीराव असतां मानाजी फांकडे याजकडून त्यानें फौज ठेवण्याचा क्रम चालविला होता. त्या फौजेस बाळोबानें फांटा दिला तेव्हां तो फांकडे वाईकडे त्या लोकांसह गेला आणि तेथें त्यानें आणखी फौज ठेवण्याचें काम सुरू केलें. बाजीरावाचे हितचिंतक कित्येक सरदारही त्याला मिळाले. नानाफडणविसाकडून पैशाचा पुरवठा हवा तसा होतच होता. यामुळें थोड्याच काळांत नानांच्या व बाजीरावाच्या पक्षाची तेथें दहा हजार फौज जमली.

इतकें झालें तेव्हां नाना, बाजीरावास अनुकूळ आहे, अशी भाऊंची व बाळोबाची खातरी झाली. नानांस आपण अनेक प्रकारें आश्वासन दिलें असतां आपल्या सत्यतेविषयीं त्यांच्या मनांतला संदेह फिटत नाहीं व त्यांनीं आपणास अगदीं फशीं पाडलें हें पाहून भाऊंच्या मनास यावेळीं फार वाईट वाटलें. तथापि, आलेला प्रसंग पार पाडणें अवश्य होतें. वाईकडे जी फौज जमत होती तिचा मोड करणें भाग आलें. भाऊंनीं या कामास स्वतः कंबर बांधिली असती तर तें चांग-

लें झालें असतें; पण, दुर्दैवानें तशी बुद्धि त्यावेळीं त्यांना सुचली नाहीं. त्यांनीं तें काम दुसऱ्यांच्या हातीं दिलें. आणि ज्यांच्या हातीं दिलें, ते नानांस पूर्वींच अनुकूळ झालेले होते. तेव्हां नानांना आपला कार्यभाग साधावयाला अधिकच सवड झाली. नानांनीं आपल्याजवळच्या सरदारांस वश केलें आहे याची बिचाऱ्या भाऊस या वेळपर्यंत वार्ताही नव्हती. भलत्याच स्थळीं त्यानें विश्वास टाकिला, आणि तो सर्वस्वी नानांच्या जाळ्यांत सांपडला. वाईकडे फौजेचा जमाव बराच होत चालला तेव्हां भाऊंचे व बाळोबाचे हितशत्रु शिंदे, होळकर यांनीं त्या फौजेच्या बंदोबस्ताकरितां आपल्या फौजा पाठवितों म्हणून विनंती केली व त्याच कारणास्तव मी नवीन फौज ठेवितों असें निजामसरकारचा दिवाण मशीर-उल्-मुल्क यानें बोलणें लाविलें. तें बाळोबास व भाऊंस खरें वाटलें आणि त्याला त्यांनीं आपली मान्यता दिली.

असें होतांच त्यांच्या बहुतेक फौजा तिकडे गेल्या. याप्रमाणें भाऊंच्या जवळचें सर्व सैन्य घालविल्यानंतर नानांनीं शिंद्याकडून बाळोबास तारीख सत्तावीस आक्टोबर रोजीं कैद करविलें. नंतर शिंद्यानें आपले कांहीं लोक व मशीर-उल्-मुल्क याचे लोक नारोपंत चक्रदेव याजबरोबर देऊन भाऊंस धरण्याकरितां पाठविलें. भाऊंना हें वर्तमान मोठ्या चमत्कारिक रीतीनें कळलें. नारोपंत चक्रदेव याचा परशुरामपंत वैद्य म्हणून कोणी मित्र होता. त्याला त्यानें भाऊंस धरण्याची मसलत झाल्याची चिठ्ठी लिहिली. पण ती चिठ्ठी ज्याजवळ पोंचविण्याकरितां दिली होती त्यानें ती परशुरामपंत वैद्य याजकडे न नेतां गफलतीनें परशुरामपंतभाऊ पटवर्धन यांजकडे पोंचविली. चिठ्ठींतील मजकूर पाहतांच भाऊ दचकले, आणि दगा आहे असें समजले. तो रातीचा समय होता. तथापि, आतां विलंब करण्याची वेळ नाहीं, ह्मणून ते लागलेच पोषाख करून स्वार होऊन वाड्यांत गेले; चिमणाजीआपा व त्यांच्या रक्षणार्थ भाऊंचे चिरंजीव हरीपंत व दाजीसाहेब तेथें निजले होते त्यांस त्यांनीं जागें केलें आणि सत्वर प्रयाण करण्याची तयारी केली. इतकें होत आहे तों पहांट झाली. नारोपंत चक्रदेव मोठी फौज घेऊन भाऊंस धरण्याकरितां शहरांत

आले. वाड्यासमीप येतात तों परशुरामपंतभाऊ, श्रीमंत चिमणाजी आपास आपल्या घोड्यावर घेऊन दोघां चिरंजिवांसह बाहेर पडले. भाऊंचे बरोबर त्यांचे खासगी पथकांतील पांचशें निवडक स्वार मात्र होते. बुधवारांतून ही मंडळी चालली. भाऊ व भाऊंकडील मंडळी घोड्यावर बसून, हातांत पट्टे चढवून सिद्ध झाली होती. कांहीं स्वार पुढें, भाऊ व चिमणाजीआपा मध्यभागीं आणि कांहीं स्वार मागें अशा प्रकारें शहरांतून गेले. शत्रूंनीं त्यांच्यावर शहरांत वार काढला नाहीं. नाहीं तर तेथेंच युद्ध जुंपावयाचें. शहरा बाहेर गेल्यानंतर भाऊंना पटवर्धनांच्या इतर पथकांतील फौज येऊन मिळाली तेव्हां त्यांच्याबरोबर तीन हजार फौज झाली. या फौजेनिशीं भाऊंनी जुन्नराकडे शिवनेरी किल्ल्याची वाट धरिली. मागोमाग चक्रदेव होतेच. कोणास अन्न नाहीं, पाणी नाहीं. वाटेनें रात्रीं चक्रदेव यांच्या सैन्यावर भाऊंनीं छापा घातला व बुणगे लुटले. शेवटीं भाऊ व त्यांची फौज शिवनेरी किल्ल्या नजीक उतरली. नारोपंतही दाखल झाला. त्याजबरोबर सातहजार फौज होती व आणखी सातहजार मागून येऊन मिळाली. किल्लेदार याचें साह्य मिळाल्यास किल्ला लढवितां येईल म्हणून रात्रीं भाऊ, चिमणाजीआपास बरोबर घेऊन किल्ल्यावर गेले. किल्लेदाराला भाऊंना साह्य करण्याचें धैर्य होईना. तेव्हां चक्रदेवाबरोबर युद्ध संग्राम करण्याचा नाद भाऊंनीं सोडून दिला, आणि तहाचें बोलणें लाविलें. आनंदराव रास्ते यांनीं भाऊंस बंदोबस्तानें ठेवण्याचा जिम्मा घेतल्यावरून भाऊ त्यांचे स्वाधीन झाले. आणि त्यांनीं आपल्या बरोबरच्या लोकांस एकेक रुपया खर्चास देऊन आपले चिरंजीव; आपासाहेब यांजकडे जाण्याविषयीं त्यांस सांगितलें. चिमणाजी आपा नारोपंताच्या हस्तगत झाले. नंतर रास्ते यांनीं भाऊंस मांडवगण येथें ठेविलें.

याप्रमाणें नानांच्या कारस्थानाचा शेवट होऊन या शूर पुरुषास कारागृहवास प्राप्त झाला.

पुढील भागांत भाऊंच्या मुक्ततेचा योग कसा घडून आला याचें निवेदन करूं.

नेटिव्ह महाराष्ट्रांतील ... ग्रंथ ... पुस्तकालय

# भाग १३.

## बंधविमोचन. सातारचें बंड.

नानांनीं रचिलेलीं कारस्थानें सिद्धीस गेलीं. बाजीरावास पेशवाईचें पद पुनः प्राप्त झालें. नाना कारभार पाहूं लागले. त्यांची मंडळी कामांत वागूं लागली. शिंदे, व भोंसले, यांस देऊं केलेले प्रांत दिले. आणि राज्यकारभारांत वर्षभर चालत असलेलें वावटळ, शांत झालें, असें बाह्यात्कारीं दिसूं लागलें. तथापि, अंतर्गत स्थिति फार भिन्न होती. बाजीरावानें नानांशीं सख्य केलें, तें केवळ स्वार्थसाधनाकरितां. इष्ट हेतु सिद्धीस गेला तसा बाजीराव नानाचा पुनः द्वेष करूं लागला. ज्या नानानें एवढा व्यूह रचिला, आणि सर्व सरदारांस वश करून आपणास हें महत्पद प्राप्त करून दिलें, तो समय आल्यास आपणास रसातळासही घालील, असें त्यास वाटूं लागलें. नानास घोटाळ्यांत घालण्याचा व आपण त्याच्यापासून स्वतंत्र होण्याचा समय कधीं येतो अशी त्याला चिंता लागली. इतक्यांत तशी संधि आली. तुकोजी होळकर मरण पावला, आणि त्याचे चार पुत्र त्याच्या गादीकरितां भांडूं लागले. त्यांपैकीं एकास नानांचा आश्रय होता. शिंद्यानें दुसऱ्यासच पाठीशीं घातलें, आणि गादीवर स्थापिलें. नानांस होळकराचा मोठा आधार होता, तो याप्रकारें नाहींसा झाला. होळकर, शिंद्याचा अंकित झाला. शिंद्याचें वजन पहिल्यापेक्षांही अधिक झालें. नाना अगदीं फिके पडत चालले; शिंदा पुण्यांत पाहिजे तें करूं लागला. बाजीरावास शिंद्याचीं कृत्यें मनापासून आवडत होतीं, असें नव्हे, पण कसें तरी करून नानांचा तोरा कमी करावयाचा असा त्याचा अंतस्थ हेतु होता. ह्मणून शिंद्याला त्याची आंतून फूस मिळाली. खरा प्रकार ह्मटला म्हणजे नाना, व शिंदे या उभयतांचाही बाजीराव द्वेष करीत असे. परंतु उभयतांच्या नाशास एक कालींच सिद्ध व्हावें, तर त्यांची कदाचित् एकवाक्यता होऊन उलट आपला नाश होईल, म्हणून प्रथम नाना आणि मागून शिंदा यांस अनुक्रमानें हात घालावा, हें चांगलें, असें त्याला

वाटलें; आणि त्याप्रमाणें त्यानें उपाय चालविले. शिंद्याचें व नानाचें चांगलें बनून राहिलें आहे, हें पाहून बाजीरावानें शिंद्याकडून नानाला कैद करण्याचें योजिलें. घाटग्याचा व बाजीरावाचा स्नेह होताच, व त्या उभयतांचे परस्पर करारही झाले होते. बाजीरावानें घाटग्याला सुचविलें कीं, आपल्या पूर्वीच्या कराराप्रमाणें तुम्हांस शिंद्याची दिवाणगिरी देण्याची माझी फार इच्छा आहे. पण तसें करण्यास नानांची आडकाठी आहे, याजकरितां नानांची कांहीं वाट लाविली पाहिजे. या सूचनेस घाटग्याचें लागलेंच अनुमोदन मिळालें, आणि नानांना कैद करण्याविषयीं त्या उभयतांचा विचार ठरला व अमलांतही आला. नाना एकदां शिंद्याच्या भेटीस त्याच्या छावणींत गेले होते, तेथें पूर्व संकेताप्रमाणें घाटग्यानें त्यांस कैद केलें. ज्या नानानें कारभार मिळण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले, व आपल्या बहुत दिवसांच्या मित्रासही कारागृह दाखविलें, त्याची अल्प काळांतच अशी अव्यवस्था झाली. हर ! हर ! कालगति विचित्र आहे.

ज्या गोष्टीनें नानांस कारागृह प्राप्त झालें त्यांतच भाऊंच्या मुक्ततेच बीज होतें हा एक चमत्कारिक योग समजावयाचा. ज्यावेळीं बाजीराव नानांच्या नाशार्थ प्रयत्न करूं लागला, त्यावेळीं त्यानें आपल्या मसलतींत साताऱ्याच्या राजास घेतलें होतें. आणि साताऱ्यास नानांचा वकील बाबूराव कृष्ण होता, त्याला कैद करावें, व किल्ला आपल्या हस्तगत करून घ्यावा, असें त्याला सुचविलें होतें. नानांचा नाश झाला ह्मणजे थोरल्या बाजीरावानें जसा साताऱ्याच्या गादीचा मान ठेविला होता त्याप्रमाणें मी ठेवून आपली सेवा करीन असेंही बाजीरावानें राजास वचन दिलें होतें. राजानें बाजीरावाच्या सांगण्याप्रमाणें सर्व केलें. पण आपला इच्छित कार्यभाग संपतांच राजाला दिलेलें वचन बाजीराव विसरला, व त्यानें शिवराम नारायण थत्ते यास राजापासून किल्ला परत घेण्याकरितां पाठविलें. राजा सामोपचारानें किल्ला स्वाधीन करीना. तेव्हां आपलें कृत्य आपणासच भोंवलें, म्हणून बाजीराव फार भयाभीत झाला. नंतर त्यानें किल्ला घेण्याकरितां माधवराव रास्ते यांजबरोबर थोडीशी फौज रवाना केली. रास्त्यांनीं तेथें जाऊन सामदाम इत्यादि उपाय योजून पाहिले; पण कांहीं केल्यानें

राजा ऐकेना. तो नवीन फौज ठेवूं लागला. शिंद्याचीही त्याला आंतून अनुकूलता मिळाली. माधवरावानें हिंम्मत करून एकवार रंजक झाडली. पण उपयोग न होतां राजानें त्यावर लागलाच हल्ला करून त्याला तेथून पिटाळून लाविलें. बाजीरावाला या पराभवामुळें साताऱ्याच्या दंग्याबद्दल फारच भय पडलें.

असें पेशव्यांच्या राज्यास मोठें संकट प्राप्त झालें असतां कोणीही सरदार बाजीरावाच्या विचित्र स्वभावामुळें व आपसांतील कलहामुळें या शत्रूस पादाक्रांत करण्याच्या कामास पुढें होईना. ही वार्त्ता भाऊ त्यावेळीं वाईस होते, त्यांना समजली. तेव्हां पेशव्यांच्या राज्याची भर अमदानीची स्थिति व सांप्रतची स्थिति, यांचें स्मरण होऊन त्या शूर पुरुषास खरोखर खेद झाला, आणि साठीजवळजवळ उमर आली असतां 'सरकारची आज्ञा होईल तर या कामावर मी फौज घेऊन जातों व सरकारची फत्तेकरून येतों' असा त्यांनीं लागलाच बाजीराव याजकडे रास्ते यांचे द्वारें निरोप पाठविला.

भाऊंची विनंती लागलीच मान्य झाली आणि त्यांस मुक्त केलें. * पराक्रमी पुरुष हे राज्याचे आधारस्तंभ होत. त्यांच्या शिवाय राज्याची इमारत रहावयाची नाहीं, व टिकावयाचीही नाहीं, असें म्हणतात, त्याचा या वेळेस बाजीरावास चांगला अनुभव आला. त्याच्या पदरीं राव अरेराव पुष्कळ होते. पण ते हांजी हांजी करण्याच्या उपयोगाचे. आणीबाणीचा प्रसंग येतांच सर्वांनीं त्याला अंगाबाहेर टाकिलें, आणि ज्या पुरुषाचा त्यानें विनाकारण नाश केला, त्याच्याच तोंडाकडे

* भाऊंच्या मुक्ततेचा हा योग साहजिक आला. तथापि, तो न येता तरी त्यांचा कारागृहवास फार दिवस लांबला नसता. त्यांच्या पदरच्या मंडळीचे त्यांच्या मुक्ततेबद्दल दीर्घ प्रयत्न चालले होते. या मंडळींपैकीं रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबा काळे म्हणून भाऊंचे विश्वासु पथक फडणीस होते, त्यांनीं, त्या वेळीं दरबारांत शिंद्याचें वजन होतें त्याजकडे त्याच्या केरा नावाच्या प्रिय वेश्येच्या द्वारें संधान लावन भाऊंच्या मुक्ततेविषयीं व्यवस्था केली होती. बाबा फडणिसाचे वंशज रा॰ रा॰ केशवराव बळवंत ऊर्फ दादाफडणीस श्रीमंत जमखंडीकरांच्या पदरीं आहेत. त्यांनीं या प्रसंगाचें दौलतराव शिंदे यांचें पत्र प्रथकर्त्यास दाखविलें, तेंच या लेखास आधार होय.

त्याला पाहावें लागलें. पराक्रमी पुरुषांचा राजांनीं परामर्श घ्यावयाचा, तो अशाच प्रसंगा करितां. भाऊंची मुक्तता झाल्यावर थोड्याच दिवसांत त्यांनीं मोठें सैन्य जमविलें. ज्यांनीं त्यांजबरोबर स्वाऱ्याकरून आपलें आयुष्य घालविलें होतें, ते या नवीन स्वारीची वार्त्ता ऐकतांच त्यांना मोठ्या आनंदानें मिळाले. सुमारें १०,००० फौज तयार झाली. त्या वेळीं पावसाळा होता. नद्यांना पूर आले होते, ह्मणून शत्रूंची आपणास मुळींच भीति नाहीं असें समजून साताराचा राजा स्वस्थ कालक्षेप करीत होता. शहरांत ठिकठिकाणीं चौक्या ठेवावयाच्या त्याही त्यानें ठेविल्या नव्हत्या. अशी बातमी ठेवून भाऊंनीं वेण्येला एक उताराची जागा शोधून काढिली, आणि दहा हजार फौजेनिशीं वेण्या उतरून * जाऊन एकाएकीं शहराजवळ येऊन ठेपले. शत्रु अकस्मात् आल्याची बातमी साताऱ्यास कळतांच राजाचे लोक, ज्याला जिकडे वाट सांपडेल तिकडे पळत सुटले. राजाच्या फौजेचें आधिपत्य राजाचा भाऊ चतुरशिंग याजकडे होतें. त्यानें व येलाजी। आणि सेनाजी मोहिते, कुशाबाराजे, दुर्गोजी महाडीक, यांनीं पराकाष्ठा करून पळणाऱ्या लोकांची थोपाथोपी केली. ते भाऊंच्या लष्कराचे तोंडावर गेले. या लोकांची व भाऊंची झटपट चालली. राजाचे लोक मोठ्या निकरानें लढले.परंतु भाऊंच्या सैन्या पुढें त्यांचा उपाय चालेना. भाऊंनीं एकसारखी कत्तल चालविली. मोहिते ठार झाले. कुशाबाराजे व दुर्गोजीराजे महाडीक फार जखमी झाले. सेनाजी मोहिता मी शत्रूस पाठ दाखविणार नाहीं असा संकल्प करून जिवाची आशा सोडून तुटून पडला. परंतु त्याचे तुकडे तुकडे झाले. सैन्य पळून गेलें. राजा पूर्वींच किल्ल्यावर चढून गेला होता.

याप्रमाणें शत्रूंची दुर्दशाकरून विजयी होऊनतें भाऊंनीं शहरांत प्रवेश केला. त्यांच्या सैन्यानें तें शहर लुटलें. सामुग्रीचा वगैरे किल्ल्यांत पुरवठा नसल्यामुळें राजा लागलाच शरण आला व किल्ला त्यानें स्वाधीन केला. इकडे चतुरशिंग समरांगणांतून पळाला, व

---

* या वेळीं वेण्या पाण्यानें दुथडी भरून चाललीं असतां, तिनें दुभागून भाऊंना व त्यांच्या सैन्याला मार्ग दिला अशी दंतकथा सांगतात—ग्रांट डफ.

कोल्हापूरच्या राजानें त्यावेळीं बंड केलें होतें त्यास जाऊन मिळण्याकरितां त्यानें तिकडची वाट धरली. भाऊंनीं पाठोपाठ आपलें सैन्य पाठविलें. तथापि, तो त्यांच्या हातीं लागला नाहीं.

याप्रमाणें साताऱ्याची मोहीम सिद्धीस नेऊन यश संपादन केलें असतां व पेशव्यांची मोठी अब्रू राखिली असतां तें सर्व विसरून मोहिमेचें काम आटपतांच भाऊंस आपल्या फौजेस निरोप देण्याविषयीं बाजीरावाची सूचना झाली. त्या शूर पुरुषाच्या पराक्रमास हें उत्तमच बक्षीस म्हणावयाचें! ज्याला गुणांची परीक्षा नाहीं अशा धन्याची चाकरी करण्यापेक्षां पोटांत काटे भरणें चांगलें असें ह्मणतात तें सत्य आहे. आपल्या पराक्रमाचें व गुणांचें असें चीज झालें हें पाहून भाऊंस काय वाटलें असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि, काळच फिरला होता व येईल त्या काळास पाठ देणें योग्य होय असें मनाचें समाधान करून भाऊंनीं पेशवेसरकारास विनंती केली कीं, "मी सरकारचा विश्वासु चाकर आहे. मला या लोकांचें बहुत देणें झालें आहे. ह्मणून सरकारच्या आज्ञेप्रमाणें करण्यास सांप्रत अडचण आहे. याउपर स्वामींची मर्जी. मजविषयीं स्वामींनीं शंका धरूं नये."

# भाग १४.

## कोल्हापूरचें प्रकरण. भाऊंचा मृत्यु.

नाना फडणविसास कारागृहवास कसा प्राप्त झाला याचें मागील भागांत दिग्दर्शन केलेंच आहे. नानांस नगरच्या किल्ल्यावर ठेविलें होतें. शिंद्याच्या द्वारें नानांची अशी व्यवस्था लाविल्यानंतर, बाजीराव शिंद्यास पाण्यांत पाहूं लागला. शिंद्याच्या तेजापुढें आपलें तेज अगदीं पडत नाहीं, तेव्हां नानाप्रमाणें याचीही एकदां निर्गत लाविली पाहिजे, ह्मणजे आपणास खरें स्वातंत्र्य प्राप्त होईल, असे विचार त्याच्या

मनांत घोळूं लागले. यास्तव नानांपासून मुक्तता करून घेतल्यानंतर बाजीराव शिंद्याच्या नाशार्थ यत्न करूं लागला. हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यानें निजामसरकार व टिपू यांजबरोबर मसलती सुरू केल्या. शिंद्याच्या कानावर ही गुणगुण येतांच, तो सावध झाला. त्यानें उलट मसलती करून बाजीरावाचे दांत त्याच्या घशांत घालण्याचा बेत केला. बाजीरावाची चांगली खोड मोडून त्याला ताब्यांत ठेवणारा, नानाफडणवीस याची शिंद्यानें लागलीच मुक्तता केली, आणि त्याला पुण्यांत आणिलें. ही गोष्ट परशुरामभाऊ फौज घेऊन सातारचे मोहिमेवर गेले, त्यानंतर पुढें लवकरच घडून आली. नंतर कांहीं दिवसांनीं नाना कारभार पाहूं लागले.

कारागृहांतून मुक्त झाल्यानंतर भाऊंबरोबर आपण विनाकारण द्वेष केला, याजबद्दल नानांच्या चित्तास पश्चात्ताप झाला. शिंदे आदिकरून सरदारांबरोबर आपण मित्रत्वानें वागलों ; पण त्यांचा स्वार्थ असे तोंपर्यंत मात्र ते आपणाबरोबर गोडीनें वागले. तो संपतांच ते आपल्या नाशार्थ प्रवृत्त झाले, हे विचार नानांच्या मनांत घोळूं लागले. भाऊंनीं अनेक प्रसंगीं केलेले उपकार, त्यांचें आपणाविषयीं प्रेम व निष्ठा आणि आपल्या मनोदयानुरूप वागण्याची इच्छा, यांची आपणास कशी विस्मृति पडली याचें, त्यांचें त्यांसच नवल वाटूं लागलें. दरबारच्या त्यावेळच्या स्थितींत भाऊसारख्या पुरुषाच्या साह्याची नानांस फारच गरज होती. ह्मणून बंधमुक्त होऊन आल्यावर भाऊंबरोबर सख्य करण्याचा नानांनीं घाट घातला. सुदैवानें तसा योगही प्राप्त झाला.

पेशवे, निजाम व इंग्लिश या त्रिवर्गांनीं सख्य करून एक समयावच्छेदें करून टिपूच्या राज्यावर इ० स० १७९२ त मोठी स्वारी केली, व त्यांत पेशवेसरकारच्या फौजेचें आधिपत्य भाऊंकडे होतें, हें वाचकांस माहीत आहेच. टिपूनें त्यावेळीं शत्रूचे पाय धरिले, आणि अर्धें राज्य देऊन तह केला. पण नीच मनुष्यास शासनाचें स्मरण फार दिवस राहात नाहीं. इंग्लिशांच्या स्वस्थतेच्या कारकीर्दीमुळें, आणि पेशवे व निजाम यांत परस्पर कलह लागल्यामुळें, टिपू पुनः उन्मत्त झाला. त्याचें पुनः शासन करण्याकरितां निजामसरकार व इंग्लिश यांचा इ० स० १७९८ त तह झाला. त्यावेळीं इंग्लिशांचा वकील

पुण्यांत होता, त्यानें या तहांत पेशवेसरकारानें मिळावें ह्मणून विनंती केली. याच समयास भाऊ साताऱ्च्या बंडाचा मोड करून यशस्वी होऊन आले होते, आणि नानांचा कारभारांत प्रवेश झाला होता. शूरांची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे त्यांना एखाद्या जंगी मोहिमेवर जाण्यास सांगणें हें होय. याजकरितां भाऊंसें व आपलें पूर्ववत् सख्य करून घेण्यास्तव नानांनीं या मोहिमेचें काम त्यांजकडे सांगावें असें योजिलें. तथापि, ज्याशीं शत्रुत्वानें आचरण केलें त्याजबरोबर आतां एकदम सख्य करण्याचा घाट कसा घालावा, हा त्या मानी पुरुषास विचार पडला. प्रथमतः नानांनीं भाऊंचे जेष्ठ चिरंजीव आपासाहेब यांजला हें काम सांगावें, अशी युक्ति काढिली. पण आपासाहेब निस्सीम पितृभक्त, पित्याच्या प्राणाकरितां प्राण देणारा असा होता. तो आपल्या पित्याचा अपमान करून आपण स्वतः या मोहिमेचें काम पतकरीना. भाऊंस नानांचा अंतस्थ हेतु कळला. मग त्यांच्या व नानांच्या भेटी झाल्या व झालेल्या सर्व गोष्टी विसरून उभयपक्षीं सख्य झालें. "धारवाडचा किल्ला व कर्नाटक प्रांतांत आणखी जहागीर तुह्मास मिळेल" असें नानांचें वचन घेऊन भाऊंनीं हें कार्य स्वीकारिलें.

मोहिमेची सर्व सिद्धता झाली. भाऊंनीं आपले स्वार, शिलेदार सर्व जमा केले. पूर्वीं श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत जो लिटल साहेब भाऊंबरोबर होता, तो इंग्लिशांचें पलटण घेऊन भाऊंच्या कुमकेस आला. पेशवे सरकारचा निरोप घेऊन निघावयाचें; पण तो निरोप लवकर मिळेना. इंग्लिशांच्या वकिलापाशीं 'आम्ही फौज पाठवितों' असें बाजीराव ह्मणे, पण आंतून त्याचीं टिपूच्या वकिलाबरोबर खलबतें चाललींच होतीं. ही बातमी इंग्लिशांना समजली. तेव्हां त्यांनीं या कुमकेची वाट न पाहतां, निजामाचें सैन्य तयार होतें तें घेऊन श्रीरंगपट्टणावर स्वारी केली. तेथें जें युद्ध झालें, त्यांत टिपू मारला गेला, व त्याचें सगळें राज्य अचानक त्यांच्या हातीं आलें. या सर्व कारणांमुळें टिपूचा अंत करण्याचा योग भाऊंच्या हातून घडून आला नाहीं.

टिपूच्या मोहिमेचें काम याप्रमाणें हातचें गेलें. तथापि, नानांनीं भाऊंस दुसरी एक महत्वाची मोहीम सांगितली. ही मोहीम भाऊंचे हाडवैरी व

पेशव्यांचे जुनाट शत्रु, कोल्हापूरकर महाराज यांजवर होती. दक्षिण-महाराष्ट्रांत त्यावेळीं कोल्हापूरकरांनीं अनर्थ मांडिला होता. पेशव्यांच्या राज्याचा दक्षिणभाग तोंडांत टाकावा, असा त्यांचा फार दिवस यत्न चालला होता. इ० स० १७९३ त भाऊंनीं, त्यांची चांगली खोड मोडिली तेव्हां कांहीं दिवस त्यांचे खेळ बंद पडले होते. पण पुढें भाऊंचे गमन पुण्यास झालें; मराठेसरदार निजामाच्या स्वारींत गुंतले; आणि सवाई माधवराव पेशवे कैलासवासी होऊन, सरदारांत व प्रधानांत कलह लागले; तेव्हां त्यांनीं पुनः संधि साधिली, आणि आपली खेळ चालू केले. माहाडांत असतां नानाफडणाविसानें जीं कारस्थानें निर्माण केलीं त्यांत कोल्हापूरकरांनीं पटवर्धनसरदारांच्या—मुख्यत्वें भाऊंच्या—जहागिरीवर स्वारी करावी, असें एक कारस्थान होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या गोष्टीनें कोल्हापूरकरांस अधिकच फावलें. त्यांनीं पूर्वीपेक्षां विशेष पाय पसरले. भुदरगडचा किल्ला पुष्कळ दिवस पटवर्धनांच्या हवालीं होता तो घेतला; चिकोडी व मनोळी हे दोन प्रांत हस्तगत केले; हुबळी आदिकरून संपन्न शहरें लुटून फस्त केलीं; आणि वल्लभगडच्या किल्ल्यावरही आपलें निशाण नेऊन रोंविलें. भाऊंनीं व त्यांच्या पुत्रांनीं कोल्हापूरकरांस अगदीं लीन करून दाबांत ठेविलें होतें, त्यांजवर त्यांचा मोठा राग असे. त्यांच्या नांवानें ते जळत असत. त्यांचा केव्हां सूड घेऊं असें त्यांना झालें असे. भाऊंवर संकटसमय येऊन त्यांस मोडवगणच्या किल्ल्यावर टाकिलें, तेव्हां या शत्रूंचा हर्ष गगनांत मावेना. या भूतलावर आपणास आतां कोणी शत्रु राहिला नाहीं असें त्यांस वाटलें. विपत्तींत पडलेल्या आपल्या शत्रूचा सूड घेण्याकरितां त्यांनीं कंबर बांधिली. भाऊंचें आवडतें राहण्याचें स्थान तासगांव याजवर हल्ला करून तें त्यांनीं लुटलें. भाऊंचा वाडा जाळिला. संवदलग्याचा किल्ला हस्तगत केला आणि भाऊंच्या गोकाकमहालावर स्वारी करून एक लक्ष वीसहजार रुपये खंडणी घेतली. असे नानाप्रकारचे कोल्हापूरकरांनीं अनर्थ मांडिले होते. धोंडोपंत गोखले म्हणून पेशव्यांचे कर्नाटकांत सरसुभेदार होते, त्यांनीं कोल्हापूरकरांबरोबर एक दोन वेळां संग्राम केला, पण अखेरीस त्यांनाही हात टेंकावे लागले.

कोल्हापूरकरांचें कर्नाटकांत चांगलें पिकलें आहे, व तिकडे ते य-

चेच्छ कृत्यें करीत आहेत असें ऐकून पेशवेसरकारचे कित्येक शत्रुही त्यां-जपाशीं आश्रयार्थ आले, आणि त्यांच्या साह्यार्थ झटूं लागले. भाऊंनीं साताऱचें बंड मोडिलें तेव्हां महाराजांचा बंधु चतुरशिंग तेथून पळाला तो कोल्हापूरकरांच्या दरबारांत आला, आणि त्यांची चांगली कुमक घे-ऊन तो रास्ते व प्रतिनिधी याच्या पाठीस लागले होते, त्यांच्या तों-डावर गेला. त्यांच्यावर त्यानें एकाएकीं छापा घातला आणि त्यांचे बहुतेक लोक कापून काढिले.

कोल्हापूरकरांचें प्रस्थ फारच माजलें, तेव्हां पेशवेसरकारास त्याचा विचार करणे भाग पडलें. त्यांनीं या मोहिमेचें आधिपत्य परशुरामभा-ऊंकडे दिलें. शिंदे, होळकर आणि इतर सरदार यांनीं तीस हजार स्वार व सहा हजार पायदळ जमवावें, आणि भाऊंची कुमक करावी, असेंही ठरलें. कोल्हापूरच्या मोहिमेचा हा ठराव झाला तेव्हां पर्जन्य-काल होता; आणि वर्सातीचे दिवस संपेपर्यंत, शिंदे, होळकर यांच्या फौजा येण्याला अनेक अडचणी होत्या. म्हणून भाऊंनीं फक्त कोल्हा-पूरकरांच्या तोंडावर जावें, आणि सरदारांची कुमक येऊन पोंचेपर्यंत युद्धसंग्रामाचा फारसा प्रसंग न आणितां कोल्हापूरकरांस फारशी हा-लचाल करूं देऊं नये, अशी आज्ञा करून पेशवेसरकारांनीं भाऊंस पुढें रवाना केलें. कोल्हापूरकरांनीं भाऊंच्या अनेक आगळिकी केल्या होत्या, आणि पेशवेसरकारचे अनंत अपराध केले होते, त्यामुळें भा-ऊंच्या अंगाचा तिळपापड झाला होता. या पुरातन शत्रूस चांगली आठवण राहील असें शासन करण्याची केव्हां संधि सांपडेल याची भाऊ वाट पहात होते. पेशवेसरकारची आज्ञा होतांच त्यांना अत्या-नंद झाला. शत्रूची समरांगणीं केव्हां गांठ घेईन असें त्यांस झालें. ते लागलेच पुण्याहून निघाले, आणि कुमकेची वाट न पाहतां को-ल्हापूरकरांच्या सरहद्दीवर येऊन ठेपले. कुमक आल्याशिवाय लढाईचा प्रसंग आणूं नये अशी सरकारची सावधपणाची सूचना होती. पण त्वेषाच्या झपाट्यांत त्यांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. त्यांना स्वस्थ बसवेना. पावसाळ्यालाही न जुमानतां त्यांनीं जारीनें लढाई सुरू केली. घटप्रभा व मलप्रभा यांच्या मधील किल्ले पुनः हस्तगत केले. सुरापूर व एलबुर्गे प्रांतांत अम्मल बसविला, आणि गोकाकेवरून चिकोडीजवळ

मुक्कामास आले. कोल्हापूरकरांचा अनेकस्थळीं पराभव झाला, तेव्हां त्यांनीं राजधानीकडे तोंड फिरविलें. तथापि, ते निराश झाले नाहींत. महाराज व त्यांचे शूर दिवाण रत्नाकरपंतआपा यांनीं आणखी फौजा जमविल्या; चतुरशिगानें त्यांस युद्धविद्या शिकविली; आणि अल्पकाळांतच चांगलें सोळा हजार सैन्य तयार झालें. भाऊंना कुमक यावयाची आहे ती आली ह्मणजे ते आपणाला निःसंशय भारी होतील, हें समजून कोल्हापूरकरांनीं भर पावसाळ्यांतच भाऊंला गांठण्याचा विचार ठरविला. त्याप्रमाणें महाराज, दिवाण आणि दुसरे शूर सरदार, हे नवीन सैन्य घेऊन राजधानी सोडून निघाले. वेदगंगा व दुधगंगा या नद्या उतरून ते हमीपवाड्याजवळ आले. तेथून चार कोसांवर भाऊंचा तळ होता. न जाणो युद्धाची मसलत फसेल या भीतीनें कोल्हापूरकरांनीं पांढरे वगैरे भाऊंकडील शिलेदारांत कांहीं फितूरही केला होता.

सर्व सिद्धता झाल्यावर कोल्हापूरकरांचें सैन्य भाऊंवर जाण्याकरितां निघालें. भाऊंना ही वार्त्ता समजतांच तिकडे तेही युद्धास सिद्ध झाले. कोल्हापूरकर आतां तळ सोडून निघणार, इतक्यांत कांहीं अपशकुन झाला. त्यामुळें तो बेत त्या दिवशीं रहित झाला. असेंच आणखी एकवार घडलें. दोन वेळां असें झालें तेव्हां भाऊंना कोल्हापूरकरांचा कांहीं अंत लागेना. आपणास हूल दाखविण्याकरितां हे त्यांचे उपाय चालले असावेत असें ते समजले आणि अंमळसे बेसावधपणें राहिले. नंतर भाद्रपद वद्य तृतीयेस महाराजांनीं सरदार, मानकरी आदिकरून मंडळीचा दरबार भरविला, आणि उदईक लढाई करावयाची असा निश्चय ठरविला. भाऊंना या बेताची खबर लागली. पण पूर्वींप्रमाणें हाही पोकळ बेत असेल असें वाटून त्यांनीं तिकडे फारसें लक्ष पोंचविलें नाहीं. प्रातःकाळीं महाराजांच्या सैन्यानें छावणी सोडल्याची पुनः खबर आली. त्यावेळीं भाऊ बुद्धिबळें खेळत बसले होते; शिलेदार लोक पगाराच्या मागील बाकीकरितां जिकीर करीत होते; आणि तोफखान्याचे बैल चरावयास गेले होते. खबर येतांच तयारीची एकच गडबड उडाली. बुद्धिबळांतील लुटपुटीचें युद्ध सोडून, भाऊ खरोखर युद्धास सिद्ध झाले. शिलेदारांची त्यांनीं कांहीं समजूत काढिली, आणि तो-

फाचे बैल लवकर परत आणविले. असें होत आहे इतक्यांत दोन प्रहरचा सुमार आला. महाराज निपाणीनजीक आले, आणि तेथें क्षणभर विश्रांति घेऊन, पुढें अर्धकोशावर येऊन पट्टणकुडीजवळ लढाईच्या बेतानें उभे राहिले.

इकडे भाऊंनीं आपल्या सैन्याची व्यवस्था केली. आपले पुत्र आपासाहेब व दाजीसाहेब यांजबरोबर एक एक टोळी देऊन त्यांना दोन बाजू धरण्यास सांगितलें. पुढें ओढा होता त्यांत कांहीं पायदळ व गाडदी घालून आपण उभे राहिले. प्रथमतः उभयपक्षांकडून तोफांची मारगिरी चालू झाली. कोल्हापूरकरांनीं नेटकरून भाऊ ओढ्यांत होते त्यांजवर प्रथम हल्ला केला. तेथें झटपट चांगलीच झाली. कोल्हापूरकरांच्या पायदळाचा मोड झाला, आणि त्यांचे सुमारें ३०।४० लोक ठार होऊन पुष्कळ जखमी झाले.

इतक्यांत भाऊंचे पुत्र आपासाहेब आपली टोळी घेऊन चाल करून आले. त्यांच्या तोंडावर महाराजांनीं, रत्नाकरपंत दिवाण व हैबतराव गाइकवाड वगैरे शूर व नामांकित सरदार ठेविले होते. ते पुढें सरून रणकंदन सुरू झालें. कोल्हापूरकरांवर आपासाहेब तुटून पडले. त्यावेळीं अर्धघटका तेथें मोठ्या निकराचें युद्ध झालें. शत्रूकडील धुळोजी पांढेर नांवाचा सरदार ठार मारला गेला आणि रामजी जाधव जायबंदी झाला. आपासाहेबांनीं कत्तल सुरू केली, तेव्हां शत्रूचा निभाव लागेना. ते मागें पाय घेऊं लागले. त्यांचे हत्ती व निशाणें हीं आपासाहेबांनीं घेतलीं. आपले पुत्र स्वपराक्रमावर या लढाईंत यश संपादण्यास समर्थ आहेत असें पाहून भाऊ आपल्या फौजेच्या गोटाच्या रक्षणार्थ तिकडे गेले. कोल्हापूरकरांचें सैन्य डगमगूं लागलें, तेव्हां महाराज मागें जवळच होते. त्यांजबरोबर निवडक तीनशें लोक होते. निकराचा प्रसंग पाहतांच महाराज स्वतः पुढें सरले, आणि आपल्या लोकांस उत्तेजन देऊन त्यांनीं त्यांस पुनः आवेश आणिला. मग थोडी सावरासावर करून ते मोठ्या त्वेषानें आपासाहेबांवर चालून गेले. या समयीं जी चकमक झडली तींत आपासाहेबांकडील पुष्कळ लोक पडले व जखमी झाले. खुद्द आपासाहेबांस डाव्या दंडावर गोळी लागली,

त्यामुळें ते फार घायाळ झाले. परंतु आपण मागें सरलों असतां आपल्या शिपायांचें धैर्य खचेल ह्मणून अभिमानानें ते दम धरून जागच्या-जागीं उभे राहिले.

नंतर महाराजांच्या सैन्यानें आपला रोंख दाजीसाहेब यांजवर धरिला. तिकडे अगोदरच फितूर झाला होता, त्यामुळें लढाईचें तोंड जुंपतांच फौज उधळली. असें होत आहे तों महाराजांकडील दोन्ही टोळ्या एकत्र झाल्या व त्यांनीं आपासाहेबांवर पुनः रोंख धरिला. हें मोठें सैन्य पाहून आपासाहेब आपल्या फौजेंत अव्यवस्था न होऊं देतां हळुहळु मागें सरूं लागले; आणि जवळच अमलझरी नांवाचें खेडें होतें, त्याच्या आश्रयास गेले. कोल्हापूरकरांची फौज मागें होती. ती गांवानजीक उभी राहिली. पुढें युद्धप्रसंग इकडे सर्व थंड पडला.

नंतर रत्नाकरपंतांनीं आपासाहेबांची पाठ सोडून गोटामध्यें भाऊ आहेत असें ऐकून, तिकडे रोंख फिरविला. त्यावेळीं सायंकाळचा तीन घटिका दिवस राहिला होता. भाऊ गोटांत थोड्याशा लोकांनिशीं होते. त्यांच्या जवळ कित्येक शूर भाऊबंद आणि कांहीं शिलेदार व लोक इतकेच कायते राहिले होते. त्यांच्या पुत्रांजवळ फौजेच्या टोळ्या होत्या त्यांपैकीं कोणाचेंही साह्य आयत्यावेळीं त्यांस दुर्दैवानें प्राप्त झालें नाहीं. दाजीसाहेबांची फौज उधळली, तेव्हांच ते तिजबरोबर समरांगण सोडून गेले होते, आणि आपासाहेब, जखमेनें घायाळ होऊन अमलझरी जवळ होते, त्यांना भाऊसाहेब अद्यापि गोटांत राहिले नसतील, असें वाटून, तेही परभारें निघून गेले होते. अशी सर्व फांकाफांक झाल्यामुळें लढाईचें मान एकाएकीं सर्व फिरलें, आणि भाऊंवर अति दुर्धर प्रसंग गुदरला. तथापि, तो धैर्यशाली पुरुष, काडीमात्र डगमगला नाहीं. कोल्हापूरकरांची फौज गोटाकडे येऊं लागली तेव्हां त्यांनीं आपला पाय बाहेर काढिला असता तर साधलें असतें. पण शत्रूंस पाठ दाखविण्याचा हा भलता विचार त्यांच्या मनांत देखील आला नाहीं. बरोबरचें सर्व सैन्य नाहींसें झालें होतें, तरी जिवासजीव देणाऱ्या कित्येक शूर बंधूंस व राहिलेल्या शिलेदारांस बरोबर घेऊन तो शूर पुरुष अश्वारूढ होऊन कोल्हापूरकरांच्या थोर फौजेशीं सामना करण्यास सिद्ध झाला. शत्रूंजवळ येऊन लगटले. त्यांनीं गोटास चोहोंबाजूनें

वेढा दिला आणि आंत प्रवेश केला. शत्रूच्या हजारों मनुष्यांबरोबर हे शेंपन्नास वीर जिवावर उदार होऊन लढूं लागले. तरवारीचे घाव चालले. युद्धाच्या गर्दीत भाऊ विजेसारखे चमकत होते, व शस्त्रप्रहारानें शत्रूंची कत्तल करीत होते. त्यांच्या बरोबरचे लोक एका मागून एक पडत होते. इतक्यांत शत्रूकडील *हैबतराव गाइकवाड नांवाच्या सरदारानें भाऊंस मानेवर मोठा वार केला. त्याच्या योगानें ते घायाळ झाले. तथापि, भयाचें चिन्ह कांहीं न दर्शवितां हातांत पट्टा होता त्यानें, पांच सहा प्रमुख असामींस त्यांनीं तेथच्या तेथें ठार केलें. भाऊंची घायाळ अवस्था झाली हें पाहून कोल्हापूरकरांकडील गाइकवाड मंडळीनें आपल्या स्वारांनिशीं त्यांजवर लगट केली आणि ते तुटून पडले. या हातघाईच्या प्रसंगांत भाऊंस दोन कानांजवळ आणखी दोन जबर जखमा लागल्या. त्यांच्या योगानें ते घोड्याखालीं आले आणि अत्यंत व्याकुळ होऊन धरणीतलावर पडले. त्यांस भयंकर मूर्च्छा आली, आणि तींतच त्यांचें देहावसान झालें असावें. भाद्रपद वद्य ४ चतुर्थी मंगळवार शके १७२१ या दिवशीं सूर्यास्ताच्या समयास या प्रतापशाली पुरुषाचा अस्त झाला. त्यावेळीं त्यांचें वय ६० वर्षांचें होतें.

याप्रमाणें या शूर व पराक्रमी पुरुषाचा अंत झाला. त्यानें आमरण क्षात्रधर्म चालवून, पेशवेसरकारची एकनिष्ठपणें सेवा केली, आणि अखेर स्वामिकार्यार्थ देह झिजवीत असतां महावीरांस अनुरूप असें धारातीर्थीं, त्यांस सर्वोत्तम मरण प्राप्त झालें. रणांगणीं शत्रूबरोबर समर करीत असतां मरण प्राप्त होणें, ही गोष्ट थोड्याच पुरुषांच्या वांट्यास येते. असा पुरुष सूर्यमंडळाला भेदून उत्तमलोकास जातो. त्यांत विशेष हें कीं भाऊंचे आराध्य दैवत श्री गणपती ; त्याजवर त्यांची निःसीम भक्ति ; आणि त्या दिवशीं अंगारकी चतुर्थीचा योग होता सृष्टींतील सर्व उपक्रम आटोपून श्री गणराजाच्या सन्निध अविनाशी-निर्मळ सुखाचा अनुभव घेण्याकरितां जाण्यास भाऊंनीं हा योग्य समय साधिला.

इकडे भाऊ पडल्याची बातमी पसरतांच कोल्हापूरकरांच्या गोटांत

---

* हा हैबतराव गाइकवाड पूर्वीं भाऊंच्या आश्रयास होता.

जो अत्यानंद झाला तो सांगतां येत नाहीं. भाऊंचें व कोल्हापूरकरांचें मोठें हाडवैर. पेशवेसरकारच्या कोणत्याही सरदारास महाराज इतके भीत नसत, इतकें त्यांस भाऊंचें भय होतें. त्यांनीं अनेक वेळां त्यांस जर्जर केलें होतें. भाऊंचें नांव ऐकितांच त्यांचा थरकांप होई. अशा प्रबल शत्रूच्या मृत्यूनें महाराजांस व त्यांच्या सरदारांस आनंद झाला हें साहजिकच आहे. भाऊंच्या प्रेताचा ते शोध करूं लागले. हैबतराव गाइकवाडानें समरांगणांतून प्रेत उचलून एका बारगिराबरोबर महाराजांच्या अवलोकनार्थ पाठविलें. वाटेंत घाटगे आडनांवाच्या एका सरदारानें तें प्रेत बारगिराजवळून आपल्या घोड्यावर घेतलें, आणि आपण त्यांस मारलें अशी फुकी फुशारकी मारीत महाराजांकडे गेला. महाराज आपल्या तंबूंत उभे होते. घाटगे पुढें येऊन उभे राहिले. तें भाऊंचेंच प्रेत आहे असें पाहून महाराजांस अति हर्ष झाला. त्यांनीं साखरा वाटल्या आणि मोठी फत्ते झाली ह्मणून जयसूचक तोफा सोडविल्या. एथपर्यंत सर्व गोष्टी ठीकच झाल्या. पण मग त्या हर्षाच्या भरांत महाराजांस देहभान राहिलें नाहीं, आणि एक त्यांनीं अगदीं अनुचित कर्म केलें. त्याचा डाग त्यांच्या नांवाला निरंतर राहील. भाऊंसारखे श्रीमंतांच्या पदरचे मोठे सरदार पाडाव आले, त्यांना जीव आहे किंवा नाहीं याचा कांहीं एक विचार न करितां, महाराजांनीं चित्तांत वैरभाव आणून भाऊंचें प्रेत घोड्याखालीं ढकलून देण्याविषयीं घाटगे यांस आज्ञा केली, आणि खासबारदार यास त्याचे *तुकडे करण्यास सांगितलें. हर हर ! काय हें अनुचित कर्म !

भाऊंचा समरांगणीं अंत झाला, त्या प्रसंगीं त्यांचे चार पुत्र व अ-

* महाराजांनीं हें अयोग्य कृत्य केल्याविषयीं क्यापटन ग्रांट डफ यांनीं आपल्या "मराठ्यांच्या इतिहासांत" उल्लेख केला आहे ; व ही गोष्ट भाऊंच्या पदरचे कोणी दाजीबा लिमये यांनीं आपणास सांगितली असें लिहिलें आहे. "कोल्हापूर व कर्नाटक प्रांताचा इतिहास" कर्ते प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं महाराजांचा कैवार घेऊन या गोष्टीविषयीं कांहीं आक्षेप घेतला आहे. परंतु, आम्हास या लढाईची हकीकत त्या लढाईंत असलेल्या एका गृहस्थानें लिहिलेली मिळाली आहे तिजवरून पाहतां प्रोफेसर मोडक यांचें अनुमान असत्य ठरतें. वरील हकीकत याच लेखावरून आम्हीं लिहिली आहे. या ठिकाणची लोकवार्ताही आमच्याच पक्षास अनुकूल आहे.

नेक भाऊबंद यांपैकीं कोणीही जवळ नव्हते. त्यांच्या जिवालाजीव देणारे जे शूर होते त्यांनीं त्यांच्या अगोदरच समरांगणावर आपला देह ठेविला होता, आणि कांहीं मंडळी गैर समजानें व कांहीं भयानें पूर्वीच निघून गेली होती. अशा अवस्थेंत प्रेताचें दहनही तसेंच राहावयाचें. पण भाऊंची पुण्याई सबळ. त्यांचें दहन करण्यास एक गृहस्थ आपण होऊन सिद्ध झाला. मिरजकर गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांजकडून नारो हरी करंदीकर नांवाचा कोणी गृहस्थ कोल्हापूरकरांच्या दरबारांत वकील होता. तो या प्रसंगीं महाराजांच्या स्वारीबरोबर होता. भाऊ व बाळासाहेब हे परस्पर चुलतबंधु, तथापि, त्यांचें सहोदर बंधू प्रमाणें परस्परांवर प्रेम असे. यामुळें नारो हरी हा भाऊंस आपल्या यजमानाप्रमाणें लेखीत असे, व त्या नात्यानें त्यांजबरोबर वागे. भाऊसारख्या पुण्यवान् व प्रतापशाली पुरुषाच्या उत्तर कार्यास आपले हात लागण्याचा प्रसंग कालांतरींही यावयाचा नव्हे, तो दैवयोगें आपणास प्राप्त झाला, हें आपल्या महत्पूर्वसुकृताचें फळ असें नारो हरीनें मानिलें, आणि भाऊंच्या देहाचें सार्थक्य करण्याकरितां फारच मेहनत केली. प्रेताचे छिन्नविछिन्न तुकडे झाले होते, ते त्यानें गोळा केले आणि जवळ दोन मनुष्य रक्षणाकरितां ठेवून आपण दहनाची परवानगी आणण्याकरितां महाराजांच्या डेऱ्यांत गेला. महाराज निद्रिस्त होते. महाराजांचें व भाऊंचें उभें हाडवैर यामुळें, नारो हरीनें नानाप्रकारें विनवणी केली तरी महाराजांपाशीं जाऊन परवानगी विचारण्याचें कोणासही धैर्य होईना. सर्वांनीं कानावर हात ठेविले. शेवटीं महाराजांचे गुरु यांजकडे जाऊन नारोपंतानें भीड घातली आणि त्यांच्या द्वारें महाराजांची भेट घेतली. महाराजांस त्यानें अनेक सामोपचाराच्या व बुद्धिवादाच्या गोष्टी सांगितल्या आणि त्यांचा राग शांत करून दहनाची परवानगी मिळविली. नंतर मोठ्या मेहनतीनें सर्व सामुग्रीची सिद्धता करून नारो* हरीनें हमीपवाड्याजवळ भाऊंच्या प्रेताचें यथाविधि दहन केलें.

---

* नारो हरीचे वंशज रा० रा० जनार्दन हरी करंदीकर हे प्रस्तुत जमाखिंडी येथील हुजुर कोर्टांत वकील आहेत. नारो हरी आपणास, या अंतकाळच्या सेवेवरून भाऊंचा पांचवा पुत्र असें म्हणवीत असे. भाऊंच्या पुत्रांनीं नारो हरीची सेवा लक्ष्यांत आणून त्याला कांहीं स्थावर उत्पन्न करून दिलें, त्याचा अद्यापि त्याचे वंशज उपभोग घेत आहेत.

भाऊंना चार पुत्र असतां व त्यांच्या बरोबर निरंतर शेंकडों मनुष्यें असतां, अंतकाळीं कोणीही जवळ राहिलें नाहीं हा कांहीं विचित्र दैवयोग समजावयाचा. निजतां, बसतां, उठतां ज्या बरोबर शेंकडों लोकांची गर्दी असावयाची, त्या पुरुषाच्या दहनक्रियेस कोणी असूंनये काय? हर हर ! काय ही दुःखदस्थिति. जगांत असे अनेक प्रसंग घडतांना मनुष्यें पाहतात, परंतु मी तुझा आणि तूं माझा हा जो लोभ तो किंचित् तरी कमी झाला आहे काय ? असो.

भाऊंच्या मरणाची वार्त्ता ऐकून संपूर्ण महाराष्ट्रदेश हळहळला. खर्ड्याच्या लढाईंत जय संपादून, निजामासारख्या प्रबल व गर्विष्ट शत्रूचा नक्षा उतरल्या पासून भाऊ संपूर्ण महाराष्ट्रदेशीय जनांचा लाल झाला होता. असा पटाईत शूर वीर आपणामध्यें आहे या गोष्टीचा ते गर्व वहात, आणि अशा पुरुषाच्या हातीं सैन्याचें काम आहे, तों पर्यंत मराठ्यांस पीडा देण्याची कोणाचीही प्राज्ञा नाहीं असें ह्मणत. असा अमूल्य मोहरा एकाएकीं नाहींसा झाला यामुळें जिकडे तिकडे हाःहाःकार झाला. कुटुंबांतील एखादा कर्त्ता पुरुष नाहींसा झाला ह्मणजे कुटुंबांतील मनुष्यें जशीं शोकाकुल होतात, तसे सर्व लोक शोकाकुल झाले. असा वीर पुनः व्हावयाचा नाहीं असें सर्वम्हणूं लागले. बाजीराव पेशवा ह्मटले असतां भाऊंचा शत्रु, तथापि, तोही त्यावेळीं त्यांचे पराक्रम स्मरून व स्वामिकार्यार्थ आजन्म त्यांनीं आपली काया कष्टविली आणि त्याच सत्कृत्यांत त्यांनीं आपले अमूल्य प्राण खर्चिले, या गोष्टींचे स्मरण करून फार हळहळला. ज्यांनीं भाऊंबरोबर अनेक मोहिमा करून, लढाईच्या यशाचा व संकटांचा वांटा, त्यांजबरोबर भोगिला होता, त्यांच्या नेत्रांतून हें वर्त्तमान श्रवण करतांच आश्रुधारा लोटल्या त्या कांहीं केल्या थांबेनात. असा सेनापती पुनः आपणास प्राप्त व्हावयाचा नाहीं असें वारंवार ह्मणून त्यांनीं फार शोक केला. सर्वांत नानाफडणविसांस फार दुःख झालें. ज्याच्या पराक्रमावर आपण अनेक कारस्थानें रचून, सिद्धीस नेलीं; ज्याच्या पराक्रमानें आपण हैदर, टिपू, निजाम, कोल्हापूरकर इत्यादि मोठमोठ्या बलाढ्य शत्रूंस लीन केलें ; ज्याच्या पराक्रमानें आपण मोठमोठे देश काबीज केले; आणि ज्याच्या पराक्रमावर मराठी राज्याचा सर्व हिंदुस्थानांत

कीर्तिध्वज उभा केला, तो आपला मित्र व साह्यकर्ता भाऊ, आपणास मागें टाकून गेला. असे एक एक विचार मनांत येऊन नानांस रडें कोसळलें तें कांहीं केल्या आवरेना. भाऊं बरोबर आपण मध्यंतरीं कृतघ्नपणें वागलों, त्यामुळें रागावून तर त्यांनीं आपला असा त्याग केला नसेलना, असें त्यांचें मन त्यांना टोचूं लागलें. भाऊंच्या उपकारांचें त्यांना एकदम स्मरण झालें आणि त्यांचें गुण मूर्तिमंत पुढें उभे राहिले. एक भाऊशिवाय मराठ्यांचें सर्व राज्य त्यांस ओस व भयाण दिसूं लागलें. त्याचा त्राता आतां कोणी राहिला नाहीं अशी नानांच्या मनानें काळजी घेतली. त्यांचें मन उदास झालें. त्यांना कांहीं सुचेना. त्यांचें धैर्यच खचलें. यापुढें पांच सहा महिन्यांतच नानांचा अंत झाला.

तासगांवांत भाऊंच्या वाड्यामध्यें जो अनर्थ लोटला त्याचें वर्णन करितां येत नाहीं. भाऊंचे पुत्र परत येऊन आपल्या पित्याची मार्गप्रतीक्षा करीत होते तों ही विपरीत वार्त्ता येऊन थडकली; त्यावेळीं त्यांजवर केवळ दुःखाचे पर्वत कोसळले. भाऊंचा आपणांवर केवढा लोभ; त्यांनीं आपले लालन पालन किती वात्सल्यानें केलें; आपणां करितां त्यानीं किती देह कष्टविले; आणि आपणांवर केवढे थोरथोर उपकार केले; या सर्व गोष्टी त्यांच्या मनांत देऊन एकदम त्यांचा कंठ दाटून आला, आणि ते मोठमोठ्यानें रडूं लागले. एकएक प्रसंगाचें स्मरण करावें आणि हुंदका देऊन पुनः पुनः शोक करावा, अशी त्यांची स्थिति झाली. ते सर्व मोठे धैर्यवान्, परंतु त्या प्रसंगीं त्यांचा शोक त्यांना आवरेना. भाऊंना मागें एकटें टाकून आलों ही आपण मोठी कृतघ्नपणाची गोष्ट केली असें वाटून त्यांस अधिकच शोकास कारण झालें, आणि ते एकसारखा विलाप करूं लागले. तासगांवशहर भाऊंचे आप्त, आश्रित, इष्टमित्र, आणि सेवक यांनीं भरलें होतें तें त्याकालीं शोकसागरांत निमग्न झालें आणि भयाण व उदास दिसूं लागलें.

भाऊंच्या मरणाबद्दल, त्यांच्या पटवर्धन मंडळीस फार दुःख झालें. गोपाळराव मिरजकरांच्या मागें भाऊच त्यांच्यांत प्रमुख होते व त्यांच्या पराक्रमावर बाकीच्यांचा उत्कर्ष होत होता. भाऊ मृत्यु पाव-

तांच पटवर्धनांचा सर्व आधार नाहींसा झाला. मिरजकर बाळासाहेबांचें एक पत्र आहे. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे, " गोपाळराव गेले ; भाऊही गेले ; आतां आह्मांस ( पटवर्धनांस ) कोणाचाही आधार राहिला नाहीं. "

भाऊंचे ज्येष्ठ पुत्र रामचंद्ररावआपासाहेब यांस पेशवेसरकारांतून दुखवट्याचें पत्र व पोषाख आले. पत्रांत भाऊंचे गुण वर्णिले आहेत व त्यांच्या मरणानें पेशवेसरकारची फार हानि झाली असें लिहिलें आहे. नाना आदिकरून प्रधान व शिंदे, होळकर आदिकरून सरदार यांजकडूनही अशींच पत्रें आलीं. श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत इंग्लिशांची व भाऊंची मोठी दोस्ती झाली होती, त्यांनाही हें वर्तमान ऐकून फार दुःख झालें.

गोविंद महादेव ... ग्रंथसंग्रहालय

## भाग १९.

## गृहस्थिति व धर्मकृत्यें.

गृहस्थाश्रमी पुरुषाचा संसार सुखदायक व्हावयास, गृहसंबंधी कित्येक गोष्टींची अनुकूलता असावी लागते. संसार हें एक मोठें यंत्र आहे. यंत्रांत एखादी लहानशी न्यूनता उत्पन्न झाली कीं, तें जसें निरुपयोगी होऊन जातें, तसेंच या संसारांत मनुष्याचा ज्या गोष्टींशीं संबंध असतो, त्यांपैकीं एक गोष्टीची वाण असली, तर ती सर्व संसार सुखास प्रतिबंधक होते. पुरुष उत्तम सद्गुणी आहे, आणि त्याच्या वांट्यास कजाग स्त्री आली; किंवा स्त्री पतिव्रता आहे, आणि तिच्या वांट्यास दुर्गुणसंपन्न पति आला;-तर उभयतांही संसारसुखास कशी अंतरतात ; आणि मातापितरें सद्गुणसंपन्न असून त्यांच्या पोटीं कुपुत्र निपजला असतां, त्यांच्या संसाराचें कसें मातेरें होतें, हें सर्वांस अवगत आहेच. सद्गुणी स्त्री, आज्ञाधारक पुत्र इ० सर्व अनुकूल गोष्टी

या संसारांत फारच थोड्यांच्या वांट्यास येतात. ही ज्याला लाधली, तो मृत्युलोकीं राहून स्वर्गांतील सुखाचा अनुभव घेतो, असें थोर पुरुषांचें वाक्य आहे, तें यथार्थ आहे. हे सर्व विचार मनांत आणून परशुराम-भाऊंच्या कुटुंबांतील मनुष्यांविषयीं या भागांत चार ओळी लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

भाऊंची मातुश्री जानकीबाई ही पुण्यांत शिवराम कृष्ण खासगीवाले यांच्या घराण्यांतील होती. खासगीवाल्यांचें घराणें मोठें प्रतिष्ठित व कुलीन होतें, आणि जानकीबाई कुलशीलसंपन्न स्त्री होती. मुलाच्या बाळपणीं त्याचा मातेशीं सहवास अति निकट, व फार असतो. यामुळें मातेच्या स्वभावाचें प्रतिबिंब मुलाच्याठायीं उत्पन्न होतें, असा सामान्य सिद्धांत आहे. त्याप्रमाणें क्षमा, सहनशीलता, दया इत्यादि या मातेचे अनेक उत्तम गुण भाऊंच्या अंगीं उतरले होते. भाऊंचे वडील, भाऊ लहान असतांच वारले. त्यामुळें या मुलाला सुमार्ग व सुरीति लावण्याचें काम सर्व या बाईकडे आलें, आणि तें तिनें उत्कृष्ट रीतीनें केलें. सरळपणाचें वर्त्तन, सेवकजनांवर प्रीति, आणि स्वामींच्या मर्जीची सुप्रसन्नता राखणें या गोष्टींविषयीं, तिनें आपल्या पुत्रास अनेक वेळ उपदेश केला. आणि आपल्या पतीच्या शौर्याच्या व पराक्रमाच्या गोष्टी वरचेवर त्याला सांगून त्याच्याठायीं शौर्य, धैर्य व साहसबुद्धि वृद्धिंगत केली. जानकीबाईस जिऊबाई ह्मणून एक कन्या होती. ही भाऊंची बहीण. ही पेण येथें लक्ष्मणराव कोल्हटकर यांस दिली होती. तिचा वंश पेण येथें आहे असें सांगतात.

भाऊंच्या पत्नीचें नांव राधाबाई. ही तासगांवचे प्रसिद्ध सावकार जोग यांचे पूर्वज विश्वनाथपंत जोग यांची कन्या. भाऊंचें लग्न इसवी सन १७५२ च्या सुमारास पुण्यास झालें. जोग यांचें घराणें फार मान्य होतें; आणि ही स्त्री फार रूपवती असून पतिसेवानिष्ठ आणि सदाचार संपन्न होती. उत्तम स्त्री ही पुरुषाच्या प्रपंचाचा अर्धा भार वाहते. ह्मणजे पुरुष मोठ्या विवंचनेंत व दुःखांत असला तरी, ती आपल्या मधूर, प्रेमरसित भाषणानें त्याच्या सर्व विवंचनेचा व दुःखाचा त्यास विसर पाडते, आणि प्रपंचांत घडोघडीं येणारीं अनेक संकटें,

धैर्यानें भोगण्यास त्याला समर्थ करिते. त्याप्रमाणें राधाबाईचें होतें. भाऊ व राधाबाई यांचें परस्परांवर निस्सीम व निर्मल प्रेम असे. आणि भाऊंना वारंवार स्वाऱ्यांना जावें लागे, त्यामुळें त्या उभयतांचा वियोग घडण्याचे प्रसंग फार येत, तरी भाऊंचें चित्त राधाबाईच्या ठायीं व राधाबाईचें त्यांच्याठायीं दृढबंधन पावलें असे. अनेक प्रकारचे कष्ट, संकटें व यातना सोसून भाऊंनीं मोहिमेवरून परत यावें आणि तिच्या तोंडचीं चार मधुर भाषणें ऐकतांच तें सर्व विसरून गार व्हावें. पेशवेसरकारच्या थोरथोर प्रशंसा श्रवण करून जो त्यांच्या मनाला आनंद होई, त्याच्यापेक्षां शतगुणित आनंद स्वस्त्रीच्या चार शद्वांनीं त्यांना होई. तिच्या सहवासास येतांच त्यांच्या सर्व वृत्ति उल्हसित होत; आणि तिच्या प्रशंसेनें त्यांना मोठमोठीं पराक्रमाचीं व साहसाचीं कृत्यें करण्याविषयीं उत्साह येई. राधाबाई आपल्या सासूच्या आज्ञेंत वागून तिचा मोठेपणा व मान राखण्याविषयीं फार दक्ष असे. अशा गुणाची साध्वीस्त्री मिळणें हें पूर्व सुकृताचें फल होय. राधाबाईला "ताईसाहेब" ह्मणत असत. ताईसाहेबांच्या गुणवर्णनाच्या परंपरेनें चालत आलेल्या अनेक गोष्टी, अद्यापि केव्हां केव्हां लोक सांगतात. राधाबाई या भाऊंच्या मरणाच्या पूर्वीं कांहीं वर्षें निवर्तल्या.

राधाबाईच्या पोटीं भाऊंस पांच पुत्र व चार कन्या अशीं नऊ अपत्यें झालीं. सर्वांत ज्येष्ठपुत्र रामचंद्रराव आपासाहेब यांचा जन्म शके १६८२ त झाला. पित्याप्रमाणेंच हे मोठे शूर निपजले. आणि त्याप्रमाणेंच लहानपणीं सरदारीचा पेशा स्वीकारून त्यांनीं अनेक स्वाऱ्या,—कित्येक आपल्या पित्याच्या समागमें, व कित्येक स्वतंत्र केल्या. भाऊंच्या मरणानंतर मराठ्यांत जे शेष वीर राहिले, त्यांत हे अग्रगण्य होत. विख्यात वीर बापू गोखला याजपाशीं एकदां कोणी म्हटलें "ब्राम्हण वीरांत आतां आपण अग्रेसर आहां;" त्यानीं लागलेंच उत्तर केलें "हा मान आपासाहेब जमखंडीकर यांचा आहे. त्यांच्यापुढें आह्मी सर्व तुच्छ आहों." आपासाहेबांचें लग्न वाईकर वासुदेवपंत रास्ते * यांची कन्या लक्ष्मीबाई इजबरोबर झालें होतें. आपा-

* जमखंडी संस्थानाचे प्रस्तुतचे दफतरदार व डेप्युटी कलेक्टर रावसाहेब वासुदेवराव धोंडदेव ऊर्फ बाबासाहेब रास्ते यांचे हे आजे होत.

साहेब शके १७३५ त मरण पावले. त्यांस गोपाळराव ऊर्फ रावसाहेब हे एकच पुत्र होते.

भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंत ऊर्फ बाबासाहेब यांचा जन्म शके १६९१ त झाला. हेही मोठे शूर होते, व पित्यासमागमें स्वारीस जात. खर्ड्यांच्या लढाईंत आपल्या पित्याचा, लालखान पठाण याच्या तडाक्यांतून, प्राण वाचवून, त्यांनीं आपला पुत्रधर्म जागविला. वाईकर आनंदराव रास्ते तालीकोटकर यांच्या रमाबाई नामक कन्येबरोबर यांचा विवाह झाला होता. बाबासाहेब शके १७३२ त मरण पावले, त्यावेळीं त्यांच्या पत्नीनें सहगमन केलें. यांस पुत्रसंतान नव्हतें.

तृतीय पुत्र माधवरावदाजीसाहेब यांचा जन्म शके १७०१ मध्यें झाला. भाऊंच्या कित्येक स्वाऱ्यांत हे गेले होते व भाऊ मांडवगण येथें प्रतिबंधांत पडले, त्यावेळींही हे बरोबर होते. भास्करपंत कोल्हटकर यांच्या पार्वतीबाई नामक कन्येबरोबर यांचें लग्न झालें होतें. दाजीसाहेब चैत्र वद्य ७ शके १७४० त वारले, त्यासमयीं त्यांची स्त्री सती गेली. यांस गोविंदरावनानासाहेब हे पुत्र होते.

चवथे पुत्र गणपतराव बापूसाहेब यांचा जन्म शके १७०७ मध्यें तासगांव येथें झाला. भाऊंच्या अंतकाळीं यांचें वय चौदा वर्षांचें होतें. यांचीं लग्नें तीन झालीं. पहिलें कुटुंब जानकीबाई, ही महादाजीपंत गाडगीळ यांची कन्या; दुसरे कुटुंब संगमेश्वरकर केळकर यांची कन्या, ही लग्न झाल्यावर लवकरच निवर्तली; आणि तिसरें कुटुंब सावित्रीबाई, परशुरामपंत सोमण यांची कन्या. बापूसाहेब शके १७४१ त वारले. त्यांस पुत्रसंतती नसल्यामुळें त्यांनीं परशुरामपंत यांस दत्तक घेतलें.

भाऊंचा पांचवा पुत्र विनायकराव हा लहानपणींच वारला.

भाऊंची वडील कन्या, बयाबाई ही बारामतीकर जोशी यांचे घरीं दिली होती. लग्न झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आंतच हिचा पति निवर्तला. त्यावेळीं हिचें वय सात आठ वर्षांचें होतें. भाऊंनीं पुण्यांत एकदां प्रसिद्ध रामशास्त्री यांस आपल्या वाड्यांत आणून या अल्पवयस्क मुलीची स्थिति त्यांना कळविली. तेव्हां ती पाहून शास्त्रीबोवाचें मन

धैर्यानें भोगण्यास त्याला समर्थ करिते. त्याप्रमाणें राधाबाईचें होतें. भाऊ व राधाबाई यांचें परस्परांवर निस्सीम व निर्मल प्रेम असे. आणि भाऊंना वारंवार स्वाऱ्यांना जावें लागे, त्यामुळें त्या उभयतांचा वियोग घडण्याचे प्रसंग फार येत, तरी भाऊंचें चित्त राधाबाईच्या ठायीं व राधाबाईचें त्यांच्याठायीं दृढबंधन पावलें असे. अनेक प्रकारचे कष्ट, संकटें व यातना सोसून भाऊंनीं मोहिमेवरून परत यावें आणि तिच्या तोंडचीं चार मधुर भाषणें ऐकतांच तें सर्व विसरून गार व्हावें. पेशवेसरकारच्या थोरथोर प्रशंसा श्रवण करून जो त्यांच्या मनाला आनंद होई, त्याच्यापेक्षां शतगुणित आनंद स्वस्त्रीच्या चार शद्बांनीं त्यांना होई. तिच्या सहवासासे येतांच त्यांच्या सर्व वृत्ति उल्हसित होत; आणि तिच्या प्रशंसेनें त्यांना मोठमोठीं पराक्रमाचीं व साहसाचीं कृत्यें करण्याविषयीं उत्साह येई. राधाबाई आपल्या सासूच्या आज्ञेंत वागून तिचा मोठेपणा व मान राखण्याविषयीं फार दक्ष असे. अशा गुणाची साध्वीस्त्री मिळणें हें पूर्व सुकृताचें फल होय. राधाबाईला "ताईसाहेब" ह्मणत असत. ताईसाहेबांच्या गुणवर्णनाच्या परंपरेनें चालत आलेल्या अनेक गोष्टी, अद्यापि केव्हां केव्हां लोक सांगतात. राधाबाई या भाऊंच्या मरणाच्या पूर्वीं कांहीं वर्षें निवर्तल्या.

राधाबाईच्या पोटीं भाऊंस पांच पुत्र व चार कन्या अशीं नऊ अपत्यें झालीं. सर्वांत ज्येष्ठपुत्र रामचंद्रावआपासाहेब यांचा जन्म शके १६८२ त झाला. पित्याप्रमाणेंच हे मोठे शुर निपजले. आणि त्याप्रमाणेंच लहानपणीं सरदारीचा पेशा स्वीकारून त्यांनीं अनेक स्वाऱ्या,—कित्येक आपल्या पित्याच्या समागमें, व कित्येक स्वतंत्र केल्या. भाऊंच्या मरणानंतर मराठ्यांत जे शेष वीर राहिले, त्यांत हे अग्रगण्य होत. विख्यात वीर बापू गोखला याजपाशीं एकदां कोणी म्हटलें "ब्राम्हण वीरांत आतां आपण अग्रेसर आहां;" त्यानीं लागलेंच उत्तर केलें "हा मान आपासाहेब जमखंडीकर यांचा आहे. त्यांच्यापुढें आह्मी सर्व तुच्छ आहों." आपासाहेबांचें लग्न वाईकर वासुदेवपंत रास्ते * यांची कन्या लक्ष्मीबाई इजबरोबर झालें होतें. आपा-

* जमखंडी संस्थानाचे प्रस्तुतचे दफतरदार व डेप्युटी कलेक्टर रावसाहेब वासुदेवराव धोंडदेव ऊर्फ बाबासाहेब रास्ते यांचे हे आजे होत.

साहेब शके १७३९ त मरण पावले. त्यांस गोपाळराव ऊर्फ रावसाहेब हे एकच पुत्र होते.

भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंत ऊर्फ बाबासाहेब यांचा जन्म शके १६९१ त झाला. हेही मोठे शूर होते, व पित्यासमागमें स्वारीस जात. खर्ड्यांच्या लढाईंत आपल्या पित्याचा, लालखान पठाण याच्या तडाक्यांतून, प्राण वाचवून, त्यांनीं आपला पुत्रधर्म जागविला. वाईकर आनंदराव रास्ते तालीकोटकर यांच्या रमाबाई नामक कन्येबरोबर यांचा विवाह झाला होता. बाबासाहेब शके १७३२ त मरण पावले, त्यावेळीं त्यांच्या पत्नीनें सहगमन केलें. यांस पुत्रसंतान नव्हतें.

तृतीय पुत्र माधवरावदाजीसाहेब यांचा जन्म शके १७०१ मध्यें झाला. भाऊंच्या कित्येक स्वाऱ्यांत हे गेले होते व भाऊ मांडवगण येथें प्रतिबंधांत पडले, त्यावेळींही हे बरोबर होते. भास्करपंत कोल्हटकर यांच्या पार्वतीबाई नामक कन्येबरोबर यांचें लग्न झालें होतें. दाजीसाहेब चैत्र वद्य ७ शके १७४० त वारले, त्यासमयीं त्यांची स्त्री सती गेली. यांस गोविंदरावनानासाहेब हे पुत्र होते.

चवथे पुत्र गणपतराव बापूसाहेब यांचा जन्म शके १७०७ मध्यें तासगांव येथें झाला. भाऊंच्या अंतकाळीं यांचें वय चौदा वर्षांचें होतें. यांचीं लग्नें तीन झालीं. पहिलें कुटुंब जानकीबाई, ही महादाजीपंत गाडगीळ यांची कन्या; दुसरें कुटुंब संगमेश्वरकर केळकर यांची कन्या, ही लग्न झाल्यावर लवकरच निवर्तली; आणि तिसरें कुटुंब सावित्रीबाई, परशुरामपंत सोमण यांची कन्या. बापूसाहेब शके १७४१ त वारले. त्यांस पुत्रसंतती नसल्यामुळें त्यांनीं परशुरामपंत यांस दत्तक घेतलें.

भाऊंचा पांचवा पुत्र विनायकराव हा लहानपणींच वारला.

भाऊंची वडील कन्या, बयाबाई ही बारामतीकर जोशी यांचे घरीं दिली होती. लग्न झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आंतच हिचा पति निवर्तला. त्यावेळीं हिचें वय सात आठ वर्षांचें होतें. भाऊंनीं पुण्यांत एकदां प्रसिद्ध रामशास्त्री यांस आपल्या वाड्यांत आणून या अल्पवयस्क मुलीची स्थिति त्यांना कळविली. तेव्हां ती पाहून शास्त्रीबोवांचें मन

ठरलें, आणि या अर्भकाचा पुनर्विवाह व्हावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. नंतर भाऊंनीं श्रीक्षेत्र काशीहून शास्त्रार्थ आणविले. त्यांत सर्वांनीं पुनर्विवाहाविषयीं आपली सम्मति दिली. तथापि, फार दिवस प्रचारांत नाहीं ती गोष्ट आपणच करून लोकांचीं मनें दुखवावीं, हें प्रशस्त नव्हे, असें कित्येकांनीं सुचविल्यावरून भाऊंनीं तो बेत रहित केला.

दुसरी कन्या, द्वारकाबाई कायगांवकर पाटणकर दीक्षित यांचे घरीं दिली होती. दीक्षित हे पेशवेसरकारचे कुलगुरु होते, व मोठे मान्य पुरुष होते.

तिसरी कन्या, मनकार्णिकाबाई वांईकर रघुनाथरावदादा वैद्य यांस दिली होती. इचा वंश रघुनाथ व्यंकटेश वैद्य प्रस्तुत जमखंडीस आहेत हा होय.

चवथी कन्या, उमाबाई प्रख्यात सावकार हुपरीकर जोशी, ज्यांस "नवकोट नारायण" ह्मणत, त्यांचे घरीं दिली होती.

भाऊंचे सर्व पुत्र निस्सीम पितृभक्त होते. पित्याच्या अर्ध्या वचनांत ते असत ; आणि त्याचा फार मान राखीत. त्याच्या जिवाकरितां ते जीव देत. त्याच्या सेवेंत आपला देह झिजावा ह्मणून ते नेहमीं फार उद्युक्त असत. भाऊंचा सर्वांवर सारखा लोभ असे. घरांत सद्गुणसंपन्न स्त्री आणि आज्ञाधारक, पराक्रमी व कीर्त्तिमान पुत्र असा सर्व गोष्टींनीं भाऊंचा प्रपंच थाटला होता. प्रपंचसुखाचा त्यांस पूर्ण अनुभव प्राप्त झाला.

प्रापंचिक संकटांत समाधान वृत्ति राहावयास धर्मनिष्ठा फार आवश्यक असते. ज्याची धर्मावर श्रद्धा नाहीं, तो पुरुष विपत्कालचें पहिलें वारें येतांच म्लान व निराश होऊन जातो. समाधान करून घेण्यास त्याला कोठें आधार नसतो. भाऊंची स्वधर्मावर फार श्रद्धा असे. नेहमीं स्वाऱ्यांची गडबड चाललीच असे, तरी स्नानसंध्या, जपजाप्य इत्यादि ईश्वरसेवेच्या कर्मांत ते कांहींना कांहीं तरी काल नियमानें घालवीत असत. अतीत, अभ्यागत, वैदिक, पुराणिक यांची ते योग्यतेनरूप संभावना करीत. विद्वान् व पूज्य अशा शास्त्रीपंडितांस व वैदिकांस त्यांनीं आपल्या संस्थानांत इनामें व वर्षासनें करून दिलीं, त्यांचा अद्यापि

त्यांचे वंशज उपभोग घेत आहेत. भाऊंनीं धर्मबुद्धीनें परोपकाराचीं व लोकोपयोगी कार्ये अनेक स्थळीं अनेक केलीं. बहुत काल लोटल्यामुळें, त्या सर्वांबद्दल आतां माहिती मिळणें अशक्य आहे. तथापि, त्यांतून जीं फारच प्रसिद्ध आहेत, व ज्यांची माहिती लोक सांगतात त्यांचीं नांवें येथें लिहितों.

श्रीकाशीक्षेत्रीं भाऊंनीं एक शिवालय बांधिलें व लक्ष ब्राह्मणांस इच्छाभोजन घातलें. या लक्षभोजनाची काशीक्षेत्रीं फार ख्याति झाली. या कृत्यास खर्च फार लागला. काशींत असें लक्षभोजन कोणीही घातलें नव्हतें. हें काम भाऊंनी धोंडो विश्वनाथ जोग यांजकडे सांगितलें होतें. भाऊंनीं श्रीकाशीक्षेत्रीं एक वाडा बांधून अतीत संन्याशी यांचा तेथें परामर्श व्हावा, अशी व्यवस्था केली, ती अद्यापि चालू आहे.

श्रीक्षेत्र पंढरी येथें श्रीपांडुरंगाचा सभामंडप, श्रीमारुतीचें देवालय व नगारखान्याकरितां कमान बांधिली. आणि श्रीअमृतेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला. या क्षेत्रींही भाऊंनीं श्रीविठ्ठलमंदिरा सन्निध एक वाडा घेऊन, तेथें श्रीविठ्ठलाच्या नैवेद्याची व कोणी अतीत संन्याशी आले असतां, त्यांच्या भोजनाची सोई होण्याकरितां अन्नसत्र ठेविलें, तेंही अद्यापि चालू आहे.

श्रीक्षेत्र पुणतांबें येथें श्रीगोदावरीच्या कांठीं शिवालय, घांट व वाडा बांधिला. आणि गांवास गांवकुसूं केलें.

तासगांव येथें श्रीगणपतीचें देवालय बांधिलें. गणपती हें भाऊंचें आराध्य दैवत असे. हें देवालय फार शोभिवंत, सुंदर व भव्य व्हावें, ह्मणून भाऊंनीं दूरदूरचे कारागीर आणविले होते. या देवालयांत श्रीगणपतिपंचायतनाची संस्थापना, कर्नाटकांतून मोठी मोहीम करून आल्यानंतर शके १७०१ फाल्गुण शुद्ध २ या दिवशीं भाऊंनीं सुमुहुर्तावर मोठ्या समारंभानें व थाटमाटानें केली. पेशवेसरकारच्या दरबारांत खटपट करून भाऊंनीं या देवस्थानाकरितां, दोन हजार रुपयांची जमीन, व दोन हजार रुपये वर्षासन करून घेतलें. तासगांव येथें हटकेश्वर ह्मणून एक अनादि स्थान होतें, त्याचा भाऊंनीं जीर्णोद्धार केला.

चिंचणी येथें श्री परशुरामेश्वराचें देवालय बांधिलें, व भिलवडी

येथें श्रीकृष्णेस मोठा घांट बांधिला. या घांटाची कारागीरलोक फार प्रशंसा करितात.

पुणें येथील तुळसी बागेंतील श्रीरामास भाऊंनीं भोकारी हा गांव इनाम दिला, आणि कायगांवकर दीक्षित यांस जळके परगणे नेवासें हा गांव त्यांच्या अन्नसत्राकरितां दिला. जमखंडी जवळ श्रीक्षेत्र असंगी येथें भाऊंचे चुलत बंधु विष्णु दीक्षित यांनीं श्री वेणुमाधवाचें देवालय बांधिलें होतें, त्याच्या पूजार्चेचा सतत खर्च चालण्याकरितां त्यांस असंगी हा गांव त्यांनीं इनाम दिला.

प्रतिवर्षीं शिवरात्रीस श्रीवालकेश्वर ( गणेशवाडी ); श्रीरामेश्वर ( रामतीर्थ ) श्रीकुसुमेश्वर ( कोतवडें ); श्रीहटकेश्वर ( तासगांव ) इ० अकरा मोठमोठ्या शिवालयांमध्यें महारुद्राभिषेक करण्याची भाऊंनीं व्यवस्था ठेविली होती.

कोंकणांतून हजारों गरीब ब्राह्मण प्रतिवर्षीं देशावर येत. त्यांच्या सोईकरितां आंबेघांट व अणुस्कुरें घांट यांवर भाऊंनीं मोठ्या खर्चानें अन्नसत्रें ठेविलीं होतीं.

याशिवाय भाऊंच्या कारकीर्दींत त्यांनीं केलेलीं मोठीं कृत्यें ह्मटलीं ह्मणजे चिंचणी गांवाजवळ मोठें धरण व जमखंडी येथें मोठा बळकट किल्ला बांधिला हीं होत. चिंचणीच्या धरणावर बागाइताचा फार उपयोग होत आहे.

---

# भाग १६.

## उपसंहार.

मागील पंधरा भागांत परशुरामपंत भाऊंच्या चरित्राचा कथाभाग पूर्ण झाला. या भागांत भाऊंच्या स्वभावादिकांविषयीं चार शब्द लिहून ग्रंथ समाप्त करूं.

महाराष्ट्र देशात आजपावेतों जे कोणी महापराक्रमी पुरुष होऊन गेले, त्यांतील श्रेष्ठांमध्यें भाऊंची गणना केली पाहिजे. शौर्य, धैर्य आणि साहस हे त्यांचे उपजत गुण होते. भीतीनें त्यांच्या मनास कधींही स्पर्श केला नाहीं. केवढाही प्रबळ शत्रु असो ; त्याच्या बरोबर दंड थोपटून समर करण्यास भाऊ सिद्ध असत. शत्रूस पाठ दाखविणें ह्मणजे प्रत्यक्ष मरणापेक्षांही अधिक ते मानीत. चौदा वर्षांचे असतां त्यांनीं युद्ध क्रम आरंभिला, आणि तोच क्रम आमरण अखंड चालविला. कोल्हापूरकर, हैदर, टिपू, निजाम व इंग्लिश अशा मोठमोठ्या रणशूर व बलाढ्य शत्रूंशीं त्यांनीं समर केलें, पण त्यांपैकीं एकासही ते हार गेले नाहींत. मराठ्यांच्या सर्व सरदारांवर त्यांनीं आपली शौर्यादि गुणांत छाप बसविली आणि सर्वांत श्रेष्ठत्व संपादिलें. त्यांचे अतुल पराक्रम पाहून हा प्रत्यक्ष "**परशुराम**" यवनादि राजांचा बलगर्व हरण्याकरितां पुनः अवतीर्ण झाला असें लोक ह्मणूं लागले. कर्नाटकांतले राजे त्यांच्या नांवाला थरथर कांपत. त्या प्रांतांत पेशवेसरकारचें वर्चस्व राखण्यास याच पुरुषाचे पराक्रम सर्वांशीं कारण होते.

भूतदया हा ईश्वरी गुण मानिला आहे, तो भाऊंच्या अंगीं फार वसत होता. कोणीही याचना करण्यास त्यांजकडे आला, आणि विमुख गेला, असें कधीं होत नसे. अनेक ठिकाणीं, अतीत अभ्यागतांच्या सोईकरितां त्यांनीं मोठ्या खर्चानें अन्नसत्रें ठेविलीं होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. पुष्कळ गरीब व कुटुंबवत्सल लोकांस त्यांनीं तासगांव येथें घरें करून दिलीं, आणि त्यांच्या कुटुंबांच्या चरितार्थाची सोई केली. दुसऱ्याचें दुःख पाहून ते हळहळत, आणि त्याचा परिहार करण्याकरितां आस्थापूर्वक झटत. स्वारी चालली असतां वाटेनें कोणी अनाथ, पंगु किंवा क्षुधित भेटला असतां, त्याचा समाचार घेतल्या शिवाय पुढें जाऊं नये, असा त्यांचा परिपाठ होता. अशी अद्यापि या प्रांतीं लोक प्रसिद्धि आहे. गरीब लोकांच्या उपयोगार्थ कोठें कोठें विहिरी व तलाव त्यांनीं बांधिलेले अद्यापि लोक दाखवितात. ज्यानें संग्रामसमयीं शत्रूचा प्राण घेण्याकरितां तुटून पडावयाचें, त्यानें अत्यंत दयाशील पुरुषापेक्षांही अधिक दया प्रकट करावी, हा एक चमत्कारच होय. डयूक आफ वे-

लिंगटन याचाही स्वभाव याच प्रकारचा होता. मनुष्याच्या स्वभावाची घटना कांहीं चमत्कारिक आहे.

पदरचे मानकरी, आश्रित आदिकरून परिजनांवर भाऊंचा फारच लोभ असे. परिजन आदिकरून हे आपल्या कुटुंबांतीलच आहेत, असें ते मानीत, आणि आपल्या पुत्राप्रमाणें त्यांचा प्रतिपाळ करीत. स्वारींत असोत, देशांतरीं, असोत, किंवा कोठेंही असोत, त्यांच्या हितांविषयीं निरंतर काळजी वाहात. ज्याला एकदां आपला असें त्यांनीं ह्मटलें, त्याला त्यांनीं कधींही अंतर दिलें नाहीं. पेशवेसरकारची इतराजी झाल्यामुळें कित्येक थोरथोर गृहस्थ त्यांच्या आश्रयास आले, त्यांस त्यांनीं त्यांच्या इतमामाप्रमाणें ठेवून घेतलें; व त्यांस नेमणुका करून दिल्या. त्यांचा अद्यापि त्यांचे वंशज उपभोग घेत आहेत. आपल्या मंडळीचा त्यांना मोठा अभिमान असे. आणि त्यांचा उत्कर्ष त्यांस फार प्रीय असे. त्यांपैकीं पुष्कळांस त्यांनीं योग्यतेस चढविलें. कित्येकांस गांव इनाम दिले; कित्येकांस जमिनी दिल्या; आणि कित्येकांस पेशवेसरकारांतून मामलती देवविल्या. अशा पुरुषाच्या ठायीं पदरच्या परिजनांचें अढळ व अप्रतिम प्रेम जडलें यांत नवल नाहीं. ते सर्व त्यांना पितृतुल्य मानीत. आणि त्यांजकरितां आपलें सर्वस्व खर्चण्यास सिद्ध असत. मांडवगण येथें भाऊ प्रतिबंधांत पडले, तेव्हां त्यांच्या सेवकांनीं व आश्रितांनीं, त्यांच्या मुक्ततेकरितां नानाप्रकारचे परिश्रम केले. भाऊंना दूरदेशीं नेऊन पोंचवावें, असे नानांचे बेत चालले होते ते दीर्घ प्रयत्न करून त्यांनीं रहित केले; भाऊंच्या जवळ सक्त पाहरा होता, तरी त्यांतून भेदून जाऊन कित्येकांनीं वैरागी, गोसावी अशा प्रकारचे नानाविध धारण करून त्यांची भेट घेतली; कित्येकांनीं शिंद्याकडे, त्याची प्रियपात्र नाटकशाळा, ( केसरा ) इच्या द्वारें त्यांच्या मुक्ततेचें धोरण बांधिलें; कित्येकांनीं रास्त्यांस भारिलें; आणि कित्येक शूर तर जिवाची पर्वा न करितां जवळच्या पहारेकऱ्यांस कापून काढण्यास उद्युक्त झाले. अशा निष्ठेचे भाऊंचे सेवक होते. सेवक उत्तम होणें हें बहुतांशीं धन्याच्या हातीं आहे असें ह्मणतात, तें यथार्थ आहे.

भाऊंच्या उत्तम गुणामध्यें त्यांच्या एक पत्नीव्रताची योग्यता फारच मोठी मानली पाहिजे. अल्पवयांत ऐश्वर्य प्राप्त झालें असतां, व

नगर ... शिवाजी

विषयोपभोगाच्या सर्व अनुकूलता असतां, आजन्म त्यांनीं कडकडीत एकपत्नीव्रत चालविलें, या गुणाबद्दल, त्यांची कितीही प्रशंसा केली तरी थोडीच आहे. महाराष्ट्रदेशाच्या इतिहासांत या गुणांत भाऊंच्या जोडीस बसविण्याजोगे फारच थोडे पुरुष सांपडतील.

भाऊ मनाचे फार मोकळे व निष्कपटी होते. आंत एक आणि बाहेर एक हें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. पण जग हें कपटानें भरलेलें आहे. त्यांत नुसत्या सरळ वर्तनाचा परिणाम लागत नाहीं. या गोष्टीचा अनुभव भाऊंना उत्कृष्ट आला, आणि चांगली अद्दल घडली. नाना फडणवीस व बाळोबातात्या यांमध्यें पेशवाईंतील कारभाराविषयीं प्रतिस्पर्धा सुरू झाली; तेव्हां त्यांनीं भाऊंना मध्यें घेऊन, त्यांचें नांव पुढें केलें, आणि स्वार्थ साधिले; व त्याला तोंडघशीं दिलें. यावरून पाहतां व्यवहारांत सरळवर्तन सर्वदां हितकर होतेंच, असा नियम नाहीं. निदान कपटपटु पुरुषा बरोबर तरी, तशा वर्तनाचा उपयोग होत नाहीं हें सत्य आहे.

स्वामीकार्याविषयीं तत्परता, हा एक भाऊंच्या आंगीं वर्णनीय गुण होता. पेशवेसरकारचें लहान मोठें कोणतेंही काम पडो, भाऊंना आज्ञा होतांच, तें बजाविण्याविषयीं ते सिद्ध असत. एका स्वारीचें काम फत्तेकरून यावें, तों दुसरीवर जाण्याविषयीं आज्ञा; याप्रमाणें एकसारखा क्रम चालला होता; तथापि, एकदांही पेशवेसरकारच्या आज्ञेस त्यांनीं ना म्हटलें नाहीं; किंवा हातीं धरलेला कार्यभाग साधण्यास किंचित् आळस केला नाहीं. असे स्वामीकार्यरत पुरुष थोडे सांपडतील. प्रख्यात समुद्रावरचा योद्धा नेल्सन याप्रमाणें, स्वामीकार्यापुढें ते आपलें स्वतःचें सुख तुच्छ मानीत. सामान्यतः मनुष्याचा स्वसुखाविषयीं मोठा ओढा असतो; तेव्हां ज्यानें स्वसुखाची पर्वा न धरितां आपला सर्व देह स्वामीकार्यार्थ झिजविला, आणि त्यांतच भूषण मानिलें त्याची योग्यता फारच मोठी, यांत संशय नाहीं. एकदां भाऊंची स्वारी श्रीरंगपट्टणच्या मोहिमेवर गेली असतां तिकडेच दोन वर्षें राहणें झालें. तेव्हां बरोबरचे सर्व लोक कंटाळले. या प्रसंगीं भाऊंच्या सैन्यांत नलगे आडनांवाचा कोणी शिलेदार होता तो भाऊंजवळ येऊन म्हणाला,

" धनीसाहेब, आपणासमागमें लहान मोठ्या शंभर लढाया मारल्या, आतां चाकरी तरी किती दिवस करावयाची ? घरीं आईबाप, बायकामुलें यांनीं आमची चिंता करावी आणि आह्मी येथें त्यांची करावी. आतां आम्हास रजा द्या. आम्ही कंटाळलों." भाऊंनीं त्याची समजूत केली आणि ह्मटलें, " बाबा, आपण सर्व सरदार आणि शिलेदार पेशवेसरकारास आपला देह अर्पण केला आहे. त्यांची एकनिष्ठ सेवा हीच आपली कर्त्तव्यता, आणि त्यांचा जय हेंच आपलें सुख होय. पेशवेसरकारानें आपल्या पराक्रमावर विश्वास ठेवून आपणांस अशा महत्वाच्या मोहिमेवर पाठविलें. आपल्या सर्व अडचणी व संकटें मोठीं आहेत खरीं, पण सरकारच्या कामांत तीं सर्व एकीकडे ठेविलीं पाहिजेत. आपण येथें आळस केला, तर पेशवेसरकारची बाजू कोणी राखावी, आणि स्वराज्याचा उदय कसा व्हावा ? स्वराज्याच्या सेवेचें प्रत्येक व्यक्तीकडे कांहींतरी काम आहे, त्यांत आपल्या वांट्यास हें आलें आहे. तें आपण मनःपूर्वक केलें पाहिजे. तसें न करूं तर आपण दोषी ठरणार नाहीं काय ?"

सेनानायक यासंबंधानें पाहतां, भाऊंची गणना अर्वाचीन वीरांत अग्रस्थानीं केली पाहिजे. सेनानायकाचे सर्व गुण त्यांच्यामध्यें पूर्ण वसत होते. शिपायांच्या व शिलेदारांच्या संकटाचे व दुःखाचे ते आपण वांटे करी होत. आपल्या सुखापेक्षां त्यांच्या सुखा करितां व सोई करितां ते अधिक जपत. त्यांच्या मंडळींत मिसळणें; त्यांच्या बरोबर गोडगोड भाषण करणें; त्यांचे पराक्रम पाहून त्यांना देणग्या देणें; त्यांच्या गमती करितां अनेक प्रकारचे खेळ करणें; आणि सणवारीं त्यांना मोठमोठ्या मेजवान्या करणें; या गोष्टींची त्यांना फार हौस असे. स्वारीचा तळ पडला, म्हणजे सर्वांची पोटपाण्याची व शिधासामुग्रीची सोय करून द्यावी, आणि मग आपली सोय पहावी असा त्यांचा परिपाठ होता. सैन्यांत अजारी असेल त्याच्या पथ्यापाण्याची तजवीज करणें; थकला असेल त्याला साह्य करणें; आणि क्लेश पावलेला असेल, त्याचें समाधान करणें; या गोष्टींविषयीं ते फार दक्ष असत. यामुळें सैन्यांत ते अत्यंतप्रिय होते. प्रत्येकास आपला जीव प्यारा असतो, तो जीवही भाऊंच्या कार्यार्थ खर्चण्यास कोणी मागेंपुढें पाहत

नसत. भाऊंच्या उपयोगीं पडण्यास 'मी पुढें कीं तूं पुढें' अशी त्यांची प्रतिस्पर्धा चाले. त्यांची नुसती सूचना आली पुरे, ते पाहिजे त्या कामावर जाण्यास तयार असत. प्रख्यात वीरनायक बोनापार्ट याचे शूर शिपाई जसे पाहिजे त्या मोहिमेवर त्याजबरोबर मोठ्या उत्छाहानें जात, तसेच भाऊंचे शिपाई त्यांजबरोबर पाहिजे तेथें जात. बोनापार्ट एल्बा बेटांत प्रतिबंधांत असतां तेथून गुप्तपणें येऊन फ्रान्स देशांत त्यानें पाय ठेवितांच, त्याचे पुरातन वीर जसे त्याजवळ लागलेच जमले, तसेच सातारचें बंड मोडण्याकरितां भाऊंची प्रतिबंधांतून मुक्तता होतांच त्यांजजवळ त्यांचे पुरातन हजारों वीर जमले. सैन्यसमागमें घेऊन बोनापार्टानें जशा कित्येक वेळ फारच मोठमोठ्या मजला मारल्या, तशाच भाऊंनींहि मारिल्या. बोनापार्टाचे अनेक सर्वमान्य गुण या ब्राम्हणवीरश्रेष्ठामध्यें वास करीत होते.

ज्याला मोठमोठ्या स्वाऱ्या करून यश संपादन करावयाचें आहे, त्याला आपलें सैन्य अर्ध्या वचनांत ठेवणेंही गोष्ट मुख्य साधावी लागते. सरदार मोठा शूर आहे, पण त्याचें सैन्य त्यास अनुकूल नाहीं, तर त्याच्या हातून कोणतेंही महत्कृत्य व्हावयाचें नाहीं. एखादे प्रसंगी तो पटकर कदाचित् प्राणासही मुकेल. पण सैन्य अनुकूल ठेवणें ही गोष्ट सामान्य नाहीं. आपल्या कुटुंबांत दहा बारा मनुष्यें असतात, तीं सर्व परस्पराचीं आप्त, एकत्र राहिलेलीं असतात ; पण त्या सर्वांचीं मनें संतुष्ट ठेवून संसाराचा गाडा हांकणें आपणास अवघड पडतें ; मग अनेक जातींचे व अनेक ठिकाणचे लोक ज्या सैन्यांत असावयाचे, त्या सैन्यास देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकास विदेशांत नेणें ; आणि त्याला आंवर घालून व आपलेसें करून, परकीय राष्ट्रांशीं, त्यांच्या हातून मोठमोठीं तुमुल युद्धें करविणें हें कृत्य किती शहाणपणाचें व धूर्ततेचें आहे याची कल्पना करा. हें कृत्य भाऊंस उत्कृष्ट रीतीनें साधलें होतें.

अंगीकारिलेल्या कार्याची दृढनिश्चयपूर्वक पाठ पुरविणें हा एक भाऊंच्या आंगीं विशेष गुण होता. त्यांनीं केलेल्या स्वाऱ्यांत सर्वदां त्यांना प्रथमच यश मिळालें असें नाहीं, पण अपजयानें निराश न होतां, यश प्राप्त्यर्थ अधिकच निश्चयानें ते उद्योग करीत, त्यामुळें त्यांचे मनोदय सफल होत. भाऊ जबरदस्त उद्योगी होते. लढाई करावयाचा किंवा

हल्ला करावयाचा निश्चय ठरला, ह्मणजे अतिक्षुल्लक कामापासून तों अतिमहत्वाच्या कामापर्यंत, ते जातीनें देखरेख करीत. उचलिलेलें काम तडीस नेल्याशिवाय त्यांना झोंप येत नसे. उद्योग व दृढनिश्चय हीं यशप्राप्तीचीं मुख्य अंगें होत, असें ह्मणतात तें सत्य आहे. या गोष्टींत भाऊंचा कित्ता, त्यांच्या देशबांधवांनीं घेण्यासारिखा आहे.

कोणत्याही लहान मोठ्या कामांत आपण मन घातल्याशिवाय आणि त्याविषयीं आपण खपल्याशिवाय लोकांच्या मनांत त्याच्याविषयीं अगत्य उत्पन्न व्हावयाचें नाहीं हें बीज भाऊंना उत्कृष्ट माहित होतें. ते जीं जीं कामें हातीं घेत, तीं तीं करण्यास अगोदर स्वतः कंबर बांधीत. आपल्या सैन्यानें एकटें जिवावर उदार होऊन जावें, आणि आपण स्वस्थ मागें मौज पहात राहावें, हें त्यांना अगदीं आवडत नसे. युद्धप्रसंगीं भाऊ आपल्या सैन्याच्या अग्रभागीं होत, आणि स्वतः पराक्रम करून दाखवून आपल्या सैन्यास उत्तेजन देत. तेणेंकरून त्यांच्या शूर शिपायांना अधिकच स्फुरण चढे आणि आवेश येई व शत्रूंशीं लढतांना ते आपल्या जीवाकडे पहात नसत. संग्रामास निघण्यापूर्वीं भाऊ आपल्या सैन्यास ह्मणत, "शूरांनो, मी तुमचा सरदार खरा. पण माझी सरदारी राखणें सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे. मी शेरभर पिठाचा मालक. सर्व भूषण तुमचें आहे. युद्धांत मरण आलें तर स्वर्गवास मिळेल. यश आलें तर अखंड कीर्त्ति होईल. आपल्या पूर्वजांचे पराक्रम आठवा; आणि कीर्त्ति मिळवा. अपयश घेऊं नका. आमची पेशवेसरकारची, आणि मराठी राज्याची शोभा सर्व तुमच्या हातीं आहे." या प्रोत्साहजनक भाषणानें भाऊंच्या लोकांस इतकी वीरश्री येत असे कीं, एकदां भाऊपुढें झाले, आणि ते मागून निघाले, ह्मणजे मग कोणालाही ते आवरत नसत.

आतां भाऊंच्या गुणांचेंच वर्णन केलें, यावरून त्यांचे दोषच शोधण्याचा कोणी यत्न केला असतां, त्याला एकही दोष सांपडावयाचा नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं. कोणाही मनुष्याच्या सर्वच कृति निर्दोष होणें, ही गोष्ट अशक्य आहे. कोणास कांहींना कांहींतरी गोम असतेच. भाऊंनीं बाजीरावास जुन्नराहून बोलावून आणिलें, तेव्हां तेथें त्यांनीं शपथा आणा घेतल्या व अभयवचनें दिलीं, तीं त्यांनीं पाळलीं

नाहींत, आणि उलटे ते त्याच्याच नाशास प्रवृत्त झाले, हा त्यांच्या हातून मोठाच प्रमाद घडला. ही गोष्ट त्यांच्या नेहमीच्या वर्तनास फार सुटून झाली, आणि हे सर्व नानांचे खेळ होते हें खरें. पण त्यांत भाऊंचा दोष कमी ठरतो असें नाहीं. येथून भाऊंची घडीच बिघडली. पुढें पेशवेसरकारचा कारभार त्यांच्या हातीं आला, त्यांतही त्यांचें वर्णन करण्यासारखें तेज पडलें नाहीं. भाऊ शूरत्वगुणांत जितके उत्कृष्ट शोभत होते, तितके राज्यकारस्थानीपणांत नव्हते. तथापि, हे अल्पस्वल्प दोष त्यांच्या प्रतापाच्या तेजांत सर्व लपून जातात, हें कोणीही प्रांजलपणें कबूल करील.

गुणदोषांचा विचार करून पाहतां भाऊंच्या आंगीं गुणांचेंच आधिक्य फार होतें हें निर्विवाद आहे. म्हणून त्यांच्या दोषांकडे दृष्टि न देतां, त्यांचीं सर्व महत्कृत्यें लक्षांत आणावीं, आणि ज्यानें आपलें नांव या देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गाजविलें ; ज्यानें अनेक संग्रामांत मराठ्यांच्या राज्याची बाजी राखून गाजी म्हणवून घेतलें ; ज्यानें शिंदे, होळकर इत्यादि महान् महान् योद्ध्यांस मागें टाकून ऐश्वर्यगिरीच्या शिखरावर उड्डाण केलें ; ज्यानें आपल्या अतुल प्रतापांनीं महाराष्ट्रवीरांची दिगंतरीं कीर्त्ति केली ; आणि ज्यानें अजरामर कीर्त्ति मागें ठेवून, अखेरीस धारातीर्थींच देहविसर्जन केलें, तो पुरुष किती थोर, किती धन्य, आणि किती पराक्रमी असावा, याचा विचार करावा. अशा प्रकारचे पुरुष सर्व महाराष्ट्रदेशीय जनांस अत्यंत पूज्य होत.

समाप्त.

महाराष्ट्र ...
क्रमांक
भिवंडी.
...वाचनालय



# या पुस्तकाविषयीं विद्वानांचे अभिप्राय.

"कर्नाटक प्रांतांतील संस्थानांचा इतिहास" या पुस्तकाचे कर्ते प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या अभिप्रायाकरितां मंडळीनें आ-जला पुस्तकें पाठविलीं होतीं. त्यांनीं सदहू पुस्तकांविषयीं अभिप्राय लिहून पाठविला. त्यांतील या पुस्तकासंबंधी कित्येक वेंचे.

"[ नंबर २ ] हा ग्रंथ फार खुलासेवार आहे, आणि यांत अगदीं नवी माहिता फार आहे. या ग्रंथकारानें पुष्कळ मूळलेख मिळविले आहेत; आणि आपल्या ग्रंथांत त्यांचा पूर्ण उपयोगही केला आहेसें दिसतें. * * * त्याची विषयरचना पद्धतवार आहे. ज्यांत भाऊंचा विशेष संबंध नव्हता अशा गोष्टींस उगीच प्रधानत्व देऊन वर्णन करण्याचा प्रमाद त्याच्या हातून झाला नाहीं. ज्यांत भाऊंचा प्रमुखत्वें करून संबंध आहे व ज्यांत त्यांनीं मराठ्यांच्या अवाढव्य सैन्यावर आधिपत्य चालवून स्वतंत्रतेनें कामगिऱ्या बजाविल्या, अशा मुख्य गोष्टी ह्मटल्या ह्मणजे त्यांनीं जनरल गाडर्ड साहेबांचा बोरघाटांत केलेला पराजय; म्हैसूर व कर्नाटक प्रांतांत त्यांनीं केलेल्या स्वाऱ्या; खर्ड्याची लढाई; आणि कोल्हापूरच्या राजावर केलेली स्वारी; या होत. तसेंच दुसरा बाजीरावपेशवा राजपदारूढ होतांना व तत्पूर्वी पुण्यांत जीं कारस्थानें व जे कट झाले, त्यांतही त्यांचें फार अंग होतें. या गोष्टींस प्रधानत्व देऊन ग्रंथकर्त्यानें आपल्या ग्रंथाचा बराच भाग त्यांजकडे अर्पिला आहे, आणि भाऊंच्या चरित्रांत ज्याप्रमाणें त्यांचें पूर्ण विवेचन झालें पाहिजे होतें, तसें त्यांचें विवेचन केलें आहे.

सामान्यत: त्याचे लेख निर्दोष व विषयास लागू असे आहेत. त्याची भाषा साधी आहे * * * व विशेषें करून भाऊ सारख्यांच्या चरित्रास साजण्यासारखी आहे. या पुस्तकांत मोठा गुण हा आहे कीं, या ग्रंथकारानें मिळविलेली माहिती भरपूर व विपुल आहे. * * * मंडळीनें दिलेल्या जाहिरातींतील अटी या ग्रंथकर्त्यानें पूर्ण केल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. आरंभीं हा ग्रंथ जरी अत्यंत साधा दिसतो तरी जेथें जेथें भाऊंच्या चरित्रांतील अतिशय महत्वाच्या कृत्यांचें वर्णन करण्याचे प्रसंग आले आहेत तेथें तेथें तो विशेषच रमणीय झाला आहे. शिवाय, आपल्या

गोष्टीस सर्वत्र सारखें स्वरूप देण्याकरितां, त्यानें बाह्य विषय, आपल्या ग्रंथांत घुसडून दिल्याचें आढळत नाहीं. जेवढ्याविषयीं त्याला लेखी आधार सांपडला, तेवढेंच त्यानें लिहिलें आहे. * * *

म्हणून माझा असा अभिप्राय आहे, कीं, नं० २ चा ग्रंथ दुसऱ्या ग्रंथापेक्षां खरोखर श्रेष्ठ आहे ; आणि मंडळीनें त्याला आश्रय द्यावा हें योग्य आहे."

---

मराठी ग्रंथमंडळीच्या मार्फत एका उदार सद्गृहस्थानें परशुरामपंत भाऊसाहेब पटवर्धन तासगांवकर यांचें चरित्र जो उत्कृष्ट लिहील त्यास ३०० रुपयांचें बक्षिस देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें तीन ग्रंथ मंडळीकडे आले, त्यांपैकीं रा० रा० भिकाजी धोंडदेव निगुडकर यांचा ग्रंथ सर्वानुमतें पसंत ठरला, त्यावरून त्यांस बक्षिस देण्यांत आलें आहे. ग्रंथमंडळीचा व्यवस्थापक या नात्यानें हा ग्रंथ मीं समग्र वाचून पाहिला आहे. याची भाषा सरळ व सुबोध असून चरित्रकथनास जो नेमस्तपणा अवश्य आहे, तो या ग्रंथांत चांगला साधला आहे. मुख्य सत्यासत्याविषयीं चवकसपणा चरित्र लिहिणाराच्या आंगीं पाहिजे. आपल्या चरित्राचा नायक सर्वगुणसंपन्न व सर्वदोषरहित असतो अशी बुद्धि धरून ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त झाल्यास चरित्रकथन शुद्ध व मार्मिक होत नाहीं. हे दोन्ही विचार निगुडकर यांनीं मनामध्यें बाळगून चरित्र लिहिलें आहे. चरित्रसंबंधी लागणारी माहिती केवळ इंग्रजी पुस्तकांवरून न घेतां होईल तेवढें करून स्वतंत्र बखरी, हकीकती, पत्रें पटवर्धन संस्थानांतून मिळवून ग्रंथ लिहावा अशी अट ठेवण्यांत आली होती. त्याप्रमाणें बरेच अंशानें त्यांस स्वतंत्र माहितीचीं साधनें मिळालीं हें प्रस्तावनेस जोडलेल्या यादीवरून दिसून येईल. हे सर्व लेख निगुडकर यांजकडून आणवून पाहिले, व सवडीप्रमाणें ते 'काव्येतिहासांत.' छापण्याविषयीं निगुडकर यांस शिफारस केली आहे. शिवाय श्री० रा० चिंतामणरावआपासाहेब सांगलीकर यांनीं आपल्या कारकीर्दीची हकीकत स्वतां लिहिलेली माझ्या पाहण्यांत आली, ती निगुडकर यांस ग्रंथ छापण्याचें काम चालू असतां दिल्यावरून त्या हकीकतीचा ही उपयोग योग्य ठिकाणीं केला आहे. एकंदरींत भाऊसाहेब

... महाराज विशीत ... खासगी

पटवर्धन यांची योग्यता ज्यांस ऐकून ठाऊक आहे अशा प्रत्येक मनुष्यानें हा ग्रंथ संग्रहास ठेवावा व पटवर्धन संस्थानिक यांनीं या ग्रंथास आपला उदार आश्रय द्यावा अशी मी शिफारस करितों.

**महादेव गोविंद रानडे.**

---

रा० रा० भिकाजी धोंडदेव निगुडकर यांणीं केलेलें " **परशुराम-भाऊ पटवर्धन यांचें चरित्र** " आम्हीं समग्र वाचिलें. ग्रंथकर्त्यांनीं माहिती मिळविण्याचे कामीं बहुत श्रम घेतले असून तिचा उपयोगही त्यांनीं योग्य स्थळीं करावा तसा केला आहे. ग्रंथकर्त्याची भाषा सोपी व साधी आहे व ग्रंथामध्यें फाजील गोष्टींचा समावेश न करण्याविषयीं होईल तितकी काळजी बाळगली आहे. चरित्रकाराच्या अंगीं जे निष्पक्षपातिता, समदृष्टि आणि यथार्थ वर्णन करण्याविषयीं सावधगिरी हे गुण असावे ते प्रस्तुत ग्रंथकाराच्या अंगीं आहेत हें एक नवीन चरित्रकारांस अनुकरणीय उदाहरण आहे. एकंदरीनें हें पुस्तक आमच्या मतानें ग्रंथोत्तेजक मंडळीनें पसंत करण्यासारखें आहे.

( सही ) **गोपाळराव हरि देशमुख.**
ग्रं० मं० चे अध्यक्ष.

---

**मराठी ग्रंथोत्तेजकमंडळी**च्या सन १८८१।८२ सालच्या रिपोर्टांतील उतारा.

" * * * * एकंदरींत रा० रा० भिकाजी धोंडदेव निगुडकर यांचें पुस्तक मंडळीस पसंत पडलें. त्यांतील मुख्य गुण हा आहे कीं, भाषा साधी व सरळ असून मधून मधून भाऊंच्या शौर्याचें वर्णन करण्याचा प्रसंग आला आहे तेथें ती रसभरित झाली आहे. तसेंच माहिती मिळविण्याच्या कामीं ग्रंथकर्त्यानें फार परिश्रम घेऊन पुष्कळ संग्रह केला, व त्याचा उपयोगही चांगल्या विचारानें केलेला आहे. * * * पुस्तक छापून तयार झालें ह्मणजे पुष्कळ अंशानें मराठींत चरित्राच्या ग्रंथांची जी उणीव आहे, ती कमी करण्याविषयीं प्रथम प्रयत्न झाला असें मानण्यास हरकत येणार नाहीं. "

**कृष्णराव बापूजी मांडे.**
ग्रं० मं० चे सेक्रेटरी.